Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

Journal of Research and Development

Multidisciplinary International Level Referred Journal

April-2022 Volume-13 Issue-21

Chief Editor
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot
No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Editor

Dr. M.N. Kolpuke
Principal,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur

Dr. V.D. Satpute
Principal,
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani

Address
'Ravichandram' Survey No-101/1, Plot,No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal

20 April 2022 Volume-13 Issue-21

Chief Editor
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Guest Editor	Guest Editor
Dr. M.N. Kolpuke	**Dr. V.D. Satpute**
Principal,	**Principal,**
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur	**Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani**

Executive Editors
Dr. C.J. Kadam
I/c Vice-Principal and IQAC Coordinator,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur
Dr. M.B. Patil
IQAC Coordinator
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani

Editorial Board

Dr. N.V. Pinamkar	**Dr. A.M. Mulajkar**	**Dr. M.D. Kachave**
Dr. A.B. Dhalgade	Dr. A.D. Chavan	Dr. B.R. Shinde

Published by-Dr. R. V. Bhole, 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

CONTENTS

Sr. No.	Paper Title	Page No.
1.	काळा पैसा व भारतीय अर्थव्यवस्था **प्रा.डॉ. डी. पी. कांबळे**	1-6
2	चिरस्थायी विकास काळाची गरज **प्रा. डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे**	7-11
3	जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवरील परिणाम **प्रा.सखाराम बाबाराव कदम**	12-18
4	जागतिकीकरणानंतर वाणिज्याचे बदलते प्रभाव **डॉ. बालाजी शिवाजी राजोळे**	19-22
5	वैश्वीकरण का हिंदी साहित्य पर प्रभाव हिंदी भाषा का वैश्विक दायरा बढ़ने से रोजगार के वसर **डॉ.संगीता राहुल यादव**	23-24
6	सुशीला टाकभौरे की कविता में दलित चेतना **सहा.प्रा. योगेश्वर रामजी कु-हाडे**	25-28
7	सार्वजनिक खाजगी भागीदारी **डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव**	29-32
8	वैश्वीकरण का हिंदी साहित्य पर प्रभाव **प्रा. डॉ. वनिता बाबुराव कुलकर्णी**	33-36
9	सामाजिक विषमतेची जाणीव **प्रा.डॉ. जोशी रोहिणी सुधाकर**	37-39
10	जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावरील परिणाम **डॉ. मीनाक्षी देव (निमकर)**	40-43
11	जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्था **प्रा. मोटे भैरवनाथ बब्रुवान, डॉ. शेषेराव एस. देवनाळकर**	44-47
12	हिंदी साहित्य में अनुवादित मराठी दलित आत्मकथाएं **डॉ. गोरे मृणाल शिवाजीराव**	48-49
13	अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर प्रसार माध्यमांचा पडलेला भाव जागतिकीकरणाच्या संदर्भात **प्रा.विलास माणिकराव गायकवाड**	50-52
14	महिला उद्योजका समोरील प्रश्न एक अभ्यास **प्रा. उषा यशवंतराव माने**	53-55
15	रशिया युक्रेन संघर्षाचा जागतिक राजकारणावरील परिणाम-विशेष संदर्भ भार **प्रा.बदनाळे शिवरुद्र शरणप्पा**	56-57
16	महिला सक्षमीकरण आणि स्वयं - सहायता बचत गटांची भूमिका: विशेष संदर्भ परभणी जिल्हा ,(महाराष्ट्र) **डॉ. सुभाष तातेराव पंडित**	58-62
17	20 व्या शतकातील जागतिक पातळीवरील विकासाच्या हक्काचा प्रवास **डिके विनोद रमेश**	63-68
18	आशा सेविकांचे ग्रामीण विकासातील आरोग्यदविषयक कार्यः एक चिंतन **प्रा. सौ. धनश्री लोकचंद राणे, डॉ.सुनिता श्री. बाळापुरे**	69-71

19	प्राचीन मराठी वाङ्मयातील अभिजात परंपरा **डॉ.लोकचंद राणे**	72-76
20	सविता सिंह की कविताओं में नारी अस्मिता का स्वर **डॉ. रमेश माणिकराव शिंदे**	77-80
21	संरक्षण यंत्रणा Defense Mechanism **प्रा.डॉ.सचिन बाबुराव खोकले**	81-83
22	जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता **प्रा.के.एम.लोखंडे**	84-88
23	रशिया - युक्रेन युद्ध : जागतिक तिसऱ्या महायुद्धाची चाहूल **प्रा. डॉ. भुजंग पाटील**	89-93
24	कोविड – १९ आणि मानसिक आरोग्य व उपाय **डॉ. आंबटकर वृषाली ओंकार**	94-96
25	भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान **डॉ. विनायक रावसाहेब वाघमारे**	97-100
26	हिंदी-मराठी दलित स्त्री आत्मकथाएँ: जीवन संघर्ष की व्यथा-कथा 'दोहरा अभिशाप' और 'जीणं आमुचं' के विशेष संदर्भ में **डॉ. संजीवकुमार नरवाडे**	101-104
27	भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनांची वाटचाल **प्रा. प्रविण रामदास जाधव**	105-107
28	भाषेतील नवप्रवाह आदिवासी साहित्य **श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव**	108-109
29	वैश्वीकरण और समकालीन हिन्दी उपन्यास **डॉ . जिन्सी जोसफ**	110-111
30	आरोग्य हिच धनसंपदा **प्रा.विजय उपलंचवार**	112-114
31	मानसशास्त्रातील प्रचलित प्रवाह **प्रा. डॉ. गणेश वायकोस**	115-118
32	कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम **प्रा. डॉ. नागनाथ महादेव अदाटे**	119-122
33	कोरोना काळ व साहित्याचे बदललेले स्वरूप **डॉ. भास्कर गायकवाड**	123-126
34	भारताच्या आर्थिक विकासातील राजकोषीय तुटीचे महत्त्व **जाधव रूपाली, डॉ. गाडेकर बी. पी.**	127-132
35	भारतीय इतिहासलेखनातील स्त्रीवादी इतिहासलेखन प्रवाह **डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार, डॉ.नितीन पांडुरंगराव बावळे**	133-135
36	अंकेक्षण आतील आधुनिक प्रवाह एक अभ्यास **प्रा.डॉ.शिंदे.बी.आर**	136-138
37	मराठी भाषा स्थित्यंतरे **डॉ. एम. के. शिंदे**	139-140

38	दळण वळण नवीन सुधारणा एक विचार प्रवाह **श्रीकांत गव्हाणे**	141-143
39	महिला उद्यमिता **डॉ सुरेखा पिपलानी**	144-146
40	आंबेडकरोत्तर काळातील आंबेडकरवादी चळवळी **प्रा.डॉ. बी.एम. काळे**	147-151
41	मोगलकालीन कृषी व्यवसायाचा ऐतिहासिक दृष्टीकोण **पवार डी. व्ही.**	152-154
42	भारतातील कौशल्य विकास व योजनांचा चिकित्सक अभ्यास **प्रा.पांचाळ विजय किशनराव**	155-157
43	स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता या घटकांचा तुलनात्मक अभ्यास. **शितल भागवत जाधव प्रा.डॉ.रमेश पठारे**	158-162
44	उद्योजक आणि महिला उद्योजकांची वाटचाल **डॉ. कु. धुतमल वर्षा सिताराम**	163-165
45	आधुनिक हिन्दी साहित्य में नारी **प्रा. डॉ. वडचकर एस.ए.**	166-168
46	बँकींग क्षेत्रातील सुधारणा **प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे**	169-173
47	नागरी सहकारी बँकांचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थिती **प्रा. डॉ.अरूण बळीराम धालगडे सय्यद फारुखअली जहूरअली**	174-176

काळा पैसा व भारतीय अर्थव्यवस्था

प्रा.डॉ. डी. पी. कांबळे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी ता. औसा जि. लातूर

Email : dkamble407@gmail.com

प्रस्तावना :संपूर्ण जग आणि भारत काळ्या पैशाच्या समस्येत गुरफटले आहे, दिवसेंदिवस होणारी आर्थिक विषमतेतील वाढ, नैतीक मुल्यांचे वाढते अधःपतन, सत्ता व राष्ट्रीय संपत्तीचा गैरवापर, मौद्रीक धोरणावर होणारे विपरीत परिणाम, भाववाढीची वाढती कमाने, चैनिच्या वस्तुचे वाढते महत्व, जमिन व इमारतीच्या किमतीत होणारी वाढ, अशा अनेक परिणामांना अर्थव्यवस्थेला सामोरे जावे लागते. यामुळेच देशासाठी आखण्यात आलेले नियोजन फोल ठरुन त्यात विसंगती निर्माण होते. परिणामी अर्थव्यवस्थेला अनेक विषमतेला सामोरे जावे लागते, पैशाचा प्रचंड ओघ समाजातील एका घटकाकडे वाढत जातो, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होवून प्रामाणिक व्यक्तींना मात्र उदरनिर्वाह करणे अवघड होऊन बसते. काळ्या पैशाचा समाजाच्या मानसिकतेवर वाईट परिणाम होतो. लाच-लुचपतीची प्रवृत्ती वाढते, व नैतीक मुल्यांची हानी होवून गैरव्यवहार हेच शिष्टाचार बनू पाहतात. नैतीकतेच्या अभावातून काळ्या पैशाच्या निर्मितीला खतपाणी मिळते. काळा पैसा म्हणजे कर चुकवून मिळविलेला पैसा असतो, अशा काळ्या पैशाच्या अर्थव्यवस्थेलाच समांतर अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते. कागदोपत्री नोंद न होता उत्पन्न कर चुकवून गैरमार्गाने प्राप्त केलेल्या पैशाचा फार मोठा साठा देशात आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या गैरव्यवहारी प्रवृत्तीमुळे काळ्या पैशाचे चढते - वाढते प्रमाण ही भारता समोर एक गंभीर समस्या आहे. हिशोबात घेतलेल्या पैशांच्या साधारणतः २० ते ३०% इतके व यापेक्षाही जास्त याचे प्रमाण असावे असे तज्ञ सांगतात. अशा प्रकारचा पैसा. साठेबाजी, सट्टेबाजी अशा मार्गांनी उपयोगात आणला जातो. परिणामतः किंमत वाढीस चालना मिळते. यामुळे कायम उत्पन्न गटातील लोकांचे जिवनमान अडचणीत येते. अर्थात राहणीमानाचा दर्जा घसरतो. एकंदरीत काय तर अशा या काळ्या पैशाच्या बिनहिशोबी किंवा नियमबाह्य अर्थव्यवस्थेमुळे देशाच्या प्रगती वेगावर विपरीत परिणाम होतात.

शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :

1. काळ्या पैशाच्या समस्येचे स्वरुप जाणून घेणे.
2. काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे शोधणे.
3. काळ्या पैशाचे भारतीय अर्थव्यवस्था व समाजावरील परिणाम स्पष्ट करणे.

गृहिते :

1. काळ्या पैशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.
2. काळ्या पैशामुळे समाज व अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतात.
3. काळ्या पैशामुळे भ्रष्टाचार वाढीस चालना मिळते.

काळ्या पैशाचे स्वरुप :

काळ्या पैशाचे प्रमाण किती हे सांगणे तसे कठिण आहे, असे असले तरी भारतात हे प्रमाण जास्त आहे हे निश्चित. भारतीय नियोजनात पुर्णरोजगार निर्माण करणे, आर्थिक विषमता दूर करणे, दारिद्र्य निर्मूलन, स्वावलंबन ही प्रमुख वैशिष्ट्ये दिसतात. परंतू या उद्दिष्टांना काळ्या पैशाची अर्थव्यवस्था अडचणीची ठरते. ज्यामुळे प्रगतीच्या वेगावर विपरीत परिणाम होतात. रामदेव बाबांच्या दाव्यानुसार परदेशी बँकात ४०० लाख कोटी रु. एवढा काळा

पैसा आहे. भ्रष्टाचारातून निर्माण होणारा काळा पैसा ही समस्या भारतापूरती मर्यादित नसून संपूर्ण जगाला तिने ग्रासलेले आहे.

भ्रष्टाचार एक सामाजिक गुन्हा आहे. परंतू त्याकडे पाहणारे गुन्हा म्हणून न पाहता एक सहज व्यवहार म्हणून खरेतर दुसऱ्या शब्दात तो एक शिष्टाचारच समजला जातो. सर्वसाधारणतः काळ्या पैशाला दुसऱ्या महायुध्दापासून सुरुवात झाली. विकास प्रक्रिया गतीमान झाली. औद्योगीक विकासाचा वेग वाढला, भारतात १९७४-७५ पूर्वी उत्पन्न कराचे दर ९७.५% पर्यंत होते. परिणामी काळ्या पैशाच्या वाढीस चालना मिळाली, "काळा पैसा म्हणजे कर चुकवून मिळविलेला पैसा असतो." दुसऱ्या

शब्दात काळ्या पैशाची अर्थव्यवस्था म्हणजे समांतर अर्थव्यवस्था होय,

1. कॅल्डार यांनी काळ्या पैशाच्या मोजमापासाठी विकसीत केलेल्या विशिष्ट पध्दतीनुसार अनेक तज्ञांनी उपयोग केला त्यांच्या मतानुसार, १९५२-५३ ला हे प्रमाण GNP च्या ६% होते.
2. १९६१-६२ ला वांच्छू कमिटीने ७०० कोटी रु. काळा पैसा असल्याचे सांगितले जो GNP च्या ४.४% होता. रांगणेकराच्या मतानुसार १९६१-६२ ला ११५० कोटी म्हणजे GNP च्या ७.२% तर १९६९-७० ला ते GNP च्या ८.४% होते.
3. चोपडा यांनी १९६०-६१ पासून ते १९७७-७८ या काळात प्रत्येक वर्षी अंदाज व्यक्त केले. त्यांच्या मतानुसार १९६०-६१ ला GNP च्या ६.१%, १९६५-६६ ला ६.४%, तर १९७४-७५ ला ८.१% आणि १९७६-७७ ला १०.५%..
4. पी. गुप्ता आणि एस. गुप्ता यांच्या मते १९६७-६८ ला GNP च्या ९.५%, १९७२-७३ ला २७% तर १९७८-७९ ला ४८.८% एवढे मोठे होते.
5. NIPFP (National Insritute of Public Finance and Policy) नुसार डॉ. एस आचार्य, राजा चोलिया या प्रमुख तज्ञांनी १९७५-७६ ला वक्तवलेल्या अंदाजानुसार १५ ते १८%, १९८३-८४ ला १८ ते २१% होते. हेच प्रमाण गुणोत्तरात सांगितल्यास ६०:४० असे आहे.
6. सुरज वी गुप्ता यांनी १९८०-८१ ला हे प्रमाण GPN च्या ४१.७% असल्याचे नोंदविले होते. त्या काळात ५०.९७७ कोटी रु. तर १९८७ ८८ ला तो १,४९,२९७ कोटी म्हणजे ५०.७% एवढा झाला. यांच्या मते GNP च्या अभिवृध्द दरापेक्षाही काळ्या पैशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर हा जास्त आहे.
7. परदेशात काळा पैसा किती ? यावावत NGO व CBI संचालक ए.पी. सिंह यांच्या दाव्यानुसार २५ लाख कोटी इतका भारतीय काळा परदेशात आहे. (दि. १४ फेब्रुवारी २०१२ लोकसत्ता)
8. स्वीस बँकेच्या २००६ च्या अहवालानुसार भारत, रशिया, यू.के., UKRAINE आणि चायना हे पाच देश सर्वोच्च स्थानी असून भारत पहिल्या क्रमांकावर आहे. अनुक्रमे १४५६, ४७०, ३९०, १०० आणि ९६ $ Million.

अर्थव्यवस्थेतील समाज आणि श्रीमंतीचा हव्यास :

माणूस म्हणून असलेले आपले अस्तीत्व अखिल मानव जातीशी निगडीत आहे. मानसाने मर्यादा ओळखावी आपली स्वतःची, ज्या जगात आपण जन्माला आलो त्या जगाची आणि ज्या परमेश्वराने हे जग निर्माण केले त्या परमेश्वराचीही. कुसुमाग्रजाच्या या मुलभूत विचारांचा येथे मुद्दाम उल्लेख केला आहे. यानुसार समाजाकडे दृष्टी टाकल्यास सर्व मर्यादांची जाण आजच्या माणसाला आहे काय? असा प्रश्न समोर येतो. याच्या उत्तरादाखल अर्थव्यवस्थेतील समाजाचे निरिक्षण करताना श्रीमंतीचा हव्यास सुटलेली माणसं समोर येतात. पैशाचा हव्यास धरणे गैर काय? असे म्हणून या मानसिकतेला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली जाते. गैरव्यवहार सुरु होतात. मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचार घडून येतात. हे भ्रष्टाचार सामाजीक गुन्हा वाटण्याऐवजी आजचा हा शिष्टाचार आहे की काय? असे

वाटायला लागते. कदाचित भूतकाळातही असेच घडत असेल पण आज नको तितकी वाढ अधिक वेगाने होत आहे. जसे कॅगच्या अहवालानुसार १०.८७ लाख कोटीचे नुकसान करणारा खाण वाटप महाघोटाळा, आदर्श घोटाळा, २ जी स्पेक्ट्रम घोटाळा, राष्ट्रकुल खेळ घोटाळा, याशिवाय लहान मोठ्या उदिष्टांच्या पुर्ततेसाठी चिरीमिरी शिवाय पर्याय नाही या सदृश्य बनलेली भारतीय आर्थिक समाजाची वृत्ती याला कारणीभूत असलेली पाश्चिमात्य संस्कृती या एकूण-एक बाबी समोर यायला लागतात. याचा विरोध करणाऱ्या सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरीकांना येणारा अनुभव विपरीत असतो. थोडक्यात पैशाचा हव्यास धरण्यात गैर काय या मानसिकतेत अमेरिकेतील व्यवस्थापकांच्या एका पिढीने गेली २० वर्ष प्रतिष्ठा देता - देता जगावर राज्य केले आणि जनतेच्या पदरात मंदी टाकली. समृध्दी सर्वांनाच हवी आहे. पण ही समृध्दी मजबुत नैतीक पायाची असेल तर ती टिकते. अन्यथा समृध्दीचा नैतीक पाया कच्चा असल्यास ती टिकत नाही.

भारतीय संतांनी व संत सदृश्य विचारवंतानी जसे, महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, यशवंतराव चव्हाण, रविंद्रनाथ टागोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जे.के. मेहता इत्यादींनी हाव (हव्यास) हा आरोग्यवर्धक नसल्याचे वेगवेगळया पध्दतीने सांगितले आहे. लोभ, हव्यास, अधाशीपणा हे वाईट गुण आहेत. म्हणून लोभाचा संग सोडा असे मूळ भारतीय विचार वेळोवेळी कळकळीने प्रकट झालेले आहेत. आता पैशाचा हव्यास माणसातील चांगूलपणा घालवितो हे वैज्ञानीकांचे संशोधनही सांगत आहेत. पण लोभ नाही धरल्यास माणसाची भौतीक प्रगती कशी होणार? काही तरी अधिक हवे असेल तरच माणुस प्रयत्न करतो. आज हे मिळाले. उद्या ते मिळेल या इर्षेने माणुस जगत आहे. जगाच्या या बदललेल्या आर्थिक समाजाच्या मानसिकतेची वैशिष्ट्ये म्हणून

1. व्यावसायिकतेची जागा धंदेवाईक पणाने घेतली
2. गुंतवणुकीच्या जागी सट्टेबाजी सुरु झाली.
3. शुध्द नैतिकतेची जागा सापेक्ष नैतिकतेने घेतली.

समाजाला उपयुक्त उत्पादने देवून माफक नफ्याची व्यावसायीक दृष्टी गेली व नवनविन गोष्टी माणसाच्या गळयात बांधण्याची धंदेवायीक दृष्टी आली. सेवा देवून पैसा मिळविणारी अर्थव्यवस्था लोप पावून स्वतःच्या फायद्याला अतोनात महत्व देणारी अर्थव्यवस्था आली, नफा झाला तर तो माझा नुकसान झाले तर ते जनतेचे हा मार्ग विस्तारत गेला. आज सर्वसामान्य प्रामाणिक माणसासमोर अशी स्थिती आहे की, धुर्तपणे जगता येत नसेल तर गरिबीत खितपत पडा, हाव धरलेला माणुस कसा बदलतो याचे निरिक्षण केल्यास असे दिसून येते की,

1. त्याची कायदा मोडण्याची खुमखुमी वाढते व बहुतेक वेळा तो मोडलाच जातो.
2. नैतिकता बाजूला टाकून निर्णय घेण्यात कमीपणा वाटत नाही उलट जोर चढतो.
3. दुसऱ्याच्या लुबाडणुकीचे सहज समर्थन होते.
4. वाटा-घाटीत बीनदिक्कत खोटे बोलले जाते.
5. यशस्वी होणे हे महत्वाचे असल्याने त्यासाठी फसवणुक करण्यास मन कचरत नाही.
6. फायदा होत असेल तर अनैतीक आचरणाचे समर्थन करण्यास मागेपुढे पाहिले जात नाही.

खरेतर योग्य विचार केल्याशिवाय काही गोष्टी लक्षात येत नाहीत, यदाकदाचीत कोणी लक्षात आणुन देण्याचा प्रयत्न केला तरी आप-आपल्या धुंदित असणारा माणुस हे समजुन घेवू शकत नाही. वास्तविक हाव ही आरोग्यवर्धक नसताना ती आरोग्यवर्धक आहे असा मोठा प्रभाव अमेरीकेवर पडला. नंतर जगावर हळुहळु त्याचा अंमल झाला व जगाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे विपरीत पडसाद उमटले. त्याच्या परिणामाचे अपत्य म्हणून काळया पैशात होणाऱ्या वाढीचा वेग वाढेल की कमी होईल? असो हव्यास पोषकही असतो व घातकही असतो. कुठे थांबायचे हे समजावे लागते. पण ते बहुधा कधिच समजत नाही आणि समाज त्याच चक्रात पुन्हा फिरु लागतो.

काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे :

करचुकवेगिरी :

भारत व जगातील राष्ट्रे यांच्या समोर करचुकवेगिरी कशी टाळावी हा प्रश्न आहे. या अध्यायातून मोठ्या प्रमाणावर काळ्या पैशाची निर्मिती होते. सदोष कर पध्दती काळ्या पैशाच्या निर्मितीस जवाबदार असते. भारतात ६५ ते ७० टक्के संस्था सरकारला आपली संपत्ती प्रामाणिकपणे दाखवित नाहीत. भारतातील साखर उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाच्या किंमती बाबत गैरव्यवहार करतात. मद्य व्यवसायीक, विविध खाजगी बँका, उद्योजक इ. मोठ्या प्रमाणात करचुकवेगिरी केली जाते. यातून मोठ्या प्रमाणात काळा पैसा निर्माण होतो.

लाचलुचपतीचे वाढते प्रमाण :

अवैध धंदे चालू ठेवण्यासाठी शासकिय अधिकाऱ्यांना दिली जाणारी लाच, जसे अवैध वाहतूक, विनापरवाना दारुची दुकाने, रॉकेलचा काळाबाजार, अशा अनेक व्यवसायात अनाधिकृतपणा वाढला. त्यावर पांघरुन घालण्यासाठी लाचलुचपतीचे प्रमाण वाढत आहे.

कल्याणकारी योजनावरील खर्चातील वाढ :

अनेक कार्यालयामध्ये अवास्तव प्रमाणात वाढ केली जात आहे. कार्यालयची यशस्वतीता मात्र निष्प्रभ ठरत आहे. मंत्र्याचे दौरे, भेटी, उद्घाटन सोहळे यावर लाखो रुपयांची उलाढाल होताना दिसते.

जुगार, सट्टेबाजी व चोरटे व्यवहार :

1. ग्रामीण व शहरी भागात अवैधरित्या जुगाराचे क्लब सुरु होत आहेत. कमी श्रमात अधिक पैसे मिळविण्याच्या आकांक्षेपोटी या गैरव्यवहारात अनेक लोक मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. या व्यवहारातून करोडो रुपयांच्या उलाढाली व या उलाढलीतून काळ्या पैशाची निर्मिती होते.
2. अवैध वाहतूक व सरकारी व्यवहारातून काळा पैसा निर्माण होतो.
3. निवडणुक खर्चात होणारी वाढ.
4. केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत काळ्या पैशाचे अनेक व्यवहार होत आहेत.
5. उत्पादकाकडून विविध पक्षांना निवडणुक निधी दिले जातात. परिणामी मतदाराचे नैतीक अधःपतन होते.
6. हवाला मार्गांनी देश व देशाच्या बाहेर अनैतीकपणे फिरणारा पैसा.
7. देशातील बहुतेक राजकीय पक्ष व प्रमुख नेते, व्यापारी, उद्योजक, व्यवसायिक यांना विशेष सुविधा व सवलती मिळवून देण्याचा हवाला घेवून मोठ्या रकमाची उलाढाल करतात.
8. जलद आर्थिक विकासासाठी अनेक योजना व प्रकल्प राबविले जातात. यावर करण्यास येणाऱ्या एकूण खर्चापैकी जवळपास ६५% रक्कम प्रत्यक्ष खर्च केली जातो. मात्र राहिलेला ३५% भाग राजकिय नेते, शासकिय अधिकारी हडप करतात. भ्रष्ट झालेल्या शासकीय व प्रशासकिय व्यवस्थेमुळे काळा पैसा निर्माण होतो.
9. तस्करी, दरोडेखोरी, लाच, स्थावर मालमत्ता व्यवहार बंदी असलेली औषधे व इतर वस्तू खरेदी - विक्री मार्गातून असा पैसा कमावला जातो.

काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम :

1. काळा पैसा उत्पादक कार्यात कमी प्रमाणात येतो. म्हणजेच राष्ट्रीय संपत्तीचा उपयोग चुकिच्या दिशेने होतो. सोने, चांदी व हिऱ्यांच्या खरेदीसाठी वापरला जावून त्यांच्या किंमती भरमसाठ वाढतात.
2. जमीन व इमारतीच्या किमतीत वाढ होते.

3. नियमित वेतन मिळविणारा वर्ग त्रस्त होतो. व्यापार, उद्योग क्षेत्रातील मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज लावणे शक्य नसल्याने करबुडवेपनास वाव मिळतो, संधी नसणाऱ्या लोकांचे उत्पन्न कमी होवून आर्थिक विषमता वाढीस लागते.
4. उत्पादन साधने चुकिच्या दिशेने वळवली जातात, चैनिच्या वस्तूचे महत्व वाढते. व काळया पैशामुळे चैनिच्या वस्तूची मागणी वाढते. परिणामी दैनंदिन उपभोगाच्या वस्तूच्याही किमती वाढतात.
5. काळया पैशामुळे कृयशक्ती वाढुन वस्तूची मागणी वाढते, मात्र काळा पैसा उत्पादन प्रक्रियेत गुंतवला जात नसल्यामुळे कमी वस्तूचा पाठलाग अधिक चलन करते, व भाववाढ होते.
6. देशातील चलन नियंत्रणावर विपरीत परिणाम होतात. व परिणामी मौद्रिक धोरण फोल ठरते, ज्या कारणासाठी मौदिक धोरण आखले जाते त्याची पुर्तता होत नाही.
7. काळा पैसा हे समाजातील नितिमत्ता घसरविण्याचे प्रमुख कारण आहे. अवैध मार्गातून निर्माण होणारा काळा पैसा समाजाच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम घडवतो लोकामध्ये लाचलुचपतीची भावना वाढते, व नैतिकमूल्याचे अधःपतन होते.
8. देशातील बचत, गुंतवणूक व उत्पन्न पातळी या बाबतचे योगय निर्णय घेणे नियोजनाला अशक्यप्राय होते.
9. काळया पैशाच्या माध्यमातून मुठभर श्रीमंताच्या हातात अफाट आर्थिक शक्ती एकवटते, याचा उपयोग करुन देशाच्या राजसत्तेवर दरारा निर्माण करण्यात ते यशस्वी होतात.
10. देशातील ७०% पेक्षा अधिक जनता गरीबीत जीवन जगत असल्याचे चित्र आजही पहायला मिळते. यातील २८% जनतेला उदरनिर्वाहाच्या गरजाही पूर्ण करता येत नाहीत.
11. काळया पैशातील अनुत्पादक गुंतवणूकीमुळे देशातील विषमता दुर करण्याच्या उद्दिष्टाला सुरुंग लागला आहे.

निष्कर्ष :

काळया पैशाची समस्या सोडविण्यासाठी कर रचनेत सुधारणा, स्वेच्छा जाहिर योजना, स्पेशीयल बिअररबाँन्ड स्किम, चलनातील नोटा रद्द करणे या सारखे अनेक उपाय वेळोवेळी केले जावूनही काळया पैशाच्या निर्मितीचा वेग कमी होऊ शकलेला नाही असे निदर्शनास येते. परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेला व या अर्थव्यवस्थेत सर्वसामान्य मध्यम वर्गाला अनेक विपरीत परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. खरोखर याला आवरायचे असेल तर एकूण-एक समाजाची बनलेली मानसिक स्थिती कशी सुधरवता येईल या दृष्टीने समाजाला वेगवेगळया माध्यमातून नैतिकतेचे धडे द्यावे, समाजातील व्यक्ती व्यक्तींच्या मनी मानसी नैतिकता ठसवल्यासारखे उपाय व यापेक्षाही अधिक खोलात जावून दर्जेदार सबूध्दी निर्माण करुन आंतरात्म्याची हाक ओळखण्याच्या दिशेने भारतीय जनता व सरकारचे पाऊल पुढे पडणे गरजेचे आहे. पुन्हा महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, लालबहादूर शास्त्री, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले या नावाचे स्मरण करुन त्यांच्या जीवनातील प्रत्यक्ष कृती व विचारांचा आदर्श प्रामाणिकपणे निर्माण करावा लागणार आहे. आता या क्षणी महाराष्ट्रातील एक देशभक्त, कर्तृत्ववान विचारी सत्पुरुष कैलासवासी यशवंतराव चव्हाण यांचे स्मरण करुन त्यांच्या विचारांचा उद्घोष करावा असे वाटते. एके ठिकाणी ते म्हणतात, "देशभक्तीची जाणिव सतत प्रज्वलीत ठेवायला हवी", मैत्री आणि जागतिक शांतता यांच्यातील श्रद्धा कधीही कमी होता कामा नये. हे करतानाच आपला देश आर्थीक आणि लष्करी दृष्टीने बलिष्ट करावयास हवा, हे व्यवस्थीतरित्या लक्षात घेतल्यास जगातील कोणतीही शक्ती भारताची प्रगती रोखू शकणार नाही, निर्धार, विश्वास आणि देशनिष्ठा यांच्या आधारावर भारताचे उज्वल भवितव्य घडवायचे आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्राची पायाभरणी केली. हजारो माणसे जोडली सारा मराठी मुलुक मनाने जिकला मात्र त्यांच्या अखेरच्या काळात जवळ कोणीही नव्हते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद चार वेळा, केंद्रात चार महत्वाची मंत्रीपदे भूषविलेल्या आणि अखेर उपपंतप्रधान

पदावर राहिलेल्या यशवंतरावांनी दिल्लीत स्वतःचे घर बांधले नाही की, मुंबईत फ्लॅट घेतला नाही. डझनांनी साखर कारखाने उभारणाऱ्या या नेत्यांच्या नावावर महाराष्ट्रात एकही एकर जमीन नाही, मृत्यूनंतर त्यांच्या दिल्लीतील बंगल्यातून त्यांचे व्यक्तीगत सामान हलवायला गेलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कपाटात सापडलेल्या स्टेट बँकेच्या पासबुकात साऱ्या हयातीत त्यांनी मागे ठेवलेली ३६,००० रुपयाची शिल्लकच तेवढी राहीली असल्याचे त्यांना आढळते.

संदर्भ :

1. के.सागर, वाणिज्य अर्थव्यवस्था, के.सागर पब्लीकेशन, पुणे - २००६.
2. प्रा.दत्तात्रय खरटमोल, भ्रष्टाचार, काळा पैसा आणि भारत, विशाखा संशोधन पत्रीका - २०११
3. डॉ. सौ. स्मिता कोंडेवारी / कोटलवार - भारतीय अर्थव्यवस्था, अरुणा प्रकाशन, लातूर, २०११
4. प्रबोधन प्रकाशन ज्योती, मासिक, फेब्रुवारी - २०१२
5. साप्तहिक साधना - फेब्रुवारी २०१२
6. प्रशांत दिक्षीत, श्रीमंतीचा हव्यास चांगला की वाईट, लोकसत्ता, दि. २०-०३-१२ पृ. ७
7. साप्ताहिक साधना १७ मार्च २०१२.

चिरस्थायी विकास काळाची गरज

प्रा. डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे

अर्थशास्त्र विभाग कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी

प्रस्तावना: शाश्वत विकास ही संकल्पना सर्वसाधारणपणे चार पैलुशी संबंधित आहे पर्यावरण आर्थिक सामाजिक आणि संस्थात्मक शाश्वतता यापैकी एका जरी घटकाकडे दुर्लक्ष झाले तरी एकंदरीत समाजाची मोठ्या प्रमाणात हानी होते सर्वसाधारणपणे शास्त्र सुद्धा म्हणजे अशी अवस्था जी थोड्या किंवा अनंत काळापर्यंत टिकून राहते sustainableहा शब्द sustanere या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे याचा अर्थ धरून ठेवणे सहन करणे सहाय्य करणे पुरविणे चालू ठेवले टिकून ठेवणे आयुष्याला हातभार लावणे एखाद्या समाजाची सांस्कृतिक व आर्थिक अवस्था टिकून राहणे यालाच शाश्वत ता असे म्हणतात शाश्वत विकासामध्ये पुनर्निर्मिती सक्षम संसाधनाचा निर्मितीचा वेग त्याच्या वापराच्या वेगापेक्षा जास्त असावा तसेच पुनम निर्मितीक्षम पर्यायाच्या विकासाचा आलेख वापरापेक्षा जास्त असावा आणि प्रदूषण कमीत कमी असावे जगातील औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे त्याचे दुष्परिणाम जाणवत आहे त्यामुळे चिरंतन विकासाचे महत्व वाढले आहे आणि नियोजनामध्ये त्याचा समावेश सर्व देशांनी कमी-अधिक प्रमाणात केला आहे club of Rome यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की साधनसंपत्तीच्या अतिवापरामुळे आपले भविष्य अंधकारमय झाले आहे म्हणून शाश्वत विकासामध्ये पुढील भावी पिढीसाठी विकास समृद्ध आणि यावर लक्ष दिले पाहिजे पर्यावरणाचे संवर्धन हा चिरस्थायी विकासाचा महत्त्वाचा भाग आहे आर्थिक विकास ही संकल्पना बहु व्यापी आणि बहुआयामी आहे विकास आणि वृद्धी यामध्ये आहे चिरस्थायी विकास त्यामधील एक महत्त्वाचा भाग आहे वास्तविक सर्वांगीण विकास हा चिरस्थायी विकासा मधून होत असतो म्हणून तुझ्या गावांमध्ये चिरस्थायी विकास आला महत्वाचे स्थान आहे सर्वसाधारणपणे विकास हा मानवाकडून जाणीवपूर्वक आणि नियोजनपूर्वक घडवून आणला जातो त्याचप्रमाणे आर्थिक वृद्धी मध्ये संख्या दर्शवली जाते आकाश दर्शन ला जातो म्हणून राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आर्थिक वृद्धी समजली जाते ज्यामध्ये वास्तव दरडोई उत्पन्न दिल दीर्घकाळ पर्यंत वाढत असते म्हणून हिंदी मध्ये सतत आणि नियमित पणा असतो दरडोई उत्पन्नात वाढ होते दीर्घकालीन सोबत असते स्वरूप असते तसेच व्यक्ती ही संकल्पना संख्यात्मक आहे यामध्ये संघटनात्मक बदल होत नाही आणि समस्या फारश्या सोडवल्या जात नाहीत आर्थिक वृद्धीचा फायदा असा की यामध्ये स्तूल देशांतर्गत उत्पन्नात वाढ होते उत्पादनात वाढ होते दरडोई उत्पन्नात वाढ होते आणि त्याच बघ दरडोई उपभोगत वाढ होते जगातील सर्व देशांचे उद्दिष्ट सर्वांगीण आर्थिक विकास हाच आहे दुसऱ्या महायुद्धानंतर या संकल्पनेला बळ मिळाले ही संकल्पना व्यापक स्वरूपाचे आहे यामध्ये आर्थिक वृद्धीचा समावेश आहे मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांमध्ये प्रगतिशील सभाचे बदल घडून आणणे म्हणजे आर्थिक विकास होईल किंवा चिरस्थायी विकास होईल या विकासाला गुणात्मक बाजू आहे यामध्ये लोकांच्या बहुतेक कल्याणात वाढ होते तसेच दारिद्र्य निरक्षरता हो ग आई बालमृत्यू घट इत्यादी उपाय केले जातात बेकारी कमी केले जाते त्याचप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन आणि संवर्धन केले जाते म्हणून चिरस्थायी विकास ही काळाची गरज आहे

अभ्यासाचे उद्दिष्ट

1 आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या संकल्पना व त्याचा अभ्यास करणे

2 चिरस्थायी विकास ही संकल्पना समजावून घेणे

3 चिरस्थायी विकासाचे घटक घटकांचा अभ्यास करणे

4 पर्यावरण आणि विकास यामधील संबंध अभ्यास करण

आर्थिक वाढीचा उच्च आणि स्थिर स्तर राखणे हे शाश्वत विकासाच्या मुख्य उद्दिष्टांपैकी एक आहे, आर्थिक वाढ सोडून देणे हा पर्याय नाही परंतु शाश्वत विकास हा आर्थिक वाढीपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे, वाढीचा दर्जा तसेच प्रमाण महत्त्वाचे आहे. जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग यांनी चिरस्थायी विकास या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात प्रसार आणि प्रचार केला आहे

पर्यावरण - निसर्गाचे कायमस्वरूपी दुष्काळ व शाश्वत विकास करता येणार नाही त्यासाठी प्रत्येकाने जीवनशैली मध्ये बदल केला पाहिजे आपली जीवनशैली पर्यावरण पूरक असली पाहिजे पर्यावरणाचे संतुलन आणि संवर्धन कसे होईल याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे आपली वसुंधरा म्हणजे पृथ्वी तिला सुजलाम सुफलाम करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे आपले सर्व आधुनिक उद्योग धंदे नैसर्गिक साधन संपत्ती व अवलंबून आहे ते जतन करणे पुन्हा निर्मिती करणे तसेच पर्यावरणात सोडणारे वायू याचे नियंत्रण करणे महत्त्वाचे आहे औद्योगिक क्रांतीमुळे विविध उद्योगधंद्यांचा हे काय झाला आहे परंतु वातावरणामध्ये हरित वायूंचे प्रमाण त्याचे उत्सर्जन वाढले आहे त्याचा गंभीर परिणाम विविध रोग आणि नैसर्गिक संकटे होत आहे त्यामुळे चालू पिढीबरोबर भावी पिढीचे आयुष्य धोक्यात आले आहे त्यामुळे त्यामुळे पर्यावरण संवर्धन करणे प्रत्येकाचे काम आहे

आर्थिक- देशातील शास्त्रात विकास हा आर्थिक सामाजिक आणि पर्यावरण दोघं व उपाय योजना यांच्याशी संबंधित असतो ज्या वेळी देशातील असंख्य लोकांना त्यांच्या आवडीच्या वस्तू विकत गेले मोठ्या प्रमाणात शक्य होते त्यामुळे आर्थिक विकास झाला असे समजण्यात येते आर्थिक प्रश्न आणि पर्यावरण घटक यांचा जवळचा संबंध असतो म्हणून आर्थिक नियोजन करताना नवीन बाजारपेठांची निर्मिती विक्रीची संधी कार्यक्षम सुधारणा खर्चामध्ये बचत ऊर्जेमध्ये बचत इत्यादींचा मार्ग अवलंबन केला जातो म्हणून शाश्वत विकास करताना नैसर्गिक घटकांमधील समतोल ठेवणे व पर्यावरणाचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे पर्यावरण रहासास आर्थिक विषमता कारणीभूत आहे कारण यामुळे लोकांमध्ये भेदभाव निर्माण होतो समाजामध्ये श्रीमंत आणि गरीब असा वर्ग निर्माण होतो श्रीमंत लोकांमुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर गरजेपेक्षा जास्त होतो कारण ते लोक मोठ्या प्रमाणात स्वयंचलित वाहने वापरतात त्यामुळे त्यांना इंधन आणि ऊर्जा जास्त प्रमाणात वापर होतो त्यामुळे पर्यावरणाचा नाश झपाट्याने होतो याउलट गरीब लोकांना नैसर्गिक साधन संपत्ती साधन संपत्ती नैसर्गिक साधन संपत्ती यांचा पूर्णपणे पैशाच्या अभावामुळे वापर करता येत नाही तसेच दारिद्र्यामुळे निर्णय क्षमता वाढते आरोग्याचे ज्ञान नसल्यामुळे लोकसंख्यावाढीला सहाय्य ममिळते म्हणून चालू पिढीला पर्यावरण सर्वेक्षण नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर दारिद्र्य निर्मूलन लोकसंख्या नियंत्रण इत्यादी क्षेत्रांमध्ये काम करावे लागेल शाश्वत विकास करणे म्हणजे सर्वांगीण विकास करणे आणि पर्यावरण संवर्धन हे फक्त शास्त्र नसून ते एक बहुअंगी शाश्वत विकासाचे शास्त्र आहे

ऊर्जा विकास कार्य करण्याच्या क्षमतेला ऊर्जा म्हणतात. ऊर्जा विकास. विजेचा वापर ऊर्जेवर अवलंबून असतो अणुऊर्जा सौर ऊर्जेतून निर्माण होते इ. अक्षय आणि अक्षय ऊर्जा उर्जेद्वारे निर्माण होते ज्यामुळे हवा आणि जल प्रदूषण टाळले जाते परंतु त्याच वेळी । तेल इत्यादींचा वीज निर्मितीसाठी वापर केला जातो. . इ. प्रदूषण हा शेती आहे - हा दुसरा सर्वात महत्वाचा घटक आहे ज्याशिवाय शाश्वत विकास इत्यादींचा विकास करणे अर्थव्यवस्थेसाठी अशक्य आहे. औद्योगिक क्षेत्राचा विकास शेतीच्या विकासाचा मधून होत असतोआणि म्हणून शेतीकडे दुर्लक्ष होता कामा नये, भारत, कृषी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे शेतीद्वारे लोकसंख्येसाठी अन्न निर्माण करते. विविध कच्च्या मालाचा पुरवठा केला जातो. कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी निघते उपाय केले पाहिजे वास्तविक.

कृषी- सर्वात महत्वाचा घटक आहे शेती हा कणा आहे ज्याशिवाय अर्थव्यवस्थेचा विकास होणे अशक्य आहे उदाहरणार्थ, इंग्लंड, फ्रा रशिया, इस्त्रायल इ. औद्योगिक क्षेत्राचा विकास कृषी क्षेत्राद्वारे झाला आहे आणि म्हणूनच विकास करताना शेतीकडे दुर्लक्ष होता कामा नये. भारतासारख्या देशात, शेती प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मोठ्या

प्रमाणात रोजगार निर्माण करते आणि शेतीद्वारे लोकसंख्येला अन्न पुरवते. साखर, कापड, कागद, रसायने, विविध उद्योगांना पुरवठा केला जातो. आधुनिक यंत्रसामग्रीसह मोठ्या सघन शेतीमुळे कृषी उत्पादकता वाढण्यास मदत झाली. याचे कारण म्हणजे उत्पादकाचा वापर आणि

शाश्वत विकास विविध व्याख्या

1 "अर्थव्यवस्थेच्या विकासाची उच्च आणि स्थिर पातळी राखणे. आर्थिक वाढ सोडून देणे म्हणजे केवळ आर्थिक वाढ होय.

2 प्रॉम कमिशन. व्याख्या - पर्यावरण विकासाच्या क्षमतेशी तडजोड न करता शाश्वत विकास म्हणजे नैसर्गिक आणि पर्यावरणीय लोकसंख्या इत्यादींचा अभ्यास. कालांतराने उत्पादनाचा शाश्वत विकास आणि त्याची क्षमता आणि आवश्यक असल्यास ते दुसऱ्या प्रणालीमध्ये बदलणे. संसाधनांची दीर्घकालीन उत्पादकता आणि सध्याची गरज धोक्यात न येता शाश्वत असणे

3 शाश्वत विकास म्हणजे अशी प्रक्रिया की यामुळे पर्यावरणाचा त्रास होत नाही आणि त्यामुळे भावी पिढ्यांचे उत्पादन क्षमता कमी होत नाही याचा सार्थ शाश्वत विकास म्हणजे जीवनाच्या सर्व पैलू मधील बदल लोकांच्या त्यांच्या आजूबाजूच्या सामाजिक आर्थिक आणि पर्यावरणीय परिस्थितीबद्दलची त्यांची धारणा बदलण्याची इच्छा आणि नैसर्गिक संसाधनाचा सध्याचा वापर बदलण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची तयारी यालाच शाश्वत विकास म्हणतात

4 शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता सध्याचा गर्जा पूर्ण करणारा विकास होईल याचा अर्थ शाश्वत विकास हा संसाधनाचा वापर विवेक पूर्ण करणारे एक प्रारूपआहे ज्याचा उद्देश पर्यावरणाचे लक्ष्मण करताना मानवी गरजा पूर्ण करणे आहे जेणेकरून वर्तमान काळातील गरजा पूर्ण होऊन भावी पिढीसाठी सुद्धा गरजांची पूर्तता होईल असा विकास करणे होय

म्हणून शाश्वत विकासामुळे भावी पिढ्यांना धोक्यात न आणता सध्याची आर्थिक स्थिती टिकाऊ आहे आणि म्हणूनच शाश्वत हा चार-पायांचा दृष्टिकोन आहे

शाश्वत विकासाची वैशिष्ट्ये

1 पर्यावरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि संवर्धन करणे तसेच हरितवायू कमी करणे जागतिक हवामान उष्णता कमी करणे त्यासाठी प्रयत्न करणे

2 पर्यावरणाला अनुकूल बांधकामे इमारती बांधणे नैसर्गिक बायोडिग्रेडेबल साहित्याचा वापर करणे

3 पाण्याचा विवेकाने वापर करणे

शा. वत विकासासाठी दारिद्र्य निर्मूलन आवश्यक आहे गरीब लोकांच्या जगण्या साठी च्या गरजा भागवताना नैसर्गिक साधन संपत्ती ची आणि पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात आणि होते दारिद्र्य आहे भूक आणि कुपोषण यांची समस्या वाढवते त्यामुळे अन्नधान्य मिळवताना अनेक अडचणी येतात म्हणून सार्वजनिक सार्वजनिक सार्वजनिक वितरण व्यवस्था भक्कम करणे कार्यक्षम करणे महत्त्वाचे आहे शाश्वत विकासामध्ये नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत असतात त्यासाठी पारंपारिक कौशल्य नवीन पद्धतीने अमलात आणण्याची गरज आहे तसेच आर्थिक सुधारणा आणि बाजारातील संधी याचा लाभ मिळवण्यासाठी गरिबांना साक्षर आणि मूलभूत शिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे शाश्वत विकासासाठी मुलभूत शिक्षण ही पूर्व आहे जीवन निर्वाहाची खात्री देणे हे चिरंतन विकासासाठी महत्त्वाचे आहे विकासामुळे क्रय शक्ती वाढते आणि बाजार भिमुख ग्राहक असल्यामुळे उपभोगत मोठ्या प्रमाणात वाढ होते त्याचा परिणाम देशातील साधनसंपत्तीवर डबा पडत आहे शिक्षण आणि सार्वजनिक जागृती द्वारे त्याला मदत करण्यासाठी नियंत्रित करण्यासाठी विविध उपाय केले पाहिजे उपभोगाच्या अपेक्षित मर्यादा व मापदंड निर्माण करणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी शिक्षण कायदे करून त्याची अंमलबजावणी करणे

महत्त्वाचे आहे शाश्वत विकास हा प्रत्येक व्यक्ती आणि राष्ट्र त्यांच्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे पर्यावरण समाज आणि अर्थव्यवस्था यांच्या योग्य समन्वय यामुळे शाश्वत विकास साध्य करणे शक्य झाले आहे आज जागतिक हवामानाच्या बदलामुळे प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाच्या रहसमुळे शाश्वत विकासाला महत्त्व आहे आज जगात ज्या वेगाने आर्थिक विकास होत आहे तोच उकल करण्यासाठी शाश्वत विकास शिवाय पर्याय नाही जागतिकीकरणामुळे सर्व जगाच्या अर्थव्यवस्था मुक्त झाले आहेत त्यांचा विकास होत आहे त्यामुळे शाश्वत विकासाला जागतिक पातळीवरील महत्त्व प्राप्त झाले आहे भारताने याविषयी बांधिलकी दाखवण्यासाठी GATT करारावर सही केली आहे भारताचा शाश्वत विकासाच्या संदर्भात पर्यावरण पर्यावरण संरक्षण संबंधात आंतरराष्ट्रीय यांच्यामध्ये सक्रिय सहभाग आहे आणि जवळपास सर्व प्रमुख पक्षीय पर्यावरण करारात सामील आहेत

भारताने राष्ट्रीय कर्तव्य आणि प्रतिज्ञपत्राद्वारे स्थानिक धोरण आणि कायदे केले आहे वास्तविक निसर्गाने मानवाला अनेक नैसर्गिक संसाधने मुक्तहस्ताने दिले आहेत उन वारा पाऊस जमीन इत्यादी दिले आहेत आणि हे सर्व विनामूल्य आहे त्याच्या उपयोगा मधून मानवाच्या मूलभूत दर्जा अन्न वस्त्र निवारा भागवल्या जातात नैसर्गिक संसाधने एक निका वन अवलंबून असतात याचा विचार करणे महत्त्वाचे आहे सुरुवातीच्या काळामध्ये नैसर्गिक संसाधने विपुल प्रमाणात होती परंतु जलशी लोकसंख्या वाढली तसे नैसर्गिक साधन संपत्ती कमी पडू लागली मानवाने आपल्या स्वार्थासाठी निसर्गावर अतिक्रमण केले त्यामुळे नैसर्गिक संसाधनाची अपरिमित आणि झाली त्यातून विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या

वास्तविक पृथ्वीवरील सर्व लोकांचे भवितव्य पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये आणि जतना मध्ये अवलंबून आहे यामधूनच चंतल विकासाची कल्पना निर्माण झाली म्हणून चिरंतन विकास ही एक परिवर्तनशील प्रक्रिया आहे त्यामध्ये साधनसंपत्तीचा पूर्ण उपयोग गुंतवणूक दिशा तांत्रिक विकास तसेच संघटनात्मक व संस्थात्मक बदल त्याच प्रमाणे मानवी गरजा आणि महत्वकांक्षा महत्वकांक्षा लग्नकार्यासाठी प्रयत्न करणे भावी सामर्थ्य वाढवणे याचा समावेश होतो म्हणून मानव मानवता आणि निसर्ग यांच्या नावे संतुलन ठेवणे शाश्वत विकासाचे मुख्य ध्येय आहे त्यामुळे चिरंतन विकासामध्ये पूनार्विनिकरणीय साधनसंपत्तीवर त्यासाठी छोटे छोटे प्रकल्प राबवले जातात त्यामध्ये व्यवस्थित असते आणि प्रतिकारक्षमता असते त्याचप्रमाणे प्रकल्प राबवताना परंपरागत मूल्य व त्याचे ज्ञान वापरले जाते

मानवाची प्रतिष्ठा जपली जाते त्यामधून सार्वजनिक जीवनाची देखबाल आणि सन्मान होत असतो राहणीमानाचा दर्जा सुधारतो तसेच खत्रीच्या सहन क्षमतेचे व विविध गतीचे संवर्धन केले जाते जी साधनसंपत्ती पुन्हा पुन्हा निर्माण केली जात नाही अशा आमचा वापर विवेक पूर्ण पद्धतीने केला जातो त्यामधून पृथ्वीची पोषण क्षमता कायम तिथून ठेवली जाते तसेच पर्यावरणाची देखभाल केली जाते अशाप्रकारे विकास करताना पर्यावरणाला कमीत कमी हानी होईल हे पाहिले जाते लोकसंख्या नियंत्रण केले जाते नैसर्गिक साधन संपत्तीचे जाणीवपूर्वक संवर्धन केले जाते जतन केले जाते यामधून आर्थिक वृद्धी साधने व काय वाढवणे तसेच समाजाची गरज ओळखून विकास करणे विशेष म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण करणे नैसर्गिक साधन संपत्तीचा कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावणे तसेच कचरा निर्माण होऊ नये म्हणून विविध उपाय लोकांच्या क्षमतेनुसार त्यांच्यामध्ये कौशल्य निर्माण करणे आणि यामधून लोकांच्या आरोग्याची पातळी सुधारणे यामुळेच शाश्वत विकासाचे महत्व अधोरेखित होते

शाश्वत विकासाचे निर्देशांक

1 सामाजिक निर्देशांक यामध्ये शिक्षण आरोग्य रोजगार पाणीपुरवठा स्वच्छता घरबांधणी दर्जेदार जीवन पद्धती सांस्कृतिक विकास आर्थिक विषमता दूर करणे गुन्हेगारीचे उच्चाटन करणे लोकसंख्या नियंत्रण करणे सामाजिक

आणि नैतिक मूल्य जपणे महिलांना समाजामध्ये प्रतिष्ठेची वागणूक देणे इत्यादी सहाय्याने चिरंतन विकासाचे मोजमाप केले जाते यालाच सामाजिक निर्देशांक असे म्हणतात

2 पर्यावरण विषयक निर्देशांक यामध्ये शुद्ध पाणी भूगर्भातील पाणी शेतीचा विकास सुरक्षित आणि विपुल प्रमाणात अन्नधान्य सागवी पर्यावरणाचे रक्षण माशांमधील जैवविविधता जैवतंत्रज्ञान प्रदूषित हवामान जागतिक हवामानातील बदल समुद्रपातळी मधील बदल नैसर्गिक साधन संपत्तीचा विवेकी वापर पीक बदल तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संतुलनासाठी विविध निर्णयांचा समावेश होतो आणि या बघ विकासाचे मोजमाप केले जाते

3 संस्थात्मक निर्देशांक यामध्ये सर्वसमावेशक निर्णय सहकार संस्थांची निर्मिती विकास कायदेशीर चौकट नैसर्गिक आपत्तीचे योग्य व्यवस्थापन त्यामध्ये लोकांचा सहभाग विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विकास लोक जागृती तसेच नागरी भागातील समाजाची भूमिका इत्यादींचा समावेश होतो वास्तविक शाश्वत विकास ही संकल्पना सर्वसमावेशक आहे ती जीवनाच्या सर्वांना स्पर्श समाजाची संस्थात्मक बांधणी करत असताना या निर्देशांक वापरला जातो

4 आर्थिक निर्देशांक मध्ये आर्थिक स्वावलंबन कर्जमुक्त ता ऊर्जेचा योग्य वापर उपभोग आणि उत्पादनाच्या वेगवेगळ्या पद्धती वाहतूक खाणकाम आर्थिक संघटना विकास आणि व्यापार उत्पादकता इत्यादींचा वापर होतो त्यामुळे आर्थिक विकास मोजता येतो सर्वसाधारणपणे बेकारीचे प्रमाण लोकसंख्या वाढीचा दर दरडोई सकल देशी उत्पादन देशांतर्गत दरडोई पाण्याचा वापर जमिनीचा वापर खतांचा वापर शहरातील प्रदूषण पातळी विजेचा वार्षिक उपभोग या वरून चिरंतन विकास बोलला जातो त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या संबंधित आजाराचे प्रमाण आरोग्य सुविधा रस्त्यावरील अनाथ मुले शहरी भागातील वृक्षारोपण भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण शेती क्षेत्रातील धारणक्षमता बचतीचे प्रमाण वाहतुकीची सक्षमता इत्यादी गोष्टींचा विचार चिकन विकास करताना केला जातो

संदर्भ

1 विकास आणि पर्यावरणाचे अर्थशास्त्र डॉक्टर वसुधा पुरोहित विद्या बुक्स औरंगाबाद

2 आर्थिक विकासाचे नवे पर्व प्राध्यापक सी प खेर

3 विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र डॉक्टर इंगळे अरुणा प्रकाशन लातूर

4 विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत डॉक्टर मनाली फडणवीस

5 शाश्वत विकास दत्ता वानखेडे पी बी डी प्रकाशन पुणे

6 www sustainable development.in

.

जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवरील परिणाम

प्रा.सखाराम बाबाराव कदम,
सहाय्यक प्रा, मराठी विभाग,कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी.

प्रस्तावना: 1990 नंतर भारतात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा स्वीकार केला गेला. मुक्त अर्थव्यवस्था, खुली बाजारपेठ, सेझ या संकल्पनाचे वारे येथे वाहू लागले.शिक्षणाचे सर्व स्तरावर होत जाणारे खाजगीकरण, पदवी शिक्षणघेऊनही नोकरी शिवायगावोगाव फिरणारे बेकारांचे तांडेभ्रमनिरास करणारे ठरल्याचे दिसते.एकूणच मानवाच्या वर्तन व विचारातील विसंगती, राजकारणी लोकांनी निवडणुकीचे केलेले मतांचे राजकारण, भ्रष्टाचारात झालेली गणितीय वाढ,इंग्रजी शिक्षणाचे वाढते अवास्तवस्तोम, धार्मिक तेढ उत्पन्नकरणाऱ्या घटना ही प्रचंड वाढल्याचे या कालावकाशावर नजर फिरवताना दिसते.दळणवळणाची विपूल साधने, प्रसारमाध्यमांच्या संदिग्ध भूमिका, इंटरनेट सोशल साईटचा वाढता वापर या सर्व संमिश्र घटना-घडामोडी चालू असतानाचग्रामीण भारतातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या मध्ये झालेली वाढ लक्षात घेता1990 ते 2010या दोन दशकांचा विचार आपणास समाजव्यवस्था, शासन आणि माणूस यांच्यात होत जाणाऱ्या बदलाचे चित्र स्पष्ट करण्यास भाग पाडतो.

ग्रामीण भागात एकीकडे पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण,भ्रष्टाचारामुळे नागरी सुविधांचा उडालेला बोजवाराउडालेला दिसतो. अन्नधान्य, दूध, फळे, भाजीपाला जरी ग्रामीण भागात पिकत असला तरी उत्पादकांना तो आवश्यक तेवढा मिळत नसल्याचे विपरीत वास्तव नजरेत भरल्याचे दिसते. गावाचा कारभार करणारी मंडळी भ्रष्टाचाराने लिप्तझाल्यामुळे, शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची ढासळलेली नीतिमत्ता शेतकऱ्याच्या पतनास अधिक जबाबदार ठरताना दिसते.अन्नधान्याची कृत्रिम साठेबाजी रासायनिक खतांचे व बी-बीयाण्याचे वाढत जाणारे भाव, अनुपलब्धतायामुळेहवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी सहकारी बँका सोसायट्यांचे तसेच खाजगी सावकाराकडून घेतलेले कर्ज, निसर्गाच्या अवकृपेने (अतिवृष्टी अनावृष्टी)शेतातील सतत नापिकी, दुष्काळ, अवेळी पावसाची येणे, गारपीट या सर्व कारणांनी शेतीवरच ज्याचे जगणे अवलंबून आहे तो शेतकरी पुरता खंगला. कुठलेच आशादायक, दिलासा, उभारी देणारे वास्तव दिसत नसल्यामुळे निराशेच्या खोल गर्तेत अडकला. पारंपारिक शेती बैलाच्या साहाय्याने केली जात होती. पण या 1990 नंतर वाढत्या यांत्रिकीकरणाचा, रासायनिक खतांचा न परवडणारा खर्च, घरातील लेकरांच्या शिक्षणासाठी लागणारी वाढती फी, इंग्रजी शिक्षणाच्या हव्यासामुळे ग्रामीण भागातील लेकरांची होणारी फरपट... हे सगळे प्रश्न 'आ' वासून उभे असताना- घरातील मोठ्यांची दुखणी, ऊपवर होत चाललेल्या लेकीबाळी,हुंड्यांचीवाईट व जीवघेणी स्पर्धा यामुळे पुरता कंबरडे मोडलेल्या अवस्थेतील शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांचे 'मरण सोपे जगणे अवघड' बनले. या आलेल्या विफल त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कीटकनाशक प्राशन करून, कुणी बैलाचा कासराव बंधाऱ्यावर उभ्या झाडांच्या फांदीने मरणाला जवळ केले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा सरकारी आकडा पाहता 1990 ते 2010 या दोन दशकाच्या कालावधीतहजारो शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली असल्याचे दिसून येते.एकूणच नैतिक मूल्यांची पडझड, लोकशाही समाजवाद, समता व स्वातंत्र्य या मूल्यांचा ऱ्हास गतीने होताना दिसतो.एकीकडे सधनता, श्रीमंती वाढत जात आहे. तर दुसरीकडे दारिद्र्य, बेकारी, बकालपणा भूमिती श्रेणीने वाढत जातआहे.या परिस्थितीकडे मराठी ग्रामीण कवी कोणत्या भूमिकेतून पहात आहेत? प्रचलित वास्तवाचे ते कितपत आणि कसे आकलन करत आहेत? आपल्या कवितेतून ते समकालीन वास्तवाचे चित्रण कसे करीत आहेत?याविषयीचा आढावा या शोधनिबंधात घेतला जाणार आहे. 'बारोमास' कादंबरी द्वारे सर्वदूर प्रसिद्धी पावलेल्या सदानंद देशमुख यांची ग्रामीण कवितेतील मैलाचा दगड ठरणारी'गावकळा' 2005मध्ये

अवतीर्ण झाली. नव्वदोत्तर काळातील ग्रामीण माणसांच्या अस्वस्थ हुंदक्यांचा आक्रोश प्रगट करणारीही अस्सल कविता बारीक-सारीक तपशिलासह ग्रामसंवेदन मांडते.जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर झपाट्याने बदललेले गाव, गावातील अस्वस्थ वर्तमान, घरातील टीव्हीव गॅस मुळे करपलेली भाकर, ढासळलेली नैतिकता,घरात बसून पत्ते, मटका खेळणारे सांड,अनैतिक मार्गाने राजकारणातील बोकाळलेली स्वार्थांधता, शेतीपासूनचे नव्या पिढीचे तुटलेपण,क्रिकेट खेळणाऱ्या पोराला शिव्या देणारा बाप,बापालाच दम भरणारी पोराची माय,रोज रात्रीदारूत झिंगून गेलेला गाव....कुठलेच आशादायक चित्र दिसत नसल्यामुळे ही गावकळाअवकळेत परावर्तित होते. आपल्या गावाविषयी मातीविषयी, मातीत राबणाऱ्या माणसाविषयी प्रेम, आपुलकी आणि आपलेपणाची भावना कमी करण्यामध्ये व समूह भावनेचा गळा घोटणे मध्ये सिंहाचा वाटा सध्याच्या राजकारणाचा आहे. गाव खेड्यांमधूनराष्ट्रीय पक्षाच्या शाखा येऊन धडकल्या. गाव छोटे असो की मोठेतिथे अनेक पक्षाचे कार्यकर्ते कामाला लागले. एकाच घरातील माणसं वेगवेगळ्या राष्ट्रीय प्रादेशिक पक्षांचे सभासद झाले. यामुळे गावातीलसमूह भावनेला तडा जाऊन राजकीय पक्षांनी जातीय भावना अधिक टोकदार बनविल्या.याचेच वर्णनसदानंद देशमुखयांनीगावकळा कवितासंग्रहात खालीलप्रमाणे केल्याचे दिसते.

गावाच्या फाट्यावर बारा-बारा पाट्या
*राज**ss**कारणाचा भर मनावर थोट्या*
ऊतू आल्या संघटना जाती जातीतून
उगवती काळ्याकाट्या गाव मातीतून
गल्लीबोळातून सारे विभागलेजन
दुरितांचे वारा वाहे कोरा भणभण ***(१)***

छोट्या छोट्या गोष्टींना अस्मितेचा प्रश्न बनवून सगेसोयरे एकमेकाच्या विरोधात उभे राहू लागले. वकील आणि पोलिसांना ग्रामीण माणसांची मिळकत मिळू लागली.खून, हाणामाऱ्या, जाळपोळ नित्याची बनली.या सर्व राजकीय दुष्ट प्रवृत्तीमुळे सामान्य गरीब शेतकरी असुरक्षित झाला.परिणामी शेतीकडे त्याचे दुर्लक्ष झाले. 90 च्या दशकातील खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणाने संपूर्ण जग ही मुक्त बाजारपेठ असून आपण या ग्लोबल व्हिलेजचे नागरिक असण्यापेक्षा ग्राहकच आहोत, बाजारकेंद्री अर्थव्यवस्थेमुळेच भौतिक समृद्धी येऊ शकतेयागोष्टी जशा मनोमन स्वीकारल्या तशाच जागतिकीकरणाच्या अनुषंगाने येणारी सत्ताकांक्षा, त्यासाठी करावे लागणारे विधिनिषेधशून्यराजकारण, त्यातून उद्भवू शकणारे अराजक,बोकाळू शकणारा मूलतत्त्ववाद, भाषा-संस्कृती सहएकूणच क्षेत्रीय अस्तित्वाची अनिश्चितता हे सगळेच जागतिकीकरणाचे 'साईड इफेक्ट्स' म्हणून स्वीकारलेले दिसते.या बदलत्या काळाचे भान राखून आजच्या या गोंधळाच्या, विस्कळीत झालेल्या नव्या वास्तवाची मांडणी करणारी कवींची एक पिढी या दोन दशकात पुढे आलेली दिसून येते. अगोदरपासून ग्रामीण काव्य लेखन करणारेना धों महानोर, इंद्रजीत भालेराव,विठ्ठल वाघ,जगदीश कदम, श्रीकांत देशमुख, केशव देशमुख यांच्यासोबतचनारायण कुलकर्णी कवठेकर, प्रकाश किनगावकर, प्रदीप पाटील, प्रकाश होळकर, संतोष पद्माकर पवार,अजय कांडर, एकनाथ पाटील, गणेश देशमुख, सदानंद देशमुख, नारायण सुमंत, जयराम खेडेकर, रमेश चिल्ले, लक्ष्मण महाडिक, शिवाजी मरगीळ, शंकर वाडेवाले, विनय अपसिंगकर,कैलास दौंड, संदीप जगताप, ललितअधाने, चंद्रशेखर मल्कमपट्टे, शशिकांत शिंदे, भरत दौंडकर, अशोक कौतिक कोळीइत्यादी कवींनीया बदलाला उस्फूर्त प्रतिक्रिया देतमराठी ग्रामीण कवितेचीताकदीने मांडणीकेली.आजवर गाव खेड्याला, शेती व शेतकऱ्याला ज्यांनी म्हणून नागविले, नासविले त्यांच्या विरोधात नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कवितेनेअक्षर हत्यार उपसले आहे.ही सर्व कवी मंडळी संपूर्ण ग्रामीण वास्तव आपल्या कवेत घेऊन सामर्थ्यानिशी प्रकट होणारी महत्त्वाची कवी मंडळी आहे.यापैकी सर्वच कवींची नोंद घेणे अशक्य असले तरी

परिणाम सिद्ध करणाऱ्या,गुणवत्ता तसेच आशय संपन्नता सिद्ध करणाऱ्याकाही कवींची ओझरती नोंदकरण्याचाहाप्रयत्न आहे. कवी जगदीश कदम यांच्या 'रास आणि गोंडर'(1998) या कवितासंग्रहातील कविता बदलत्या ग्रामीण जीवनाची व्यथा सांगणारी कविता आहे. मळणी चे यंत्र आले आणि मळणी यांत्रिक झाली, पिठाची गिरणी आलीआणि जात्यावरची ओवी गेली याचं दुःख गातांना

'गिरणीचंचाकआलं/चाले गिरणी जोरात/
ववीदुचितव्हवून/पडे सांदीकोपऱ्यात'(२)

यांत्रिकीकरणाचा शिरकाव आणि पारंपारिकजीवन पद्धतीवर पडलेला प्रभावनेमकेपणाने कवी येथे टिपतो.गाव बदलले तशी माणसंही बदलली.शिकलेला लेक शहरात गेला. गावाकडच्या माय बापाला विसरला. त्याची वाट पाहून माईन डोळे मिटले. गावातील सख्ख्या भावाची भांडणे ही कोर्टाची पायरी चढू लागली.असे गाव आणि शहर यांच्यातील द्वैत या कवितेत आहे. प्रदीप पाटील यांनी 'आत्मसंवाद'(1996) व 'अंतरीचा भेद'(2010) या दोन्ही कविता संग्रहातून1990 नंतरच्या मूल्यगर्भ जाणिवांचीनोंद घेतली आहे.गावातील आड विहिरी प्रमाणेमाणसे जिव्हाळ्यापासून कोरडीठण्ण पडत चालली आहेत.संवेदनशून्य माणसांची व्यापक शुष्कता शब्दातून मांडताना कवी म्हणतो-

नाही उरलेली काळजात माया
गेली जात वाया माणसाची
तोंडामध्ये एक डोळ्यामध्ये एक
मनातली मेख वेगळीच
कुणावर तरी जीव टाकण्याचा
आणा भाकण्याचा काळ गेला **(3)**

जशी माणसे फाटली तशा त्यांच्या वसाहती सुद्धा धड उरलेल्या नाहीत. मग कवी हा आत्मसंवाद साधत समष्टीकडूनस्वतःकडे येतोआणि जीवघेण्या अशा जाणिवा मधून एक प्रखर सत्य पुढ्यात येते;

असे होते माझे गाव, कसे बदलून गेले
कोणी मेले तरी आता, डोळे नसतात ओले **(४)**

ही बदललेल्या गावाची दुखरी जखम कविमनाला व्यथित करते.कालपर्यंत जीवाला जीव देणारी माणसं आज अशी संवेदनाहीन झालीच कशी? गावाचं गावपण मोडकळीला आणणारी ही कुठली बदलाची प्रक्रिया आहे? कवी जयराम खेडेकर यांच्या 'ऋतूवंत'(1997),'मेघवृष्टी'(2005)व 'भुई' (2009)या तीन कविता संग्रहातून मराठी ग्रामीण जीवनाचे बदलते वास्तव तितक्याच ताकदीने येताना दिसून येते. ऋतूवंत ते भुई हा खेडेकरांच्या सृजनशीलतेचा एकसंध आणि दीर्घ प्रवास आहे.'मेघवृष्टी'तलीवाटणी कवितायेथे पाहू. गढी, शेतीवाडी, पडक्या विहिरी, माळवद माडीची वाटणी होते. शेतीयोग्य हत्यारे व अवजारेही वाटून घेतली जातात. गुरंढोरं वेगवेगळे होतातेव्हा जुनी जपलेली नाती, ईळा कुऱ्हाडी सारखी धारदार बनल्याचे कविता सांगते. शेवटी प्रश्न करते...

वाटणी कशी करावी
कन्यादानातआलेल्या वासरांच्या गाईची?
मरणवेणा भोगणाऱ्या जन्मदात्या आईची?
आढीत ऊतू गेलेल्या दुधाच्यासायीची? **(५)**

कवी केशव सखाराम देशमुखयांच्या अथक कविता संग्रहातूनसंग्रामशास्त्रशीर्षकाची कविता मात्र या संपत्तीच्यावाटणीचे सनातन भाऊबंदकीचे दुःख ही कविता व्यक्त करते. तेव्हा ही जाणीव केवळ कवीची न राहता ती बदललेल्या गाव खेड्यातील प्रत्येक कास्तकाराच्या जगण्याची बनते. जागतिकीकरणाच्या रेट्यात

नष्ट होत जाणारे सांस्कृतिक संचित, सामाजिक अधःपतन, नैतिक अनाचार इत्यादीमुळेया कवींची होणारी तगमग, ग्लोबलायझेशन मुळेपुर्वापार चालत आलेल्या आमच्या श्रद्धा, धारणा, परंपरा यांना किंमत उरली नाही.त्यामुळे ग्रामीण जीवनशैली, लोकसंचित, निसर्गाशी असणारा नातेसंबंध आणि भूमीशी असलेली नाळ तुटत चाललीअसल्यामुळे ग्रामीण माणूस द्विधावस्थेत जगत आहे.भूमी आणि भूमिपुत्र ही या देशाची ठळक आणि अटळ अशी ओळख आहे. शेती हा इथल्या माणसांचा व्यवसाय नसून ती जीवन शैली आहे. इथले सण सोहळे शेतीशी जोडलेले आहेत. इथल्या लोककलांचा जन्म व कृषी संस्कृतीच्या संपर्कातूनच झाल्याचे सजग भाननव्वदोत्तर लिहू लागलेल्यासगळ्या मराठी ग्रामीण कवींना असल्याचे दिसून येते. शेतकऱ्याचा शोषण करणाऱ्या शोषक व्यवस्थेविरुद्ध विद्रोहाची भाषा अंगीकारते. कमरेला वेळा ठेवूनच घराबाहेर पडावे लागेल. डोळ्यात तेल घालून जागल करावी लागेल, कारण नागव्या सोबत नागवझाल्याशिवाय इलाज नाही. असे प्रतिपादन हा नायक करतो.या संवेदनशील कविला बदलते ग्राम वास्तव अस्वस्थ करते शेतकऱ्याच्या घरात जन्म लाभूनहीकास्तकार मुले शेत शिवारात रमत नाहीत. मोगडा, तिफन, सालचंदी व बैल सुद्धा अडगळीला पडल्याचे चित्र पाहूनकवीबदललेल्या गावाचे चित्र सहज रेखाटतो..

ग्यानबाच्या कैलासनं तिन एकराचंढेलं
विकून कळमदुरीला पानटपरी टाकली
सटवाजीच्या पर्भतीनं मेटाडोर घेतला;
चंपतअण्णाच्या वसंत्यांनसव्वालाख भरून
झेडपीतचेपराशाची नोकरी मिळवली
गावात फक्त कावळ्यांची काव काव
आणि गिधाडांची खावखाव!(६)

असं हे गावखेड्याला उद्ध्वस्त करू बघणारं विदारक वास्तव जागतिकीकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणून समोर येतं. इथे प्रत्येकाला ढोर कष्टापासून आपला बचाव करायचा आहे. 'काहीही करू पण शेती नको' अशीही बळावत जाणारी मानसिकताच मेटॅडोर पानटपरी सुरू करायला लावते. पैसे भरून चपराशाची नोकरी बरी पण बेभरवशाची शेती नको! असं म्हणून शेतीकडे पाठ फिरवणारी ही शेतकऱ्यांची मुले कवीच्या चिंतनाचा विषय ठरतात. संपत्तीवरून भावातील वाद, वाढते कलह, घरात वाढत जाणारी चुलींची संख्या, दावणीलाचंमरणारी उपाशी गाय,तासन्तास गंजिफा खेळणारी तरुणाई,त्यांचे फाटलेले खिसे कवीला अस्वस्थ करतात.गावात जीव रमेल अशी सावली कुठेच दिसत नाही.

शशिकांत शिंदे यांचा 'शरणागताचे स्तोत्र' हा कवितासंग्रह 2005 मध्ये प्रकाशित झाला.कवितासंग्रहाच्या अर्पणपत्रिकेतचं'लहरी निसर्गापुढे आणि मनमानी व्यवस्थेसमोर शरणागत असूनही ताठ कणा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुःखाची ही गाथा त्यालाच...' अर्पण करून आपली कविते विषयीची भूमिका तितक्याच ठामपणे मांडणारा हा कवी आहे.सृष्टीला सृजनाचे दान देणाऱ्या पाऊस पाण्याविषयी एकमेकाशीबोलताना गाव खेड्यातली माणसंपाहून, घरी तिने ल्यायलेला हिरवा शालू, हिरव्यागार शेतात मुळेच मका गहू हरभरा भुईमूग सुर्यफुल आदींची विस्तारलेली वंशवेल,येथील झाडे असंख्य मरणे झेलून उभी असल्याची जाणीव कवीला करून देतात. सिद्धार्थाला शांतीचा संदेश शिकवणारी ही झाडे अंतर मनातल्या भावना सहज बाहेर काढणारी आहेत.ही माणसे वेद घडवणारी आहेत तो फक्त पावसाचा.

माणसांनी आळविले वेद पावसाचे
निळ्या निळ्या अस्मानाच्या कृपा आर्जवाचे(७)

कारण झाडांना बहरण्यासाठी, वाढण्यासाठी ऊर्जा पुरवणारा हा पाऊस आहे. भेगाळल्या भुईत पावसाचे थेंब होऊन मुरण्याची आस बाळगणारा हा कवी नव्या सृजनाचे उद्याला दान अपेक्षितो. शशिकांत शिंदे यांनी पावसासाठी आरती, प्रार्थना, स्तवन, धावा अशी अनेक पर्जन्यसूक्त तळमळीनेयेथेच मांडली आहेत. शशिकांत शिंदे यांची कविता मातीची- माणसाची- झाडाची काळजी वाहतात.त्यांच्या कवितेत काव्यात्मता, सूचकता, उत्कटता व नादमयता ही काव्य वैशिष्ट्येठळकपणे दिसून येतात.

नारायण सुमंतयांचे रानभरी 1983 व सातबारा 2010 या दोन कविता संग्रहातूनशेतकरी जीवनाच्या अनेक ज्वलंत समस्या मांडल्या आहेत. देशातील शहरीकरणाच्या विळख्यात कित्येक गावे गडप झाली आहेत त्यांचे गाव पण केव्हाच संपलेआहे.अशा या गावातील माणसांना त्यांच्या शेतीसोबतच स्वतःचाही NA उद्या केली जाण्याची भीती कवी बोलून दाखवतो.

लवकरच गरज वाढेल त्यांची
होईल तुझ्या सहज तुझ्या जमिनीची ही एनए
कबुलच नसेल तर..
बेशक शेवटून ठेव फाळ.., बांधावर ***(८)***

खेडूतांचे जगणे बेचिराख करणारा हा महानगरी भस्मासुर अवघ्या खेडूतांचे जगणे संपवत चाललाअसताना आता ग्रामीण माणसानेही नांगराचा फाळ शेवटून ठेवावा. कारण कधीतरी त्यांच्या सहाय्याने आपल्या हक्कासाठी त्यांना किमान संघर्ष करता येईल.अशी आशावादी जाणीवकवितेतूनयेताना दिसते.

शिक्षणामुळे तरी शेतकऱ्याची ही करूण परिस्थिती पालटेल असे स्वप्न उराशी बाळगून तो बसला होता.अक्षरे वेशीतून आत आली आणि वाड्या-वस्त्यांवर शिक्षण पोहोचले. त्याप्रमाणे सुशिक्षित शेतीपासून लांब गेले.अडाणीपणा जाऊन तरुण सुशिक्षित झाले नीटनेटके कपडे घालू लागले पण 'रानोमाळ गाई बेवारस' झाल्याप्रमाणे शेतीपासून ही पिढी लांब गेली.या यंत्रयुगात झुंबरा चे स्वप्न क्षणभंगुर ठरले. शिक्षणातून मिळणाऱ्या नोकरीऐवजी सुशिक्षित बेकारांची संख्या वाढीस लागली. 'ना धड नोकरी ना शेती' अशा स्थितीत

हात विसरू पहात आहेत
ओळीत पेरणे बियाण्यांना
मुठीत पकडणे अवजारांना
पिकणारी अक्षरे बेकार जळवा वांझबांडगुळे
नापिकता वाढविणारी
जी हिरवीगार केवळ कागदावर ***(९)***

अशीही सुशिक्षितांची अक्षर शेती कवीने मोठ्या उद्देशाने उभी केली. हिरवीगार सुशिक्षित तरुण पिढी ही केवळ कुटुंबालाच नव्हे तर समाजालाही खाणार्याआणि त्रस्त करणाऱ्या जळवाप्रमाणेच चिकटून आहे.या काही न कमवता बांडगुळाप्रमाणे जगणाऱ्यांची धग कुटुंबाला सोसावीलागते. ग्राम जीवन असे -हासाच्या उंबरठ्यावर आले असून ही सुशिक्षित पिढी ही व्यसनाधिनतेकडे व चंगळवादाकडे झुकत चालली आहे.

लक्ष्मण महाडिक यांनी 'कुणब्याची कविता' या कविता संग्रहातूननाशिक जिल्ह्यातील लासलगाव परिसरातील ग्रामजीवनानुभवाच्या सच्चेपणाने आणि प्रखर आत्माविष्कारातून व्यक्त झाले आहे.शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने शेती करावी आणि उंदीर, घुशी, डुक्कर यांनी खेड्यातील धान्याचा फडशा पाडावा हा अनुभव शेतकऱ्यास नवीन नाही.उन्हात राबराब राबणारा हा कुणबी तनाळ जमिनीतून पिकाला वाढवितो. पोटच्या मुलाप्रमाणे काळजी घेतो.पाखरांच्या चोची, ओढाळ जनावरे या पिकाला ओरबाडत राहतात. तरी तो त्याची

परोपकारी वृत्ती व दातृत्व सोडत नाही. निसर्ग व समाजातील सर्वच घटक शेतकऱ्याच्या पिकाची लूट करतात. म्हणून कवी म्हणतो-

हे सगळेच कसे बसले तर टपून कुणब्याच्या मरणावर
अस्थिपुरता तरी ऊरेल का तो जळण्यासाठी सरणावर (१०)

जागतिकीकरणातील शेतकऱ्याच्या व्यथेचा हा कडेलोटच म्हटला पाहिजे.बाप मेल्यानंतर वारसाहक्काने सातबारा शेतकऱ्याच्या मुलाच्या नावाने करतानासुद्धा शासकीय यंत्रणेतीलभ्रष्टाचारत्याला खूपविकल करून टाकतो.कवी आपल्या आयुष्याची कैफियत मांडतानानिसर्गातील बोरी मावळ्यांच्या काट्यांचे आणि शिवळ न सोडणाऱ्या बैलाचीच निवडकरतो.आपली परिस्थिती सुधारण्यासाठी तो सहकारी संस्थांच्या मदतीने वैज्ञानिक प्रगती साधू पाहतो. पण त्यालाही मर्यादा पडतात

आता उचलावी म्हणतो कर्ज बँका सोसायट्यांकडून
इसमे सामान हिंदी साहित्य आता है। विज्ञान और टेक्नोलॉजी के युग मे हिंदी के इस साहित्य रूप का विस्तार हुआ है, और हिंदी साहित्य को एक नूतन स्वरूप प्राप्त हुआ है। आज हिंदी साहित्य पर वैश्वीकरण का सशक्त प्रभाव दृष्टव्य है। विदेशो में रेडिओ प्रसारण मे स्थानिक समालोचक हिंदी मे योगदान दे रहे है। आज अनेक विदेशी कंपनियाॅ अपने स्वार्थ के लिए हिंदी के द्वारा छोटे- छोटे गाॅवो तक पहुंची है। एक तरह से आज बाजारू संस्कृती का उदय हुआ है। हिंदी भारतीय राष्ट्रीय एकात्मता को बढावा देनेवाला साधन है। "भारत की सांस्कृतिक सामाजिक भाषात्मक एकात्मता को एकता के धागे मे पिरोने का कार्य करने वाली हिंदी एक मात्र भाषा है, जो अपने बलबुते पर भारत मे ही नही बल्की विदेशों मे भी प्रयुक्त होने लगी है। विश्वभाषा मे हिंदी की यह महिमानवीत स्थिति वैश्विक सत्ता को पुष्ट कर रही है।"7 हिंदी विश्व की श्रेष्ठ भाषा बनी ही है इसका मुख्य कारण हिंदी का विशाल शब्द भंडार है राजनीति को अलग रखकर हम देखे तो समूचे जगत मे अधिक मात्रा मे लोग हिंदी समजते तथा बोलते है अब हिंदी के साथ अंग्रेजी और सामान्य बोलचाल की भाषा का मिश्रण आम बात हो गई है। हिंदी साहित्य भी नयीवाली हिंदी का स्वरूप ग्रहण किया है। इस नई वाली हिंदी मे अंग्रेजी पाठको को भी हिंदी की और आकर्षित किया है। और साथ ही हिंदी मे बोलने लिखने और पढणे मे गर्व का अनुभव महसूस करते है। हिंदी साहित्य के विभिन्न विधाओं में भूमंडलीकरण का असर प्रकट है। बाजार के विविध रूप और दृश्यों जैसे शेअर बाजार, मुद्रास्फीति, संवेदी सूचकांक, विज्ञापन, महाजनी पुंजी, तेल की कीमते, टेलिव्हिजन, कंप्यूटर उद्योग, पर्यावरण, मिडीया, बहुराष्ट्रीय कंपनियाँ,मुनाफा, भ्रष्टाचार, रिश्वत व्यवहार, नये अर्थशास्त्रीय सिद्धांत आदि संबंधी सूचनाएँ एवम संकेत आते है। हिंदी कहानी साहित्य मे भी भूमंडलीकरण का प्रभाव प्रकट है। राजेश जैन की कहानी " क्यू मे खडी उदासी"

बहुराष्ट्रीय कंपनी मे काम करने वाले युवा लोगों के धिरे- धिरे रोबोट बनते चले जाने का और मानविय संवेदनाओंसे कटते जाने का सबसे अच्छा उदाहरण है। हिंदी कहानी की भांति उपन्यास साहित्य मे भी आज भूमंडलीकरण का सशक्त रूप विद्यमान है। प्रदीप सौरभ ,अलका सरावगी, जेसे रचनाकारोने अपने उपन्यासो मे भूमंडलीकरण का यथार्थ चित्र प्रस्तुत किया है। प्रदीप सौरभ का "मुन्नी मोबाईल" अलका सरावगी का एक "ब्रेक के बाद" उपन्यासों में भूमंडलीय व्यापार जगत, मोबाईल क्रांती, इंडिया की इकॉनोमी कल्चर, विकास की द्रुतगति आदि पर केंद्रित है। इस प्रकार हिंदी साहित्य के अन्य विधाओं मे भी वैश्वीकरण का सशक्त प्रभाव दृष्टीगत होते है।

सारांश —

आज हिंदी किसी प्रदेश विशेष की भाषा न रहकर समूचे देश की भाषा बन गई है। विदेशो में भी इसका पठन- पाठन हो रहा है। प्रवासी भारतीय साहित्य आंतरराष्ट्रीय फलक पर हिंदी को अपनी विशिष्ट पहचान दिला रहा है। इस प्रकार हिंदी भाषा और साहित्य का दायरा विश्व के मानचित्र पर बढा है। हिंदी साहित्य वर्चुअल वर्ल्ड मे अपने व्यक्तित्व मे स्थिरता लायी है। हिंदी साहित्य को वैश्विक बनाने के लिए यह बहुत आवश्यक है कि आज के लेखक, साहित्यकार, वर्तमान समय की सच्चाईयों और प्रवृत्तियों को पहचानकर और समझ कर रचना करे। भूमंडलीकरण के परिप्रेक्ष मे विश्व के अनेक देशो ने समय की मांग को ध्यान में रखकर हिंदी भाषा को अपना लिया है। फलस्वरूप हिंदी भाषा का महत्व और भी बढ गया है। वैश्वीकरण के इस युग मे अन्य भाषा- भाषी भी हिंदी मे अपने अनुभूति को अभिव्यक्त करणे मे गौरव महसूस कर रहे है। इस प्रकार हिंदी अपनी ही शक्ती और उर्जा तथा सूचना क्रांती के उपलब्ध नये यांत्रिक उपकरणों के साथ अपना सामंजस्य स्थापित करते हुए विश्व मंच पर भारत का गौरव बढा रही है। हिंदी मे अनेक रूपता की भरमार है। यह अनेकरूपता ध्वनी स्तर पर लेखन के स्तर पर शब्द स्तर पर, वाक्य स्तर पर पाई जाती है। वर्तमान में आवश्यकता है हिंदी के सर्वमान्य मानविकृत रूप को अपनानेकी और इसे व्यावहारिक स्तर पर प्रचलित करने की क्योकि हिंदी जन -जन की भाषा है। इसका प्रसार भी भाषाई ज्ञान के दायरो से दूर व्यावहारिकता की छाव मे ही हो सकता है।

संदर्भ —

(1) हिंदी का वैश्विक परिदृश्य- डाॅ मंजु रानी- मानसरोवर प्रकाशन - पृष्ठ 5

(2) भूमंडलीकरण: मिथक या यथार्थ - गिरीश मिश्र एवं पांडेय - अभिदा प्रकाशन, मुजफ्फरपुर,- सन 2005 - पृष्ठ 101

(3) बाजार के बीच: बाजार के खिलाफ- प्रभा खेतान- वाणी प्रकाशन, नई दिल्ली. सन 2004- पृष्ठ 32

(4) भूमंडलीकरण साहित्य समाज और संस्कृति- शशि भूषण कुमार 'शशी' (संपा) च ॲक्सिस बुक्स प्रा. लि. नई दिल्ली- सन 2013- पृष्ठ 2097

(5) भूमंडलीकरण और हिंदी उपन्यास - रोशन कुमार- पृष्ठ 2011

(6) हिंदी मत और अभीमत - कांती विमलश वर्मा- प्रकाशन विभाग- सूचना और प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली- सन 1996- पृष्ठ 99

(7)वर्तमान परिप्रेक्ष मे भारतीय भाषा तथा साहित्य का अध्ययन- अध्यापन- संपा. प्रो. डॉ. माधव सोनटक्के, डॉ हनुमंतराव पाटील - पृष्ठ 49.

सामाजिक विषमतेची जाणीव

प्रा.डॉ. जोशी रोहिणी सुधाकर
मराठी विभाग प्रमुख,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पिपंळनेर (ग.), ता.जि.बीड.

भारतीय परंपरेचा विचार करत असताना पूर्वीपासूनच देशात रुढ असलेल्या चातुवर्ण्य पद्धतीचा विचार करावा लागतो. वर्णाश्रम पद्धीनुसार समाजातील स्तर ठरवले गेले. त्यानुसार समाज व्यवहार चालत असे. तत्कालीन समाजात सर्वसामान्य स्वरुपाची ही पद्धती होती. धर्माचे जातीमध्ये रुपांतर झालेले होते. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण होते. वर्णाश्रमानुसार कार्य चालण्याची सामाजिक सक्ती होती. सामाजिक भेदाभेद हे समाज व्यवस्थेचे ठळक वैशिष्टये होते. स्पृश्य-अस्पृश्यता शिवाशिव ही शिगेला पोहचली होती. जाती जातीमध्य विषमता होती, माणसाचा स्पर्श माणसाला चालत नाही तो बाटतो, अपवित्र होतो. अशी परंपरेने चालत आलेली मानसिक धारणा होती. सामाजिक विषमतेने शुद्र वर्णातील लोकांचे जे शोषण केले त्यामुळे समाजातील दलित वर्ग चिरडला गेला. त्याला माणूस म्हणुन जगण्याचा कोणताच अधिकार व्यवस्थेने दिला नाही. अशाच काळात मराठी समाजात सुधारणावादी दोन पंथाचा उदय झालेला होता.

एका महानुभव आणि दुसरा वारकरी संप्रदाय, वारकरी पंथाने भक्तीचे क्षेत्र सर्वांसाठी खुले असावे अशी भूमिका मांडली व आठरापगड जातीचे संत संप्रदायात समाविष्ट करुन घेतले गेले. वारकारी संप्रदायाने जसे विविध जात धर्म पंथातील लोकांना सामावून घेतले तसेच या संपद्रायात स्त्रियांचा देखील समावेश आहे ज्यांचा संदर्भ तेथे अनिवार्य आहे, जनाबाई कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मळा, भागू महारीण, या कवयित्रींनी अंभागद्वारे आपले दु:ख मांडले. या स्त्रिया दलितच होत्या त्यामुळे यादव काळाचत दलित स्त्री प्रकट झाल्या असे म्हणणे वावगे ठरु नये. कोणतीही सामाजिक क्रांती ही अचानकपणे होत नाही, त्याची पाळेमुळे ही खोलवर रुजलेली असतात, दलित स्त्री कवयित्रीच्या अभिव्यक्तीचे रुपाने पूर्वीपासून सारकले आहे. तत्कालीन सामाजिक विषमतेचे चित्रण कान्होपात्रा आपल्या अंभगात व्यक्त करते. तसेच दासीपण वाटयाला आल्याचे दु:ख जनाबाईंच्या अंभागात येते. अभंगावरुन हे निदर्शना येते की स्त्रीला दलितत्वाची जाणिव झाली होती पण तिचा उहापोह तेवढा झाला नाही. कारण तत्कालीन सामाजिक स्थितीत भक्ती हेच मुक्तीचे साधन होते. त्यामुळे या रचनेकडे भक्तीच्या माध्यमातूनच पाहिले गेले. 1960 नंतर दलित कवयित्रींच्या कवितेतील दलित जाणिव बंडखोरीची भाषा करतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यांमुळे दलित माणसात आला. त्याला आत्मभान आले स्वत्वाची व्यथा वेदना, दु:ख साहित्यातून मांडु लागला. या प्रवाहात बनसोडे, प्रज्ञा पवार, ज्योती लांजेवार, सूरेखा भगत, संध्या रंगारी, प्रतिमा अहिरे यांच्या नावाचा प्रामुख्याने उल्लेख येतो. कारण या स्वत:च्या दु:खाबरोबर समग्र स्त्री जातीचे दु:ख मांडतात. राज्यघटनेने जरी देशातील प्रत्येक नागरीक समान मानलेला आहे. तरी समाजात अस्पृश्यतेची विषमतेची भावना कायम आहे. या संवेदनेचा अविष्कार सुरेख भगत कवितेद्वारे व्यक्त करतात.

एक गाव एक पाणवठा
आम्ही सारे भारतीय आहोत
आमचाही आवेश रामांचित झाला
परंतु एक घटना घडली
लोकांची जातीय तपासणी सुरु झाली
आपले किती परके किती

याचा हिशोब मांडला गेला
त्यावेळी आम्ही ओरडून म्हटले
तुमची वर्णव्यवस्था जातीवरच अवलंबून आहे

हिंदु संस्कृतीत जी व्यक्ती घेते ती जात घेऊनच येते हे वास्तव आहे. ज्या जातीत ती जन्मे त्या जतीचा अहंकार तिच्या मनानत जन्मत: उतरत जातो. जातीची ही एक उतरंड आहे. आपण या देशात कशाला जन्माला आलो, अशी अपराधी पणाची भावना जातीसंस्था देत आलेली आहे. शुद्र जातीतील व्यक्तीची नेहमीच उपेक्षा करण्यात आली. माणूस म्हणून या समाज व्यवस्थेने कधी त्यांच्याकडे पाहिलेच नाही. जातीची ही भावना क्रुर आहे याची नोंद करताना दिशा या काव्यंसग्रहाद्वारे ज्योती लांजेवारी म्हणतात.

कशाला जन्माला आलास
इथं या बकाल वस्तीत
इथली सगळी झाडं छाटलेली आहेत
आणि दिव्याच्या खांबाना
गंज लागला आहे...
कशाला जन्माला आलास

गावकुसाबाहेरचे जीवन हे मृत्यु यातना देणारे होते. या माणसाने काबाडकष्ट करावे अन समाजाची सेवा करावी त्यांची सर्व कामे करावीत, पण त्यांचे आयुष्य मात्र परावलंबी होते दिनरातकष्टी करुनही पोटभर भाकरी मिळण्याचीही मारमार होती आज दिवस बदलले आहेत, असे वाटे पण,,

सरकारी फतवा म्हणून नोकरीत घेतात
उपकारांच्या ओझ्याचे नित्यस्मरण देतात
जातीची नाळ जोपासतात
आम्हालाच, जातीवादी ठरतात
रिझर्वेशनचे घोडे कागदावर नाचवतात
माजले धेडं म्हणून हिणवतात...
साऱ्या जागा हडपून घेतात
आणि पूर्वपारचे सारे भोग
नव्याने वाटयास येतात...

घटनेने सर्वांना समान लेखले म्हणुन वर्गात बसून शिकायला मिळते, सरकारी फतवा म्हणुन नोकरीही मिळते दलित म्हणून कमी मार्काला पासही मुभाही देतात आणि पुन्हा जातच काढतात.पूर्वीसुद्धा दलितांच्या वाटयाला अवहेलनाची आली आणि आजही तेच होत आहे. फक्त स्वरुप बदलले आहे, म्हणून कवयित्री म्हणते या जातीत जन्माला आलो हा कायम आमचा दोष आहे, ज्याची जखम त्यालाच वेदना कळते ही दलितत्वाची जाणिव या कवितेतून प्रखरतेने प्रकट होते. याच आशयाची कविता संध्या रंगारी आघात या कविता संग्रहात लिहितात...

मी जन्मले
अस्पृश्य मातेच्या पोटी
कपाळावर रेखाटलेल्या महारपणाचा वारसा घेवून
स्वत:लाच जाळत राहिले
पोटाच्या भाकरीला

शेकावा म्हणून

आजही भारतीय समाज रचना वर्णव्यवस्थेवरच आधारित आहे अस्पृश्य मातेच्या पोटी जन्माला येणाऱ्या अपत्यालाही आजही आपण अस्पृश्य जन्माला आलो, याचे दु:ख होते, याचे कारण इथली सामाजिक मानसिकात होय. ज्यांनी स्त्रियांना असाहय्यतेचे जिणे जगण्यासाठी मजबुर केले त्या वर्णव्यवस्थेचे विरुद्धची चीड त्या आपल्या कवितेत व्यक्त करतात. या सोसलेपणातूनच विद्रोहाचा सूर येतो. प्रचलित समाज व्यवस्थेविरुद्ध जशी संघर्षाची भावना निर्माण झाली तशी बंडखोरीचीही भावना हिरा बनसोडे यांच्या काव्यातुन व्यक्त होते.

क्रांतीची बिजली पेटली आहे
प्रत्येक घायाळ ऱ्हदयात
ही लढाई अटळ आहे ... अटळ आहे ...
मग जाय होवो न होवो

वर्णव्यवस्थेमुळे भोगावे लागलेले दु:ख जात निहाय सांस्कृतिक धर्म जगाच्या पाठीवर कुठंही गेले तरी पाठ सोडत नाही हे वास्तव सुषमा अंधारे आपल्या कवितेद्वारे व्यक्त करतात.

जी जात नाही
जी जात असते
जगात कुठेही गेलं
तरी ती सोबत असते
जातीच्या नावावरच
सगळा खेळ चालतो कलंक मात्र जातीला लागतो
सगळे निर्दोष सुटतात...
बदनाम मात्र जात होते

दलित कवयित्रींची कविता ही चिंतनशील आहे. समाज आणि वास्तव याची ती कठोरपणे मीमांसा करते. विषमता ग्रस्त समाजाचे वास्तव चित्रण ती करते. समाजाने केलेल्या शोषणाचा तीव्र निषेधही करते, पण या सामाजिक स्तरीकरणाचे दु:ख तिच्या मनात कुठेतरी सलते आणि ते काव्यातून व्यक्त होते. आजही समाजात अमुक एक जातीचा आहेस, म्हणजे तूच चोरी केलीस असे आरोप करु चिमूरडया जिवाला ठेचुन मारण्यात येते. तेंव्हा प्रश्न पडतो खरचं जात संपुष्टात आली आहे काय, आजही समाजात अशा अनेक घटना घडतात तेंव्हा वाटते की, समाजात विषमता अजुनही आहे. उच-निच कनिष्ठ वरिष्ठ हे भेद कधी संपणार आहे का, असा प्रश्न पुन्हा पुन्हा निर्माण होतो दलित स्त्रीचं जीवन हे दु:खाने भरलेले आहे. अस्पृश्य म्हणून तिथे दुहेरी स्वरुपात शोषण झालेले आहे. परसमाज आणि स्व समाज तिचे स्थान दुय्यम दर्जाचे आहे. पण परिस्थितीशी झुंज देतात. या कवयित्री आंबेडकरी प्रेरणेने प्रभावित झाल्या आहेत. त्यांची वेदना विद्रोह व या विद्रोहातून प्रचलित सामाजिक विषमतेला नकार देत त्यांची कविता साकारते ती स्वत:च अस्तित्व शोधते...

संदर्भ सूची :-

1. भगत सुरेखा - साक्ष प्रशांत प्रकाशन बुलढाणा
2. बनसोड हिरा - फिर्याद समाज प्रबोधन संस्था, पुणे.
3. प्रा. लांजेवार ज्योती-दिशा निखिल प्रकाशन, नागपुर.
4. अंधारे सुषमा - शापित पैंजण देवाशिर्ष प्र. पुणे.
5. प्रा. रंगारी संध्या - अपघात शब्ददान प्रकाशन, नांदेड.

जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावरील परिणाम

डॉ. मीनाक्षी देव (निमकर)

मराठी विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक,डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद.

सारांश (Abstrae) :जागतिकीकरण हा एक विसाव्या शतकाचा परवलीचा शब्द बनला आहे. अद्ययावत सोयी सुविधा यांत्रिकीकरणाचा विकास यामुळे मानवी जीवन अधिक गतिमान धकाधकीचे झाले आहे, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून कोणीही सुटलेली नाही. शहर खेडे या सर्वांना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेढून घेतले आहे. जागतिकीकरणाचे उघड परिणाम सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रावर झाले आहेत, तसेच मराठी भाषा व साहित्यावर ही झाले आहेत. प्रस्तुत शोध निबंधातून जागतिकीकरणाचा भाषा व साहित्यावर झालेला परिणाम अभ्यासताना साहित्यामध्ये आलेली आधुनिकता, नाविन्यपूर्ण प्रतिमा प्रतिके प्रयोगशीलता, वैचारिकता आणि मराठी भाषेवर इंग्रजी - हिन्दी भाषेचा जाणवणारा पगडा - प्रभाव या दृष्टीने प्रकाश झोत टाकण्यात आला आहे.

प्रास्ताविक :

जागतिकीकरणाने माणसाच्या जगण्याची लय बदलवून टाकली. महानगर असो की खेडे कोणी ही यातून सुटलेला नाही गेल्या तीन दशकामध्ये झालेले परिवर्तन जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना व्यापून राहिलेले आहे.

जागतिकीकरणाचा उघड परिणाम सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आर्थिक क्षेत्रावर झालेला दिसून येतो आहे. जागतिकीकरणामुळे वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण आधुनिकीकरण, संणगकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, या गोष्टींमध्ये दिवसेंदिवस वाढ होतांना दिसून येत आहे.

१९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या पर्वात मुक्त अर्थव्यवस्थेचा शिरकाव, त्याचबरोबर अद्ययावत माहिती तंत्रज्ञान, जलद दळणवळणाची साधने, यांत्रिकीकरणाच्या विकासामुळे मानवी जीवन अधिक गतिमान, धकाधकीचे, अनेक अर्थांनी गजबजलेले झाले आहे.

भौतिक आणि आर्थिक प्रगती करण्याच्या प्रयत्नांत `पैसा' हेच जीवनमूल्य आणि चंगळवाद, स्वच्छंदीपणे जगण्याकडे कल वाढला पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण वाढले राहणीमान, जीवनमान, खानपानाच्या सवयी, सण उत्सव साजरे करण्याच्या पद्धती, कौटुंबिक नाते संबंध, प्रतिष्ठेच्या कल्पना या सर्वांमध्येच अमुलाग्र बदल झालेला जाणवतो.

जागतिकीकरणामुळे भारतीय संस्कृती आणि मूल्य आणि पाश्चिमात्य संस्कृती आणि मूल्य यांच्यामध्ये सरमिसळ होऊन पारंपरिक गोष्टी पूर्णपणे सोडता ही येत नाही आणि पाश्चात्य संस्कृतीचा संपूर्णपणे स्वीकार आणि अंगिकार ही करता येत नाही अशी काहीशी संभ्रमित त्रिशंकू सारखी आपल्या या जागतिकीकरणामुळे झालेली दिसून येत आहे.

भारतीय संस्कृतीतील सेवा, त्याग, समर्पणशीलता, सहिष्णूता, विश्वास, एकमेकांचा आदर, सहकार्य भावना, नितीमूल्यांच्या संकल्पना कुचकामी ठरवल्या जात आहेत. सगळेच जण पैशाच्या मागे धावताना दिसून येत आहेत, कोणाकडे ही वेळ नाही, विचार करायला सवडनाही, त्यामुळे एकविसाव्या शतकातील पहिल्या दोन दशकात मानवी जीवनात बऱ्याच प्रमाणात स्थित्यंतर झालेले आहे.

जागतिकी करणाचा भाषा व साहित्यावर झालेला परिणाम :

साहित्य समाज जीवनाचा आरसा असतो. आपल्या अवती - भोवती ज्या समस्या दिसून येतात मग त्या वैयक्तिक असोत, कौटुंबिक असोत की सामाजिक असोत त्याचे प्रतिबिंब साहित्यातून चित्रित होणे अगदी स्वाभाविक असते.

१९९० नंतर जी पिढी जन्माला आली जी आज ३०/३२ वर्षाची आहे त्या युवा पिढीतील लेखकांचे साहित्य त्या साहित्यातून हाताळलेले विषय, आशय, अभिव्यक्ती, रूपबंध आणि भाषा या सगळ्याच बाबतीत जागतिकीरणाचे पडसाद ऐकून येतात. व्यापारी करणाच्या व्यवस्थेमुळे सर्व सामान्यांचे जीवन अस्वस्थता, अनिश्चितता आणि संभ्रम वाढवणारे बनले आहे. अशाया नव्या जाणिवा व संवेदनांचा वेध लिहित्या युवा साहित्यिकांच्या लेखनातून घेतलेला दिसून येतो, दैनंदिन जगण्याशी संबंधित अनुभव, विश्वाचा वेध या युवा लेखकांनी घेतलेला जाणवतो, महानगरामधील संस्कृती, बदललेली ग्राम संस्कृती, पर्यावरण विषयक प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, इंग्रजी भाषेचे प्राबल्य, इंटरनेट संगणक, मोबाईल, अशी विविध माध्यमे लिलया हाताळणारी युवा पिढी या पिढीचे पतिनिधीत्व करणारे.

साहित्यिक, प्रगल्भ, चिंतनशील, मर्मग्राही मांडणी करीत आत्मशोध आणि आत्माविष्काराने वैश्विक पातळीवरचे प्रश्न आपल्या साहित्यातून हाताळताना दिसतात.

जागतिकीकरणामुळे अनेक नवीन विषय काही चिंतेचे आणि काही आनंदाचे ही आपल्या आयुष्यात आले आहेत हे विषय हाताळून युवा लेखक जोमाने साहित्य लेखन करीत आहेत.

जागतिकीकरणाचाच एक परिणाम म्हणजे पुस्तके -मासिके ग्रंथ छापील किंवा मुद्रित या पारंपरिक माध्यमांच्या मर्यादित कक्षा ओलांडून ऑनलाईन संकेत स्थलावर, ब्लॉगवर उपलब्ध होत आहेत.

जागतिकीकरणामुळे वाचक वर्ग वाढला आहे. आंतरजालावरील लेखन वसाहित्य वाचणारा व्यापक वर्ग देश विदेशातील मंडळी वेगवेगळ्या विषयावर लेखन वाचन करीत विचारांची देवाण - घेवाण करीत आहेत.

१) जागतिकीकरणाच्या आधुनिक तंत्र माध्यमांच्या युगाने ज्ञान प्रक्रियेचे सारे बांधकामच बदलवलेले आहे. एकविसव्या शतकातील माध्यम क्रांतीतून म्हणजेच इंटरनेट मोबाईल या संपर्क माध्यमातून अभिव्यक्त होणारा लेखक आणि त्याचे साहित्य असा एक नवा साहित्य प्रकार उदयाला आला आहे.

२) आपल्या आसपासच्या परिसराच्या, परिस्थितीतल्या माणसांच्या व्यथा - वेदना समस्या हाल अपेष्टा यांचे चित्रण साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

जागतिकीकरणामुळे भाषा व साहित्यात आलेली आधुनिकता : जीवनशैली, राहणीमान विचार भावना यातून प्रकर्षाने जाणवते ती स्त्री पुरुष संबंध मैत्री, या संबंधी जे वर्णन साहित्यातून येते ते आधुनिक काळाची अनुभूती देणारी आहे.

उदा. रवी कोरडे या कवीच्या ``धुसर झालं नसतं गाव'' या काव्य संग्रहातून जागतिकीकरण, उदारीकरणाच्या संदर्भात नव्या प्रतिमा प्रतिकांचा वापर करीत सद्यकालीन शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले आहेत.

``ब्लू टुथ ऑन केलं म्हणजे इकडचं तिकडे केलं जातं जसं गाजर गवत पांगावं शिवाभर.''

``सणांना यावेत शुष्क शुभेच्छांचे एस. एम.एस. तसे नुसता अक्षरांचा सांगाडा म्हणजे कशी होऊ शकेल कविता''

``आय. सी. यु. मध्ये ठेवावा पेशंट तसे शेताच्या अंगभर नळया''

``गर्भवतीने करावी सोनोग्राफी दर महिन्याला तशा बियाण्यांच्या चाचण्या''

``घटावी मुलींची संख्या जाणून बुजून, तसे बैल झालेले वजा गोठ्यातून''

असे आजच्या काळाचे संदर्भ देऊन शेतकऱ्यांची अवस्था आधुनिक प्रतिमा प्रतिकांमधून कवी नेमकेपणाने अचूकपणाने व्यक्त करतात.

जागतिकीकरणामुळे भाषा व साहित्यातील आलेला नाविन्यता : प्रस्थापित साहित्यात ज्या परिस्थितीचे घटनांचे वर्णन् पूर्वी आलेले नव्हते, असे घटना प्रसंग जेव्हा साहित्याच्या माध्यमातून येतात तेव्हा ते साहित्य नवीन वाटतात. उदा. लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहणाऱ्या जोडप्याचे धर्म कीती सुमंत यांनी ``पाणी चारु आरो इत्यादी'' या नाटकात मांडलेला. विषय नवा आशय सूचित करणारा आहे. ``ब्लॉगच्या आरशा पल्याड'' या कथासंग्रहातील मनस्विनी लता रवींद्र या लेखिकेने माहिती तंत्रज्ञानाच्या मोबाईलच्या आभासी जाळयात अडकलेल्या तरुणाईचे केलेले वर्णन वास्तव सद्यकालीन परिस्थिती आधारेखित करणारी आहे.

जागतिकीकरणामुळे भाषा व साहित्यातील आलेला प्रयोगशीलता : ज्यावेळी साहित्यात साचलेपणाचा दोष निर्माण होतो त्यावेळी प्रतिभावान लेखक कळत नकळत किंवा जाणीवपूर्वक प्रयोगशीतात. स्वीकारताना बदलत्या काळाची बदलती परिस्थिती ही प्रयोगशीलतेसाठी उपयुक्त ठरते. प्रयोगशील साहित्याचा संबंध जसा आशयाशी तसा अभिव्यक्तीशीही असतो. पारंपरिक आकृतीबंध आणि भाषा शैली याबद्दल लेखकांनी काही नवा मार्ग स्वीकारला की त्यात प्रयोगशीलता आपोआपच येते, आजच्या जागतीकरणाच्या काळात माहिती तंत्र ज्ञानाच्या युगात बदललेल्या प्रतिमा जेव्हा येतात, उदा. नाटकामध्ये स्वगतासाठी मोबाइलचा संभाषणासाठी केलेला प्रयोग, तसेच ब्लॉगद्वारे स्वत:च्या भावना, मतं इच्छा मांडणारी युवापिढी, ही जागतिकीकरणातली प्रयोगशीलता म्हणावी लागेल.

माहिती तंत्रज्ञानाचे गावपातळीवर, शेतकऱ्यांवर झालेले परिणाम आधुनिक तंत्रांच्या प्रतिमा प्रतिकांमधून अभिव्यक्त होतात, तेव्हा ती प्रयोगशील अभिव्यक्ती ठरते, ती मनाला चटकन भिडते आणि समकालीन वास्तव अचूकपणे अभिव्यक्त होते.

जागतिकीकरणामुळे भाषा व साहित्यात आलेली वैचारिकता -

वैचारिक साहित्यातून समाज चिंतन, जाणीव जागृती, विचार जागृती केली जाते, प्रबोधन आणि सामाजिक सुधारणांना प्राधान्य देण्याचं कार्य वैचारिक साहित्यातून केलं जातं सद्यकालीन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्राबद्दलचे वास्तवा भिमुख चित्रण करताना, चिंतन मनन निरीक्षण करून वास्तवाभिमुखतेने ते लिखाण केलं जाते त्यामुळे त्यात वैचारिकता आली आहे.

कवी ऐश्वर्य पाटेकर `भूईशास्त्र' मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पर्यावरण विषयक प्रश्न हाताळतात, वीरा राठोड, `सेन साईवेसं` या काव्य संग्रहातून भटक्या - विमुक्तांच्या जगण्यातील समस्या मांडतात. महानगरीय लोकांच्या जगण्यातील संवेदना हीन, एकाकी - असुरक्षित गोंधळात टाकणारी परिस्थितीचे चित्रण सुशीलकुमार शिंदे ``शहर आत्महत्या, करायचं म्हणतंय मध्ये मांडतात, महाविद्याल्यातील विद्यार्थ्यांमधील वाढती व्यसनाधिनता लैंगिकतेचे आकर्षण याविषयी `काळे करडे स्ट्रोक्स' मधून प्रणव सकदेवांनी केलेले चित्रण अंतर्मुख करून विचार करायला लावणारे आहे.

जागतिकीकरणातील साहित्याची भाषा ही इंग्रजी - हिन्दी मिश्रित मराठी भाषा आहे. काही वर्णनात ती खूप बिनधास्त, सत्य परखडपणे सांगणारी ग्राम्य शिवराळ ही वाटते, पुण्या - मुंबई सारख्या महानगरात राहणाऱ्या लेखकाच्या मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचा खूप मोठा पगडा असल्याचे जाणवते.

``जागतिकीकरणात माझी कविता`` या कवितेत उत्तम कांबळे म्हणतात, ``सारं जग जवळ आलंय म्हणतात, पण माणसं माणसापासून दूर धावताहेत, रोबोटच्या गळयात - गळा घालता हेत, माणसा ऐवजी कुत्र्यावर, कुत्र्याऐवजी यंत्रावर विश्वास टाकताहेत, सारेच मोईलवर जमिनीवर कोणीच नाही,`` अशी विदारकस्थिती सद्यकाळात सर्वत्र दिसून आहेत.

यंत्रयुगाचा लहान मुलांवर झाला न परिणाम, मित्रांमध्ये मैदानावर खेळण्यापेक्षा मुलं घरात दूरदर्शन मोबाईल संगणक यावरच रमताहेत, याचं बोलकं चित्रण प्रज्ञा लोखंडे यांनी `खेळ' या कवितेतून केले आहे.

``बंद खोलीत कम्युटरवर खेळताहेत एक एकटी मुलं त्यांच्यासाठी आतडं तिळतिळ तुटण्याची वेळच् आता संपून गेलीय''

काळानुरूप होणारे हे बदल अपेक्षित असतातच पण

जागतिकीकरणाच्या रेट्यात आगतिक ना होता, आपले `स्व'त्व आणि सत्व आपण सोडू नये जे चांगले आहे, उत्तम आणि सकस आहे ते आपण टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मराठी भाषा आणि वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी - जागतिकीकरणाच्या झंझावातात ही मराठी साहित्य दालनातील ताजेपणा व सर्जनशील लेखनाचा नंदादीप सदैव पेटता ठेवण्याची, मराठी भाषा व साहित्य संवर्धनची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे. हे निश्चित -

संदर्भ ग्रंथ सूची : (MLA stayel**)**

१) अजमेरा सूर्यकांता उपर्वट विनोद - जागतिकीकरण आणि मराठी भाषा, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०११

२) गायकवाड शरद / शिंदे सुनील - जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन (क्र. ७७४) पुणे, २००९.

३) जाधव जयद्रय - जागतिकीकरण मराठी भाषा आव्हाने आणि उपाय्ा चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०२१.

४) पाटील भास्कर - जागतिकीकरण मराठी भाषा आणि शासन चिन्मय प्रकाश, औरंगाबाद, २०११.

जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्था

प्रा. मोटे भैरवनाथ बब्रुवान [1] डॉ. शेषेराव एस. देवनाळकर[2]

सहाय्यक प्रा. अर्थशास्त्र विभाग

शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय लोहारा, ता. लोहारा जिल्हा उस्मानाबाद

सहयोगी प्रा. अर्थशास्त्र विभाग

महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा.ता. निलंगा जिल्हा लातूर.

प्रस्तावना: विसाव्या शतकाच्या शेवटच्या क्षणी संपूर्ण जगामध्ये जागतिकीकरण व खाजगीकरण यांची जागतिक लाट निर्माण झाली होती. नेमक्या याच कालावधीत साधारणता 1990 च्या दरम्यान भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक कोंडी मध्ये सापडली होती. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अनेक प्रश्न निर्माण झाले. उदा. व्यवहार शेषातील वाढती तूट, परदेशी गंगाजळी मध्येघट, राजकीय, अस्थिरता, अनिवासी भारतीयांनी आपल्या ठेवी काढून घेतल्या. आशा आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेने काही अटी घालून आर्थिक सहकार्य देऊ केले. त्यामुळेच अर्थव्यवस्थेच्या धोरणात संरचनात्मक बदल करण्याचे धोरण निश्चित केले जुलै 1991 मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरण जाहीर केले. या नवीन आर्थिक धोरणात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकरणाचा स्वीकार करण्यात आला. या नवीन आर्थिक धोरणानुसार औद्योगिक परवाना धोरण शिथिल केले. सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी केली, परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञानास मुक्त प्रवेश देण्यात आला. थोडक्यात जागतिकीकरणाची संकल्पना विकसित होत गेली.

संशोधनाची उद्दिष्टे:

1. जागतिकीकरण या संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हानाचा अभ्यास करणे.
3. जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्र, इंटरनेट या दुय्यम स्त्रोताचा प्रामुख्याने उपयोग केला आहे.

जागतिकीकरण संकल्पनेतील महत्वाच्या बाबी:

1. व्यापारावरील बंधन कमी करणे.
2. भांडवल व तंत्रज्ञानास मुक्त प्रवेश
3. सरकारी उद्योगांचे खाजगीकरण
4. श्रेमाच्या एका देशातून दुसऱ्या देशात मुक्त प्रवेश

जागतिकीकरणाचे अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने:

1991 मध्ये भारतात निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी च्या सल्ल्यावरून आपली अर्थव्यवस्था खुली करून जातील करण स्वीकारले या घटनेला आज 28 वर्षे पूर्ण झाले असले तरी अर्थव्यवस्थेसमोर पुढील आव्हाने दिसून येतात.

1) स्पर्धात्मक क्षमतेचा अभाव: जागतिक बाजारपेठ स्पर्धात्मक बाजारासाठी खुली झालेली आहे. त्यामुळे जागतिक बाजारात वस्तू व मालाला मागणी फक्त गुणात्मक दर्जा मुळे मिळू शकते. व्यापार वाढीसाठी अनेक देशांमध्ये मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे प्रत्येक वस्तूच्या उत्पादनासाठी अनेक उत्पादन संस्था बाजारामध्ये असल्याचे दिसते.

त्यामुळे दर्जेदार उद्योग संस्था बाजारात टिकून राहू शकतात. आशा स्पर्धात्मक बाजारात टिकून राहणे हे भारतीय उद्योगासाठी आव्हानच आहे कारण ज्या दर्जाच्या वस्तू जागतिक बाजारपेठेत चालतात तसेच या वस्तू उत्पादन करण्यासाठी भारतीय वस्तूचा गुणात्मक दर्जा कमी पडत आहे.

2) भांडवलाची आवश्यकता: उदारीकरण व जागतिकीकरण याने देशाच्या सीमा नाहीशा झालेल्या आहेत.मुक्त व्यापाराने भांडणाच्या गतिशील तेस मदतच मिळते जगामध्ये जागतिकीकरणाने अनेक खाजगी उत्पादन संस्था मोठ्या प्रमाणात नफा मिळवीत आहेत. यांना त्यातूनच त्यांना नवीन गुंतवणूक करणे शक्य होते. परंतु भारतामध्ये मात्र बचत कमी असल्याने गुंतवणुकीचा दरही कमी होतो. एकंदरीत भांडवलाची उपलब्धता निर्माण करणे ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हानच आहे.

३) प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव: कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त गुणात्मक उत्पादन करावयाची असल्यास प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक ठरते. व पर्याप्त भांडवलात प्रगत तंत्रज्ञानाचा वापर भारतात करणे अशक्य आहे. त्यासाठी तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरते. परंतु कमी श्रम व मर्यादित खर्चात उत्पादन करणे व स्पर्धेत टिकून राहणे हे भारतीय उद्योगासमोर एक आव्हानच आहे.

4) भ्रष्टाचार: गुणात्मक दर्जा चांगला असल्यास भ्रष्टाचारास वाव मिळत नाही परंतु भ्रष्टाचाराने वस्तूचा दर्जा कमी असला तरी वस्तू बाजारात विकल्या जातात. अशा या भारतीय उद्योगपती चा समज आहे. कारण राजकीय वरदहस्ताने काही उद्योग भारतात शिवाय भारतात कच्चामाल खरेदी, वितरण, विक्री व्यवसाय यामध्ये भ्रष्टाचाराचे मोठे प्रमाण असल्याचे दिसते. त्यामुळेच खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात पारदर्शकता आणणे कठीण काम आहे. त्यामुळे भ्रष्टाचार ही एक भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हान आहे.

5) राजकीय हस्तक्षेप: भारतात प्रत्येक धोरण सरकार ठरवते. त्यामुळे उद्योग किंवा व्यवसाय मध्ये राजकीय हस्तक्षेप वाढत आहे. त्यामुळे उत्पादन करण्यापासून ते त्याचे वितरण करण्यापर्यंत सर्व निर्णय राजकीय असल्याने त्यामध्ये भ्रष्टाचार वाढत आहे. त्यामुळे उद्योगांना उत्पादनाचे व वितरणाचे स्वातंत्र्य राहत नाही. त्यामुळेच उद्योगासाठी पोषक वातावरणाचा अभाव हे एक आव्हानच आहे.

6) वस्तूंच्या वाढत्या किमती व चलन वाढ: जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढत्या तेलाच्या किमती मुळे भारतातील सर्व वस्तूंच्या किमती वाढलेल्या दिसतात. उदारीकरणाने किमतीचे समानीकरण करण्यासाठी देशांतर्गत वस्तूचे भाव वाढतात. खाजगी करणाने गुणात्मक दर्जा वाढला असला तरी किमती वाढताना दिसतात त्याच बरोबर चलनात वाढ केल्यामुळे ही भाव वाढ होत आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम अर्थव्यवस्थेवर होत आहे.

7) पारदर्शकता व उत्तरदायित्व: भारतात सार्वजनिक क्षेत्रात पारदर्शकता व उत्तरदायित्वाचा अभाव आढळतो. कारण जागतिक अर्थव्यवस्थेची बरोबरी करताना या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. कारण उत्पादनाचा दर्जा व टिकाऊपणा हे गुण पारदर्शक ते मुळेच येतात. म्हणून उत्पादन व विक्री याबाबत पारदर्शकतेचा अभाव आढळतो.

अशाप्रकारे जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेपुढील अनेक आव्हाने असले तरी भारतातील बदलती स्थिती ही आव्हाने स्वीकारण्यास भारतीय अर्थव्यवस्था समर्थ असल्याचे दिसून येते वाढता आर्थिक विकासाचा दर हे जागतिक अर्थव्यवस्थेत भक्कम असल्याचे मानले जाते.

जागतिकीकरणाचे भारताच्या अर्थव्यवस्थेवरील चांगले व वाईट परिणाम:

जागतिकीकरणाचे स्वरूप, आव्हाने याची माहिती घेतल्यानंतर जागतिकीकरणाच्या फायद्या-तोट्याची चर्चा करणे गरजेचे आहे. तेव्हा या धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे चांगले परिणाम पुढील प्रमाणे

1. आर्थिक विकासाला प्रेरणा:

जागतिकीकरणाच्या मुक्त व्यापार व गुंतवणुकीमुळे जगातील सर्व देशातील व आर्थिक विकासला प्रेरणा मिळत आहे. विशेषता अल्पविकसित देशांना याचा फायदा मिळत आहे. एकंदरीत जागतिकीकरणामुळे भारताच्या आर्थिक विकासाला गती मिळून भारतातील लोकांचे जीवनमान उंचावत आहे.

2. लोकांच्या प्रवर्तित बदल:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे लोकांच्या प्रवृत्तीत बदल होत आहे. पाश्चिमात्य देशातील विविध वस्तूंच्या आयातिने भारतातील अनेक लोकांच्या राहणीमानात बदल होत आहे. अनेक नवीन वस्तू आल्याने काही जुन्या वस्तू कालबाह्य होत आहे विदेशी वस्तू वापराची फॅशन निर्माण होत आहे. एकंदरीत लोकांच्या प्रवर्तित बदल होत आहे.

3. उत्पादन क्षमतेचा योग्य वापर:

जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर होत आहे अनेक देशातील उत्पादने बाजारात येतात. त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी कार्यक्षमता वाढवावी लागते. उत्पादन क्षमतेचा पूर्ण वापर करावा लागतो. त्याचा शिवाय स्पर्धेत टिकता येत नाही.

4. स्पर्धा शक्ती वाढत आहेत:

जागतिकीकरणाच्या धोरणाने विकसनशील देश आपली स्पर्धा शक्ती सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. उदा. 1991 पासून आंतरराष्ट्रीय व्यापारातील बंधने दूर करण्याची प्रक्रिया होत आहे. भारतात वस्तू भांडवल व तंत्रज्ञानाच्या मुक्त प्रवाहाला मान्यता द्यावी लागत आहे. अश्या प्रकारे जागतिकीकरणामुळे भारतामध्ये स्पर्धा शक्ती वाढत आहे.

5. जग जवळ येत आहे:

जागतिकीकरण प्रक्रियेमुळे जगातील सर्व देश एकमेकांच्या जवळ येत आहे. दूरसंचार क्षेत्रातील क्रांतिकारक बदलामुळे हे शक्य झाले. दूरसंचार, इंटरनेट, कॉम्प्युटर, ई-मेल यामुळे माहिती तंत्रज्ञान क्रांती झाली आहे. या क्रांतीने ज्ञान जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात सहज उपलब्ध होत आहे यामुळे जग जवळ येत आहे.

जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील वाईट परिणाम:

1.कर्ज बाजारी पण वाढ झाली:

जागतिकीकरणामुळे काही अविकसित देश कर्जाच्या सापळ्यात सापडले आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी नाणेनिधी व जागतिक बँकेकडे धाव घेतली आहे. या संस्थांनी मदत देताना कर्जबाजारी देशांनी अर्थव्यवस्थेला पुनर्रचना चा कार्यक्रम स्वीकारली पाहिजे अशी अट घातली हा कर्जबाजारी वाल्यांना पहिला धक्का मेक्सिकोला बसला त्यानंतर ब्राझील, चिली, अर्जेंटिना या देशाची स्थिती अशीच झाली तसेच 1991 नंतर भारताची स्थिती वरील देशाप्रमाणे बनली होती.

2. संस्कृतीक विविधतेवर परिणाम:

भारतासारख्या देशावर जागतिकीकरणाचा संस्कृतीक विविधतेवर अनिष्ट परिणाम होत आहे. खानपान, वेशभूषा, संगीत, जीवन, पद्धती जीवनमूल्य या सर्वावर या धोरणाचा अनिष्ट परिणाम होत आहे. कारण पारंपारिक जीवनपद्धती व मूल्य नष्ट होत आहे. विशेषता विकसनशील देशातील तरुण वर्ग आपल्या समृद्ध व संस्कृतिक परंपरांना पारखा होत आहे.

3. नैसर्गिक संपत्तीचा रास:

जागतिकीकरणामुळे विविध देशातील नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत आहे. जागतिकीकरणाने विश्व वृत्ती वनसंपत्तीचा 55 टक्के भाग संपुष्टात येत आहे जैविक विविधतेचा ऱ्हास होत आहे

नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हासाने मानवी संस्कृतीला धोका निर्माण होत आहे. मानवी संस्कृतीला धोका निर्माण होत आहे त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे.

4. शेतीवर प्रतिकूल परिणाम:

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या भारतासारख्या देशात कृषी व्यवस्था स्थापनाच या प्रयत्नात आहे. म्हणजे एका बाजूने बी बियाणे, खते कीटकनाशके यांच्या पुरवठ्यावर तर दुसऱ्या बाजूने शेती उत्पादनावर पूर्ण नियंत्रण ठेवत आहे या नवीन व्यवस्थेत भारतासारख्या 80 टक्के लहान शेतकरी असणार्या देशात त्यांचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे भविष्य अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून राहावे लागेल हे परावलंबित्व अत्यंत धोकादायक आहे. अशाप्रकारे जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर काही चांगले तर काही वाईट परिणाम दिसून येत आहे.

समारोप:

जागतिकीकरणाचे चांगले व वाईट परिणाम विचारात घेता त्यातून येणारी आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी ची उपाय योजना करावे लागेल. कारण आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक यापासून लाभ मिळण्याच्या स्थितीमध्ये भारतीय अर्थव्यवस्था आहे. जगाचा माहिती तंत्रज्ञान उद्योगाच्या शिखरावर भारताची स्वारी हे देशातील कुशल मनुष्य बदलाचे विपुल विपुलतेचे प्रतीक आहे. विदेशी गुंतवणूक धोरण बदलामुळे उद्योगाच्या पुनर्रचित पर्यावरणामध्ये उद्योग चालावे लागणार आहे. भारतीय उद्योग योग्य व्यापारासाठी बळी ठरू नयेत. यासाठी भारत सरकारने जागरूक राहिले पाहिजे. संघटित क्षेत्रातील रोजगार वाढ करणे आवश्यक आहे. वाढणारी विषमता नियंत्रित करून ती कमी करणे हे आव्हान पेलण्याची आहे. आणि शेवटच्या माणसापर्यंत विकासाची फळे पोहोचविणे त्यासाठी रोजगार निर्मिती वाढवणे, लघु व कुटीर उद्योगांना संरक्षण देणे आवश्यक आहे. सामाजिक व आर्थिक लोकशाही जोपासणे हे आपले ध्येय असले पाहिजे. जागतिकीकरणाचे वाईट परिणाम आणि आव्हाने पेलण्यासाठी सर्वसामान्य माणसाची शक्ती वाढवणारी समावेशक विकास कसा साधता येईल. यासाठी उपाय योजना अमलात आणावी लागेल.

संदर्भ:

1) डॉ. जगन कराडे- जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन पुणे.

2)डॉ. जी.एन. झामरे-भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मकअर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिकेशन नागपुर.

3. डॉ. आर. जी. पैठणकर- भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, डायमंड प्रकाशन पुणे.

4. डॉ. एस. के. ढगे- भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास- के. एस. पब्लिकेशन पुणे.

हिंदी साहित्य में अनुवादित मराठी दलित आत्मकथाएं

डॉ. गोरे मृणाल शिवाजीराव
सहाय्यक प्राध्यापक (हिंदी विभाग)
Email- mrunalgore36@gmail.com

भारतीय साहित्य में दलित विमर्श की जो धारा प्रवाही हुई उसका श्रेय नि:संदेह मराठी भाषा में रचित साहित्य को जाता है | दलित साहित्य कि प्रेरणा बने महात्मा ज्योतिबा फुले | अपने क्षेत्र में सम्पूर्ण सामाजिक विषमता होने के उपरांत भी विद्रोह के स्वर पुरस्कृत करने में महात्मा फुले जी का महत्व अनन्य साधारण है | दूसरा प्रमुख नाम लिया जायेगा डॉ .बाबासाहेब आंबेडकर जी का | आंबेडकर जी ने उन वर्गों को मुक्ति का अनुभव कराया जिन्हें समाज ने नाकारा था जातिव्यवस्था ने ठुकराया था | दासत्व में जी रहे लोगो में परिवर्तन कि लड़ाई से परिचित कराया | आंबेडकर जी का नागपुर में दीक्षा भूमि पर धम्मादिक्षा ग्रहण से शताब्दियों के बाद गौरवशाली सांस्कृतिक विरासत वाले इस देश के दलितोंको एक नई सांस्कृतिक धरोहर प्राप्त हो गई थी, जिसका दलित साहित्य के बीजवपन में अनुकूल तथा पोषक परिणाम साठोत्तरी दशक परिलक्षित होने लगा | मराठी के प्रसिध दलित साहित्यकार शरणकुमार लिंबाळे अपने एक साक्षात्कार में कहते है_ " इसमें कई संदेह नहीं कि , दलित चेतना और दलित साहित्य के केंद्र में डॉ.बाबासाहेब कि विचारधारा है | डॉ.बाबासाहेब के महापरिनिर्वन के बाद दलित समाज में जो उथलपुथल मची, उसे एक सांस्कृतिक क्रांति ही कहा जा सकता है | इस प्रक्रिया में डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक व्यक्ति का नाम नहीं रहा वह एक विराट विद्रोही सांस्कृतिक आन्दोलन का नाम बन गया है | यह उन्ही के विचारों का परिणाम है कि कई परिवर्तनवादी खड़े हो गए | हजारों वर्षोंसे चुप और बहिष्कृत समाज जाग उठा है |"

दलित साहित्य जन साहित्य के रूप में उभरता है जो मानवीय मुल्यों की भूमिका पर सामन्ती मानसिकता के विरुध आक्रोशजनित संघर्ष है | दारिद्र्ताके कलंक से मुक्ति द्वारा मानव सामाज में समानता, बंधुत्व, मर्यादा और सम्मान के भाव पैदा करना इसका उद्देश है | डॉ पानतावणे दलित साहित्य कि अन्त:चेतना को व्याख्यान्वित करते हुए कहते हैं कि, "दलित साहित्य हमारे समाज का दर्पण है जो हमने देखा, अनुभव किया, भोगा, जाना, समझा उसका अंकन उत्कटतापुर्वक हुआ है | दलित का निर्मूलन हमारे साहित्य का हथियार है | इसलिए सर्वव्यापी क्रांती का यह आव्हान करता है |".

मराठी साहित्य में दलित आत्मकथाओं का अपना विशेष महत्व पूर्ण स्थान है | भोगे हुए जीवन का यथार्थ वर्णन प्रस्तुत करने की तथा अपने संघर्षों को शब्धबद्ध करने का प्रयास मराठी अत्मकथाकारों में इतना सशक्त रूप से मुखरित होता है कि, अत्याधिक कृतियों का हिंदी भाषा तथा अन्य भाषा में उसका अनुवाद हो चूका है | मराठी आत्मकथाओं में शुरुवात दया पवार कि 'बलूत' (हिंदी अनुवाद_ 'अछुत') से मानी जाती है | सन २४ दिसंबर १९७८ में प्रकाशित 'बलूत' कृति दलित आत्मकथा विधा कि पहली कृति है | इसके बाद एक महीने बाद २७ जनवरी १९७९ में प्र.ई. सोनकांबळे कि आत्मकथा 'आठवणीचे पक्षी' (हिंदी अनुवाद_ 'यादों के पंछी') प्रकाशित हुई | अछूत आत्मकथा में दगडू पवार नामधारी व्यक्ति के अंतर्मन कि उसके 'स्व' का बारीकी से चित्रण किया है | प्रस्तुत आत्मकथा का नायक दगडू पवार दलित जीवन और जगत के अमानवीय भोगे भुगत चूका प्रतिनिधि व्यक्ति है |

भूक कि समस्या, शिक्षा का आभाव और घिनोने जीवन व्यापक कि तस्वीर यादों के पंछी आत्मकथा से उभरती है | प्रस्तुत आत्मकथा से गुजरते हुए हम न सिर्फ भारतीय जाती व्यवस्था के मनोसांस्कृतिक रूपों से परिचित होते है, बल्कि समस्त जात्याभिशाप से ग्रस्त समाज के भीतरी ताने-बाने को भी भली भांति समझ सकते है | माधव कोंडविलकर की आत्मकथा 'मुक्काम पोस्ट' (हिंदी अनुवाद_'टूटी जिंदगी') चमार जाती समूह पर प्रकाश डालती है | इसी अनुक्रम में आगे प्रकाशित हुई घुमंतू समाज समूह में कैकाड़ी जाती समूह पर लक्ष्मण माने की आत्मकथा 'उपरा' सन१९८० में प्रकाशित हुई | (हिंदी अनुवाद_'पराया') यहाँ यह उल्लेखनीय होगा कि, १९८१ में उपरा को साहित्य अकादमी का पुरस्कार मिला | पेट कि भूक मिटाने के लिए गाँव दर गाँव तथा जंगल जंगल घूमकर बांस, अरहर, मुंज, बेन, की सीकियों से अनाज रखने के लिए बखार, डाला जैसी चींजे हाथों से बनाने से केकाड़ी लोगोंकी अत्यंत गरीब स्तिथियाँ, समाजीक लांछन और बहिष्कृतता के हलात में बढ़े लक्ष्मण माने का बचपन गधों को चराने में बीत गया | उनके जीवन संघर्ष की यात्रा इस आत्मकथा में अधोरेखित होती है | सन १९८९ में प्रकाशित शंकरराव खरात कि 'तरल अंतराल आत्मकथा' महार जाती का इतिवृत्त पेश करती है |

पहली दलित आत्मकथा लेखिका कुमुद पावडे जी की आत्मकथा है 'अंत:स्फोट' | प्रस्तुत आत्मकथा और उसमें व्यक्त विचार सामाजिक परिवर्तन कि दृष्टी से अपना एक विशेष महत्त्व रखती है | कुमुद पावडे जी का दलित

महिलाओंके उद्धार में बहुत बड़ा योगदान रहा है | पावडे जी ने ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह विमेन ऑर्गनाइझेशन नागपुर के तत्वधान में २ अक्टूम्बर १९९५ को दलित महिला लेखिकाओं का पहला सम्मेलन आयोजित किया था |

इसी क्रम में पोतराज नामधारी एक विशिष्ट समज समूह कि कथाभिव्यक्ति दर्शाती आत्मकथा 'आभारु' जो पार्थ पोलक द्वारा रचित है | सन १९८४ में प्रकाशित शरणकुमार लिंबाले की आत्मकथा 'अक्करमासी' (हिंदी अनुवाद_'दोगला') दलित तथा वैशा औरत के संतान पर प्रकाश डालती है | कुमुद पावडे के बाद कुछ सालों के बाद शांताबाई कृष्णाजी कांबले का 'माझ्या जन्माची चित्तर कथा' (हिंदी अनुवाद_'मेरे जन्म कि चित्रकथा') तथा बेबी कांबले की आत्मकथा 'जिणं आमचं' (हिंदी अनुवाद_'जीवन हमारा') का प्रकाशन हुआ | लक्ष्मण गायकवाड की आत्मकथा 'उचल्या' (हिंदी अनुवाद_ 'उठाईगीर') सन१९८७ में प्रकाशित हुई | लमान/बंजाराजाती पर आत्माराम राठोड द्वारा लिखित तांडा कृति लमाण जाती समुदाय की संस्कृति को दर्शाने के साथ-साथ उपेक्षित तथा समाज के लिए सर्वथा अपरिचित जाती समुदाय को पहचान देती है | श्रीमती जनाबाई कचरू की आत्मकथा 'मरणकला' जो गोपाल संबोधन से परिचित खानाबदोश जाती समुदाय से सम्बंधित है | संघर्ष के साथ जंगलों-वादियों में शिक्षित होती है और अध्यापिका बन कर जिंदगी गुजारती है | इसी संघर्षकथा को दर्शाती यह आत्मकथा है | सन १९९४ में एक ओर सशक्त आत्मकथा कृति सामने आई | किशोर शांताबाई काळे की 'कोल्हाटयाचे पोर' (हिंदी अनुवाद_'छोरा कोल्हाटी का') कोल्हाटी जाती समुह के शिक्षित तथा डॉक्टरी पेशा लेखक किशोर काळे कि यह कथा है | इसमें स्वयं लेखक और उनकी माता शांताबाई काळे दोनों के हृदय-विदारक अनुभवों को हम प्रस्तुत आत्मकथा में पढ़ते है | गुलाबराव हाडेजी इस आत्मकथा के सन्दर्भ में कहा है "यूँ तो महाराष्ट्र में कोल्हाटी जाती समूह कि अपनी एक खास पहचान है | नाच-गाना इनका चित-परिचित वेशा तो हैं ही, मगर मातृसत्ताक परिवार कि प्रथा का समर्थन और इस प्रथा को जलाये रखने कि मज़बूरी या ललक का ही यह परिणाम कहना चाहिए कि, आत्मकथा लेखक किशोर काळे ने अपनी वल्दीयत के परिचय में पिता के बजाय जन्मदायिनी माँ शांताबाई का उल्लेख किया है | अत: किशोर शांताबाई काळे यह नामोल्लेख ही आत्मकथा के प्रति पाठकों कि जिज्ञासा जगाता और बढाता है |"

आत्मकथा मराठी दलित साहित्य कि सशक्त विधा है इंदुमती जोंधले कृत 'बिनपटाची चौकट', नरेंद्र जाधव कृत 'आमचा बाप' आणि आम्ही चंद्रकांत जाधव कृत 'ढगा आडचा चंद्र' आदी | दलित साहित्य सामाजिक परिवर्तन, मानवता का पक्षधर है | क्रांति में वैचारिकता, समानता दिखाई देती है | आत्मचेतन से परिपूर्ण यह साहित्य आम आदमी कि जिंदगी से जुड़ा हुआ साहित्य है | "मराठी साहित्य कि दलित साहित्य एक उपलब्धि है | उसमें दलितों कि पीड़ा, व्यथा, वेदना को वाणी मिली है | डॉ. आंबेडकर ने शिक्षित बनो, संघटित बनो और संघर्ष करो यह नारा दिया जिसके कारन, दलितों में चेतना कि लहर दौड़ने लगी | धर्म परिवर्तन से प्रभावित दलित अपनी अस्मिता को जांचने लगे |

संक्षेप में, दलित अस्मिता का निर्माण क्रांति का आवाहन, विद्रोह कि भावना, दलित पीड़ा, तथा उनका जीवन अंकन, महामानवों का संदेश, समता का उद्घोष, अधिकारों के प्रति स्रुजगता, दलित नारी संघर्ष आदि कई सारे मुद्दोंन को अधोरेखित करता आत्मकथाओं का मराठी से हिंदी तथा अन्य भाषा में अनुवाद हुआ है | वर्तमान में डॉ. दामोदर खडसे जी का नाम मराठी से हिंदी भाषा के अनुवादक के रूप में उभरकर लिया जा सकता है | ये सभी आत्मकथाएँ दलित रचनाकरों की यथार्थ घटनाओं का दस्तावेज है उनकी आपनीति है | यह कहना होगा कि मानव मन कि वाणी, समाज निर्माण का दस्तावेज और प्रमाणिक कथा दलित साहित्य है |

संदर्भ सूची -

1. डॉ.रणसुभे , सूर्यनारायण . दलित चेतना की पहचान , दिल्ली. वाणी प्रकाशन , १०१२ पृ.४०
2. वाल्मीकि , ओमप्रकाश . दलित साहित्य का सोंदर्यशास्त्र , दिल्ली. राधाकृष्ण प्रकाशन , २०११ पृ. २३
3. हाडे, गुलाबराव . मराठी दलित साहित्य आत्मकथा के मिलस्तंभ , इलाहबाद . जयभारती प्रकाशन , २००७ पृ. ८१
4. डॉ . सगरे ,भरत धोंडीराम . इक्कीसवी सदी का दलित साहित्य कानपूर , पूजा पब्लिकेशन , २०१४ पृ. १२७

अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर प्रसार माध्यमांचा पडलेला भाव जागतिकीकरणाच्या संदर्भात

प्रा. विलास माणिकराव गायकवाड

समाजशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय बेलापूर ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर(महाराष्ट्र)

संक्षिप्त गोषवारा :'अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर प्रसार माध्यमांचा पडलेला प्रभाव: जागतिकीकरणाच्या संदर्भात' प्रस्तुत या शोध निबंधात अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या जीवनपद्धतीवर जागतिकीकरणाच्या संदर्भात प्रसार माध्यमांच्या पडलेल्या प्रभावाचे अध्ययन केलेले आहे.

समाज जागृतीचे प्रसार माध्यम हे महत्वाचे साधन आहे. प्रसार माध्यमात समाज परिवर्तन करण्याचे सामर्थ्य आहे. आधुनिक काळात प्रसार माध्यम समाज परिवर्तनात अग्रेसर आहे. समाजातील विविध प्रचलित प्रश्नांवर किंवा समस्यांवर प्रसार माध्यमांव्दारे प्रकाश टाकला जातो. प्रसार माध्यमे समाजात प्रचलित असलेल्या समस्यांची सत्यता समाजापुढे मांडण्याचे काम चोखपणे बजावतात.

जागतिकीकरण म्हणजे जग जवळ येणे, जगातील प्रत्येक राष्ट्रांच्या सीमांचा लोप होणे होय. प्रादेशिक सीमा एकीकरणाच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. म्हणून हा अडथळा दूर सारला कि सर्व मानवी समाज एकत्र येवून 'एक जग' निर्माण होईल असा 'जागतिकीकरण' या संकल्पनेचा अर्थ आहे. आधुनिक काळात जागतिकीकरणामुळे देशाच्या सीमारेषा पूसट झाल्या असून माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे झटपट संभाषणाची किमया साधली असून जगाच्या एका टोकावरून व्यक्ती मोबाईल, ई-मेल, आदी माध्यमांमार्फत काही सेकंदात संवाद साधताना दिसून येतात.

अनुसूचित जमातीतील लोकांच्या पूर्वीच्या परिस्थितीत बदल झालेला आहे. अनुसूचित जमातीच्या शिक्षण घेतलेल्या व्यक्तींच्या आचार-विचारात, बोली–भाषेत, जीवनमानात बदल झालेला आहे. वृत्तपत्रे, टी.व्ही., रेडियो, चित्रपट इत्यादी प्रसार माध्यमांच्या प्रभावामुळे अनुसूचित जमातीत परिवर्तनास मदत झालेली आहे. त्यांच्या राहणीमानात आणि विचार सरणीमध्ये टी.व्ही. व सिनेमांचा प्रभाव पडलेला असून त्याच्या विकासाला गती आलेली आहे. यावरून असे सिद्ध होते की, प्रसार माध्यमांव्दारे समाज परिवर्तनास मदत होते त्यामुळेच अनुसूचित जमातीच्या परिवर्तनामध्येसुध्दा प्रसार माध्यमांचा व जागतिकीकरणाचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. अनुसूचित जमातीतील लोकांमध्ये झालेल्या जागृतीमुळे व प्रबोधनामुळे त्यांच्या उत्पादनात काही प्रमाणात निश्चितच वाढ झालेली आहे. याचाच अर्थ असा कि, प्रसार माध्यमांची भूमिका व अनुसूचित जमातीच्या विकासाचे प्रश्न यांचा सहसंबंध आहे. तसेच प्रसार माध्यमांचा अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर अनुकूल प्रगतीकारक प्रभाव पडलेला आहे.

प्रस्तावना : समाज जागृतीचे प्रसार माध्यम हे महत्वाचे साधन आहे. प्रसार माध्यमात समाज परिवर्तन करण्याचे सामर्थ्य आहे. आधुनिक काळात प्रसार माध्यम समाज परिवर्तनात अग्रेसर आहे. समाजातील विविध प्रचलित प्रश्नांवर किंवा समस्यांवर प्रसार माध्यमांव्दारे प्रकाश टाकला जातो. प्रसार माध्यमे समाजात प्रचलित असलेल्या समस्यांची सत्यता समाजापुढे मांडण्याचे काम चोखपणे बजावतात.

जागतिकीकरण म्हणजे जग जवळ येणे, जगातील प्रत्येक राष्ट्रांच्या सीमांचा लोप होणे होय. प्रादेशिक सीमा एकीकरणाच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. म्हणून हा अडथळा दूर सारला कि सर्व मानवी समाज एकत्र येवून 'एक जग' निर्माण होईल असा 'जागतिकीकरण' या संकल्पनेचा अर्थ आहे. आधुनिक काळात जागतिकीकरणामुळे देशाच्या सीमारेषा पूसट झाल्या असून माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे झटपट संभाषणाची किमया साधली असून जगाच्या एका टोकावरून व्यक्ती मोबाईल, ई-मेल, आदी माध्यमांमार्फत काही सेकंदात संवाद साधताना दिसून येतात.

अनुसूचित जमातीतील लोकांच्या पूर्वीच्या परिस्थितीत बदल झालेला आहे. अनुसूचित जमातीच्या शिक्षण घेतलेल्या व्यक्तींच्या आचार-विचारात, बोली–भाषेत, जीवनमानात बदल झालेला आहे. वृत्तपत्रे, टी.व्ही., रेडियो, चित्रपट इत्यादी प्रसार माध्यमांच्या प्रभावामुळे अनुसूचित जमातीत परिवर्तनास मदत झालेली आहे. त्यांच्या राहणीमानात आणि विचार सरणीमध्ये टी.व्ही. व सिनेमांचा प्रभाव पडलेला असून त्याच्या विकासाला गती आलेली आहे. यावरून असे सिद्ध होते की, प्रसार माध्यमांव्दारे समाज परिवर्तनास मदत होते त्यामुळेच अनुसूचित जमातीच्या परिवर्तनामध्येसुध्दा प्रसार माध्यमांचा व जागतिकीकरणाचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. अनुसूचित

जमातीतील लोकांमध्ये झालेल्या जागृतीमुळे व प्रबोधनामुळे त्यांच्या उत्पादनात काही प्रमाणात निश्चितच वाढ झालेली आहे. याचाच अर्थ असा कि, प्रसार माध्यमांची भूमिका व अनुसूचित जमातीच्या विकासाचे प्रश्न यांचा सहसंबंध आहे. तसेच प्रसार माध्यमांचा अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर अनुकूल प्रगतीकारक प्रभाव पडलेला आहे.

'अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर प्रसार माध्यमांचा पडलेला प्रभाव: जागतिकीकरणाच्या संदर्भात' प्रस्तुत या शोध निबंधात अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या जीवन पद्धतीवर जागतिकीकरणाच्या संदर्भात प्रसार माध्यमांच्या पडलेल्या प्रभावाचे अध्ययन केलेले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी ऊर्ध्व गोदावरी आणि भीमा या नध्यांच्या खोऱ्यात वसलेल्या अहमदनगर जिल्याचे उत्तर अक्षांश १८.२ ते १९.९ अंश व पूर्व रेखांश ७३.९ ते ७५.५ अंश असे भौगोलिक स्थान आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तरेस नाशिक जिल्हा, ईशान्य दिशेस औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे, दक्षिणेस सोलापूर जिल्हा व पश्चिमेस ठाणे व पुणे हे जिल्हे आहेत.

अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७०४८ चौ. कि.मी.असून ते राज्याच्या एकूण क्षेत्रफ़ळाच्या ५.६ टक्के आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने हा जिल्हा महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. जिल्ह्यात एकूण १४ तालुके आहेत. नगर, नेवासा, कर्जत, जामखेड, पाथर्डी, शेवगाव, श्रीगोंदा, पारनेर, संगमनेर, अकोले, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी आदी तालुके अहमदनगर जिल्ह्यात आहेत.

सहकारातून ग्रामोद्धार व संताची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. २०११ च्या जनगणने प्रमाणे अहमदनगर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४५४३१५९ आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या ५७३६९८ असून या मध्ये पुरुषांची संख्या २९१५२१ तर स्त्री यांची संख्या २८२१७७ आहे. तसेच अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३७८२३० असून यामध्ये पुरुषाची संख्या १९११६५ तर स्त्रीयांची संख्या १८७०६५ आहे. अहमदनगर जिल्ह्यात मागासवर्गीय लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण अनुसूचित जातीचे १२.६३ टक्के असून अनुसूचित जमातीचे प्रमाण ८.३३ टक्के एवढे आहे.

अभ्यासाचे उद्दीष्ट:

अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील विविध प्रश्न व प्रसार माध्यमांची भूमिका यांचा सहसंबंध जागतिकीकरणाच्या संदर्भात शोधणे.

अभ्यासाचे गृहीतकृत्य :

अनुसूचित जमातीच्या जीवनावर प्रसार माध्यमांचा व जागतिकीकरणाचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोध निबंधांमध्ये विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून शोध निबंधातील विवेचन दुय्यम सामग्रीवर अवलंबून आहे. यासाठी विविध ग्रंथ, पुस्तके इत्यादींचा उपयोग केलेला आहे.

विश्लेषण :

प्रसारमाध्येमे स्थितीशिलतेकडून गतिमानतेकडे जाण्याचे कार्य करीत असतात. प्रसारमाध्यमे संपूर्ण मानवी जीवनाला कलाटणी देण्याचे कार्य करतात. प्रसारमाध्यमे नवजीवनाचा स्त्रोत बनत आहे. आधुनिक काळात या माध्यमांचे रूप-स्वरूप झपाट्याने बदलत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वेग एवढा मोठा आहे की, वृत्तपत्रांचे व इतर प्रसार माध्यमांचेही चित्र झपाट्याने बदलत आहे. आपल्याला काही मत, विचार, सूचना याना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसार माध्यमांचा सहारा घ्यावा लागतो. प्रसार माध्यमांच्या स्वरूपात दररोज बदल होत आहे. सरकार व जनता यांच्यामध्ये प्रसार माध्यमे ही आज सेतूचे कार्य करीत आहे. सरकारची नीतिची माहिती प्रसार माध्यमे हि जनतेपर्यंत पोहोचवतात आणि प्रसार माध्यमांद्वारा जनतेच्या क्रिया-प्रतिक्रियांना सरकार पर्यंत पोहोचवतात.

शिक्षणाचे वाढते प्रमाण व प्रसारमाध्यमांचा वाढता प्रभाव आणि प्रसारामुळे आज अनुसूचित जमातीचा मोठ्या प्रमाणात व्यक्तिमत्व विकास साधला जात आहे. अनुसूचित जमातींमध्ये आज मोठ्या प्रमाणात आत्मविश्वास वाढला आहे. कारण शैक्षणिक समानतेमुळे अनुसूचित जमातीच्या आरोग्यावर, स्वच्छतेवर परिणाम झाला आहे. शिक्षणातून आणि प्रसार माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे व प्रसारामुळे अनुसूचित जमातींना कुटुंब नियोजनाचे महत्व पटत आहे. सामाजिक जागरुकता वाढून अनुसूचित जमाती अधिकाधिक प्रगतशील होत आहे. अंधश्रद्धा सामाजिक प्रश्नांना फाटा देण्यात अनुसूचित जमातीतील लोक पुढाकार घेत आहेत. अनुसूचित जमातीतील शिक्षणाच्या वाढत्या प्रमाणामुळे व प्रसार माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांचे सामुदायिक आर्थिक, सांस्कृतिक जीवनाला आकार मिळत आहे. असे अभ्यासकास वाटते.

आधुनिक जगाशी अनुसूचित जमातींचा संबंध असल्याने रितीरिवाजात बदल होत आहे. परिस्थितीनुसार बदल घडत आहे. सामाजिक जाणीव जागृती वाढवून सामाजिक दृष्टीकोन विकसित होत आहे. शिक्षण घेतलेल्या अनुसूचित जमातींच्या लोकांच्या आचार-विचारात बदल झालेला आहे. अनुसूचित जमातीतील लोकाना आजच्या परिस्थितीत व पूर्वीच्या समाजाच्या परिस्थितीत त्यांच्या जमातीत बदल झाल्याचे वाटते. शासनांच्या विविध योजनांची माहिती अनुसूचित जमातीतील लोकांना विविध वर्तमान पत्रातून मिळते. रेडिओ, टी.व्ही. व वतर्मान पत्रे ह्या प्रसार माध्यमांच्या वापरामुळे अनुसूचित जमातीच्या लोकांच्या उत्पादनात काही प्रमाणात वाढ होत आहे. याचाच अर्थ असा की, अनुसूचित जमातीच्या विकासाचे प्रश्न व प्रसार माध्यमांची भूमिका यांचा जवळचा संबंध आहे असे दिसून येते. वर्तमानपत्रे, रेडीओ, टी.व्ही. ह्या प्रसार माध्यमांच्या वापरामुळे काही प्रमाणात अनुसूचित जमातीतील लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावतो. तसेच काही प्रमाणात त्यांच्या कुटुंबातील महिला व मुलांच्या जीवनावर, विचारसरणीवर रेडिओच्या कार्यक्रमांच्या प्रभावामुळे त्यांच्यात बदल झाला आहे. तसेच काही अनुसूचित जमातीतील लोकांकडे टी.व्ही. नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनावर प्रभाव कमी झालेला आढळतो. एकूणच प्रचलित प्रसारमाध्यमांचा अनुसूचित जमातीतील लोकांच्या सामाजिक जीवनावर अत्यल्प प्रमाणात प्रभाव पडलेला आहे.

जागतिकीकरणाचा अनुसूचित जमातीतील लोकांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. सौंदर्य प्रसाधने, विविध साबण, विदेशी पेय, लिमका, पेप्सी, थम्सअप, मोबाईल, टी.व्ही. इत्यादी वस्तू अनुसूचित जमातीतील लोकांपर्यंत जावून पोहोचल्या आहेत. जागतिकीकरणामुळे टी.व्ही., मोबाईल चे दर अतिशय कमी झालेले दिसून येतात. रंगीत टी.व्ही. पूर्वी भारतात वीस हजाराच्या आसपास मिळत असे. जागतिकीकरणामुळे रंगीत टी.व्ही. अतिशय कमी दरात स्वस्त मिळत आहे. या वस्तू आज अनुसूचित जमातींच्या लोकांच्या घरातही दिसून येत आहेत. मोबाईलचीहि परिस्थिती तशीच दिसून येते. आज अनुसूचित जमातीतील लोकही मोबाईल घेवून फिरत आहे. जागतिकीकरणामुळे आरोग्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. जगात आरोग्य चांगले व सुदृढ ठेवण्यासाठी विविध तंत्रज्ञान निर्माण झालेले आहे. आज शरीर संतुलन ठेवण्यासाठी विविध साधनांचा वापर करून शरीराचा आकार साचेबंध कसा होईल याबद्दल दक्षता घेतली जाते.

निष्कर्ष: एकंदरीत वरील विश्लेषणाचा विचार केला असता असे दिसून येते कि, अनुसूचित जमातीतील लोकांच्या पुर्वीच्या परिस्थितीत व आजच्या परिस्थितीत बदल झालेला आहे. अनुसूचित जमातीच्या शिक्षण घेतलेल्या व्यक्तींच्या आचार-विचारात, बोली-भाषेत, जीवनमानात बदल झालेला आहे. वृत्तपत्रे, टी.व्ही., रेडीओ, चित्रपट इत्यादि प्रसार माध्यमांच्या प्रभावामुळे अनुसूचित जमातीत परिवर्तनास मदत झालेली आहे. त्यांच्या राहणीमानात आणि विचारसरणीमध्ये टी.व्ही. व सिनेमांचा प्रभाव पडलेला असून त्यांच्या विकासाला गती आलेली आहे. यावरून असे सिद्ध होते कि, प्रसार माध्यमांव्दारे समाजपरिवर्तनास मदत होते. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या परिवर्तनामध्येसुद्धा प्रसारमाध्यमांचा व जागतिकीकरणाचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. अनुसूचित जमातीतील लोकांमध्ये झालेल्या जागृतीमुळे व प्रबोधनामुळे त्यांच्या उत्पादनात काही प्रमाणात निश्चितच वाढ झालेली आहे. याचाच अर्थ असा की, प्रसार माध्यमांची भूमिका व अनुसूचित जमातीच्या विकासाचे प्रश्न यांचा सहसंबंध आहे. तसेच प्रसारमाध्यमांचा अहमदनगर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीवर अनुकूल प्रगतीकारक प्रभाव पडलेला आहे असे अभ्यसकास वाटते.

संदर्भसूची :

१) अहमदनगर जिल्हा – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६ जिल्हा अहमदनगर जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन अहमदनगर
२) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर,अहमदनगर जिल्हा
३) भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक संचालक सचिव महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर ४४०००१
४) गारे गोविंद (२००२) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, सामाजिक व सांस्कृतिक मागोवा, दिव्तीय आवृत्ती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजया नगर, पुणे-३०
५) डॉ.सौ.देवगांवकर शैलजा, आदिवासी विश्व, डॉ.देवगावकर श.गो.आनंद प्रकाशन, नागपूर, जुलै २००१
६) विकल्पवेध जागतिकीकरण आणि वैद्यकीय व्यवस्था, प्रकाशक-श्रीहरी सोवणी,पुणे,दिपावली विशेषांक मासिक,नोव्हें २००४.
७) गारे गोविद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती.
८) संगवे विलास, आदिवासींचे सामाजिक जीवन.
९) प्रत्यक्ष निरीक्षण आणि अनुसूचित जमातीतील लोकांशी केलेली चर्चा.

महिला उद्योजका समोरील प्रश्न एक अभ्यास

प्रा. उषा यशवंतराव माने

गृहविज्ञान विभाग प्रमुख, श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा,ता परळी वैजनाथ जिल्हा बीड email I'd maneusha600@gmail.com

प्रस्तावना:- संपूर्ण जगात महिला सशक्तीकरण उपक्रम प्रभावीपणे राबविण्याची नितांत राष्ट्रसंघाने अजेंडा 2030 मध्ये प्रत्येक राष्ट्राने महिला उद्योजकांचा संदर्भात50 50 हे लक्ष अवलंबावे असे स्पष्ट केले आहे आज संपुर्ण विश्वाला महिला उद्योजकांची गरज आहे महिला उद्योजकता वाढविल्याशिवाय अर्थव्यवस्थेत अपेक्षित विकास होत नाही म्हणून आगामी काळात प्रत्येक देशाचे हे ध्येय आहे संपूर्ण जगामध्ये महिला उद्योजकांची क्षेत्र वाढत आहे या अनुषंगाने विचार करता विकास सोबत काही प्रश्न निर्माण होत असतात या प्रश्नांची सोडवणूक कौशल्याने करणे आवश्यक आहे महिला उद्योजकांन समोरील अडचणींचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली

उद्योगाची संकल्पना:- ए. एच. कोल 'नफा मिळवणे नफ्याचे प्रमाण टिकून ठेवणे किंवा नफ्यामध्ये वाढ करण्याच्या हेतूने आर्थिक वस्तू व सेवांची उत्पादन किंवा वितरण करण्याकरिता एखादी व्यक्ती किंवा परस्परांशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या एखाद्या समूहाने केलेले सहेतुक कार्य म्हणजे उद्योजकता होय'

'महिला उद्योजकता संकल्पना :-भारत सरकार:-' महिला उद्योजक म्हणजे अशी उद्योजिका जी उपक्रमाचे संचलन व नियंत्रण करीत असून उद्योगांमध्ये तिचे 51%

आर्थिक हित समाविष्ट असते व उद्योगातील एकूण रोजगारापैकी 51 टक्के रोजगार महिलांना प्रदान करते संबंधित

साहित्य:- 2019 20 च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार या वर्षाच्या प्रारंभापर्यंत देशात 27 हजार 84 अधिकृत नव्या छोट्या व्यवसायात कमीत कमी एक महिला संचालक असणाऱ्या कंपन्यांची संख्या 43 टक्के आहे 2018 मध्ये महिला संचालक एक असणाऱ्या स्टार्टअप कंपन्यांचे प्रमाण 17 टक्के होते पुढे ही संख्या घटून 12% उरली.

जगातील प्रमुख77 देशांचा अभ्यास करून काढलेल्या महिला उद्योजकांच्या निर्देशाकावरून सर्वाधिक महिला उद्योजक निर्देशांक 82.9 अमेरिकेचा आहे यानंतर

ऑस्ट्रेलिया व युनायटेड किंग्डम या देशांचा नंबर लागतो. या अहवालानुसार भारताचा 70 वा क्रमांक लागत असून भारताचा महिला उद्योजक निर्देशांक 25.3 एवढा कमी आहे भारतात 1.24 कोटी महिला एमएसएमई उद्योगाचे स्वामित्व करत आहेत या महिलांना सर्वाधिक 29 लाखापेक्षा जास्त महिला पश्चिम बंगालच्या आहेत त्यानंतर 12. 85 लाख महिला तामिळनाडू 9. 72 लाख कर्नाटक 8.32 लाख उत्तर प्रदेश 8. 38 लाख आंध्र प्रदेश आणि 8. 26 लाख गुजरात मध्ये एमएसएमई उद्योग चालवत आहेत. तसेच 8 लाखापेक्षा जास्त महाराष्ट्रात आहेत.संशोधन

पद्धती:-संशोधनाचे समस्या सूत्रन:- 'उद्योगाची स्थापना करून त्यावर नियंत्रण व संचलन करते त्याच प्रमाणे उद्योगाच्या विकासाकरिता कटिबद्ध असते अशा स्त्रीला महिला उद्योजक असे म्हणतात' महिला उद्योजकता म्हणजे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. यामुळे महिलांमध्ये सक्षमीकरण निर्णय क्षमता स्वाभिमान मुक्तसंचार सुरक्षितता हे सर्व अभिप्रेत आहे. महिला उद्योजकता हे क्षेत्र महिलांना त्यांच्या क्षमता प्रदर्शन करण्याची संधी आहे .जगातील काही प्रगत राष्ट्रांमध्ये

महिला उद्योजकांचे योगदान मोठे आहे. त्या तुलनेत भारतात महिला उद्योजकांचे प्रमाण अत्यल्प आहे. याला भारतीय सामाजिक बंधने हे महत्त्वाचे कारण दिसून येते भारताने मानव शक्तीचा कधीच पूर्णपणे वापर केला नाही तसे झाले असते तर भारतात विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत दिसला असता हे सरकारच्या लक्षात आल्याने आज उद्योग क्षेत्रात महिलांची भागीदारी वाढवण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारे सुद्धा प्रयत्नशील आहेत. या प्रयत्नात आपण यशस्वी झालो तर देशाच्या आर्थिक विकासात वाढ होऊ शकते

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल ही एक चर्चेची बाब आहे.पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा मागास आहे मराठवाड्यातील काही जिल्हे सुधारित आहेत त्या तुलनेत बीड जिल्हा मागास आहे ऊसतोड कामगारांचा जिल्हा

म्हणून बीडची कडे पाहिले जाते बीड जिल्ह्याला प्रगत बनवायचे असेल तर मोठ्या उद्योगातील उद्योजकता विकासापेक्षा लघु व कुटीर उद्योगातील उद्योजकता विकासावर लक्ष केंद्रित करावे लागेल. त्या दृष्टीने आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या बीड जिल्ह्यातील सिरसाळा गावातील महिला उद्योजकांचा उद्योजकीय विकास करण्याच्या दृष्टीने अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

विषय निवडीचे प्रयोजन :-महिला उद्योजकता व त्यांचे प्रश्न या विषयावर संशोधन झाले नाही. उद्योजकाचे ज्ञान समाजापर्यंत पोहोचवले नाही. त्यामुळे महिला उद्योजक म्हणून बघण्याची मानसिकता दुय्यम आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने 21व्या शतकात महिला उद्योजकता ही संकल्पना आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची नसून देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे .महिलांप्रमाणेच महिला उद्योजक हा विषय अभ्यासापासून दुर्लक्षित आहे. सिरसाळा ही एक छोटी बाजारपेठ आहे आजूबाजूला 60 -65 खेडे व तांडे आहेत. त्यादृष्टीने उद्योगांना चालना देता येईल म्हणून या अभ्यासाचे महत्त्व आहे त्यामुळे शासन जनता विविध संस्था व अभ्यासकांच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:-

1) महिला उद्योजकांच्या अडचणीचा अभ्यास करणे

2) महिला उद्योजकांच्या विकासाकरिता उपाय सुचविणे

संशोधनाची गृहितके:-

1) महिला उद्योजकांना उद्योगात अडचणीत येतात.

संशोधनाचे क्षेत्र व कालावधी:-

संशोधनाचे क्षेत्र सिरसाळ्यातील महिला उद्योजकांपुरते

मर्यादित आहे. वर्ष 2017-18 व 2021-22 या पाच वर्षांच्या काळातील नोंदणीकृत महिला उद्योजक या अभ्यासासाठी निवडले आहे.

संशोधन पद्धती:-

अभ्यासासाठी प्रामुख्याने नमुना निवड पद्धती हेतुपुरस्कर सरसकट पाच उद्योजक निवडले. अभ्यासासाठी प्राथमिक माहितीचा अवलंब करण्यात आला आहे.

प्राथमिक पद्धत:- स्वतःच्या पाहणीवरून करण्यात आलेला अभ्यास म्हणजे प्राथमिक पद्धत.सिरसाळ्यातील महिला उद्योजकांना उद्योगात येणाऱ्या अडचणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. ही माहिती गोळा करण्यासाठी अनुसूचित निरीक्षण या प्राथमिक पद्धतीचा अवलंब करून प्रत्यक्ष व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन तथ्य गोळा करण्यात आली.

दुय्यम पद्धत:- यामध्ये प्रकाशित माहितीचा उपयोग करण्यात येतो संशोधनाशी संबंधित आवश्यक तथ्य गोळा करण्यासाठी अहवाल, मासिके,पुस्तक, वर्तमानपत्र,संगणक व इंटरनेटवर विविध संकेतस्थळाद्वारे माहिती गोळा करून विश्लेषण केले आहे.

संशोधनाच्या मर्यादा हा अभ्यास सिरसाळ्यातील निवडलेल्या महिला उद्योजकापूरता मर्यादित आहे.

चर्चा:- सिरसाळ्यातील उद्योग करण्यासाठी धडपडणाऱ्या महिला उद्योजकांचा अभ्यास करताना त्यांच्यासमोर समस्यांचा डोंगर उभा असल्याचे दिसून आले तोंडी माहितीच्या आधारावर चालू केलेला उद्योग आहे. उद्योगाची पार्श्वभूमी नाही, अज्ञान, माहितीचा अभाव या अडचणीमुळे या महिला समस्यांच्या विळख्यात आहेत. उद्योग आधार मध्ये नोंदणी व ऑनलाइन फूड लायसन्स काढणे पलीकडे या महिलांना जाता आले नाही. उद्योग उभारणीसाठी प्रकल्प लेखन, ना हरकत प्रमाणपत्र, कच्चामाल ,पायाभूत सुविधा, मार्केटिंग, भांडवल उभारणीचे वेगवेगळे पर्याय,

सरकारी योजना या सर्वांची माहिती मिळणे या उद्योजक महिलांसाठी गरजेचे आहे सोबतच या महिलांचा संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण आवश्यक आहे .

निष्कर्ष :-

1) महिला उद्योजकांना प्रचंड अडचणी आहेत,महिलांमध्ये विषयासंबंधीचे अज्ञान दिसून आले. 2) प्रशिक्षणाचा अभाव दिसून आला. मार्केटिंगचा अनुभव नसल्याचे दिसून आले लेबलिंग व पॅकिंग संदर्भात प्रशिक्षणाची गरज आहे.

शिफारशी :- उद्योग उभारणी करताना त्या उद्योगाचे संपूर्ण ज्ञान देऊन उद्योगातील चढ/उत्तार किंवा नफा-तोटा यांची माहिती तज्ञ मंडळींकडून मिळण्यासाठी संस्थांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम राबवावेत

3) स्वयंसेवी संस्थांमार्फत त्यांना उद्योगनुसार प्रशिक्षण द्यावे.

4) उद्योगाची जाहिरात फलक लावून तसेच पेपर मध्ये बातमी देऊन व ऑनलाईन माध्यमांचा वापर करून करावी.

5) निर्माण केलेल्या वस्तूंची पॅकिंग साठी प्रशिक्षण द्यावे व त्यासाठी लागणारे साहित्य त्यांना योग्य दरात मिळण्यासाठी पत्ते व मोबाईल नंबर द्यावे.

6) महिला उद्योजक निर्माण करण्याच्या कामात ज्या स्वयंसेवी संस्था काम करत आहे त्यांनी उद्योग उभारण्याची सर्व तयारी एकाच छताखाली होईल अशी व्यवस्था करावी उदा.उद्योग नोंदणी, प्रकल्प लेखण, कर्जपुरवठा, व्यवसायासाठी जागा या सर्व गोष्टींची माहिती त्यांना द्यावी

संदर्भ:-

1. भारतीय लघुउद्योजकांना येणाऱ्या समस्या व यशस्वी व्यावसायिकांसाठी त्यासंदर्भात समस्यांसाठी काय उपाय करावे Gromor.in .Santosh R.Shetty
2. पुणे शहरातील महिला व्यवसायिक स्त्री उद्योजक व कामगार मराठी विश्वकोश https://www.pmc.gov.in>files pdf
3. https://www.kailasheducation.com/2020/08/udyami-ki-samasya.html
4. https://vishwakosh.marathi.gov.in/23261/
5. https://marathi.latestly.com/india/information/these-5-government-schemes-will-be-useful-for-womens-entrepreneurs-definitely-read-by-women-who-want-to-become-entrepreneurs-334410.html
6. https://m.facebook.com/Maratha.Udyojak.Bhushan.Patil/photos/a.893088940847402/999363443553284/
7. https://www.deshdoot.com/features/articles-women-entrepreneurसौऑ
8. महिला उद्योजकतेचा गांभीर्याने विचार व्हावा www.deshdoot.com
9. महाराष्ट्रात 8 लाखापेक्षा जास्त महिला उद्योजक
10. नारायण राणे यांचे संसदेत माहिती
11. www.lokmat.com 20 dec 2021
12. The Global Enterprenurship and Development Institute Report 2015.

रशिया युक्रेन संघर्षाचा जागतिक राजकारणावरील परिणाम-विशेष संदर्भ भार

बदनाळे शिवरुद्र शरणाप्पा
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा
Email ID shivrudra.badnale@gmail.com

आज जे जागतिक राजकारण आपल्यासमोर सुरू आहे ते नेहमीच असं नव्हतं कोणत्या ना कोणत्या घटना-घडामोडी मुळे त्यात सातत्याने बदल होत आलेले आहेत. मागच्या शंभर दीडशे वर्षांचा जागतिक राजकारणाचा इतिहास जर आपण पाहिला विशेषता विसाव्या शतकापासून अशा काही घटना घडामोडी घडल्या की ज्यामुळे जागतिक राजकारणात अनेक मूलभूत बदल झालेले आहेत. यामध्ये प्रथम महायुद्ध, द्वितीय महायुद्ध ,शीत युद्ध ,अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्ला यामुळे जागतिक राजकारणात फार मोठे बदल झाले आहेत आणि आज रशिया युक्रेन यांच्यात जो संघर्ष चालू आहे यामुळे भविष्यात जागतिक राजकारणावर काय परिणाम होईल हे पहावे लागणार आहे .

रशिया युक्रेन युद्ध ही 1991 मधील शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर ची सर्वात मोठी घटना आहे कारण शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर असे मानले जात होते की जग आता शांतता आणि विकासाच्या मार्गावर जात आहे. पण आता रशिया युक्रेन संघर्षामुळे जगाचे राजकारण बदलू शकते आणि नवीन राजकारणाला सुरुवात होऊ शकते. या संघर्षाचे जागतिक राजकारणावर दूरगामी परिणाम होतील असे वाटते कारण आज हा संघर्ष सुरू असताना जागतिक सत्तांनि आणि इतर राष्ट्रांनी जी भूमिका घेतली आहे त्यावरून भविष्यात जागतिक राजकारण कसे असेल त्यावर काय परिणाम होईल याचा अंदाज लावता येऊ शकतो. आज विविध राष्ट्रांनी या संघर्षाबाबत जी भूमिका घेतली आहे ती प्रामुख्याने रशिया विरुद्ध भूमिका घेणारा एक गट, रशियाच्या विरुद्ध न भूमिका घेणारा एक गट आहे आणि या गटाला रशियाविरुद्ध भूमिका घेणाऱ्या राष्ट्रांत सोबत तसेच रशियासोबत ही चांगले संबंध ठेवायचे आहे आणि काही देश असेही आहेत ज्यांनी वरवर रशियाविरुद्ध भूमिका घेतली आहे पण त्यांना आता रशियासोबत जुळवून घ्यायचे आहे. अशा तीन गटांमध्ये आज जगातल्या देशांची विभागणी झाली आहे. रशियाविरुद्ध संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण सभेत जो ठराव मांडण्यात आलेला होता त्या ठरावा मध्ये विविध देशांनी ज्या पद्धतीने मतदान केले त्यावरून सुद्धा जागतिक राजकारणामध्ये काय घडेल याचा अंदाज येऊ शकतो. संयुक्त राष्ट्रा मध्ये रशिया विरुद्धच्या ठरावात केवळ 5 राष्ट्रांनी विरोधात मतदान केले तर 35 राष्ट्र यात तटस्थ राहिले तर 12 राष्ट्रांनी मतदानात भाग घेतला नाही म्हणजेच या राष्ट्रांनी रशिया विरुद्ध भूमिका घेण्यास विरोध केला आहे. त्यामुळे जागतिक राजकारणात रशिया एकाकी पडला आहे किंवा त्याच्यासोबत कोणी नाही असे म्हणता येत नाही तर पश्चिमी राष्ट्रांत पासून त्याचे संबंध दुरावले आहे रशियाला एकाकी पाडण्याचा प्रयत्न होत आहे मात्र इतरत्र ज्याला आपण तिसरे जग म्हणतो किंवा विकसनशील राष्ट्र म्हणतो त्या राष्ट्रां सोबत रशिया चे संबंधआजही चांगले आहेत यापैकी अनेक राष्ट्रांना रशियाच्या विरुद्ध अमेरिका अथवा पाश्चात्य राष्ट्रांची बाजू घेण्याची गरज नाही हे बदलत्या राजकारणाचं उदाहरण आहे.

रशिया युक्रेन संघर्षामुळे जागतिक राजकारणावर काय परिणाम होईल हे आज जरी नक्की सांगता येणार नसले तरी त्यात मोठ्या प्रमाणात बदल होईल हे नक्की कारण मागील काही काळापासून राजकारण ज्या पद्धतीने बदलत चालले आहे विशेषता शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकेचे जगावर जे एकछत्री साम्राज्य निर्माण झालेले होते त्याला पूर्वीपासूनच सुरुंग लागायला सुरुवात झाली होती मागच्या दीड दशकापूर्वी 2008 मध्ये अमेरिकेमध्ये आर्थिक मंदी पसरली होती त्याच काळात चीनचा आर्थिक शक्ती म्हणून झालेला उदय तसेच भारताचा आर्थिक शक्ती म्हणून उदयाला सुरुवात झाली होती. तसेच रशियानेही आज यूक्रेन वर जसे आक्रमण केलेले आहे तसेच आक्रमण जॉर्जिया वर केलं होतं आणि 2014 मध्ये क्रिमीयावर आक्रमण करून आपला ताबा मिळवला होता म्हणजेच रशियाने 2008 पासूनच आपला प्रभाव वाढवायला सुरुवात केली होती ज्याचा विरोध कोणीही करू शकल नाही हा जो काही प्रवास 2008-09 पासून सुरू झाला तिथून अमेरिकेच्या जागतिक साम्राज्याला उतरती कळा लागायला सुरुवात झाली होती ती अद्याप सुरूच आहे आणि रशिया युक्रेन युद्धामुळे त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे यामुळे अमेरिकेचा जगावरील लष्करी तसेच आर्थिक प्रभाव कमी होणार असून जगामध्ये इतरही लष्करी सत्तांचा उदय होण्याची शक्यता आहे किंबहुना जर्मनीच्या लष्करी क्षमता वाढविण्याच्या घोषणेने त्याला सुरुवात झालेली दिसून येते. याचा परिणाम म्हणून संपूर्णयुरोपातच लष्करी करण घडून येऊ शकतो तसेच. जगातील इतर देशांचे रशिया चीन सोबत आर्थिक, लष्करी संबंधात वाढ होऊ शकते कारण अमेरिका परवडणार नाही किंवा त्याच्यावर विश्वास ठेवता येणार नाही अशी स्थिती भविष्यातील राजकारणात निर्माण होऊ शकते. यासोबतच नाटोच्या प्रभाव देखील कमी होईल असे वाटते याउलट रशियाचा युरोप वर प्रभाव निर्माण होऊ शकतो. मात्र या सर्व घटना-घडामोडी मुळे चीनला मात्र आयताच फायदा मिळू शकतो

आणि जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने चीन ने जी पावले टाकायला सुरुवात केलेली होती त्या दिशेने त्याचा प्रवास वेगाने होऊन उद्दिष्टापेक्षा कमी कालावधीत चीन महासत्ता बनू शकतो.

रशिया युक्रेन संघर्षाचा भारतावरील परिणाम

सकारात्मक परिणाम :

रशिया युक्रेन संघर्षामुळे भारतावर देखील खूप मोठ्या प्रमाणावर परिणाम घडून येताना दिसून येत आहे. हे परिणाम पाहत असताना या संघर्षाचे काही सकारात्मक तसेच नकारात्मक परिणाम पडणार असल्याचे दिसून येते त्यातील सकारात्मक बाजू ही की मागील काही काळापासून भारत आणि रशिया मधील पूर्वीपासून मैत्रीचे संबंध होते ते काहिसे दुरावत चालले होते. त्यामुळे रशियाने अल्प प्रमाणात का होईना पाकिस्तान सोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न सुरू केलेला होता पण या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताला रशियासोबत आपले संबंध अधिक मजबूत बनवता येऊ शकतात. तसेच शीत युद्ध पूर्वीच्या काळातील अलिप्ततावादी राष्ट्रांच्या गटाचं पुनर्जीवन करून त्यावर आपला प्रभाव भारताला निर्माण करता येऊ शकतो. तसेच या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताला चीन सोबत सीमारेषेच्या प्रश्नावर राजकीय चर्चा सुरू करता येऊ शकते.

नकारात्मक परिणाम:

रशिया युक्रेन संघर्षातून भारताला जशा सकारात्मक बाबी घडू शकतात तसेच काही नकारात्मक परिणाम निर्माण होऊ शकतात या नकारात्मक परिणाम मध्ये चीन आपलं वर्चस्व वाढू शकतं तसेच तिबेटवर हल्ला करून आपला ताबा मिळवू शकतो आणि भारत-चीन सीमारेषेच्या बाबतीत भारतावर अधिक दबाव आणू शकतो. यासोबत कच्च्या तेलाच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढू शकतात आणि त्याचा विपरीत परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो कारण भारत आपल्या गरजेच्या जवळपास 80 टक्के पेक्षा अधिक तेलाची आयात करत असतो. यात वाढ झाल्यास त्याचा मोठा फटका भारताला बसू शकतो. मागील अनेक काळापासून भारत आपल्याला एनएसजी सदस्यत्व मिळावे म्हणून प्रयत्न करताना दिसत आहे त्याबाबत युरोपमधील अनेक देश सकारात्मक दृष्टीने विचार करत होते मात्र रशिया युक्रेन संघर्षात भारताने युरोप अथवा नाटो ची बाजू घ्यावी असा त्यांचा दबाव होता मात्र भारताने तटस्थ भूमिका घेतल्यामुळे हे युरोपियन राष्ट्र भारताला एनएसजी च सदस्यत्व मिळण्याच्या बाबतीत विरोधात जाऊ शकतात किंवा ते लांबणीवर पडू शकतो. रशिया युक्रेन संघर्षामुळे भारताची यापूर्वी आणखी एक जी मागणी होती की आम्हाला सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व मिळावे तर ती मागणी देखील आता अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडू शकते. भारतातले जे कट्टर दक्षिण पंती उजव्या विचारसरणीचे लोक आहेत त्यांचाही सरकारवर दबाव वाढू शकतो की ज्या पद्धतीने रशियाने युक्रेन वर आक्रमण केलेला आहे त्याच पद्धतीने भारतानेही पाकव्याप्त कश्मीर वर आक्रमण करावे आणि तो भारताला जोडून घ्यावा अशावेळी सरकार वर कारवाई बाबत दबाव वाढू शकतो.

सारांश.

रशिया युक्रेन संघर्षाचे भारताबरोबरच जगावर दूरगामी परिणाम घडून येणार आहेत त्यामुळे येत्या काळात हा संघर्ष संपुष्टात जरी आला तरी या युद्धामुळे येत्या काळात रशिया आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनू शकतो तसेच अमेरिकेचे महासत्ता पद देखील धोक्यात येऊन चीन सारखे राष्ट्र महासत्ता म्हणून वेगाने पुढे येऊ शकते भारतासारख्या राष्ट्राला देखील आपल्या सुरक्षेसाठी इतरांकडून अपेक्षा न करता आपली संरक्षण क्षमता वाढवली पाहिजे व आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण कायम ठेवून आपला प्रभाव वाढवता येईल.

संदर्भ-

1. इंडियन एक्सप्रेस दिनांक02-03-2022.
2. दैनिक लोकसत्ता दिनांक 07-03-22.
3. दैनिक लोकसत्ता दिनांक 08-03-22.
4. महाराष्ट्र टाइम्स 02-03-22.
5. वाटसरू संवाद-यूट्युबचॅनल.

महिला सक्षमीकरण आणि स्वयं - सहायता बचत गटांची भूमिका: विशेष संदर्भ परभणी जिल्हा ,(महाराष्ट्र)

डॉ. सुभाष तातेराव पंडित

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग स्वामी विवेकानंद रात्र कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली (पूर्व),दत्त नगर, आयरे रोड,डोंबिवली – ४२१२०१, जिल्हा ठाणे

subhashpandit2011@gmail.com

गोषवारा (Abstract) : समाजातील महिला सक्षमीकरणात महिलांचे संघटन हे अंत्यत महत्वाची भूमिका बजावते. महिला संघटीत करण्यासाठी स्वयं - सहायता बचत गट हे माध्यम अत्यंत उपयुक्त असून, सर्व क्षेत्रातून त्यास मान्यता मिळाली आहे. स्वयं - सहायत गटातून महिला केवळ संघटीत होत नाहीत. तर स्वत:च्या कष्टातून काही बचत करतात व त्यामधून एकमेकांना आर्थिक मदत करतात. यातूनच छोटे -छोटे व्यवसाय करून आर्थिक उन्नती कडे वाटचाल करतात. या सर्व प्रक्रियेतून एकंदरीत महिलांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव होते. त्याच बरोबर कुटुंब, गावाच्या विकासाचाही त्या विचार करू लागतात. म्हणूनच एकंदरीत महिला सक्षमीकरनाच्या प्रक्रियेत महिला स्वयं सहायता बचत गटाची भूमिका महत्वाची ठरते. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक आर्थिक घटकाबरोबरच अनेक घटकांचा समावेश होतो. महिलांचे उत्पन वाढविण्याकरिता लहान – लहान उद्योगांची निर्मिती करण्यावर भर दिला जातो. शेतीवर आधारित कुकुट पालन, शेळीपालन, फलोत्पादन, भाजी विक्री, तसेच बिगर शेतीवर आधारित किराणा दुकान, शिवणकाम, मिरची कांडप इत्यादी उद्योगामध्ये महिला सहभागी झाल्या आहेत. सदर संशोधनात्मक अभ्यासात परभणी जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्वयं सहायता गटांच्या भूमिकेचा विश्लेषनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तावना: (Introduction) देशातील महिला सक्षमीकरण हा आज समाजाच्या सर्वागीण विकासाठी महत्त्वाचा विषय असून महिलांना सामाजिक – आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळणे आवश्यक आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी जवळ - जवळ ५० % महिला असून अर्थव्यवस्थेच्या विकासात त्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. भारतीय समाजात महिला बहुसंख्य असूनही त्या आर्थिक, सामाजिक दृष्ट्या गरीब, शोषित, वंचित आहेत. जागतिक बँकेने (२००६) आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे की, भारतीय स्त्रियांना अनेकदा मालमत्ता आणि वारसा हक्क नाकारले जातात. प्रा. अमर्त्य सेन (1995) यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, भारतीय समाजातील लिंग असमानता नैसर्गिक म्हणून स्वीकारली जाऊन त्याचा परिणाम महिला आर्थिक व सामजिक दृष्ट्या दुर्बल समजण्यात होतो. भारतातील पुरुष प्रधान संस्कृतीत अनेक वेळा असमानतेशी संबंधित वर्चस्ववादी निर्णय पुरुष घेतात ज्या मध्ये महिलांचा समावेश केला जात नाही. वास्तवात मात्र जगाच्या कोणत्याही देशाला समाजाचा सर्वागीण, चिरंतन विकास करावयाचा असेल तर प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेऊन त्याची अमलबजावणी करण्यासाठी महिलांचा समावेश करून घ्यावा लागेल. भारतासारख्या मागास, धार्मिक, सामजिक प्रथा - परंपरा, रूढी असलेलेया विकशनसील अर्थव्यवस्थेत महिलांच्या सहभागाशिवाय अर्थव्यवस्थेच्या त्याच बरोबर समाजाच्या चिंरतन विकासाची कल्पनाही करणे शक्य नाही. म्हणून महिलांना, विशेषतः गरीब, समाजिक व आर्थिक मागास, दुर्लब ग्रामीण महिलांना सक्षम करणे अत्यावश्यक बनते. त्याकरिता समाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिक आव्हाने स्वीकारणे आणि विकास प्रक्रियेत त्यांना सक्रियपणे सहभागी करून घेणे हे समाजाचे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. महिला सक्षमीकरण संकल्पना महिला वरील अत्याचार, भेदभाव, शोषण करणाऱ्या शक्तींशी लढण्यासाठी सक्षम बनवणारी चिरंतन प्रक्रिया असून त्याकरिता देशातील दुर्लब महिलांना संसाधने आणि संधींमध्ये समान प्रवेश प्रदान करणे होय. महिला सक्षमीकरणासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक संसाधनांत महिलांचा सहभाग व त्यांचे नियंत्रण प्रस्थापित करणे होय. तसेच व्यावसायिक गतिशीलता, आर्थिक सुरक्षा, क्रयशक्ती, घरातील निर्णय घेण्यामध्ये सहभाग, कुटुंबातील स्वातंत्र्य आवश्यक असून सरकारने विविध क्षेत्रात महिलांच्या प्रगतीसाठी विविध कार्यक्रम, योजनाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले आहेत. देशातील पंचवार्षिक योजना आणि महिला कल्याण योजनाचा महिला सक्षमीकरणासाठी कार्य करत आहेत. महिलांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि समानता सांस्कृतिक क्षेत्रे आणि महिलांवरील सर्व प्रकारचे भेदभाव दूर करणे. देशाचा ग्रामीण विकास कार्यक्रम, आर्थिक हस्तक्षेप आणि आत्मविश्वास निर्माण करून कार्यान्वित केले तर

महिला सक्षमीकरण होऊ शकते. वर्तमान स्थितीत महिला सक्षमीकरणासाठी स्थापन केलेले स्वयं - सहायता गट, महिला बचत गट मार्फत महिलांमधील उद्योजकता विकासाचे प्रभावी माध्यम म्हणून उदयास आले आहे.

संशोधन अभ्यासाची उदिष्ट्ये (Objectives of Study):

१. समाजातील महिला सक्षमीकरणाचा स्थितीचा अभ्यास करणे.

२. स्वयं – सहायता गटांच्या स्वरूप व कार्यांचा अभ्यास करणे.

३. स्वयं – सहायता गटांच्या सामाजिक व आर्थिक परिणामाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके (Assumptions):

१. स्वयं – सहायता गटांच्या माध्यामातून महिलांचे सक्षमीकरण होते.

१. स्वयं – सहायता गटांच्या कार्यामुळे सामाजिक स्थितीत धनात्मक बदल होतो.

२. स्वयं – सहायता गटांच्या कार्यामुळे आर्थिक विकास होण्यात मदत होते.

संशोधन पद्धती (Research Methodology): महिला सक्षमीकरण आणि स्वयं – सहायता बचत गटांच्या भूमिका: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (महाराष्ट्र) या संशोधन समस्येचे संख्यात्मक आणि वर्णनात्मक संशोधन आहे. ज्यासाठी द्वतीय माहिती व प्राथमिक माहिती संरचित प्रश्नावलीच्या मदतीने गोळा केली आहे. संशोधनासाठी सोयीचा नमुना (एक प्रकार संकलित करण्यासाठी गैर - संभाव्यता नमुना पद्धत) निवड पद्धती वापरली आहे. माहिती सर्वेक्षण करण्यात आलेल्या नमुन्याचा आकार १५० आहे. परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय वेगवेगळे व्यवसाय करणारे स्वयं – सहायता गटांची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाच्या मर्यादा (Limitation of Research): महिला सक्षमीकरण आणि स्वयं – सहायता बचत गटांच्या भूमिका: विशेष संदर्भ परभणी जिल्हा (महाराष्ट्र) हे संशोधन केवळ परभणी जिल्ह्यापुरता मर्यादित असून या जिल्ह्यात स्थापन झालेल्या स्वयं – सहायता गटांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरना बरोबरच सामाजिक व आर्थिक घटकावरील परिणामाचा अभ्यास करण्यापुरताच आहे.

माहिती विश्लेषण आणि व्याख्या (Data Analysis and Interpretation): मराठवाडा विभागातील महत्वाचा परंतु मागास जिल्हा म्हणून परभणी जिल्ह्यास ओळखले जाते. परभणी जिल्ह्यात एकूण नऊ तालुके असून ज्यामध्ये परभणी, जिंतूर, सेलू, पाथरी, गंगाखेड, पालम, पूर्णा, सोनपेठ आणि मानवत तालुक्यांचा समावेश होतो. जिल्यातील अधिक लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व शेती सबंधित व्यवसाय आहे. जिल्ह्यात सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या अनुसंगाने विविध प्रकारचे कार्यक्रम, योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याप्रमाणेच परभणी जिल्ह्यात ही महिला सक्षमीकरणाकरिता स्वयं – सहायता गटांची स्थापना करण्यात आली असून उद्योग, व्यवसायात महिला कार्यरत आहेत. महिला सक्षमीकरणासाठी स्वयं-सहायता गटांचे सामाजिक - आर्थिक परिणाम: परभणी जिल्ह्याचा अभ्यास (महाराष्ट्र) या संशोधनात्मक अभ्यासातून परभणी जिल्ह्यातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत कशाप्रकारे परिणाम झाला याचा शोध घेण्यात आला आहे.

तक्ता क्रमांक १. परभणी जिल्ह्यातील तालुकानिहाय स्वयं सहायता गट संख्या (२०२०-२१)

अ. क्रमांक	तालुका	एकूण बचत गट	सरासरी (%)
१	गंगाखेड	१३४४	१२.०९
२	जिंतूर	१७९०	१६.११
३	मानवत	८९९	८.०९
४	पालम	११८८	१०.६९
५	परभणी	१६८७	१५.१८
६	पाथरी	१०७७	९.६९
७	पूर्णा	१२९९	११.६९
८	सेलू	१०५८	९.७०
९	सोनपेठ	७४६	६.७१
एकूण परभणी जिल्हा		**१११०८**	**१००**
महाराष्ट्र		534156	-

Source: Ministry of Rural Development Report 2020-21 (nrlm.gov.in)

परभणी जिल्ह्यातील एकूण स्वयं – सहायता गटांची संख्या १११०८ असून राज्याच्या तुलनेत केवळ २.०७ टक्के आहे. यामध्ये जिंतूर तालुक्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत स्वयं –सहायतागटाची संख्या सर्वाधिक १७९० असून ताचे प्रमाण १६.११ टक्के असलेले दिसून येते. तर सर्वात कमी संख्या ७४६ सोनपेठ तालुक्यातील असून त्याचे प्रमाण एकूण जिल्ह्याच्या तुलनेत केवळ ६.७१ टक्के आहे.

तक्ता क्रमांक २.

सामाजिक प्रवर्गानुसार महिला स्वयं सहायता बचत गटातील सदस्य (२०२० - २१)

तालुका	सामाजिक प्रवर्गानुसार महिला स्वयं सहायता बचत गटातील सदस्य									
-	एससी	सरासरी	एसटी	सरासरी	अल्प	सरासरी	इतर	सरासरी	एकूण	सरासरी
गंगाखेड	१६२४	१०.६८	२७२	९.५३	४७८	११.२९	१०७१६	१२.०४	१३०९०	११.७६
जिंतूर	३१५७	२०.८९	१२७०	४४.५१	५६०	१३.२२	१३३०२	१४.९४	१८२८९	१६.४३
मानवत	११८८	७.८१	८२	२.८७	३२७	७.७२	७४६५	८.३८	९०६२	८.१४
पालम	१५२१	१०.०१	६१५	२१.५५	४७०	११.१०	९५१४	१०.६९	१२१२०	१०.८९
परभणी	२१६१	१४.२२	२६२	९.१८	९३४	२२.०६	१३६८३	१५.३५	१४०७०	१५.३१
पाथरी	१४५६	९.५८	९५	३.३२	४१०	९.६८	८९५६	१०.०६	१०९१७	९.८१
पूर्णा	१७६१	११.५९	७२	२.५२	५१५	१२.१६	१०३०२	११.५७	१२६५०	११.३६
सेलू	१३७७	९.६	१२६	४.४१	२८७	६.७४	९११५	१०.२४	१०९०५	९.८०
सोनपेठ	९४७	६.२३	५९	२.०६	२५२	५.९२	५९३५	६.६६	७१९३	६.४६
एकूण	**१५१९२**	**१००**	**२८५३**	**१००**	**४२३३**	**१००**	**८८९८८**	**१००**	**१११२६६**	**१००**

Source: Ministry of Rural Development Report 2020-21 (nrlm.gov.in)

वरील तक्त्यामध्ये परभणी जिल्ह्यात स्थापन झालेल्या स्वयं – सहायता गटातील सामजिक स्थिती लक्ष्यात येण्याकरिता सामाजिक वर्गानुसार वर्गीकरण केले आहे. जिल्ह्यातील परभणी तालुक्यातील सदस्य संख्याचे प्रमाण सर्वाधिक १५.३१ टक्के आहे. तर सर्वात कमी सदस्य संख्या ६.४६ टक्के आहे. परंतु सामाजिक वर्गवारीचा विचार केला तर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात अनुस्चीत जाती – जमातीच्या सदस्यांचे प्रमाण इतर वर्गाच्या तुलनेत अत्यंत अल्प असलेले आपणास दिसून येते. यातही जिंतूर तालुक्यातील स्वयं –सहायता गटातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सदस्यांचे प्रमाण अनुक्रमे २०.८९ टक्के व इतर तालुक्यातील सदस्यसंख्येपेक्षा अधिक आहे. तर ४४.५१ टक्के असून सर्वात कमी सोनपेठ तालुक्यात अनुक्रमे ६.२३ टक्के आणि २०.६ टक्के आहे.

तक्ता क्रमांक ३.

स्वयं – सहायता गटांचे व्यवसाय आणि उत्पन्नानुसार वर्गीकरण

अ. क्रमांक	व्यवसाय	सदस्य संख्या	प्रमाण (एकूण १५०)
१	शेती	६४	४२.६६
२	शेतमजूर	४४	२९.३३
३	टेलरिंग	१६	१०.६६

४	शेळीपालन	१२	८.०
५	दुध डेअरी	०६	४.०
६	किराणा दुकान	०४	२.६६
७	भांडी दुकान	०४	२.६६
एकूण		**१५०**	**१००**
अ. क्रमांक	**दैनदिन उत्पन (रुपये)**	**सदस्य संख्या**	**प्रमाण (एकूण १५०)**
१	० – २००	३५	२३.३३
२	२०० – ५००	८५	५६.६६
३	५०० – ७५०	१७	११.३३
४	७५० - १०००	८	५.३३
५	१००० – पुढील	५	३.३३
एकूण		**१५०**	**१००**

Source: - Field survey

वरील तक्त्यामध्ये जिल्ह्यात स्थापन झालेल्या स्वयं – सहायता गटातील सदस्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार करण्यात येणाऱ्या व्यवसायानुसार वर्गीकरण करण्यात आली आहे. ज्यामध्ये शेती व शेती सबंधित व्यवसाय करणाऱ्या सदस्यांचे प्रमाण अधिक असून दैनदिन उत्पन निर्माण करणाऱ्या गटामध्ये प्रतीदिन रुपये २०० – ५०० प्रमाण ५६.६६ टक्के आहे.

तक्ता क्रमांक ४.

स्वयं-सहायता गटांचा सामाजिक - आर्थिक प्रभाव

अ. क्रमांक	**घटक**	**सदस्यसंख्या (एकूण १५०)**			
अ.	**सामजिक**	**होय**	**प्रमाण**	**नाही**	**प्रमाण**
१	सामाजिक सुरक्षितते वृद्धी	११०	७३.३३	४०	२६.६७
२	सामजिक जागरूकता वृद्धी	१२३	८२.०	२७	१८.०
३	सामाजिक कार्यातील सहभाग वृद्धी	१४४	९६.०	०६	४.०
ब.	**आर्थिक**	**होय**	**प्रमाण**	**नाही**	**प्रमाण**
१	व्यवसाय विस्तार वृद्धी	११7	७८.०	३३	२२.०
२	लाभदायक रोजगार वृद्धी	१४५	९६.६६	०५	३.३४
३	उत्पन वाढ	८७	५८.०	६३	४२.०
४	नियमित बचतीत वाढ	९०	६०.०	६०	४०.
५	आर्थिक जागरूकता	१३०	८६.६६	२०	१३.३४

Source: - Field survey

परभणी जिल्ह्यातील स्वयं –सहायता बचत गटांच्या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक परिणामत बदल झाला की, नाही याबाबतीत प्राप्त माहितीनुसार समाजात आर्थिक व सामाजिक घटकात वृद्धी झाल्याचे प्राप्त माहितीनुसार स्पष्ट होते.

गृहीतकांची चाचणी:

तक्ता क्रमांक ४ नुसार स्वयं –सहायता गटांच्या कार्यामुळे सामाजिक आणि आर्थिक घटकात मोठ्या प्रमाणात वृद्धी होऊन महिला सक्षमीकरण होण्यास धनात्मक बदल झाला आणि त्यांच्या आर्थिक विकास होण्यास मदत होताना दिसते याचाच अर्थ प्राप्त माहितीच्या विश्लेषणातून गृहीत धरण्यात आलेले शून्य परिकल्पना गृहीतक स्वीकारण्यात आले आहे तर बदली गृहीतक नाकारण्यात आले आहे.

निष्कर्ष व शिफारशी:

१. परभणी जिल्ह्यातील एकूण स्वयं – सहायता गटांचे प्रमाण राज्याच्या तुलनेत केवळ २.०७ टक्के आहे.

२. परभणी जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत अल्प प्रमाण स्थापित गटांचे आहे.

३. सामाजिक वर्गवारी नुसार जिंतूर तालुक्यात स्थापन झालेल्या स्वयं – सहायता गटातील सदस्य संख्या (१६.४३ टक्के) सर्वाधिक असून सोनपेठ तालुक्यात त्याचे प्रमाण (६.४६ टक्के) कमी आहे.

४. परभणी जिल्ह्यात स्थापन झालेल्या एकूण गटांपैकी सर्वाधिक गट हे शेती व्यवसाय (४२.४६ टक्के) करतात.

५. स्वयं – सहायता गटातील एकूण सदस्यांपैकी सर्वाधिक (५६.६६ टक्के) सदस्य रुपये २०० – ५०० उत्पन प्रतिदिन निर्माण करतात.

६. स्वयं – सहायता गटातील स्थापनेमुळे सामजिक सुरक्षितता (७३.३३ टक्के), सामाजिक जागरूकता (८२.० टक्के) आणि सामाजिक कार्यातील सहभाग (९६.० टक्के) यामध्ये वृद्धी झाली आहे.

7. स्वयं – सहायता गटातील स्थापनेमुळे व्यवसाय विस्तार वृद्धी (७८.० टक्के), रोजगार निर्मिती (९६.० टक्के), उत्पन वाढ (५८.० टक्के) झाली असून आर्थिक वृद्धी होताना दिसते.

शिफारशी:

१. परभणी जिल्ह्यात स्वयं – सहायता गट स्थापनेचे प्रमाण वाढवावे.

२. अनुसूचीत जाती व जमातीच्या आर्थिक विकासात वाढ करण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत.

३. स्वयं – सहायता गटांच्या माध्यमातून शेती व्यवसायाबरोबरच इतर व्यवसायात वाढ करावी.

४. स्वयं – सहायता गत्तातील सर्व महिला सदस्यांना वेगवेगळया व्यवसायाचे प्रशिक्षण द्यावे.

५. परभणी जिल्ह्यात महिला सक्षमीकरण करण्यासाठी आर्थिक व सामाजिक घटकांचा प्रभाव महत्वाचा ठरतो त्यात वाढ होणे आवश्यक आहे.

References:

1. Madheswaran, 2001, Empowering Rural Women through SHGs: Lessons from MRCP, Indian Journal of Economics

2. Murlidhar Ananda Lokhande, 2014, Women Self-help Groups and Women Empowerment-A Case Study of Mahila Arthik Vikas Mahamandal, Indian Journal of Marketing.

3. National Policy for the Empowerment of Women, 2020-21

4. The World Bank Report, 2001, 2006.

5. Economic survey of India 2019, 2020

6. Economic Survey of Maharashtra 2020, 21

7. *Ministry of Rural Development India, 2020-21*

8. Ministry of Rural Development of Maharashtra 2020-21

9. Department of Women and Child Development, Maharashtra Government, 2021-22

10. Nrlm.gov.in

11. India.gov.in

12. Maha.gov.in

20 व्या शतकातील जागतिक पातळीवरील विकासाच्या हक्काचा प्रवास

डिके विनोद रमेश

अर्थशास्त्र विभाग Smt . C . K . Goyal Arts & Commerce College, Dapodi, Pune 411012.

ई-मेल - Vinodkumardike64@gmail.com

गोषवारा : आधुनिक काळात जगातील सर्वच देशांमध्ये मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहे.यातूनच आर्थिक विकास, सामाजिक विकास राजकीय विकास इत्यादी संकल्पना उदयास आल्या. औद्योगिक क्रांतीच्या रुपाने आर्थिक क्षेत्रात सुरुवातीला परिवर्तन घडून येण्यास चालू झाले त्यानंतर सामाजिक क्षेत्र, राजकीय, सांस्कृतिक शैक्षणिक, क्षेत्र इत्यादी क्षेत्रांमध्ये विकास घडून येण्यास चालना मिळाली. या विकासाच्या प्रक्रिया वर समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक,पर्यावरणीय, इत्यादींसारख्या विविध घटकांचा प्रभाव पडत आहे. तसेच या विकास प्रक्रियेचा प्रभाव मानवी वर्तन व मानवी संबंधावर पडू लागल्याने सामाजिक परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली.व्यक्तीला आपली प्रगती घडवून आणण्यासाठी तसेच आपल्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी त्याचप्रमाणे सुखी व संपन्न जीवन जगण्यासाठी काही हक्क व अधिकार आवश्यक आहे ही गोष्ट जगातील सर्वच देशांनी मान्य केली आहे.यातूनच मानवाच्या विकासाच्या हक्काची संकल्पना उदयास आली. आज मानव म्हणून प्रत्येक व्यक्तीला जन्मतः काही नैसर्गिक हक्क प्राप्त होतात. त्यामध्ये जिविताचा हक्क, समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, अन्यायाविरुद्ध दाद दाद मागण्याचा हक्क, मतदानाचा हक्क, मानवतेचा हक्क इत्यादी यांचा समावेश होतो . त्यातूनच विकासाचा हक्क ही संकल्पना उदयास आली. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा सर्वांगीण विकास घडवण्याचा हक्क आहे. त्यामुळेच आज विकासाचा हक्क हा आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेला मानवी हक्क आहे.

प्रस्तावना :- आज मानव म्हणून प्रत्येक व्यक्तीला जन्मतः काही नैसर्गिक हक्क प्राप्त होतात. त्यामध्ये जिविताचा हक्क, समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, अन्यायाविरुद्ध दाद दाद मागण्याचा हक्क, मतदानाचा हक्क, मानवतेचा हक्क इत्यादी यांचा समावेश होतो . त्यातूनच विकासाचा हक्क ही संकल्पना उदयास आली. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा सर्वांगीण विकास घडवण्याचा हक्क आहे.आज विकासाचा हक्क हा आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेला मानवी हक्क आहे. अस सर्वच प्रकारचे हक्क व अधिकार तसेच जीविताचा हक्क त्याचबरोबर जीवनमान उंचावण्याचा हक्क हे विकासाच्या हक्काशी अनिवार्यपणे जोडले गेले आह जॉन लॉक, थॉमस पेन, जॉन स्टुअर्ट मिल या तत्त्वज्ञांनी मानवी हक्कांचा पाया उभारला आहे. फ्रान्सने 26 ऑगस्ट 1989 ला मानवी व नागरी हक्कांची सनद घोषित केली. हेन्री ड्युनांट यांच्या प्रयत्नांनी 1864 ते 1949 दरम्यान जीनिव्हा अधिवेशनात (Geneva Convention) मानवी हक्काच्या संरक्षणास अनन्यसाधारण महत्व दिले गेले. सरकारच्या विविध धोरणांच्या आणि योजनांच्या माध्यमातून लोकांना चांगले काम शिक्षण आरोग्य अन्नसुरक्षा सामाजिक सुरक्षा मिळत असते, त्या लोकांना मिळणे हे शासनाचे कर्तव्य आहे तर लोकांचा हक्क आहे. विकासाचा हक्क राईट टू डेव्हलपमेंट (Right to Development) असणे म्हणजे काम, शिक्षण, आरोग्य, अन्नसुरक्षा, सामाजिक सुरक्षा मिळण्याचा हक्क असणे हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वांना विकासाचा हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ (United Nations Organization) प्रयत्नशील आहे विकासाच्या हक्काचा प्रवास खऱ्या अर्थाने 1948 मधील मानवाधिकाराच्या वैश्विक घोषणेनेपासून (Universal Declaration of Human Rights) सुरू झाला. या घोषणेतील '21 ते 26' कलमे ही आर्थिक व सामाजिक विकासाच्या हक्काची आहे. कित्येक देशांच्या राज्यघटनांवर या घोषणेने प्रभाव टाकलेला असल्यामुळे या बहुतांश देशांमधील धोरणे आणि योजना मध्ये त्याचे प्रतिबिंब उमटले आहे. विकासाच्या हक्काचा (Right to Development) प्रवास हा जागतिक पातळीवर

मानवाधिकाराचे वैश्विक घोषणा(UDHR) , आर्थिक व सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचाआंतरराष्ट्रीय करार (ICESCR), वंशभेद निर्मूलनाचा अंतरराष्ट्रीय करार(CERD), स्त्री भेदभाव निर्मूलनाचा अंतरराष्ट्रीय करार (CEDAW), बाल हक्काचा आंतरराष्ट्रीय करार (CRC) इत्यादी आंतरराष्ट्रीय पातळीवरील करारांरामधून झालेला दिसून येतो.

अभ्यास विषयाचे महत्त्व :-

1) विकासाच्या हक्कामुळे प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी प्राप्त होऊन मानव केन्द्रित विकासाच्या दृष्टिकोनास चालना मिळत आहे.

2) विकासाच्या हक्कामुळे व्यक्तीला जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ज्या त्या देशातील शासन संस्थेवर येऊन पडली आहे.

3) विकासाच्या हक्कामुळे कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेस देशातील साधनसामग्रीवर एकाधिकार प्राप्त न होता समाजातील प्रत्येक घटकाला देशातील उपलब्ध साधन सामग्रीचा आवश्यकतेनुसार उपभोग घेण्याचा समान अधिकार प्राप्त होतो.

4) देशातील उपलब्ध साधन सामग्रीचा समान उपभोग घेण्याचा अधिकार प्रदान करून समाजातील प्रत्येक घटकाला उच्च जीवनमान जगण्यासाठी आवश्यक परिस्थिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासन संस्थेवर आहे.

5) विकासाचा हक्क हा व्यक्ती व समाज या दोहोंच्या हिताच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारा असल्यामुळे हा हक्क आजघडीला आंतरराष्ट्रीय कायद्यांचे एक प्रमुख तत्व असण्याबरोबरच अविभाज्य भाग बनला आहे.

6) जोपर्यंत समाजातील प्रत्येक घटकाला आर्थिक व सामाजिक हक्क प्राप्त होत नाही, तोपर्यंत नागरी व राजकीय हक्कांचा काही उपयोग नाही कारण हे हक्क परस्पर पूरक आहे.

अभ्यास विषयाचे उद्दिष्ट :-

1) व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीतील विकासाच्या हक्काची भूमिका अभ्यासणे.

2) विकासाच्या हक्काचा जागतिक पातळीवरील प्रवास अभ्यासणे.

3) सामाजक व आर्थिक विकासाच्या हक्कांशी संबंधित प्रश्नांची संशोधनाद्वारे उकल करणे .

4) विकासाच्या हक्काबाबत समाजघटकात जाणीव निर्माण करणे..

5) विकासाच्या हक्काबाबतच्या संशोधनासाठी चालना देणे .

अभ्यास विषयाची गृहीतके :-

1. विकासाच्या हक्कांमध्ये बहुआयामी घटकांची भर पडत आहे.
2. व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीतील विकासाच्या हक्काची महत्वाची भूमिका आहे.
3. समाजातील महत्वाच्या प्रश्नांची उकल करण्यात विकासाच्या हक्कांसंबंधित संशोधन महत्त्वाचे ठरत ,आहे.

संशोधन पध्दती :-

दुय्यम स्त्रोत प्रस्तुत संशोधनासाठी महत्त्वपूर्ण माहिती व आकडेवारी दुय्यम स्त्रोताद्वारे प्राप्त केली जाणार असून त्यामध्ये अप्रकाशित व प्रकाशित सार्वजनिक प्रलेख, आंतरराष्ट्रीय संस्थांची वेबसाईट, Wikipedia, वर्तमान पत्रातील लेख , मासिके , इत्यादीद्वारे माहिती संकलित केली गेली आहे.

विकासाचा हक्क संकल्पना : खरेतर विकास म्हणजे ढोबळमानाने सामाजिक व आर्थिक प्रगती होय , अर्थातच अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अशी प्रगती आवश्यक असते. परंतु प्रगतीसाठी आर्थिक वाढीसोबतच समावेशक व शास्वत विकासाची जोड दिली तर तो विकास दीर्घकाळ टिकून राहतो.

संयुक्त राष्ट्रसंघ युनो (UNO - United Nations Organization) :- पहिल्या महायुद्धात नंतर व्हर्सायच्या तहानुसार आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढीस लागण्यासाठी आणि शांतता व सुरक्षितता प्राप्त करण्यासाठी 10 जानेवारी 1920 रोजी राष्ट्रसंघांची (League of Nations) स्थापना झाली, परंतु ही राष्ट्रांची लीग दुसरे महायुद्ध टाळू न शकल्याने ही संस्था नामशेष झाली. त्यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेचे अध्यक्ष फ्रेंक्लिन रुझवेल्ट यांनी संयुक्त राष्ट्र ही संकल्पना पुन्हा रुजवली व पुढे 24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेच्या संसदेवर 51 व्या पोलंड ने उशीर का होईना सनदेवर सही केली आणि 51 देशांनी मिळून संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना केली. अर्थात 26 जून 1945 ला 50 देशांनी या सनदेवर अगोदरच सह्या केल्या होत्या. दुसऱ्या महायुद्धानंतर 51 देशांनी एकत्र येऊन जागतिक शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी, देशादेशांमध्ये मित्रत्वाचे संबंध विकसित करण्यासाठी, सामाजिक आर्थिक उन्नतीसाठी, चांगल्या राहणीमानासाठी व मानवी हक्कांसाठी, गरिबांचे आयुष्य सुधारण्यासाठी, उपासमारी नष्ट करण्यासाठी, आजार व निरक्षरता दूर करण्यासाठी, एकमेकांच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा आदर करण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एकत्रित काम करण्यासाठी या राष्ट्रांमध्ये सहकार्य घडवून आणण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना केली होती.

संयुक्त राष्ट्रसंघाची आर्थिक व सामाजिक परिषद (EcoSoc-Economic & Social Council):- संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार 1946 मध्ये या परिषदेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या 62 व्या कलमानुसार आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आरोग्य व संबंधित विषयासाठी या परिषदेने कार्य करावयाचे असते. संयुक्त राष्ट्र संघाची मध्यवर्ती कार्यकारी संस्था म्हणून आर्थिक व सामाजिक परिषद कार्यरत आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यप्रणालीचे तसेच विचारांचे प्रतिबिंब या परिषदेत दिसते. शाश्वत विकासाच्या अभिनव विचारांचे ते व्यासपीठ आहे. सन 2005 पर्यंत आर्थिक व सामाजिक परिषदेअंतर्गत मानवी हक्क आयोग (Commission on Human Rights) कार्यरत होता, परंतु 2005 च्या जागतिक परिषदेत हा आयोग गुंडाळण्याचा निर्णय घेण्यात येऊन 27 मार्च 2006 ला हा आयोग गुंडाळण्यात आला असून त्याचे रूपांतर मानवी हक्क परिषदेत (Human Rights Council) करण्यात आले आहे. परिषद पुढील कार्य करते ;

1) जागतिक पातळीवर आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे.
2) जागतिक पातळीवर उच्च राहणीमानाची मानके तयार करणे.
3) महिला तसेच बालकांचा विकास व कल्याण साध्य करणे.
4) आंतरराष्ट्रीय सामाजिक, आर्थिक व आरोग्याच्या प्रश्नांची सोडवणूक करणे.
5) भेदभावरहित मानवी हक्कांप्रती वैश्विक आधार निर्माण करणे.

मानवाधिकाराची वैश्विक घोषणा (UDHR - Universal Declaration of Human Rights) :- आर्थिक व सामाजिक परिषदेच्या 10 डिसेंबर 1946 च्या सभेत मानव हक्क आयोग स्थापन करण्यात आला व तो 2006 पर्यंत कार्यरत होता. वरील परिषदेने आंतरराष्ट्रीय हक्कांचे विधेयक तयार करण्याची जबाबदारी या मानवी हक्क आयोगाकडे सोपवली. मानवी हक्क आयोगाच्या प्रयत्नाने संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण परिषदेत मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीय विधेयक (International Bill of Human Rights)मांडले गेले. या विधेयकात 3 करार होते, त्यामध्ये मानवाधिकाराचे वैश्विक घोषणा(UDHR), आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हक्काचा आंतरराष्ट्रीय करार(ICESCR), नागरी व राजकीय हक्क यांचा आंतरराष्ट्रीय करार(ICCPR) हे होय यापैकी मानवाधिकाराचे वैश्विक घोषणा सर्वसाधारण परिषदेने 10 डिसेंबर 1948 रोजी स्वीकृत केली. या घोषणेत 30 कलमे होती, त्यापैकी कलम 21 ते 26 ही आर्थिक व सामाजिक अधिकारांशी निगडीत होती.

मानवाधिकार वैश्विक घोषणापत्रातील आर्थिक व सामाजिक हक्क :-

कलम 21 - शासकीय कामकाजात सहभाग घेता येणे, वेतन तसेच सार्वजनिक सेवा मिळण्याचा समान अधिकार असणे, लोकांचा आर्थिक व सामाजिक अपेक्षांना लोकशाहीत आत्यंतिक महत्त्व असणे.

कलम 22 - सामाजिक सुरक्षेचा व मुक्त विकासाचा अधिकार असणे.

कलम 23 - व्यक्तींना रोजगाराचा अधिकार असणे, समान काम समान वेतन मिळणे, चांगले जीवन जगण्या इतपत न्याय्य व योग्य वेतन मिळणे, कामगार संघटना स्थापन करण्याचा किंवा त्यामध्ये सहभागी होण्याचा अधिकार असणे.

कलम 24 - कामात विश्रांतीचा, कामाच्या विशिष्ट तासांचा, बिनपगारी विशिष्ट गरजांचा अधिकार असणे.

कलम 25 - निरोगी तसेच चांगल्या राहणीमानाच्या आयुष याबरोबरच अन्य वस्त्र निवारा यासारख्या किमान मूलभूत गरजा मिळण्याचा अधिकार असणे. पण व मातृत्व काळात विशेष शुश्रुषा व सेवा मिळणे.

कलम 26 :- मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार असणे, शिक्षणाचा मानवी विकासात पुरेपूर वापर करणे, पालकांना पाल्याचा शिक्षणाच्या संधीची निवड करता येणे.

आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करार (ICESCR) :- वरीलप्रमाणे मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीय विधेयकामध्ये उल्लेखिलेल्या करारांपैकी आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करार (ICESCR- International Convenant on Economic, Social, & Cultural Rights) हाय करणार आहे. या कराराच्या सरनाम्यात असे म्हटले आहे की, "मानवाधिकाराचे वैश्विक घोषणेत अपेक्षित असलेले मानवी स्वातंत्र्य व अधिकार आला तेव्हाच अर्थ आहे जेव्हा प्रत्येक व्यक्तीला आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक अधिकार उपभोगता येतील". या करारातील

आर्थिक सामाजिक हक्काविषयी तरतुदी पुढीलप्रमाणे :

कलम 1- प्रत्येक व्यक्तीला स्वयंनिर्णयाचा (Self Determination) अधिकार असणे.

कलम 2 ते 5 - वंश, जात, धर्म, लिंग, भेदभाव विरहित कल्याणकारी लोकशाही निर्माण करून पुरोगामी जाणीव निर्माण करणे.

कलम 6- कामाचा हक्क असणे.

कलम 7- काम मिळणे, न्याय्य व योग्य वेतन मिळणे, समान काम, कामात विश्रांती तसेच विशिष्ट तासांचे काम असते.

कलम 8- कामगार संघटना स्थापन करता येणे.

कलम 9- सामाजिक सुरक्षेचा हक्क असणे.

कलम 10- प्रसूतीकाळात सुट्टी तसेच वेतन मिळणे, आर्थिक पिळवणूकीपासून व बालमजुरीपासून बालकांचे संरक्षण करणे.

कलम 11- अन्न, वस्त्र, निवारा मिळण्याचा व एकूणच चांगले राहणीमान मिळण्याचा अधिकार असणे.

कलम 12- उच्च प्रतीचे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य लाभण्याचा अधिकार असणे.

कलम 13- माध्यमिक शिक्षणाची संधी मिळणे.

कलम 14- वैश्विक, सक्तीचे व मोफत शिक्षण मिळण्यासाठी राष्ट्राने राष्ट्रीय पातळीवर नियोजन आखणे.

कलम 15- विज्ञान व संस्कृतीचा अधिकार, सार्वजनिक भागीदारीचा अधिकार व विकासाचा अधिकार मिळण्यासाठी राज्याने प्रयत्नशील असणे.

कलम 16 ते 25- आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांची अंमलबजावणी करणे, कृती आराखडा बनविणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक परिषदेअंतर्गत विकासाचे धोरण ठरविणे.

वंशभेद निर्मुलनाचा अंतरराष्ट्रीय करार (CERD) :- संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक परिषदेने वंशभेद निर्मूलनाच्या कराराचा(CERD- International Convention on Elimination of all forms of Racial Discrimination) मसुदा तयार केला असून 4 जानेवारी 1969 पासून हा करार कार्यान्वित करण्यात आला. या करारातील तरतुदींमध्ये वंशभेद व वंशभेदाच्या व्याख्या तसेच कामात, शिक्षणात व आरोग्य सुविधा देताना वंशभेद टाळणे तसेच वंशभेद यामुळे मागे पडलेल्या समाजास/गटास आरक्षण देण्याबाबत उल्लेख केलेला आहे.

स्त्रीभेदभाव निर्मूलनाचा आंतरराष्ट्रीय करार (CEDAW) :- संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण परिषदेने 18 डिसेंबर 1989 रोजी या स्त्रीभेदभाव निर्मूलनाचा आंतरराष्ट्रीय करार(CEDAW- International Convention on Elimination of all forms of Discrimination against Women) कराराचा स्वीकार करून 3 सप्टेंबर 1981 रोजी हा करार कार्यान्वित करण्यात आला. कराराच्या अंमलबजावणीसाठी याच दिवशी स्त्री भेदभाव निर्मूलन समिती संयुक्त राष्ट्रसंघ अंतर्गत स्थापन करण्यात आली. या कराराला आंतरराष्ट्रीय स्त्री हक्काचे विधेयक असेही म्हटले जाते. या करारात स्त्री भेदभावाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे, 'लिंगाधारित व्यावर्तन, बंधन अथवा तफावत असणे ज्यामुळे स्त्रियांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक मूलभूत हक्कांवर परिणाम होईल त्या सर्व क्रियांना भेदभाव म्हटले जावे'. या करारातील तरतुदींमध्ये शिक्षणाच्या अधिकारात, रोजगार व काम मिळवताना, आरोग्यसेवा मिळवताना, आर्थिक व सामाजिक लाभ मिळवताना लैंगिक भेदभाव न पाळणे तसेच ग्रामीण भागातील स्त्रियांना आवश्यक ते अधिकार मिळणे इत्यादी तरतुदींचा उल्लेख केला आहे.

बाल हक्काचा आंतरराष्ट्रीय करार (CRC) संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण परिषदेत 20 नोव्हेंबर 1989 ला रोजी बाल हक्काचा करार (CRC- International Convention on the Rights of Children) स्विकारण्यात येऊन दोन सप्टेंबर 1990 पासून तो करार कार्यान्वित करण्यात आला. या करारात 18 वर्षाखालील व्यक्तींना बालक म्हणून संबोधले गेले आहे. 1946 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने United Nations International Children's Emergency Fund नावाची विशेष संस्था स्थापन करून बालहक्कांप्रति पहिलं पाऊल उचललं होतं. पुढे 1953 मध्ये या संस्थेचे नाव United Nations Children's Fund असे करण्यात आले. तिला UNICEF-युनिसेफ याच नावाने ओळखले जाते. बाल हक्काच्या आंतरराष्ट्रीय करारात एकूण 54 कलमं असून बालकांच्या चारही प्रकारच्या हक्कांचा (जीविताचा हक्क, विकासाचा हक्क, संरक्षणाचा हक्क, सहभागाचा हक्क)

या तरतुदींचा समावेश होतो या करारातील महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे :-

1) अपंग बालकांचे अधिकारांचे वर्णन केले आहे.

2) बालकांना चांगले आरोग्य मिळण्याचा अधिकाराचे वर्णन केले आहे.

3) बालकांच्या सामाजिक सुरक्षेच्या अधिकाराचे वर्णन केले आहे. बालकांच्या शिक्षणाच्या अधिकाराचे वर्णन केले आहे.

4) शिक्षणाच्या माध्यमातून बालकांच्या सर्वांगीण विकास करण्याबाबत तरतुदींचा समावेश आहे.

5) बालकांची आर्थिक पिळवणूक व बालमजुरी पासून बालकांचे संरक्षण करण्याबाबतच्या तरतुदींचा समावेश आहे.

6) बालकांच्या अपव्यापारावर व विक्रीवर बंदी घालण्याच्या तरतुदींचा समावेश आहे.

व्हिएन्ना जाहीरनामा (The Vienna Declaration) :- मानवी हक्कांची संबंधित एक विश्व संमेलन परिषद 14 जुन ते 25 जुन 1993 मध्ये व्हिएन्ना (आस्ट्रिया) येथे भरली होती. या संमेलनात 171 देशांचे 2100 प्रतिनिधी उपस्थित

होते. या संमेलनात जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला त्यालाच व्हिएन्ना जाहीरनामा (The Vienna Declaration) जाहीरनामा असे म्हणतात. या जाहीरनाम्यात विकासाच्या हक्काबाबत पुढील तरतुदी करण्यात आल्या ,

1) विकासाचा हक्क विश्वव्यापी(Universal) तसेच हिरावून न घेता येणारा (Inalienable) आहे.

2) विकासाचा हक्क हा मूलभूत हक्कांचा अविभाज्य भाग आहे.

3) विकास घडवून आणण्यासाठी तसेच विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी विविध देशांनी परस्परांना सहकार्य करणे गरजेचे आहे.

4)विकसनशील देशांवरील कर्जे कमी केले पाहिजे, जेणेकरून त्यांना आपल्या देशातील जनतेला आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक हक्क देता येतील.

संदर्भ सूची :-

1. Www.un.org
2. http://op-icescr.escr-net.org/
3. www.ohchr.org/
4. विकिपीडिया Wikipedia
5. https://www.aafc.org/
6. https://mr.vikaspedia.in
7. प्रा.डॉ. तेजस्विनी मुडेकर, रिसर्च पेपर अर्थशास्त्रीय विवेचनात मानवी हक्कांचा संदर्भ -EIIRJ ISSN–2277-8721 Mar – April 2019 Volume–VIII, Issue– II

आशा सेविकांचे ग्रामीण विकासातील आरोग्यदविषयक कार्यः एक चिंतन

प्रा. सौ. धनश्री लोकचंद राणे, डॉ.सुनिता श्री. बाळापुरे

गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, भवभुती महाविद्यालय, आमगांव गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख

स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ

प्रस्तावना : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात अनेक योजना कार्यान्वित झाल्या. त्यांचा लाभ समाजातील अगदी शेवटच्या; तळागाळातील घटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न झाला. या योजनांचा एक भाग म्हणजे, गरीब दुर्लक्षित तसेच गरजू ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्यासारखी, कार्यक्षम विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात 12 एप्रिल 2005 पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले. त्या योजनांच्या अनुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत गावपातळीवर आरोग्यसुविधा पुरविण्यासाठी "आशावर्कर" (Asha- Accredited Social Health Activist) : हे मिशन काम करु लागले. ही "आशा" म्हणजे गावातील सर्वांच्या ओळखीची सामाजिक आरोग्य कार्यकर्ती होय.

प्रत्येक गावामध्ये स्त्री आरोग्य कार्यकर्तीची निवड करणे हा हया कार्यक्रमातील महत्वाचा भाग होता. म्हणून ग्रामीण भागात स्थानीक पातळीवर एक स्वयंसेवी कार्यकर्ती "आशा" ची निवड करण्यात आली. स्थानीक रहिवासी, सामाजिक कार्याची आवड आणि आरोग्य सेवेची जाण असलेल्या कार्यकर्तीच्या निवडी नंतर आरोग्य विभाग आणि ग्रामीण पातळीवर कार्यरत अन्य महत्वाच्या विभागांकडून ती प्रशिक्षित झाल्यानंतर ग्रामस्थ, ग्रामपंचायत व आरोग्य सेवा हयातील महत्वाचा दुवा म्हणून काम करणे हे तिचे कार्य असेल असे निर्धारित करण्यात आले.

ग्रामीण भागातील आरोग्य विषयक समस्याः

भारतातील आजही 80% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. खेडयातील वातावरण शुध्द, स्वच्छ, नैसर्गीक असते असे म्हटल्या जाते. परंतु वास्तविकता आजही वेगळी दिसून येते. अधिकांश खेडी आजही स्वास्थ्यवर्धक नाहीत. ब-याचशा गावात घाण आणि दुर्गंधी दिसून येते त्यामुळे मलेरिया, फायलेरिया, क्षयरोग, कुष्ठरोग, साथीचे रोग, कुपोषण मातामृत्युदर, बालमृत्यु जास्त आहे. अतिदुर्गम भागात चिकित्सा सोयीचा अभाव दिसून येतो. प्रशिक्षित डॉक्टर आणि नर्स यांचा अभावही याभागात दिसून येतो. यामागे अंधविश्वास व अशिक्षितपणा प्रामुख्याने कारणीभूत असल्याचे जाणवते.

या स्वास्थ्य विषयक समस्यांवर उपाय म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने ग्रामीण स्वास्थ्य समस्या समोर ठेवून 2002 ला एक राष्ट्रीय स्वास्थ्य निती तयार करण्यात आली. या नितीचा उद्देश ग्रामीण, गरिब, जनतेला स्वास्थ्य लाभ देणे व शिक्षित करणे, प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामवासीयांना स्वास्थ्याप्रती जागरुक करणे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून एक प्रकाशकिरण दिसून येत आहे व सर्वांसाठी आरोग्याच्या आशा पुन्हा प्रकाशित झाल्या आहेत ग्रामीण पातळीवर "आशा" हया स्वयंसेवी स्त्री कार्यकर्तीची निवड हे या अभियानाचे प्रमुख घटक आहे.

समाजसेवेची आवड असलेली "आशा" निवडून तिला प्रशिक्षित करुन समाजात ती आरोग्यविषय सेवा देतांना आज आपल्याला दिसून येते.

आशा सेविकांची प्रमुख कार्य/कामेः

ग्रामस्थांविषयी माहिती घेणे –

आपल्या देशात आजही शहरी आणि ग्रामीण असे दोन प्रकारचे जीवनमान दिसून येतात. गावातील लोकांची परिस्थिती व शहरी जीवनस्तर यात खुप तफावत दिसून येते. ग्रामीण भागात गरीबी सोबतच अनेक अडचणी व समस्यांना तोंड दयावे लागते. बरेचसे ग्रामीण शेतीवर अवलंबून असतात,तर काही फक्त मोलमजुरी, पशुपालन करुन जीवनयापन करतात.

काही ग्रामीण अत्यंत गरिब असतात ते शासनाच्या निकषाप्रमाणे दारिद्रय रेषेखालील जीवन जगत असतात. बरेचदा ते अनुसूचित जाती, जमाती किंवा इतर भटक्या विमुक्त जाती पैकी एक असतात. अशा

कुटूंबियांसाठी काही विशेष सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. याशिवाय स्त्रीया, लहान मुले, किशोरवयीन मुले आणि वृध्द ह्यांच्या आरोग्याची विशेष व वारंवार काळजी घेणे आवश्यक असते. यांच्या आरोग्य विषयक गरजा अधिक असतात.

अशा गरजु व्यक्तिंची माहिती काढणे हे आशा सेविकांचे प्रथम कार्य आहे. रुग्ण आढळल्यास किंवा गंभीर परिस्थिती असल्यास ग्रामस्थ, आरोग्यसेविका आंगणवाडी सेविका, दाई, शिक्षक, ग्रामपंचायत इत्यादी सर्वांचे सहकार्य घेणे तिला आवश्यक आहे. अशावेळी रुग्णाला योग्य मार्गदर्शन करणे, वेळीच सेवा मिळवून देणे ही आशाची जवाबदारी असते.

गावपातळीवरील आरोग्य नियोजन करणेः

गावाच्या आरोग्य संवर्धनासाठी आरोग्यसेविका, आंगणवाडी कार्यकर्ती, ग्रामपंचायत सदस्य इत्यादींच्या मदतीने कृती आराखडा आशासेविका द्वारे तयार करण्यात येतो. ग्रामपातळीवरील आरोग्य नियोजनासाठी त्या गावातील महत्वाच्या आरोग्यविषयक समस्याची उकल करुन त्यात सर्वांना सहभागी करुन विशेषतः गावातील स्वयंसेवी संघटना, शिक्षक, बचत गट, यांची मदत घेवून गावातील आरोग्य विषयक समस्या सोडवतात.

बहुतेक गावातील ग्रामपंचायतीत स्वच्छता व आरोग्य समिती स्थापन झालेल्या आहेत. ह्या समितीच्या सदस्यांना बरेचदा काय करावे हे माहित नसते, रस्त्यांवर वाहणारे सांडपाणी, उघड्या गटारी, डासोत्पतीच्या स्थानांची माहिती घेणे आरोग्यासाठी आवश्यक असते. जर गावात तापाचे रुग्ण आढळत असतील तर त्यांचा पाठपुरावा करुन आरोग्य शिक्षण आशा सेविका देतात.

व्यक्तिच्या वागणुकीतील बदलांसाठी सुसंवाद साधनेः

औषधी, गोळया, इंजेक्शन ह्यापेक्षा महत्वाचा भाग म्हणजे योग्य माहिती व समुपदेशन हे लोकांना आजारापासून दूर व निरोगी ठेवण्यास मदत करते. ग्रामस्थ, स्त्रीया, किशोरवयीन मुलांमुलींना आरोग्य संदर्भात योग्य माहिती आशासेविकाद्वारे देण्यात येते. सुसंवादातून योग्य बदल घडवून आणणे ही 'आशा' सेविकांची जवाबदारी आहे.

आंगणवाडी कार्यकर्ती, दाई, आरोग्य सेविका, आरोग्यसेवक ह्यांच्याशी समन्वय साधनेः

ग्राम पातळीवर कार्य करताना आरोग्यविषयक कार्याशी संलग्न अन्य कर्मचा-यांच्या मदतीची गरज असते. उदा. अंगणवाडी सेविका, दाई आणि अन्य औषधोपचार करणा-या व्यक्ती.

लसीकरण, गरोदर मातांची तपासणी, प्रसुती, बाळाची काळजी, गर्भनिरोधका बद्दल सल्ला देणे, काही आजारांवर औषधोपचार करणे अशा अनेक आरोग्य विषयक कारणांसाठी "आशा" ना आंगणवाडी कार्यकर्ती, दाई, आरोग्यसेविका, आरोग्यसेवक यांच्याशी आपसात समन्वय साधावे लागते.

समुपदेशन करणेः

बरेचदा लोकांना त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांच्या समाधानासाठी समुपदेशनाची गरज असते. विशेषतः पौगंडावस्था, किशोरावस्था, गरोदरपण, प्रसुती, वंध्यत्व, मुलांचे आरोग्य, पोषण, लसीकरण, गर्भनिरोधक साधनांची माहिती, लैंगिक आजार, कुष्ठरोग, क्षयरोग, कर्करोग इ. समस्या उदभवल्यास आशा सेविका त्यांना समुपदेशन करु शकतात.

रुग्णास रुग्णालयात पोचविण्यासाठी सहाय्य करणेः

काही वेळा औषधोपचारासाठी ब-याच जणांना शहरामध्ये किंवा जिल्हयाच्या ठिकाणी रुग्णालयात दाखल करणे आवश्यक असते.अशावेळी आशाची भूमिका फार
महत्वाची असते.

उदा. प्रसुतीमध्ये गुंतागुतअसल्यास, बाळंतपणापूर्वी होणारा किंवा बाळंतपनानंतर होणारा अत्याधिक रक्तस्त्राव, बालकास गंभीर आजार असल्यास,गंभीर आजारी व्यक्ती, अपघात, सर्पदंश, जळीत रुग्ण, क्षयरुग्ण किंवा एचआयव्ही बाधित रुग्ण, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया इत्यादी.

प्रथमोचार(प्राथमिक वैद्यकियसेवा)०ः

ब-याच वेळा आरोग्य विषयक तक्रारींसाठी लोकांना उपचारांची गरज नसते.
अशावेळी आशाद्वारे गरजूंवर प्रथमोपचार व मार्गदर्शन मिळत असते.

उदा. साधे सर्दी/पडसे झाल्यास घरगुती उपचार करुन रुग्ण बरा होऊ शकतो. तसेच साध्या आजारावर आशांना पुरवलेल्या औषधाच्या माध्यमातून रुग्णावर आवश्यकतेनुसार प्रथमोपचार करता येऊ शकतो.

औषधी साठा ठेवणेः

काही अत्यावश्यक औषधींचा साठा आशांकडे असतो. जसे क्षारसंजीवनी, पाकिट लोह गोळया, क्लोरोक्विनच्या गोळया इत्यादी.....

रेकॉर्ड व नोंदणीः

प्रत्येक जन्माची किंवा मृत्युची नोंद ग्रामपंचायत ला 14 दिवसाच्या आत कळविण्यात येते व प्रत्येक मृत्युची नोंद ग्राम पंचायतकडे 7 दिवसाच्या आत कळविण्यात येते.

सर्व केलेल्या कामांच्या नोंदी आशा आपल्या डायरी किंवा रजिस्टरमध्ये लिहून ठेवतात.

सारांश-

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात आशा सेविकांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. आशा त्याच गावातील रहिवासी असल्याने लोकांना तीने सांगितलेले सहजतेने पटते. तिच्या संपूर्ण कार्याचे अवलोकन केल्यास लक्षात येते की ग्रामीण आणि डाक्टर्स, नर्स यांना जोडून ठेवणारी नाळ आहे, एक दुवा आहे. आरोग्यासी संबंधित प्रत्येक छोटया-छोटया कार्यात, कार्यक्रमात आशांचा महत्वपूर्ण सहभाग असतो. ग्रामीण भागात आरोग्यासी संबंधीत ब-याच समस्या असतात या समस्या सोडविण्याचे कार्य आशांच्या हातात आहे.

संदर्भ ग्रंथ-सूची

1. डॉ. संजीव महाजन- भारत में ग्रामीण समाज, प्रकाशक- अर्जुन पब्लिसींग हाऊस नई दिल्ली, प्रथम संस्करण- 2012
2. आशा अभ्यासक्रम पुस्तक क्र. 1- सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन
3. नागरी भागातील आशा स्वयं सेविकांकरिता मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम- राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र.
4. सुरक्षित मातृत्व- सार्वजनिक आरोग्य विभाग राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे.

प्राचीन मराठी वाङ्मयातील अभिजात परंपरा

डॉ.लोकचंद राणे

धोटे बंधु विज्ञान महाविद्यालय, गोंदिया

प्रस्तावना : प्राचीन मराठी वाङ्मयात संतपरंपरा, अभिजात वाङ्मय परंपरा, शाहिरी परंपरा, लोकपरंपरा व आर्षपौराणिक परंपरा अशा या पाच परंपरा आहेत तर अर्वाचीन काळात स्वछंद परंपरा, वास्तवतावाद, अतिवास्तवतावाद आणि अस्तित्ववाद अशा चार परंपरा अस्तित्वात आहेत.

अभिजात परंपरा ही अतिशय प्राचीन आहे. संस्कृत, प्राकृत वाङ्मयात ती अतिशय प्रभावी आहे. इंग्रजी साहित्यातही ती प्रभावित आहे. इंग्रजीमध्ये याला (क्लासिकल ट्रॅडीशन) असे नाव आहे. संस्कृतमध्ये मात्र या परंपरेला विदग्ध अथवा अभिजात परंपरा असे नाव आहे. मराठी अभ्यासकांनी या परंपरेला पंडिती परंपरा असे नाव दिले आहे. काही समीक्षक या परंपरेचा उल्लेख कलाकवी असा करतात. या विषयावर काही थोर अभ्यासकांनी ग्रंथलेखनही केले आहे. डॉ.रा.शं. वाळींबे यांनी "वाङ्मय आणि संप्रदाय" या नावाचा ग्रंथच लिहिला. या ग्रंथात डॉ.वाळींबे यांनी इंग्रजी साहित्यातील अभिजात परंपरा आणि स्वछंद परंपरा यांचा इतिहास दिला आहे. "साहित्यातील संप्रदाय" या विषयावर अभ्यास करणारे दुसरे थोर अभ्यासक डॉ.के.ना. वाटवे आहेत. त्यांनी संस्कृत साहित्यातील पंचमहाकाव्याचा अभ्यास सादर केला आहे. कालिदासाचा रघुवंश व कुमारसंभव, भारवी कवीचा किरात अर्जुनीय युद्ध, माघ कवीचा शिशुपालवध आणि श्रीहर्षाचे नैषदीय काव्य अशा या पाच महाकाव्यांचा अभ्यास सादर केला आहे. त्या अभ्यासातून संस्कृत साहित्यातील विदग्ध व अभिजात परंपरेचा अभ्यास मांडला.

मराठी साहित्यात रा.श्री.जोग यांनी या परंपरेचा थोडा फार विचार सादर केला. अर्वाचीन काळात डॉ.म.रा. जोशी यांनी या विषयाच्या अनुरोधाने बरेचसे लेखन केले आहे. "ज्ञानेश्वरकन्या आणि वाङ्मयातील संप्रदाय" या ग्रंथात त्यांनी विदर्भातील थोर सत्पुरुष गुलाबराव महाराज यांच्या वाङ्मयीन कार्याचे विवेचन केले व त्या बरोबरच विदग्ध व वाङ्मयीन परंपरेचाही उहापोह केला. विशेषतः त्यांनी जे प्राचीन मराठी वाङ्मयातील १ ते ७ पुरवणीखंड प्रसिद्ध केले त्यामधून प्राचीन मराठी साहित्यातील पंडित कवी आणि अभिजात परंपरा या दोहोंचा एकत्रित विचार करून मराठी अभिजात परंपरेचे नवरूप वाचकांच्या नजरेला आणले आहे. या सर्व ग्रंथाबरोबरच डॉ.रा.श. वाळिंबे यांचा "ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती" हा ग्रंथ केवळ लक्षणीयच नव्हे तर प्रस्तुत प्रबंधाच्या संदर्भात विशेष महत्वाचा ठरतो.

मराठी अभिजात परंपरा ही ज्ञानेश्वर, नरेंद्र यांच्यापासून दृगोचर झाली असे मानले जाते. परंतु प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या पहिल्या खंडात जी पुरवणी डॉ.म.रा. जोशी यांनी जोडली त्यात त्यांनी असे दाखवून दिले की, मराठी अभिजात विदग्ध परंपरेचे स्वरूप ज्ञानेश्वर, नरेन्द्रपूर्वीही रसिकांच्या समोर आले होते. यासाठी त्यांनी शिलालेखाचा आधार घेतला. शके १०६६ च्या आंबेजोगाईच्या शिलालेखात 'वाग्देवताभट्ट' असा उल्लेख केला आहे. यावरून वाग्देवताभट्ट म्हणजे सारस्वतभट्ट हे शिलालेखाचे लेखनिक असून अभिजात परंपरेशी संबंधित होते असे दिसून येते. यावरून शके १०६६ पासून मराठी रसिक अभिजात साहित्याचा आस्वाद घेत होते. असे डॉ.म.रा. जोशी त्या विवेचनात म्हणतात. अर्थात हा शिलालेख ज्ञानदेवापूर्वी १७८ वर्षांपूर्वी कोरलेला आहे. तेव्हा ज्ञानदेवापूर्वी १७८ ते २०० असे दोनशे वर्ष मराठी वाचकांना व रसिकांना अभिजात साहित्याची व त्या परंपरेची माहिती होती असे दिसून येते.

आंबेजोगाईचा शिलालेख व त्याचा आशय लक्षात घेतला तर विठ्ठल, सामराज आणि नागेश यांच्या पूर्वी ५०० (पाचशे) वर्षाच्या कालखंडात मराठी साहित्यामध्ये अभिजात साहित्य निर्माण होत होते असे निष्पन्न होते आणि या परंपरेच्या वैभवशाली इतिहासाने केवढा विस्तृत कालखंड व्यापला होता हे दिसून होते.

अभिजात विदग्ध परंपरेसंबंधी येथे नमूद करणे आवश्यक आहे की, मराठी साहित्याला समृद्ध करणारी अशी ही परंपरा प्रामुख्याने संस्कृत साहित्याच्या सहवासाने व प्रभावाने प्रभावित आहे. या परंपरेची पुढील प्रधान वैशिष्ट्ये :-

प्रथमतः असे दिसते की, ही परंपरा पूर्णपणे लौकिकवादी आहे. लौकीकवादात मानवी जीवनातील चढउतार, सुखदुखाचे प्रसंग, भावभावनांचे दर्शन आणणे हे अभिजात परंपरेचे वैशिष्ट्ये आहे. म्हणून या परंपरेने रससिद्धांताचा

स्वीकार केला. रस हे आठ आहेत. साहित्यशास्त्रज्ञानी आठ रस मान्य केले आहेत. शृंगार, वीर, करूण, हास्य, विभत्स, रौद्र, अद्‌भुत, भयानक. या आठ रसापैकी चार रस प्रमुख आहेत व इतर चार रस प्रमुख रसाला पोषक आहेत. या रसांचे विवेचन भरताने नाट्यशास्त्रात केले व अभिनवगुप्ताने नाट्यशास्त्रावरील टीकेत स्पष्ट केले.

रसनिर्मिती ही स्थायी भावावर अवलंबून असते. असे ३३ भाव आहेत. त्यापैकी आठ भाव प्रमुख आहेत. हे आठ भाव रसात परिणत होतात व त्याचा आस्वाद रसिक घेतात. म्हणून रस आणि रसाचे अस्वाद्य मानतात असे काव्यशास्त्रज्ञानी सांगितलेले आहे. रस हे जसे अस्वाद्यमान आहेत तसेच ते पुरुषार्थनिष्ठ आहेत. पुरुषार्थ ४ (चार) आहेत. (१) धर्म, (२) अर्थ, (३) काम आणि (४) मोक्ष. मानवी जीवन या चार पुरुषार्थाशी कोणासी ना कोणासी संबंधित असते व ते आठ भावांचा आश्रय घेणारे असते ही बाब प्रथमतः अभिजात परंपरेने सादर केली व दाखवून दिले की, आठ स्थायी भाव व आठ रस यातून मानवी जीवनाचे दर्शन होत असते. भाव आणि रस याचा स्विकार आणि चारही पुरुषार्थाच्या संदर्भात रसांची निर्मिती व त्याचा आस्वाद अभिजात परंपरेने स्विकारल्यानंतर त्यातील ग्रंथकार व रसिक यांनी सिद्धांतावर भर दिला. या रससिद्धांताची प्रचिती कशी येते हा मुद्दाही त्यांनी विचारात घेतला. आनंदवर्धन याने प्रथमतः 'ध्वन्यालोक' या ग्रंथात असे सादर केले की, निर्माणकर्ता ग्रंथकार हा वक्ता असतो आणि त्या ग्रंथाचा, साहित्यकृतीचा आस्वाद घेणारा रसिक हा श्रोता असतो व वक्ता आणि श्रोता यांच्या संवादातून रसाची अखंड प्रतीति रसिकांना होते व त्यापासून त्यांना आनंद होतो. हा श्रोता-वक्ता सिद्धांत संत परंपरेतील ज्ञानदेवांनीही स्विकारला. ज्ञानदेव ९ व्या अध्यायात म्हणतात:

तेवी तुम्हा संतांचा पढियावो । कैसेनि तरि आम्हावरी हो ।
या बहुवा आळुकीया जी आहो । सलगी करित ।। ७ ।।
वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादृश्य श्रोते ।
काय धड्यावरी सारस्वते । पढो सिकिजे ।। ८ ।।
अवधारा आवडे तेसणा घुंघुर । परी महातेजी न मिरवे काय करू ।
अमृताचिया ताटी वोगरु । ऐसी रससोय कैची ।। ९ ।।
अहो हिमकरासी विंजणे । की नादापुढे आइकवणे ।
लेणियासी लेणे । हे कही आथी ।। १० ।।
सांगा परिमळे काय तुरंबावे । सागरे कवणे ठायी नाहावे ।
हे गगनचि आडे आघवे । ऐसा पवाडु कैचा ।। ११ ।।
तैसे तुमचे अवधान धाये । आणि तुम्ही म्हणा हे होये ।
ऐसे वक्तृत्व कवणा आहे । जेणे रिझा तुम्ही ।। १२ ।।
परी आता चंद्रापासोनि निवविते । जे अमृताहूनि जीववितें ।
तेणे अवधाने कीजो वाढते । मनोरथा माझिया ।। २४ ।।
कां जै दिठिवा तुमचा वरुषे । तै सकळार्थसिद्धी मति पिके ।
ए-हवी कोंभेला उन्मेषु सुके । जरी उदास तुम्ही ।। २५ ।।
सहजे तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा ।
तरी दोंदे पेलती अक्षरा । प्रमेयाची ।। २६ ।।
अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावो अभिप्रायाते विये ।
भावाचा फुलोरा होत जाये । मतिवरी ।। २७ ।।
म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे । तरी हृदयाकाश सारस्वत वोळे ।
आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे । मांडल रसु ।। २८ ।।
अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्रीकी आहे ।
म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनविण ।। २९ ।।

ज्ञानदेवांनी वक्ताश्रोता संवाद आणि रसप्रतीति हा साहित्यशास्त्रातील सिद्धांत मान्य करुन अभिजात परंपरेशी सुसंवाद केला. विदग्ध व अभिजात परंपरेचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, या परंपरेतील सर्व ग्रंथकार आणि अभ्यासक यांनी रससिद्धान्त आणि अलंकार या दोहोंचा उपयोग साहित्यनिर्मितीसाठी केला आणि शतकानुशतके रसिकांचे मनोरंजन केले. या अभिजात परंपरेने सुरुवातीला आठ रस मान्य केले ते असे - (१) शृंगार, (2) वीर, (3) करूण, (4) हास्य, (5) विभत्स, (6) रौद्र, (7) अद्‌भुत, (8) भयानक.

स्वतः ज्ञानदेवांनी मात्र आठ नव्हे तर नऊ रसांचा पुरस्कार केलेला आहे. त्यांनी पुरस्कार केलेला रस 'शांतरस' आहे ते म्हणतात की 'शांत' रस हा सर्वश्रेष्ठ रस आहे. तो शृंगारापेक्षाही महत्वाचा आहे. 'शांत' आणि 'शृंगार' यांची तुलना केली तर शृंगाराला सर्वच बाबतीत मागे टाकतो. शांत रसाचा एवढा गौरव करण्याचे कारण तो संत व ऋषीमुनी यांना प्रिय आहे. तो अलौकिक आहे. तर शृंगाररस हा केवळ लौकिक रूप स्वीकारतो. ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानदेवांनी अद्‌भुत आणि शांत या दोन रसांचे वर्णन केले आहे. अद्‌भुत रस हा शांत रसासी सुसंगत आहे. या रसाचे ११ व्या अध्यायात ज्ञानदेवांनी ओवी क्रमांक ६१० ते ६१६ मध्ये वर्णन केलेले आहे.

कोण हे वस्तू पावला आहासी । तया लाभाचा तोषु न घेसी ।
मा भेंणें काय नेणों बोलसी । हे काडू ऐसा ।। ६१० ।।
आम्ही सावियाची जैं प्रसन्न होणे । तै आगंचीवरी म्हणे देणें ।
वांचोनि जीव असे वेंचणें । कवणासी गा ।। ६११ ।।
तें हे तुझिये चाडे । आजि जिवाचेंचि दळवाडे ।
कामऊनिया येवढें । रचिले ध्यान ।। ६१२ ।।
ऐसी काय नेणो तुझिये आवडी । जाहली प्रसन्नता आमुची वेडी ।
म्हणोनि गौप्याची ही गुढी । उभविली जगी ।। ६१३ ।।
ते हे अपरां अपार । स्वरूप माझें परात्पर ।
येथूनि ते अवतार । कृष्णादिक ।। ६१४ ।।
हे ज्ञानतेजाचे निखळ । विश्वात्मक केवळ ।
अनंत हे अढळ । आद्य सकळां ।। ६१५ ।।
हे तुजवांचोनि अर्जुना । पूर्वी श्रुत दृष्ट नाही आना ।
जे जोगे नव्हे साधना । म्हणोनिया ।। ६१६ ।।

शांत रसाची अपूर्वता व महती वर्णन करताना ज्ञानेश्वरीच्या ४ थ्या अध्यायात ओवी क्रमांक २१२ ते २२५ मध्ये म्हणतात :

ते कथेची संगति । भावाची संपत्ति ।
रसाची उन्नति । म्हणिपेल पुढां ।। २१२ ।।
जयाचिया बरवेपणीं । कीजे आठां रसाची ओवाळणी ।
जो सज्जनाचिये आयणी । विसांवा जगिं ।। २१३ ।।
तो शांतूची अभिनवेल । ते परियसा मराठे बोल ।
जे सामुद्राहूनि खोल । अर्थभरित ।। २१४ ।।
जैंसे बिंब तरी बचकें-एवढें । परी प्रकाशा त्रैलोक्य थोकडें ।
शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवाची ।। २१५ ।।
नातरी कामितयाचीया इच्छा । फळे कल्पवृक्ष जैसा ।
बोलू व्यापकु होय तैसा । तरी अवधान द्यावें ।। २१६ ।।
हें असो काय म्हणावें । सर्वज्ञु जाणती स्वभावें ।
तरी निकें चित्त द्यावें । विनंति माझी ।। २१७ ।।
जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती ।
जैसे लावण्यगुणकुळवती । आणि पतिव्रता ।। २१८ ।।
आधींचि साखर आवडे । आणि तेचि जरी ओखदिं जोडे ।
तरी सेवावी ना कां कोडें । नावानवा ।। २१९ ।।
सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु ।
आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या ।। २२० ।।
तरी स्पर्से सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी ।
तेवींची कानाकरवी म्हणवी । बापु माझा ।। २२१ ।।
तैसें कथेंचे इये एकणें । एक श्रवणाशी होय पारणें ।
आणि संसारदुःख मूळवणें । विकृतीविणें ।। २२२ ।।
जरी मंत्रेंची वैरी मरे । तरी वायांची कां बांधावी कटारें ।
रोग जाय दुधें साखरें । तरी निंब का पियावा ।। २२३ ।।
तैसा मनाचा मारू न करितां । आणि इंद्रिया दुःख न देता ।

एथ मोक्षु असे आयता । श्रवणाचिमाजी ।। २२४ ।।
म्हणोनि आथिलिया आराणुका । गीतार्थु हा निका ।
ज्ञानदेवो म्हणे आइका । निवृत्तिदासु ।। २२५ ।।

अशाप्रकारे नवरसाची महती व शांत रसाचा पुरस्कार ज्ञानदेव करतात हे खरे असले तरी ज्ञानदेवांच्या काळात शृंगारप्रधान साहित्याला रसिकवर्गात मोठीच मान्यता होती. ज्ञानदेवांचे समकालीन भास्करभट्ट बोरीकर आणि दामोदरपंडित हे दोन महानुभाव कवी आहेत. भास्करने 'शिशुपालवध' व 'उद्धवगीता' हे ग्रंथ लिहिले व दामोदरपंडिताने 'वच्छाहरण' हा ग्रंथ लिहिला यात श्रीकृष्णाचे वर्णन केले व भक्तीचा पुरस्कार केला. पण भक्तीरसाचा पुरस्कार करताना श्रीकृष्णाचे चरित्र हे केवळ भक्तिरसानेच नव्हे तर नवरसाने कसे परिपूर्ण आहे हेही सांगितले. दामोदर पंडित हा शांत रसाचा पुरस्कर्ता आहे हे खरे परंतु त्यालाही हे मान्य करावे लागले की, भक्ती व शांत रसाइतकेच शृंगार रसालाही महत्व देणारे काही ग्रंथकार व रसिक आहेत. दामोदराच्या समकालीन भास्करभट्ट बोरीकर आहेत. हा मोठा जाडा विद्वान होता. तो महानुभाव पंथाचा आचार्य होता. भास्करभट्ट हा विद्वान असून कवी होता. त्याने 'शिशुपालवध' नावाचे काव्य लिहिले. हे काव्य त्यांनी आपले गुरु भावे देवदास यांना दाखविले तेव्हा भावे देवदासांनी असा अभिप्राय दिला की, हे काव्य शृंगारप्रधान आहे. म्हणून हा अभिप्राय लक्षात घेऊन भास्करभट्टानी 'उद्धवगीता' नावाचे दुसरे काव्य केले. या काव्यात त्याने शांत व भक्ती रसाचा पुरस्कार केला. दामोदरपंडित व भास्करभट्ट या दोन महानुभाव कवींच्या पूर्वी महानुभाव पंथाचा नरेंद्र नावाचा महान कवी होऊन गेला. त्याने 'रुक्मिणी स्वयंवर' हे महाकाव्य लिहिले. हे काव्य लिहिले तेव्हा नरेंद्रपण्डित हा यादवांच्या राजसभेत होता. हे काव्य त्यांनी राजा रामचंद्राला वाचून दाखविले. ते त्याला फार आवडले. नंतर त्यांनी त्या काव्याची मागणी केली. त्यानंतर तो राज्य सभेचा त्याग करून महानुभाव पंथाचे आचार्य नागदेवाकडे आला. तेव्हा पासून तो महानुभाव पंथात प्रचलित आहे. आज हे काव्य महानुभाव पंथात अपूर्ण स्वरूपात प्रचलित आहे. या काव्यात रुक्मिणी स्वयंवराची कथा आलेली आहे. ही शृंगारप्रधान असूनही त्यांनी शांत व भक्तीस्वरूपात मांडली. अशाप्रकारे ज्ञानदेव, दामोदरपंडित, भास्कर व नरेंद्र या चारही कवींनी शृंगार रसाला दुय्यम व गौण स्थान देऊन शांत व भक्तीरसाचा पुरस्कार केला. हे चारही कवी संत परंपरेचे असले तरी विदग्ध परंपरेप्रमाणे ते काव्य रचना करताना दिसतात. एवढेच नव्हे तर शांत व भक्तिरसाचाही ते पुरस्कार करताना दिसतात.

रससिद्धांत व रससंख्या याला संत आणि अभिजात परंपरेत महत्वाचे स्थान आहे. परंतु अभिजात परंपरेचा इतिहास पहिला तर असे दिसून येते की, कोणता रस श्रेष्ठ मानावा याविषयी मतमतांतरे आहेत. एक विचार प्रवाह असा आहे ज्यामध्ये शृंगार हा सर्वश्रेष्ठ रस आहे, असे मानले जाते. दुसरा विचार प्रवाह असा आहे की, करूण हा सर्वश्रेष्ठ रस आहे. प्रसिद्ध नाटककार भवभूती हा करूण रसाला महत्व देणारा आहे. तिसरा प्रवाह शांत रसाला श्रेष्ठपदाचा मान देणारा आहे. ज्ञानदेव, विठ्ठल, सामराज व नागेश हे तीन कवी शांत रसाला महत्व देणारे आहेत. चौथ्या भक्ती रसाला महत्व देणारे एकनाथासारखे संतकवी आहेत. अभिजात परंपरा शांत आणि भक्तिरसाच्या विरोधात नाही. एवढेच नव्हे तर मराठी साहित्यातील वामन आणि मोरोपंत हे अभिजात परंपरेतील कवी असूनही भक्ती रसाचे पुरस्कर्ते आहेत. वामन आणि मोरोपंतप्रमाणे विठ्ठल आणि सामराज हे कवीदेखील भक्ती रसाला महत्व देतात.

नवरसप्रधान साहित्याप्रमाणेच, अभिजातपरंपरा अलंकारांना अतिशय महत्व देते. अलंकार हे काव्याचे परमसौन्दर्य आहे. हे सौन्दर्य काव्यात दोन घटकांमुळे आढळून येते. (१) शब्द व (२) अर्थ. काही अलंकार शब्दालंकार आहेत. पण त्यांची संख्या तीन चारच आहे. अनुप्रास, यमक व श्लेष हे शब्दालंकार आहेत. तर अर्थालंकार अनंत आहेत. त्यांची संख्या ८०-९० पर्यंत आहे. त्यात उपमा, दृष्टांत आणि उत्प्रेक्षा यांना मोठे स्थान आहे. अभिजात परंपरेतील सर्व ग्रंथ आणि कवी शब्द आणि अर्थालंकाराचा उपयोग करून आपली काव्यनिर्मितीची क्षमता दाखवून देत असतात.

रस आणि अलंकार कथानक (प्लॉट) याला अभिजात विदग्ध परंपरेत अतिशय महत्व आहे. कथेचे कथानकात रूपांतर करणे म्हणजेच उत्तम स्वरूपाचे काव्य निर्माण करणे. कथानकाप्रमाणेच व्यक्तिचित्रणालाही महत्वाचे स्थान असते. नायक, नायिका व प्रतिनायक या तीन घटकांनी अभिजात परंपरेतील घटकांचा विस्तार व विकास होत असतो. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, भारतीय अभिजात परंपरेत खलनायक नसतो तर प्रतिनायक असतो, आणि नायक व प्रतिनायक किंवा व्यक्तिजीवनातील घटना अथवा प्रसंगयातील संघर्ष याचे चित्रण अभिजात परंपरेत

असते. याशिवाय वातावरण निर्मिती, निसर्गवर्णन आणि मनमोहक भाषाशैली हे अभिजात परंपरेच्या काव्याचे प्रधान घटक आहेत. हे सर्व लक्षात घेतले तर अभिजात परंपरेतील पुढील वैशिष्ट्ये लक्षात येतात :-

१) अभिजात परंपरेतील साहित्य हे लौकिकप्रधान आहेत.
२) अभिजात परंपरेतील साहित्य धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे पुरुषार्थप्रधान आहेत.
३) अभिजात विदग्ध परंपरेतील साहित्य हे रसप्रधान व अलंकारप्रधानयुक्त असते.
४) अभिजात विदग्ध परंपरेतील साहित्य हे कथानकप्रधान असते.
५) अभिजात विदग्ध परंपरेतील साहित्य हे व्यक्तिचित्रणात्मक असते.
६) अभिजातप्रधान साहित्यात मानवी जीवनातील घटना व व्यक्ती यांच्या आयुष्यातील संघर्षाचे चित्रण असते.
७) अभिजात विदग्ध परंपरेतील साहित्यातील वातावरण मानवी जीवनातील नानाविध प्रसंगांनी भरलेले असते. तसेच मानवाच्या नानाविध भावनांचे चित्रण नवदर्शन घडविणारे असते.
८) अभिजात विदग्ध परंपरेतील साहित्यामध्ये रम्य व मधुर चित्रण केलेले असते. कारण निसर्ग हा मानवाचा मित्र आहे ही त्याची प्रधान भावना असते.
९) अभिजातप्रधान साहित्यामध्ये धर्म व संस्कृती यांच्या प्रभावाची रेखीव वर्णने आलेली असतात.
१०) अभिजात विदग्ध परंपरेतील साहित्याची भाषाशैली सौन्दर्याने नटलेली व भाषेच्या दृष्टीने समृद्ध व विकसित असते.

संदर्भग्रंथ सूची :-

१) लेखक स. रा. गाडगीळ, काव्यशास्त्रप्रदीप, चौथी आवृत्ती
२) रामचंद्र मित्र, काव्यादर्श, द्वितीय आवृत्ती, चौरंगा विद्या भवन वाराणसी
३) आनंदवर्धन, ध्वन्यालोक, प्रथमावृत्ती, चौखंबा पुस्तकालय बनारस
४) वि.ल. भावे, महाराष्ट्र सारस्वत, पाचवी आवृत्ती
५) लेखक मा.गो. देशमुख, मराठीचे साहित्यशाश्त्र, चौथी आवृत्ती
६) संपादक के.ना. वाटवे, मराठी पंडिती काव्य, प्रथमावृत्ती
७) लेखक द.के. केळकर, मराठी साहित्याचे शिंहावलोकन, प्रथमावृत्ती
८) संपादक शं.वा. दांडेकर, सार्थ ज्ञानेश्वरी, सातवी आवृत्ती
९) संपादक गो. का. चांदुरकर, संत काव्य सूची, प्रथमावृत्ती
१०) संपादक द. सी. पंगू, प्राचीन मराठी कवी पंचक, प्रथमावृत्ती
११) संपादक ल.रा. पांगारकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्रथमावृत्ती
१२) संपादक अ.ना. देशपांडे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्रथमावृत्ती
१३) संपादक म.रा. जोशी, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, द्वितीयावृत्ती

सविता सिंह की कविताओं में नारी अस्मिता का स्वर

डॉ. रमेश माणिकराव शिंदे
सहयोगी प्राध्यापक, हिंदी विभाग, यशवंतराव महाविद्यालय, अंबाजोगाई.
Email. eerameshmshinde@gmail

सविता सिंह हिंदी की परिचित कथाकार, प्रसिद्ध कवयित्री तथा स्त्रीवादी वैचारिकी के निर्माण में अहं भूमिका निभाती साहित्यकार है | इनका जन्म सन १९६२ में बिहार राज्य के 'आरा' में हुआ | दिल्ली विश्वविद्यालय में एम्.ए., एम्.फिल. करने के बाद उच्च शिक्षा के लिए वह मॉट्रियल के मैक्गिल विश्वविद्यालय चली गई | उनके शोध का विषय था 'भारत में आधुनिकता का विमर्श : एक व्याख्यात्मक अध्याय !' सविताजी चार साल kanadaकॅनाडा और दो साल लंडन में रही | विदेशी परिवेश के परिणाम स्वरूप उनके साहित्यिक योगदान में अंग्रेजी कविताएँ सम्मेलित हुई| सविताजी का पहला कविता संग्रह 'अपने जैसा जीवन' २००१ में हिंदी अकादमी द्वारा पुरस्कृत हुआ| दूसरा कविता संग्रह 'निंद थी और रात थी' यह 2005 में छपा जैसे रजा सम्मान से नवाजा गया | 2008 में उनका एक 'द्विभाषिक' कविता संग्रह अंग्रेजी हिंदी में रोविंग टुगेदर से प्रकाशित हुआ | सविता जी ने सन 2018 में अमेरिका युरोप और एशिया की सात कवयित्रियों के आंग्रेजी संकलन सेवेन लीव्स वन ऑटम का संपदान भी किया | उसमें उनकी प्रतिनिधी कविताएँ भी शामील है| हाल ही में उनका तीसरा कविता संकलन 'स्वप्न समय' प्रकाशित हुआ है | प्रस्तुत 'नई सदि के लिए चयन पचास कविताएँ' साल 2012 में प्रकाशित कविता संग्रह है जो उनकी प्रतिनिधि कविताओं को प्रदर्शित करती है | वरिष्ठ कवयित्री कविता सिंह की कविताएँ भारतीय नारी की कविताएँ है | प्रस्तुत कविता संग्रह में अधिकतम कविताएँ नारीवादी वैचारिकी का ठोस आधार है | कविताओं में स्त्री जीवन के विविध पक्ष उजागर हुए है उनमे स्त्री का संघर्ष विद्रोह स्त्री जीवन की चुनोतियाँ आदि | स्त्री मन के सपनों को अधोरेखित करती संग्रह की पहली कविता 'श्याम में एक सपना' मैं एक मैं सविताजी स्त्री के मनोदशा को बखूबी दर्शती है_

""किसी राह को कहूँ अपनी राह
किसी विस्मृत सुख को एक सुख
किसी की नींद में जा लेटूँ
जगूँ किसी मीठे स्वप्न की बाहों में
ऐसी है कामना इस शाम""१

'स्त्री सच है' नामक कविता में उन्होंने प्राचीन समय से स्त्रीयों को दूषित नजरिया से देखने की दृष्टि पर सवाल उठाया है | उनके अनुसार विज्ञान, तकनीकी तथा सभी क्षेत्रों में आज इंसान तरक्की तो कर रहा है, लेकिन स्त्री को मानव के रूप में स्वीकृत नहीं कर रहा अनादी काल से आज तक स्त्री की स्थिती अंधेरामय ही है |

""दूर तक देख सकते हैं
समतल पथरीले मैदान है
प्राचीनतम-सा लगता विश्व का एक हिस्सा
और एक स्त्री है लांघती हुई प्यास""२

पुरुष प्रधान संस्कृती में पुरुषों का एकाधिकार नारी को बंधनों में बांध देता है | इसमें कोई दोहराय नहीं है कि पुरुष शिक्षित हो भी न नहीं हो वह हमेशा से स्त्री को अपने नीचे ही देखना चाहता है | आज भी वर्तमान समय में उच्चभ्रू घरों में नारी को केवल दिखावे की वस्तु बनाकर रखा जाता है | उसे अपने मन की बात बोलने का अधिकार नहीं और नहीं खुद के सपने पूरे करने का अधिकार | याद रखना गीता नामक कविता में सविता जी नीता को इसी बात को समझाते हुए कहती है कि कामयाब आदमी हमेशा ऐसी जीवनसंगिनी चयन करते हैं, जो अपने पति के हाँ में हाँ मिलाये, पति के हर इशारे पर चले, चुपचाप दूसरों के विचारों को स्वीकार करें साथ ही साथ वह मेहनती और कम बोलने वाली हो | इस कविता में कामयाब आदमी की असली सूरत दर्शाते हुए सविता जी ने निडरता से पुरुष प्रधान संस्कृति को लिखा व्यंग देखिए

""कामयाब आदमी यूं ही नहीं बनता कामयाब
उसे आता है अपने पूर्वजों की तरह चुनना
भेद करना
और इस भेद को एक भेद
बनाए रखना""३

कविता जी की कविताएँ भारतीय निश्चित है लेकिन कविता में अभिव्यक्त नारी विश्व के हर क्षेत्र देश की नारी है | 'मैं कथा कहूंगी' कविता में विश्व नारी स्थिति की बात रखते हुए वे कहती है कि, कई शताब्दियों से हमारे उपर डाली गई जिम्मेदारियों को नारी अपना कर्तव्य समझकर निभाते आयी है | झूठ, अनाचार हमने अपनी आँखों से देखा है | कई बार शर्म से हमारी गर्दन झुकीं है | हर रोज घटित घटनाओं से यह सिलसिला आज भी जारी है | इसलिए 'सविताजी' कहती है_

"स्त्रीयों तुम जहाँ कहीं भी हो
जिस सदी और जिस देश में
तुम्हें अपने पूर्वजन्म-सा में कविता में पालूंगी
क्योंकि बार-बार में ही थी जन्म लेती बनकर
कभी मीरा, राबया, एमिली सिमोन आख्यातोवा कभी|"४

प्रस्तुत कविता संग्रह की और एक सशक्त कविता है 'मुझे वह स्त्री पसंद है' | 'सविताजी' अपनी अत्याधिक कविताओं में नारी के शक्तिशाली रूप को देखने की मनीषा रखती दिखाई देती है | 'सविताजी' 'नारी' को अबला, लाचार, चापलूसी करनेवाली तथा डरी हुई देखना नहीं चाहती | उनके अनुसार नारी को अपनी बात बेबाकी से साफ-साफ रखने आनी चाहिए जिससे किसी को जानबूझकर ठेंस न पहुंचे और स्वयं स्वाभिमान की रक्षा भी हो | अपने उपर होते अन्याय को समझे, उसका विरोध करें पर किसी पर हानि ना हो | सभी के प्रति सहानुभूति की भावना उसके ह्रदय में हो_

"मुझे वह स्त्री पसंद है
समझती हुई सारे घात प्रतिघात जो
खतरे सारे जीवन के
खुद से प्रेम करती है
और संसार के हर प्राणी से सहानुभूति रखती है"५

'सविताजी' की सबसे चर्चित और पाठकों द्वारा पसंदीदा कविता का जिक्र किए बिना आगे नहीं जा सकेगा | यह कविता जो संगोष्ठी, वेबीनार, सम्मेलनों तथा साक्षात्कार में सुनायी जाने की माँग पाठकोंद्वारा हमेशा से ही की जाती है | कविता का नाम है 'मैं किसकी औरत हूँ?' प्रस्तुत कविता आधुनिक स्त्रीका और जीवन जी चुकी बुजुर्ग स्त्री दोनों के जीवन दर्शन को प्रस्तुत करती है | एक स्त्री जो कवयीत्री के रूप में वर्तमान सशक्त नारी का प्रतिनिधित्व करती है तो दूसरी बुजुर्ग जो सब जिम्मेदारीयों, और कर्तव्य को पूरा करके भी इस प्रश्न पर सभ्रमित है कि मैं किसकी औरत हूँ? यही प्रश्न स्त्री की व्यथा को दर्शाता है |

"मैं किसकी औरत हूँ
कौन है मेरा परमेश्वर
किसके पाँव दबाती हूँ
किसका दिया खाती हूँ
किसकी मार सहती हूँ|"६

नारी का जीवन हमेशा से दूसरों पर निर्भर रहता है | रमणिका गुप्ता जी स्त्री की दशा को दर्शाते हुए लिखती है "मेरे विचार से हर महिला दलित है चाहे वह किसी भी वर्ग, जाति, व धर्म की हो | इसका सबसे बड़ा कारण है परजीवी होना, पुरुष प्रधान सामाजिक व्यवस्था में उसे चाभियों का गुच्छा कमर में लटककर घर संसार की मालकिन का किताब तो पुरुषों द्वारा दे दिया गया है लेकिन, कोई अधिकार प्रदान नहीं किया है उल्टे उसे घर के कामकाज में बांध कर दुनिया से काट दिया गया है वह बिना पुरुष के इजाजत के न तो घर का भंडार भर सकती है और नहीं खली कर सकती है |"७ विवाह के पूर्व पिता के घर, विवाह के उपरांत पति का घर और बुढ़ापे में बेटे के घर में उसका जीवन व्यतीत होता है | जीवन के अंतिम पड़ाव में उसे यह सवाल बार-बार बैचेन करता है कि आखिर में किसकी औरत हूँ**?** यहाँ 'सविताजी' आधुनिक नारी होने के कारण आधुनिकता उत्तर देती है कि_

"मैं किसकी औरत नहीं हूँ
मेरा परमेश्वर कोई नहीं|"८

'सविताजी' सभी औरतों को बार-बार यही बताने की कोशिश करती है कि, नारियों के भी पसंद नापसंद, उम्मीदें, सपने होते हैं | इतना ही नहीं उन्हें पूरा करने का अधिकार भी उन्हें प्राप्त है | अपने अंदर छुपी उस औरत को बाहर निकालें जो कह सकेगी_

"उन्मुक्त देखो,
और यह आसमान
समुद्र यह और इसकी लहरें
हवा यह
और इस में बसी प्रकृति की गंध सब मेरी है
और मैं हूँ अपने पूर्वजों के शाप और अभिलाषाओं
से दूर पूर्णतया अपनी|"९

स्त्री जीवन के त्यागमयी वृत्ति को कवियीत्री लेखन रेखांकित करती है | पिता के घर से पति के घर आने के बाद उसमें घर में बस जाने से उसे और अच्छा बनाने के लिए अपनी पूरी सामर्थ्य को वे लगाती है | अपनी आखिरी साँस भी वह पति के यहाँ ही लेती है | 'विमला की यात्रा' कविता में लेखिका नारी जीवन यात्रा को प्रकाशित करती है_ देखें -

"जब वह गई पति के घर पहली बार
उस घर को उसने बनाया अपना
लीप पोतकर चमकाया उसे
कूट-पीसकर हमेशा ही इकट्ठा किया और रखा
साल भर का अनाज
छोये सबके पांव
सीने सब के ऊपर उड़े फटे कपड़े
कहते हैं पति का घर होता है पत्नी का घर|"१०

वर्तमान में हर दिन कोई न कोई घटनाएं घटित होती है जिससे नारी स्थिति को गंभीरता से सोचने पर मजबूर कर आती है बलात्कार दहेज प्रथा अनमेल विवाह जैसी कुप्रथा नारी को पांव तले रखने की प्रवृत्तियों को बढ़ावा देती है पत्नियां तो चाहिए और बेटियां नहीं इस प्रकार की मानसिकता की गर्भ में ही बेटियों को मौत के घाट उतार दी है गर्भ से बाहर आती भी है तो उन्हें नालियों में फेंका जाता है आगे अनमेल विवाह दहेज ऐसे अत्याचारों को झेलना पड़ता है अपने सपनों की उड़ान को दबाकर सर्वता परिवार के लिए जीवन या पित्त करती औरत को करते हुए कवित्री लिखती है

वर्तमान में हर दिन कोई न कोई घटनाएं घटित होती है जिससे नारी स्थिति को गंभीरता से सोचने पर मजबूर कर आती है बलात्कार दहेज प्रथा अनमेल विवाह जैसी कुप्रथा नारी को पांव तले रखने की प्रवृत्तियों को बढ़ावा देती है पत्नियां तो चाहिए और बेटियां नहीं इस प्रकार की मानसिकता की गर्भ में ही बेटियों को मौत के घाट उतार दी है गर्भ से बाहर आती भी है तो उन्हें नालियों में फेंका जाता है आगे अनमेल विवाह दहेज ऐसे अत्याचारों को झेलना पड़ता है अपने सपनों की उड़ान को दबाकर सर्वता परिवार के लिए जीवन या पित्त करती औरत को करते हुए कवित्री लिखती है_

"नमन करो उन छोटी बेटियों को
जो जी लेती है जैसे-तैसे मिला यह जीवन
हो लेती है पार कागज की नौकाएँ होते हुए भी
डूबती है कई
कई गर्ल भी जाती है बीच में ही
कुछ लगती है पार
खतरनाक इन गहरे जलाशयों के|"११

स्त्री जन्म से ही अगणित मुश्किलों को मात देकर आगे बढ़ती है | देश के हर क्षेत्र में कम अधिक मात्रा में नारी की यही स्थिति दिखाई देती है |

"जिस्म पर इतने जख्म
पर उससे भी ज्यादा
देश के मानचित्र पर और भी ज्यादा
एक तरफ ढेर सली लाशों का
एक तरफ टंगा हुआ

पेट चीर कर मारा गया और जन्मा बच्चा|"१२

सविता जी ने समाज में व्यक्त कुरीतियों अंधविश्वासों रोड पर नेताओं का भी खंडन किया है क्योंकि उन्होंने यह प्रमाणित किया है कि इन परंपरागत कुरीतियों ने सबसे अधिक प्रहार नारी के स्वाधीनता सम्मान को ही किया है कुल मिलाकर कहा जा सकता है कि सविता सिंह ने अपने प्रतिनिधि कविता संग्रह में साहित्य का आधार समाज को बताया है समाज में व्याप्त नारी समस्याओं विद्रूपता ओ और विसंगतियों को उन्होंने प्रमुखता से कविताओं के माध्यम से प्रस्तुत किया उनके कविताओं में विषयों को नए स्वरूप में देखा जा सकता है सीधे शब्दों में कहा जाए तो उनके कविताओं में कविताओं का सामाजिक पक्ष अत्यंत प्रबल है

सन्दर्भ सूचि :सिंह , सविता . पचास कविताएँ , नयी दिल्ली . वाणी प्रकाशन ,२०१२ पृ.५

1. वहीं – पृ. १०
2. वहीं – पृ.१९
3. वहीं – पृ.२१
4. वहीं – पृ.४१
5. वहीं – पृ.२२
6. सं. शर्मा , श्रीराम . समकालीन हिंदी साहित्य विविध विमर्श , नयी दिल्ली . वाणी प्रकाशन २००९
7. सिंह , सविता . पचास कविताएँ , नयी दिल्ली . वाणी प्रकाशन ,२०१२ पृ.२३
8. वहीं – पृ.२४
9. वहीं – पृ.२५
10. वहीं – पृ.२८
11. वहीं – पृ.५१

संरक्षण यंत्रणा Defense Mechanism

प्रा.डॉ.सचिन बाबुराव खोकले

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गंगाखेड जि.परभणी

सारांश:- आजच्या धकाधकीच्या जगात ताणतणाव, मानसिक समस्या आणि मानसिक आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. फ्रॉइड यांच्या मनोविश्लेषण सिद्धांताप्रमाणे अहम् आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवण्यासाठी व विकारी चिंतेपासून संरक्षणासाठी जे समायोजनकारी डावपेच मांडतो त्याला संरक्षण यंत्रणा म्हणतात. परंतु ह्याचा काही वेळा अतिरेक होऊन त्यांचे मानसिक विकारलक्षणांत रूपांतर होते. हे डावपेच एकतर *पराहमला* अमान्य अशा इदमच्या वेगाचे रूप पालटून पराहमची मान्यता मिळवून देतात; किंवा आत्मप्रतारणेने इदमच्या अभिलाषा तृप्त झाल्याचा आभास निर्माण करतात. एकूण आंतरिक द्वंद्व व अस्थैर्य टाळून अहम् (पर्यायाने व्यक्तिमत्त्व) अबाधित ठेवण्याचा हा एक अविरत प्रयत्न असतो.

प्रस्तावना: मानसिक तणाव किंवा कठीण भावनांना सामोरे जाण्यासाठी संरक्षण यंत्रणा हा एक मार्ग आहे. ते बेशुद्ध तंत्र आहेत, ज्याचा अर्थ असा आहे की एखादी व्यक्ती त्यांना न कळता त्यांचा वापर करते. ताणतणाव हाताळण्यासाठी संरक्षण यंत्रणा सकारात्मक मार्ग असू शकतात. इतर वेळी, ते कठीण भावना टाळण्यासाठी किंवा अपायकारक किंवा असामाजिक वर्तनास नकार देण्यासाठी मार्ग असू शकतात.

मानसशास्त्रज्ञ डॉ.सिगमंड फ्राईडने मानवी वागणूक समजून घेण्याचा एक मार्ग म्हणून संरक्षण यंत्रणेची कल्पना विकसित केली. असुविधाजनक भावना टाळण्यासाठी मार्ग म्हणून लोक संरक्षण यंत्रणेचा वापर करतात. काही वारंवार वापरल्या जाणाऱ्या संरक्षण यंत्रणा खाली दिल्या आहेत.

नकार (Denial)

संकटांचा सामना करण्याचा आणखी एक प्रारंभिक मार्ग म्हणजे त्यांचे अस्तित्व स्वीकारण्यास नकार देणे. एखाद्या व्यक्तीच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या परिस्थितीत नकार उपयुक्त ठरू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या गंभीर आजारावर मात करण्याचा प्रयत्न केल्यामुळे आशावादी राहणे एखाद्या व्यक्तीस फायदेशीर ठरू शकते. ज्या व्यक्तीने नकाराचा अवलंब केला आहे तो त्याच्यासाठी वेदनादायक वास्तवांकडे दुर्लक्ष करतो आणि ते अस्तित्वात नसल्यासारखे वागतो. **एक मद्यपी जो त्याच्या व्यसनास नकार देतो** आणि असे म्हणतो की मद्यपान केल्याने आपल्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत नाही. पण मद्यपान करणे सोडत नाही. त्यामुळे , विद्यमान समस्येमध्ये आणखी एक समस्या जोडली जाते - अल्कोहोलयुक्त पेये वापरण्याशी संबंधित समस्या. पुढे तर आणखी जास्त अल्कोहोल आवश्यक असेल आणि खरी समस्या आणखी खोल होईल. एक दुष्ट वर्तुळ तयार होऊ शकते.

प्रतिगमन (Regression)प्रतिगमन ची यंत्रणा आपल्याला लहानपणापासूनच्या वर्तनाच्या नेहमीच्या पद्धतींकडे परत येऊन संघर्ष, चिंता किंवा दबावाच्या अत्यंत क्लेशकारक परिस्थितीशी जुळवून घेण्यास अनुमती देते: किंचाळणे, रडणे, लहरीपणा, भावनिक विनंत्या इ. हे घडते. प्रतिगमन आपल्याला जे घडत आहे त्याबद्दल जबाबदारीचे ओझे काढून टाकण्याची परवानगी देते: शेवटी, बालपणात, आपले पालक आपल्याऐवजी बऱ्याच गोष्टींसाठी जबाबदार असतात. ही संरक्षण यंत्रणा अतिशय प्रभावी आणि समस्यामुक्त म्हणता येईल. जेव्हा ते जास्त काळ काम करते तेव्हा अडचणी उद्भवतात. प्रतिगमनाचा गैरवापर केल्याने सायकोसोमॅटिक रोग, यशस्वी जीवन धोरणाचा अभाव, आजूबाजूच्या लोकांशी असलेले नातेसंबंध नष्ट होतात.

दडपण (Repression)

दडपशाहीमध्ये वेदनादायक किंवा अस्वस्थ भावना, भावना आणि प्रेरणा रोखण्यासाठी काहीतरी विचार करणे टाळणे समाविष्ट आहे. दडपशाही एक बेशुद्ध प्रक्रिया आहे - एखाद्या व्यक्तीला हे माहित नाही की ते हे करीत आहेत. एखादी व्यक्ती बेशुद्धपणे वेदनादायक किंवा कठीण स्मृती दाबू शकते, परंतु स्मृती कायम आहे. मानसोपचारांचे एक उद्दीष्ट म्हणजे एखाद्या व्यक्तीस अधिक उपयुक्त मार्गाने सामोरे जाण्यासाठी दडपशाही विचार व्यक्त करण्यास प्रोत्साहित करणे.

दडपशाही विशिष्ट फोबियांच्या मुळाचे स्पष्टीकरण करण्यास मदत करू शकते. उदाहरणार्थ, काही स्पष्टीकरण नसलेले फोबियस बालपणात आघात झालेल्या अनुभवांमुळे उद्भवू शकतात. दडपशाही ही एक सचेत प्रक्रिया आहे, यात जाणीवपूर्वक काही विचार किंवा आठवणी टाळणे आणि त्यांना विसरण्याचा प्रयत्नपूर्वक प्रयत्न करणे समाविष्ट आहे.

विस्थापन (Displacement)विस्थापनात एखाद्या व्यक्तीस असे वाटते की ते एखाद्या विशिष्ट व्यक्तीबद्दल नकारात्मक भावना व्यक्त करू शकत नाहीत, म्हणून त्या त्या नकारात्मक भावना दुसऱ्याकडे वळवतात. उदाहरणार्थ, ज्याला आपला बॉस अन्यायकारक आहे असे वाटेल त्यांनी तक्रार केल्यास किंवा राग व्यक्त केल्यास त्यांना नोकरीवरून काढून टाकण्याची भीती वाटू शकते - आणि परिणामी, ते नंतर कुटुंबातील सदस्यावर ओरडतील. विस्थापनामुळे एखाद्या व्यक्तीसाठी आणि त्याच्या सभोवतालच्या लोकांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

प्रक्षेपण (Projection) उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती ज्याला हे समजले की तो युक्तिवादादरम्यान आक्रमक होत आहेत तर तो दुसऱ्या व्यक्तीवर आक्रमक असल्याचा आरोप करू शकतो. तो ही टीका स्वतःपासून दूर आणि दुसऱ्या व्यक्तीकडे वळवतो. प्रोजेक्शन ही एक संरक्षण यंत्रणा आहे ज्यामध्ये आपले स्वतःचे न स्वीकारलेले गुण किंवा भावना घेणे आणि त्यांना इतर लोकांवर आरोपित करणे समाविष्ट आहे. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीसाठी आपल्याला फार नापसंती असल्यास, आपण असे म्हणू शकतो की त्याला किंवा तिला आपण आवडत नाही. प्रोजेक्शन हानिकारक असू शकते, कारण एखाद्याने स्वत: चे विचार किंवा वागणूक स्वीकारण्याची आणि जबाबदारी घेण्यास थांबवलेले असते. प्रक्षेपणाचा सर्वोत्तम प्रतिबंध म्हणजे स्वत: ची टीका. आणि जेव्हा तुम्ही इतरांवर टीका करण्यास सुरुवात करता किंवा त्यांच्यावर एखाद्या गोष्टीचा आरोप करता तेव्हा विचार करा की तुमच्यात हा गुण नाही ना "आधी तुमच्या डोळ्यातील मुसळ काढून टाका आणि मग इतरांच्या डोळ्यातील कुसळ कसे काढायचे ते पहा."

उदात्तता (sublimation)सिगमंड फ्रायडचा असा विश्वास होता की sublimation नावाच्या सर्जनशीलता एक महत्त्वाचा स्त्रोत म्हणून काम करतात. एखादी गोष्ट मिळाली नाही तर निराश न होता ती उर्जा सकारात्मक कार्याकडे वळवणे म्हणजे उदात्तीकरण करणे होय. भाषण करणे जमत नसेल तर, अभ्यासात गती प्राप्त केली जाते. किंवा क्रीडा म्हणून उच्च पातळीवर आक्रमकता दाखविणारे लोक **बॉक्सिंग, कराटे** जिथे इतर व्यक्तीला मारणे हे मुख्य उद्दीष्ट आहे, असे खेळ खेळतात.

तार्किक स्पष्टीकरण (Logical explanation)

तर्कशुद्धीकरणाचे सर्वात सोपे उदाहरण म्हणजे अपयश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याचे स्पष्टीकरण. शेवटी, प्रत्येकाला हे कबूल करणे इतके आक्षेपार्ह आहे की ही माझी स्वतःची चूक आहे. अभिमानाला असा धक्का बसण्यास प्रत्येकजण सक्षम नाही. आणि तुमच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या इतर लोकांकडून होणारी टीका वेदनादायक आहे. म्हणून शाळेतील मुलगा स्वतःला न्याय देतो, "प्रामाणिक" स्पष्टीकरणांसह येतो: "हा शिक्षक वाईट मूडमध्ये होता, म्हणून त्याने मला काहीही न करता मार दिला" किंवा "मी वडिलांचा आवडता नाही, म्हणून ते माझ्याशी वाईट वागतात." तो खूप सुंदरपणे समजावून सांगतो, सगळ्यांना पटवून देतो आणि तो स्वतः या सगळ्यावर विश्वास ठेवतो.

बौद्धिकीकरण (Rationalization)बौद्धिकीकरण हा मनोवैज्ञानिक संरक्षणाचा एक प्रकार आहे ज्यामध्ये एखादी व्यक्ती, प्रदीर्घ सिद्धांतांच्या सहाय्याने, त्याच्या जीवनातील अपयश प्रचलित परिस्थितीनुसार स्पष्ट करण्याचा प्रयत्न करते, वैयक्तिक अपयशाने नाही. संरक्षणाचा हा प्रकार आपल्या जीवनात अतिशय सामान्य आहे. शाळेतील अपयशाचे श्रेय विद्यार्थी शिक्षकांच्या पक्षपाताला देतात. प्रौढ लोक त्यांच्या जीवनातील अपयशाचे वर्णन करतात की ते दुर्दैवी होते (मुले, पती, पत्नी, बॉस, अधीनस्थ, सामाजिक, हवामान परिस्थिती इ.). "अशा परिस्थितीत तुम्ही काहीही कसे साध्य करू शकता?" कधीकधी एखादी व्यक्ती, बौद्धिकतेच्या मदतीने, इतर लोकांना त्याच्या बाजूने आकर्षित करते, काही काळ सहानुभूती जागृत करते आणि स्वतःला न बदलता महत्त्वपूर्ण मदत मिळवते. परंतु काही काळानंतर हे स्पष्ट होते की अपयश बाह्य परिस्थितीशी संबंधित नसून त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या संरचनेशी संबंधित आहेत. तो स्वत: ला बदलू इच्छित नाही आणि त्याला त्याच्या कमतरतेची जाणीव नाही.

कल्पनाजाल (Fantasy)

कल्पनाजालास काही व्यावहारिक उपयुक्तता नसली, तरी व्यक्तीच्या वैफल्यभावनेला अशा प्रकारच्या विचारक्रियेद्वारे (कल्पनाजालाद्वारे) वाट करून दिली जाते. म्हणजे व्यक्ती काल्पनिक रीतीने आपली इच्छापूर्ती करून घेते आणि वैफल्याचे दडपण हलके करते तसेच बाह्य जगातील सामाजिक,नैतिक इ.नियम किंवा बंधने बाजूस सारून ती व्यक्ती स्वतःस हव्या तशा सोयीच्या घटनांची वा प्रसंगांची आपल्या कल्पनाविश्वात निर्मिती करून समाधान मिळवीत असते. कल्पनाजाल हे काही अंशी स्वप्न पाहण्याचाच एक प्रकार होय. वास्तवतेत अशक्य अशा काही आकांक्षांची कल्पनेत अनुभूती घेणे काही विकारांत दिसून येते.

प्रतिक्रिया निर्मिती (Reaction formation)

हे अशी प्रक्रिया म्हणून परिभाषित केले जाते ज्याद्वारे अस्वीकार्य इच्छा किंवा इच्छा विरुद्ध प्रवृत्तीच्या अतिशयोक्तीद्वारे नियंत्रित केली जाते. उदाहरणार्थ, एका पालकासाठी मुलाचे अतिशयोक्तीपूर्ण प्रेम हे त्याच्याबद्दलच्या द्वेषाच्या सामाजिकदृष्ट्या अस्वीकार्य भावनेचे परिवर्तन असू शकते. दया किंवा काळजी हे क्रूरता किंवा भावनिक उदासीनतेच्या संबंधात प्रतिक्रियाशील स्वरूप म्हणून पाहिले जाऊ शकते.

उदाहरणः नातेसंबंधासाठी आपण काहीतरी वाईट केले आहे हे आपल्या जोडीदारास सांगण्याऐवजी वस्तुस्थितीचा सामना करु नये म्हणून आपण त्यांना आश्चर्यांसाठी भेटवस्तू देणे.

निष्कर्ष :-बचाव यंत्रणा एखाद्या व्यक्तीला असुविधाजनक किंवा आघातजन्य परिस्थिती किंवा भावनांचा सामना करण्यास मदत करण्याचा मानसिक मार्ग आहे. तथापि, काही लोक असुरक्षित भावना किंवा वर्तन करण्याच्या आरोग्यासाठी अनुकूल नमुने टाळण्यासाठी नियमितपणे संरक्षण यंत्रणेचा वापर करतात. डिफेन्स यंत्रणेत औदासिन्य आणि चिंता हे सामान्य वैशिष्ट्य आहे. बहुतेकदा, या परिस्थितीसह लोक आघात किंवा चिंतेचा सामना करण्यासाठी संरक्षण यंत्रणेवर अवलंबून असतात. या यंत्रणा अल्पावधीत अस्वस्थता रोखण्यासाठी किंवा मर्यादित ठेवण्यास मदत करू शकतात, परंतु ते दीर्घकालीन उपाय नाहीत.

संदर्भः-

1. Myers, D.G. (2013). Psychology. 10th edition: International edition, New York; Worth Palgrave Macmillan, Indian reprint 2013.
2. मानसशास्त्र, (२०१४), अभ्यंकर व गोलविकर, Pearson Education India publisher.
3. https://www.loksatta.com/kutumbkatta/mental-health-literacy-need-for-assessing-mental-health-literacy-zws-70-2070532/

जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता

प्रा.के.एम.लोखंडे

विभागप्रमुख, मराठी विभाग, एच.पी.टी.आर्ट्स & आर.वाय.के.कॉमर्स कॉलेज, नाशिक

ई. मेल –kautiklokhande@gmail.com

प्रास्ताविक: विचारशीलता ही प्रत्येक मानवाच्या अंगी असलेली एक मूलभूत शक्ती आहे. त्या आधारेच तो आपल्या एकूणच जीवनाला आणि जगण्याला आकार देतो. विचारांच्या प्रक्रियेतूनच मानवाला नवे आकलन होते. संवाद आणि सौंदर्याचा उदय हे देखील विचारातूनच होतो. मानवाच्या दैनंदिन जीवनव्यवहारामध्ये निर्माण होणारे प्रश्न, त्या प्रश्नांच्या निराकरणाच्या अनुरोधाने झालेल्या चिंतन - मनन आणि संशोधनातून विचारप्रक्रियेला आकार प्राप्त होतो. तो जेव्हा सूत्र रूप धारण करतो तेव्हा त्याचे तत्वज्ञान निर्माण होते. या तत्त्वज्ञानाच्या प्रत्यक्ष अवलंबनातून समाज व्यवहारांमध्ये बदल होतो. समाज व्यवहारामध्ये होणारा हा बदल म्हणजे त्याच्या वर्तन व्यवहारातील बदल असतो. वैचारिक प्रक्रियेतूनच जीवनदृष्टी अधोरेखित होते. फुले - आंबेडकर - लोकहितवादी यासारख्या विवेकनिष्ठ बुद्धीप्रामाण्यवादी समृद्ध परंपरेने भारतीय समाजाला नवे आयाम प्राप्त करून दिले. परंतु आधुनिक युगातील प्रस्थापित वर्ग निसर्गसंपदेवर देखील शासनवर्गाच्या मदतीने मालकी मिळवून उत्पादित मालासाठी संपूर्ण समाजाला ग्राहक बनवित आहे. त्यामुळे निसर्ग आणि मानवी जीवन व्यवहार यामध्ये असमतोल निर्माण होतो आहे. पूर्वीभांडवलदार वर्ग केवळ उत्पादन प्रक्रिया केंद्र अर्थात कारखाना यावरतीच आपली मालकी सांगत होते आणि उत्पादित माल व नफा यावरतीच त्यांचे लक्ष केंद्रित असायचे. आता मात्र केवळ कारखानाच नव्हे तर निव्वळ नफा एवढेच नाही तर उत्पादनासाठी ज्या जमिनीतून या कारखान्यांना कच्चामाल मिळतो त्याच जमिनीवर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या निसर्ग संपदेवरचतो आता मालकी प्रस्थापित करू पाहतो आहे. परिणामी ज्यांनी निसर्गाला आपले जीवन मानले एवढेच नव्हे तर त्याच्या शिवाय जगणे अशक्य आहे असा समाज देखील आता निसर्गाला बाधा पोहचवतो आहे. त्यामुळे ज्या निसर्गाने या मानवी समाजाला जगण्याचे संपन्न भान दिले तो मानवी समाज ज्याने अत्यंत मायेने या निसर्गाचे भरन पोषण केले, त्याच्याकडूनच हे सारे वैभव हिरावून घेतले जात आहे. परिणामी ज्यांना केवळ निसर्गाला ओरबडून खायचे आहे तो त्याचा मालक होता व आहे. निसर्ग आणि माणूस यांच्या नात्यातले पारंपरिक ऋणानुबंध हळूहळू तुटत आहेत. या नैसर्गिक साधन संपत्तीवर ताबा मिळवून जो असमतोल आज निर्माण करण्यात येत आहे, त्यातून केवळ मानव प्राण्यांचे नव्हे तर सबंध पृथ्वीच्याच गळयाला नख लावण्याची स्पर्धा जागतिकीकरणाने सुरू केली आहे. परिणामी निसर्ग अधू झाला, त्यासोबतच माणूस पांगळा झाला आणि त्याच्या संस्काराचे सगळे घटक हळूहळू प्रभावहीन होत आहेत. त्याची अघोरी लालसा मात्र दिवसेंदिवस वृद्धिंगत होताना दिसते आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय 'जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कविता' असा आहे. त्यामुळे सर्वप्रथम जागतिकीकरणाची संकल्पना, स्वरूप स्पष्ट करणे क्रमप्राप्त ठरते. त्यानंतर जागतिकीकरणाच्या प्रभावाने प्रभावित झालेली ग्रामीण कविता आणि तिचे स्वरूप विवेचन करणे गरजेचे वाटते.

जागतिकीकरण संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती:

साधारणतः १९९०नंतरच्या काळात पारंपरिकतेची चौकट नाकारून मानवी जीवन झपाट्याने बदलायला प्रारंभ झाला. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय समाज व्यवस्थेने जागतिकीकरण या नव्या व्यवस्थेचा स्वीकार केला. जागतिकीकरण या संकल्पनेच्या संदर्भात १९९१पासून आजतागायत वेगवेगळया माध्यमांप्रमाणे असंख्य लेखकांच्या ग्रंथातून विचारमंथन झाले आहे. थोडक्यात जागतिकीकरण या संकल्पनेने मानवाच्या मनोभूमिका, त्याचे वर्तन, त्याचे विचार याबरोबरच त्यांची जीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलून टाकली आहे. एकूणच मानवी जीवनव्यवहार बाधित करणारी संकल्पना नेमकी कशी आहे हे वेगवेगळया व्याख्यानाच्या आधारे जाणून घेणे सयुक्तिक वाटते

१) शि.पं. खेर :

"जागतिकीकरण म्हणजे व्यापार, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशासर्व क्षेत्रांतून होत राहणारे रूपांतर होय."[१]

२) उत्तम कांबळे:

"वैश्वीकरण म्हणजे दुसरं तिसरं काही नाही तर समाजातल्या बहुसंख्य वर्गाची दमछाक करण्यासाठी मांडलेला एक नवा खेळ, एक नवे षड्यंत्र आहे."[२]

३) रावसाहेब कसबे :

"ज्या साम्यवादी जागतिकीकरणाचे नेतृत्व सोव्हिएत संघ करीत होता. त्याचेच विघटन झाल्यामुळे ते जागतिकीकरण पोरके बनले. त्याचा आवाज क्षीण होत गेला आणि त्याचवेळी अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवली जागतिकीकरणाचा अभूतपूर्व असे बळ प्राप्त झाले. त्याचवेळी जगाने एका नव्या अवस्थेत प्रवेश केला ती अवस्था म्हणजे आजचे जागतिकीकरण होय."३

४) रंगनाथ पठारे :

"जागतिकीकरण म्हणजे जगातल्या वेगवेगळ्या मानवी संस्कृतींनी एकमेकींशी संवाद करणं, त्यांनी एकमेकींना भेटणं, त्यांच्यात काही व्यवहार - व्यापार होण."४

५) वीरेंद्र सिंह यादव :

"यहा एल. से तात्पर्य लिबलराइजेशन पि. से तात्पर्य प्राईविटायजेशन जी. से तात्पर्य ग्लोबलायझेशन है।"५उपरोक्त सर्वच विचारवंतांनी केलेल्या जागतिकीकरणाविषयीच्या व्याख्या विचारात घेता सर्वांनी वेगवेगळ्या अंगांनी जागतिकीकरणाची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी शि. पं. खेर आणि रावसाहेब कसबे यांची भूमिका समान वाटते. कारण, त्यांनी जागतिक पातळीवरती होणारा वेगवेगळ्या पातळीवरील व्यवहार ही बाब केंद्रवर्ती मानली आहे तर, रंगनाथ पठारे यांनी जगाच्या पातळीवरील लोकांनी एकत्र येऊन एकमेकांशी सलोखा प्रस्थापित करणे म्हणजे जागतिकीकरण असे संबोधले आहे. उत्तम कांबळे यांना जागतिकीकरण म्हणजे मानवाची दमछाक करण्याकरता रचलेले षड्यंत्र वाटते तर हिंदीतील एक खास लेखक वीरेंद्र सिंह यादव यांनी एल.पी.जी. ही संकल्पना स्पष्ट करताना फॅशन प्रायवेटायजेशन आणि ग्लोबलायजेशन म्हणजे उदारीकरण, खाजगीकरण आणि व्यापारीकरण अशा स्वरूपाचा विचार केला आहे. एकूणच काय तर जागतिकीकरण म्हणजे मुक्त अर्थव्यवस्था होय. म्हणजेच जागतिक समुदायाने एकत्र येऊन अर्थव्यवस्था भक्कम करण्यासाठी सामाजिक सलोखा प्रस्थापित करणे होय. थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगभरातील मानवी समूहांना नियंत्रित केले आहे. अर्थकारणाच्या माध्यमातून गतिमान झालेल्या या प्रक्रियेत मानवाच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनातही नफा - तोट्याचे निकष लावले आहेत. त्यामुळेच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून दाखवण्यात आलेल्या समृद्धीची स्वप्न आणि प्रत्यक्षात सामान्य ग्रामीण शेतकऱ्याच्या वाट्याला आलेले भीषण वास्तव यातील विषमता नाकारणे शक्य नाही. जगाच्या पातळीवरील केवळ हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या लोकांची चंगळ आणि शेतकऱ्यांची होरपळ की सर्वसामान्य समाजाची फरपट हाच जागतिकीकरणाचा साधा सरळ अर्थ दिसून येतो. माणसांच्या भावविश्वाचे झालेले बाजारीकरण, संस्कृतीला देण्यात आलेली बाजारू मूल्यव्यवस्था, मूल्य आत्मकथा इत्यादी परिणाम ठळकपणे सांगता येतील. देशादेशातील भौगोलिक सीमारेषा पुसट होऊन सर्वत्र कंपन्यांचे जाळे प्रस्थापित झाले आहे. सरकारी क्षेत्राचे अवमूल्यन होऊन सामाजिक व्यवहार खाजगीकरणावर खाजगीकरणाचे नियंत्रण आले आहे. एकूणच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाल्यापासून जगभरातील अनेक देशांची स्वायत्तता आणि स्वयंपूर्णता संपुष्टात येऊ लागली आहे. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होत आहे.ठीकठिकाणी विस्थापन, बेरोजगारी, दहशतवाद, युद्ध, मारामारी, संघटित गुन्हेगारी, पांढरपेशी गुन्हेगारी, यादवी, मादक पदार्थांचा व्यापार, खंडणीराज आणि गुन्हेगारी राजकारण यासारख्या बाबींना प्रचंड प्रमाणात ऊत आल्याचे दिसते मानवाच्या शेतीवर आधारित नैसर्गिक जगण्याचा भांडवली उत्पादनासाठी विपर्यास करण्यात आला आहे. हा विपर्यास वाढीला लागण्यामागे प्रसारमाध्यमे, त्यातील जाहिरातबाजी आणि चंगळवादी मूल्यांचा सुळसुळाट इत्यादी कारणे जबाबदार ठरली आहेत. काळ आणि अवकाश संपुष्टात येऊन मानवासमोर प्रचंड प्रमाणात गुंतागुंतीचे वास्तव आले आहे. इकडे आधीच प्रचंड अज्ञान दारिद्र्य आणि बेरोजगारी आदी प्रश्नांच्या माध्यमातून भरडले जाणारे लोक आहेत तर दुसरीकडे श्रीमंतीच्या दूरूपयोगाचे उन्माद आलेले जग आहे. जंगल, जमीन, पाणी यासारखे निसर्ग घटक आणि मानवी अवयव यांना उत्पादन मूल्य याचे निकष लावण्यात येत आहेत. या सर्वातून ग्रामीण भागात राहणार्याी अशिक्षित शेतकरी

समूहाचे जीवन अधिकच बिकट बनले आहे. उद्योग व्यापार आणि सेवा क्षेत्रांचे लागणारे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात विकसित होऊ लागले आहेत. या प्रक्रियेच्या माध्यमातून कार्यरत माणसांना अमाप पगार, सोयीसुविधा पुरवल्या जातात यातूनच जागतिकीकरणाचे समर्थन करणारे मूठभर लोक तयार झाले. परंतु जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने अशिक्षित व पारंपरिक शेती करणारा शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर बळी पडला आहे. जागतिकीकरणामुळे समाजमन ढवळून निघत आहे. हेच बदलते समाजमन मराठी ग्रामीण कवितेतही उमटले आहे. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली चंगळवादी संस्कृती, त्यामुळे आधुनिक व्यक्तीची शेतकरी जीवनाकडे पाहण्याची बदललेली दृष्टी याचे चित्रण अनेक कवींच्या कवितेतून व्यक्त झाले आहे. जागतिकीकरणामुळे शेतकरी जीवनात झालेली प्रचंड उलथापालथ आणि या नव्या बदलातून आकाराला आलेले त्याचे व्यक्तिमत्त्व या बदललेल्या व्यक्तिमत्वाकडे पाहण्याची बदललेली दृष्टी अनेक कवींच्या कवितेतून व्यक्त झाले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये नारायण सुमंत, एकनाथ पाटील, श्रीकांत देशमुख, फ. म. शहाजिंदे इत्यादी कवींच्या कवितेतील जागतिकीकरणाच्या संदर्भातीलशेतकरी जीवनाचा वेध घेतला आहे.

जागतिकीकरणातील ग्रामीण कविता:

१) नारायण सुमंत:

नारायण सुमंत 'रानभैरवी' ची गीते गात - गात वृक्षांची व्यथा नव्या दमाने नव्या अर्थाने मांडताना 'वृक्षवेध' जन्माला घालतात. तरीही इथला निसर्ग आणि शेतकरी तसाच राहिला. त्याचा सातबारा मात्र नेहमीच बोजाखाली राहिला असल्याने हे वास्तव रेखाटण्यापर्यंतचा प्रवास अधिकच अर्थपूर्ण आहे. नारायण सुमंत हे स्वतः शेतकरी असल्याने शेतकरी जीवन अभिव्यक्त करणारी त्यांची कविता कसदार झाली आहे. पारंपरिक शेतीऐवजी आधुनिक यंत्र –तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने रानात पेरलेले याबरोबरच दारिद्र्यात खितपत पडलेल्या शेतक-यांचे पीक त्याच्या हाती लागेल याची शाश्वती नाही. असंख्य संकटांचा सामना करत पीक त्याच्या हाती लागते याचे चित्रण 'भरवसा' या
कवितेत कवी पुढील प्रमाणे करतो,

"बोल्या बोल्यानं टिपणं घेतली,
ओलती शिवार पेरून काढली
तवर डोईवर सफेदी आली
पर वलेत्यातली पेर
फुलात न्हाय आली,
आताशा सांच्यापारी यीळ जात न्हाई
तवा मी पोरास्नी सांगतू काई
पेरल्यालं उगवलंच....भरवसा न्हाई"[६]

भारतीय समाज जीवन हे अगदी पूर्वीपासून पारंपरिक जीवन व्यवहारातही शेतीवरती अवलंबून असल्याने शेती व्यवसाय हा देखील परंपरेने वडिलांकडून मुलाकडे चालत येतो.वर्तमान नवी पिढी शेती करताना दिसते परंतु त्यामध्ये आधुनिकतेचा अभाव असल्याने निसर्ग साथ देत नाही. अशावेळी तो निराश होतो. परंतु जिद्द सोडत नाही आधी महत्व आणि जीवनाचे सौंदर्य खुलून आयुष्य वाढवू पाहणारे भावविश्व शेतक-यांच्या वाट्याला क्वचितच येते. याचे भान सुमंताना नसल्याने त्यांची कविता पारंपरिकतेचे रूप घेऊन अवतरते. त्यामुळे त्यांची कविता व्यक्त होताना दुष्काळाचे अभावग्रस्त वास्तव दर्शन घडवते.

२) एकनाथ पाटील :

एकनाथ पाटील यांची कविता ग्रामीण आणि दलित या दोन्ही पातळयांवर सक्षम पणे लढणा-या आजच्या ग्रामीण तरुणाला केंद्रस्थानी ठेवून जन्माला आली आहे आजपर्यंत या कवितेमध्ये शेतीच्या आणि शेती संस्कृतीच्या सर्व शक्यता नोंदवताना दुष्काळ गावाची राजकारण संस्कृतीकरण यासारख्या बाबींचा अंतर्भाव केला आहे. शहर आणि गाव यांच्यातील संस्था सांस्कृतिक संघर्ष या कवितेच्या माध्यमातून समर्थपणे चित्रित होताना दिसते. विशेषतः कामधंद्याच्या निमित्ताने खेड्यातील जी पिढी शहरात आली त्या पिढीचे तुटलेपण पाटलांच्या कवितेत प्रकर्षाने

जाणवते हा कवी कधी तुकाराम बाबांच्या कोर्टात न्याय मार्गाने दिसतो तर कधी आपल्या समविचारानाही संदेश देऊ पाहते. संवादी शैलीमध्ये आपलेपणा, हक्क, आज्ञा, विनंती, कळवळा, आत्मियता असते. त्यामुळेनिवेदनाला एक प्रकारचा आत्मविश्वास येतो.

उदा:

सखी मी पुढे निघालो मगाच्याच गतीने अंधारात पावले टाकीत
पुढच्या वळणावर थांबे थोडा वेळ तुझी वाट पहात.
तुझा निर्णय झाल्यावर मग तू माझ्या मागून ये
विश्वासाचा प्रकाश घेऊन
त्यानंतर उद्याची पहाट शोधायला जाता येईल."

या कवितेच्या माध्यमातून आपल्या नंतर येणाऱ्या पिढीला कवी कानमंत्र देतो. तो म्हणतो, की मी पारंपरिक जीवन जगलो आहे. त्यातून काही प्रगती साधता आली नाही. माझ्या मागून ज्यावेळी तुम्ही याल त्यावेळी तुम्ही परिस्थितीचा नीट अभ्यास करून कानोसा घेऊन मगच या. अशा प्रकारचा कानमंत्र देतो. एवढेच नाही तर येताना नवे तंत्रज्ञान, या बरोबरच त्याद्वारे मिळणारा आत्मविश्वास घेऊन या. असे तो म्हणतो कारण, त्याद्वारे पुढच्या पिढ्या घडणार आहेत. हा सूचक आशय उपरोक्त काव्यपंक्ती मोठ्या समर्थपणे सांगतात.

३) श्रीकांत देशमुख :

पारंपरिकतेच्या प्रभावातूनही श्रीकांत देशमुख यांची कविता वेगळेपण घेऊन अवतरते. कवी परंपरा आणि आधुनिकता यांचा सुरेख मेळ घालत 'आषाढमाती' या संग्रहातील पहिल्या ३५कविता परंपरेचा अन्वयार्थ लावतच येतात. परंपरा आणि आधुनिकता यांचा संघर्ष सनातन असतो. हा संघर्ष जसा आशयाच्या म्हणजे जीवन जाणिवांच्या बाबतीत असतो. तसा अभिव्यक्तीच्या बाबतीतही असतो. हा कवी आधुनिकतेची मांडणी करताना उपरोधिक शैलीचा वापर करतो. त्यांची एक कविता अशी,

"उबगला जीव तरी वाऱ्याशी झुंजतो आहे
गाभाऱ्यात अभंग आला देवाशी भांडतो आहे."

थोडक्यात एका बाजूला निसर्गाचा कोप आहे. त्याचे खापर वर्तमान शेतकरी देवावर फोडतो आहे. तरीही जीव उबगला म्हणून तो हार मानत नाही. त्याला माहित आहे, एवढेच नाही तर आजवरचा अनुभव आणि त्याचे अनुमान त्याने बरोबर काढले आहे. की प्रत्येक समस्येवर उपाय असतो त्यामुळे तो निसर्गाच्या अवकृपेने भरती आधुनिक साधनांच्या साथीने झुलतो आहे. त्यासाठी तो देवाशी म्हणजेच आपल्या कर्माची दोन हात करतो आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहाच्या दृष्टीने ही भावना याठिकाणी मला अतिशय महत्त्वाची वाटते.

४) फ. म. शहाजिंदे :

फ. म. शहाजिंदे यांचा 'शेतकरी' हा दीर्घ कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. आधुनिक युगातील शेतकऱ्यांची भावना प्रकट करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचा काव्यसंग्रह महत्त्वपूर्ण ठरतो. कवी स्वतः शेतकरी आहे. त्यांनी शेतकरी जीवनानुभव प्रत्यक्षात अनुभवले आहे. वारंवार येणारा दुष्काळ हे सावलीसारखे शेतकऱ्यांच्या मागेपुढे फिरत असतात. दुष्काळामुळे शेतकरी खचला जात आहे. शेती करावी की नको? अशी त्याची अवस्था झाली आहे. त्यातच शेतकऱ्याच्या कष्टावर दलाल श्रीमंत होत आहेत. एकूणच शेतकऱ्याचा समाज व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. अशी त्याची भावना झाली आहे. या सर्वांकडून आपली दिशाभूल होते आहे ही भावना कवीची होते आहे. त्याच्या अंतर्मनाला सातत्याने सतावणारी हीच भावना तो पुढील कवितेच्या माध्यमातून प्रकट करतो,

"अरे, आज काय हाय?
कानून कसा हाय
सरकार लुच्छा हाय
चोर सच्चा हाय
वकील बगलबच्चा हाय."[७]

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण भागात राहणारे लोक किमान अपेक्षा बाळगून होते की, आता स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे आपल्याला सुखाचे दिवस येतील. आपल्या श्रमाला प्रतिष्ठा मिळेल. शेतातल्या मालाला योग्य भाव मिळेल. दारिद्र्य जाईल, ग्रामीण जीवन समृद्ध होईल. परंतु या अपेक्षा फोल ठरल्या. जागतिकीकरणाच्या येण्याने केवळ विशिष्ट वर्गच आपली प्रगती साधतो आहे. शेतकऱ्याने मोठ्या कष्टाने मिळवलेल्या धान्यावर आधुनिक

साधनांच्या जोरावर प्रक्रिया करून दलाल अमाप पैसा मिळवतो आहे. शेतीमध्ये काबाडकष्ट करणारा सर्वसामान्य शेतकरी मात्र आधुनिक जगापासून अलिप्त राहतो आहे. कारण, नव्या जगाशीजमऊन घेईपर्यंत वेळ निघून गेलेली असते. शिवाय आर्थिक बाजूदेखील सध्याच्या जागतिकीकरणामध्ये खूप महत्वाची असते की,जी शेतकऱ्याकडे अजून तरी पुरेशा प्रमाणात नाही. हीच भावना उपरोक्त सर्वच कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त केली आहे.

समारोप:

मानवाच्या दैनंदिन जीवनामध्ये जे असंख्य स्वरूपाचे प्रश्न निर्माण होतात त्यातूनच विचारप्रक्रियेला आकार प्राप्त होतो. ज्याने निसर्गाला आपले मानले, एवढेच नव्हे तर त्याच्याशिवाय जगणे अशक्य आहे असा समाज आणि ज्या निसर्गाने मानवी समाजाला जगण्याचे भान दिले तो मानवी समाज जो निसर्गावर प्रचंड प्रेम करतो. त्याच्याकडून हे सारे वैभव हिरावून घेतले जात आहे. निसर्ग आणि शेतकरी यांच्यातील पारंपरिक ऋणानुबंध हळूहळू तुटत आहेत. याच भावनेचे प्रतिबिंब उपरोक्त सर्वच कवितेतून पाहावयास मिळतात. थोडक्यात जागतिकीकरणामुळे ग्रामीण जीवन ढवळून निघाले आहे. त्याचे स्पष्ट प्रतिबिंब ग्रामीण कवितेत काही प्रमाणात घडताना दिसते. नारायण सुमंत, एकनाथ पाटील, श्रीकांत देशमुख आणि फ. म. शहाजिंदे यांची ग्रामीण कविता जागतिकीकरण आणि त्याचे हे रूप रौद्र अवताराच्या स्वरूपात प्रकट करते. परंतु तरीही परिस्थितीचा सोस् न बाळगता पारंपरिकतेतही तसेच गरिबीतही आपली जीवन जाणीव नव्या जोमाने प्रस्फुटित करतात हीच भावना उपरोक्त कवींच्या कवितेतून अभिव्यक्त होते.

संदर्भ:

१) खेर सी. पं., :' जागतिकीकरण समस्या, आशय आणि अनुभव', दिलीपराज प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती २००८, पृ – १०

२) उत्तम कांबळे, : 'जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमवृत्ती,२००२, पृ-९.

३) कसबे रावसाहेब: 'जागतिकीकरण स्वरूप आणि भवितव्य', सुमेध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ-२०

४) पठारे रंगनाथ, :'जागतिकीकरण आणि देशीवाद', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई,चौथी आवृत्ती, २००६, पृ-२.

५) यादव वीरेंद्र सिंह: 'दलित साहित्य', साहित्य अकादमी, दिल्ली, प्रथम संस्करण,२००७, (संपा)पृष्ठ – १६६.

६) शहाजिंदे फ. म.: 'शेतकरी', आंतरभारती प्रकाशन, औरद, शहाजाती, लातूर, पृ - २८

रशिया - युक्रेन युद्ध : जागतिक तिसऱ्या महायुद्धाची चाहूल

प्रा. डॉ. भुजंग पाटील

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,ता. अहमदपूर, जि. लातूर.

सारांश: मानवाच्या मनातील साम्राज्य विस्ताराची महत्त्वाकांक्षा आदिम काळापासून पहावयास मिळते. पृथ्वीच्या आजवरच्या इतिहासात जे अनेक युद्ध झाले त्याच्या मुळाशी कोणती ना कोणती सुप्त आकांक्षा होतीच. एकीकडे गौतम बुद्धांनी पुनरुज्जीवित करून साहचर्य आणि शांती संदेश जगाला दिला. याशिवाय विविध धर्मातील असंख्य महानुभावांनी त्या त्या काळात वादा शिवाय सुसंवाद साधून जगण्याचा मूलमंत्र दिलेला, अशा शांततापूर्ण जगण्याचे संस्कार मानवावर असूनही जगात वेगवेगळ्या कालखंडात युद्ध झालेली आहेत. आजवर वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तीमुळे जितकी हानी झाली त्यापेक्षा अधिक अशा महा भयंकर युद्धामुळे झाली आहे हे विसरून चालणार नाही. आधुनिक जगाच्या इतिहासात 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात दोन जागतिक युद्ध घडलेली आहेत. ज्याचे दुष्परिणाम आजही मानवासह सबंध सजीव भोगत आहेत. याशिवाय जगभरात दोन देशांच्या सीमारेषेवर अधून मधून युद्ध घडत राहते. आज रशिया आणि युक्रेनच्या अंतर्गत दुहीतून तिसऱ्या जागतिक महायुद्धाची शक्यता निर्माण झाली आहे. मागील युधापेक्षा या युद्धाची तीव्रता आणि दुष्परिणाम महाभयंकर आणि दीर्घकालीन असतील. आज प्रत्येक देश अणुशास्त्र सज्ज आहेत. रशिया आणि युक्रेनही याला अपवाद नाहीत. रशिया तेल, गॅस, खनिज द्रव्यांनी समृध्द आहे. एकट्या अमेरिका देशाला लागणारे वरील 60% घटक रशियाकडून निर्यात होतात. यावरून रशिया आणि युक्रेनच्या नैसर्गिक साधन समृध्दतेची साक्ष पटते. कधी काळी सोव्हिएत संघाचा भाग असलेल्या युक्रेन मधून रशियाच्या वरील घटक निर्यात करणाऱ्या पाईप लाईन जातात. परिणामी युक्रेन कायम आपल्या ताब्यात रहावा ही रशियाची भावना जगजाहीर आहे. याउलट आपण एक स्वतंत्र राष्ट्र आहोत ही भावना उराशी बाळगून युक्रेन नाटो संघात सहभागी होऊ पाहतोय. या तात्कालिक कारणावरून रशिया आणि युक्रेनमध्ये वादाला तोंड फुटले. भारताने 'ऑपरेशन गंगा' राबवून भारतीय विद्यार्थी आणि नागरिकांना मायदेशी परत बोलावले. प्रस्तुत लेखात सदरील युद्ध किती उग्र रूप धारण करू शकते याबाबत संक्षेपाने विचार केला आहे.

प्रस्तावना -

24 फेब्रुवारी 2022 रोजी रशियाने युक्रेन वर हल्ला करून युद्धाला सुरुवात केली. मुळात रशिया हा बलाढ्य देश असून त्या तुलनेत युक्रेन सर्वच बाबतीत लहान आहे. नाटो देशाच्या सहकार्याची आशा असलेला युक्रेन युध्दात नमते घेण्यास तयार नाही. युद्ध असेच चालू राहिल्यास संपूर्ण जगाला याचे दुष्परिणाम भोगावे लागतील. गेल्या शतकात दोन महायुद्ध अनुभवल्यामुळे जग पुन्हा नव्याने त्याच खाईत जाईल का, हे पाहणे गरजेचे आहे. इथे रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध आणि तिसऱ्या महायुद्धाची शक्यता याबाबत संक्षेपाने विचार करू.

प्रमुख संज्ञा - जागतिक महायुद्ध, सोव्हिएत संघ, नाटो संघ, अणुबॉम्ब, साम्राज्यवादी महत्वाकांक्षा, जागतिक आर्थिक मंदी, ऑपरेशन गंगा, भारताची मुत्सद्दी भूमिका.

गृहितके -

1. रशिया आणि युक्रेन यांच्या युद्धाची कारणे समजून घेणे.
2. युरोपीय देशांना पेट्रोल, गॅस पुरविण्यासाठी रशियाला युक्रेनवर गरजेचे वाटते.
3. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाला लवकर पूर्ण विराम न मिळाल्यास जागतिक तिसऱ्या महायुद्धस सुरुवात होऊ शकते.

4. रशिया युक्रेन युद्धामुळे जागतिक अर्थ व्यवस्था अडचणीत आली आहे.
5. नाटो संघाचे सदस्य होण्यापासून रोखणे हे युद्धाचे कारण आहे.

उद्दिष्टे -

1. रशिया आणि युक्रेन यांच्या संबंधाचा संक्षिप्त आढावा घेणे.
2. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाचे भारतीय परराष्ट्र धोरणावर झालेले परिणाम समजून घेणे.
3. रशियाच्या साम्राज्यवादी धोरणावर जगातील इतर देशांची प्रतिक्रिया समजून घेणे.
4. महायुद्धाचे दीर्घकालीन परिणाम समजून घेणे.
5. रशिया व युक्रेन युद्धाचा जगावर झालेला परिणाम समजून घेणे.

विषयप्रवेश – 24 फेब्रुवारी 2022 रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला करून युद्धाला सुरुवात केली. भारतीय वेळेनुसार सकाळच्या सत्रात या युद्धाची ठिणगी पडली. वास्तवात युद्ध सुरू होण्याच्या खूप दिवस आधीपासून दोन्ही देशात वाक्युद्ध सुरुवात झाली होती. एकीकडे बलाढ्य रशिया आणि तितकाच क्रूर असलेला ब्लादिमिर पुतीन सारखा महत्त्वाकांक्षी शासक तर दुसऱ्या बाजूला आकाराने मूठभर असलेला युक्रेन आणि वोलोदीमिर झेलेंस्कीसारखा नवानुभवी शासक यांच्यातील संबंध ताणायला सुरुवात झाली होती. मुळात युक्रेन हा मूळ रधियाचाच भाग होता. तेथील भाषा, संस्कृती आणि बहुसंख्य लोकसंख्या ही रशियन असल्यामुळे जनमताचा कौल एका बाजूने नव्हता. युरोपीय देशांच्या दावणीला बांधण्यापेक्षा रशियन सत्तेची ताकद वाढावी यासाठी बहुतेक युक्रेनी नागरिक अनुकूल तर जगाच्या नकाशावर स्वतंत्र्य राष्ट्र म्हणून उभं राहण्याची मनीषा बाळगणारे ही तिथे असल्यामुळे अर्थातच हा तिढा काहीसा जटील होत गेला. जगातील मोठमोठ्या देशांशी व्यापारी संबंध असलेल्या देशाचे सहकार्य मिळेल असे अपेक्षित असल्याने युक्रेन नाटो संघाचा सदस्य होण्यासाठी धडपड करत राहिला यातूनच या युद्धाला सुरुवात झाली.

अ) रशिया - युक्रेन युद्धाला सुरुवात - 'गुरुवारी भारतीय वेळेनुसार सकाळी सव्वा आठ वाजता रशियाच्या विमानांनी युक्रेनमधील कीव, खारकीव यासह काही शहरांवर भीषण बॉम्ब व क्षेपणास्त्रांचे हल्ले केले.'[1] ही रशिया आणि युक्रेन यांच्यातील प्रत्यक्ष युद्धाची सुरुवात होती. कीव, खारकीव, चर्नेबिल सारखे असंख्य शहरे रशियन सैनिकांनी आपल्या ताब्यात घ्यायला सुरुवात केली. स्थावर तसेच जीवित हानी मोठयाप्रमाणात सुरू झाली. नाटो संघाचा सदस्य होण्यापासून युक्रेनला रोखणे ही रशियाची भूमिका होती. शिवाय रशिया आणि युक्रेन सीमावर्ती राष्ट्र असल्यामुळे हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे अशी भूमिका रशियाची असल्यामुळे इतर देशांनी यात पडू नये असे त्यांचे म्हणणे होते.

'रशिया-युक्रेनियन युद्ध हा एक चालू आणि प्रदीर्घ संघर्ष आहे जो फेब्रुवारी 2014 मध्ये सुरू झाला होता, ज्यामध्ये एकीकडे रशिया आणि रशिया-समर्थक सैन्यांचा समावेश होता आणि दुसरीकडे युक्रेन. युक्रेनचा भाग म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या क्रिमिया आणि डोनबासच्या काही भागांवर हे युद्ध केंद्रित आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील तणाव विशेषतः 2021 ते 2022 पर्यंत उफाळून आला, जेव्हा हे उघड झाले की रशिया युक्रेनवर लष्करी आक्रमण करण्याचा विचार करत आहे. फेब्रुवारी 2022 मध्ये, रशियासोबतची राजनैतिक चर्चा अयशस्वी झाल्यामुळे आणि 22 फेब्रुवारी 2022 रोजी रशियाने फुटीरतावादी नियंत्रित प्रदेशात सैन्य हलवल्यामुळे संकट अधिक गडद झाले. 24 फेब्रुवारी रोजी, रशियाने युक्रेनवर पूर्ण-प्रमाणावर आक्रमण सुरू केले.'[2] वरीलप्रमाणे रशिया आणि युक्रेन यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकता येईल. 1991 साली युक्रेनने रशियन सोव्हिएत संघातून स्वत:ला वेगळे करून आपण स्वतंत्र असल्याचे घोषित केले तेव्हा पासून रशिया आणि युक्रेन यांच्यातील संबंध ताणलेले आहेत. युक्रेन हा देश आकाराने लहान असला तरी युरोपियन देशांनी जवळ असलेला देश आहे.

ब) रशिया - युक्रेन युद्धाचे तात्कालिक कारण – मुळातच सतत कोणत्या ना कारणाने धुसफूस सुरू असलेल्या या दोन शेजारील देशात थेट युद्ध सुरू होण्याचे तात्कालिक कारण नाटो मध्ये सदस्य होण्याची युक्रेनची तीव्र इच्छा आणि त्याला रशियाने केलेला जोरदार विरोध हे आहे. 'रुस आणि युक्रेन यांच्या गेल्या अनेक वर्षांपासून तणाव आहे. युक्रेन

हा युरोपीयन संघाशी जवळीक असलेला देश आहे, हीच जवळीक रशियाला आवडत नाही. सन 1991 साली युक्रेनने सोवियत संघापासून स्वातंत्र्य मिळाल्याची घोषणा केली. त्यानंतर, युरोपीयन संघासोबत युक्रेनची जवळीक वाढली. युक्रेन हा अमेरिकन नेतृत्वातील सैन्य संघटना NATO चा सदस्य बनू इच्छित आहे. मात्र, रशियाला हे पसंत नाही. त्यामुळेच, अमेरिका आणि नाटोकडून रशियाला हा शब्द हवा आहे की, युक्रेनला नाटोचा सदस्य केले जाणार नाही. मात्र, अमेरिका आणि पाश्चात्य देश रशियाच्या मतावर सहमत नाहीत.'[3] वरीलप्रमाणे पाहू जाता रशियाने युक्रेनच्या सीमेवर सैन्य शक्ती वाढवून युद्धाची तयारी सुरूच केली होती. एकीकडे अमेरिकेने युक्रेनला नाटो संघाची सदस्यता देऊ नये असा प्रयत्न रशियाने केला तर दुसरीकडे युक्रेनने अमेरिका धार्जिण्या नाटोचे सदस्य होऊ नये यासाठी रशियाने सुरू केलेल्या चर्चा, बोलणी निष्फल ठरल्यामुळे रशियाने युद्धाचे पाऊल उचलले.

क) रशियाची आक्रमकवृत्ती - रशियाची आक्रमक वृत्ती जुनीच आहे. डॉ. सुधीर अग्रवाल यांनी म्हटल्याप्रमाणे, 'रशियाने 1949 च्या जिनिव्हा कराराचे उल्लंघन करून रशियाने युक्रेनवर युद्ध लादले आहे. अमेरिका व नाटो देश बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे युक्रेन एकाकी झुंज देत आहे.'[4] जगाचे नेतृत्व करू पाहणारी अमेरिका आज या युद्धात प्रत्यक्ष सहभाग घ्यायला धजावत नाही. वरकरणी मदत करत अमेरिका युद्धासाठी आवश्यक सर्व सामग्री युक्रेनला पुरवत असली तरी प्रत्यक्षात मात्र युद्धात उतरत नाही याची महत्त्वाची दोन करणे आहेत. एक अमेरिका आजवर गॅस, पेट्रोल सारख्या नैसर्गिक वायूसाठी रशियावर खूप जास्त अवलंबून आहे आणि दुसरे म्हणजे अमेरिका युक्रेनच्या बाजूने युद्धात उतरल्यास रशिया अमेरिकेवर अनुहल्ले करण्यास ही मागेपुढे पाहणार नाही ही भीती. पुतीन यांचा स्वभाव आणि मागील इतिहास पाहता ते काहीही करू शकतात, ही सत्यता नाकारता येत नाही. रशियाने सीरियावर केलेला हल्ला असो की चेचेन आतंकवादी यांचा केलेला बीमोड असो, युक्रेन समर्थक क्रिमिया, डोनबास यांच्यावरील हल्ले असो; या प्रत्येकवेळी वापरलेली युद्धनीती अत्यंत क्रूर म्हणता येईल अशीच होती. एकूण एक देश म्हणून रशिया जगाचे नेतृत्व करेल ही त्यांची महत्त्वाकांक्षा रशियाला स्वस्थ बसू देत नाही, हेच चित्र सद्या दिसत आहे. जगाने असंख्य निर्बंध घातलेले असले तरी रशिया मागे हटायला तयार नाही यावरूनही त्यांची आक्रमकता सहज अधोरेखित करता येते.

ड) रशिया - युक्रेन युद्ध आणि भारत - रशिया आणि युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताची नेमकी भूमिका अत्यंत सावध आणि तितकीच मुत्सद्दी आहे. एकीकडे भारतीय संरक्षण क्षेत्रास बळ देण्यासाठी विविध युद्ध सामग्री रशियाकडून भारतास वेळोवेळी प्राप्त झाली आहे. '1979 - 80 मध्ये रशियाने अफगाणिस्तानवर हल्ला केला तेव्हा तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी रशियाचे समर्थन केले होते.'[5] पुढे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनीही रशिया आणि युक्रेनच्या बाबतीत सावध भूमिका घेतली होती. अर्थात भारताची सावध प्रतिक्रिया हा भारतीय अलिप्ततावादी धोरणाचा भाग राहिला आहे. युक्रेनशी भारताचे संबंध शैक्षणिक बाबतीत चांगले आहेत. भारतातून हजारोच्या संख्येने विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी युक्रेनमध्ये दर वर्षी जातात. प्रस्तुत युद्धजण्य स्थितीत भारताने युक्रेनच्या बाजूने उभे राहावे असे युक्रेनला मनातून वाटत होते. परंतु भारताने हा प्रश्न दोन्ही देशांनी सामोपचाराने सोडवावा असे मत व्यक्त केल्यामुळे एकटे पडलेल्या युक्रेनच्या सैन्याने भारतीय विद्यार्थी आणि नागरिक यांचा काही प्रमाणात छळ केल्याचे समोर आले आहे. तरीही भारताची भूमिका मात्र सावध होती. केंद्रीय मंत्रीमंडळातील मुत्सद्दी नेत्यांना पाठवून हंगेरी, पोलंड, बेलारूस या शेजारील राष्ट्रांची मदत घेऊन भारताने 'ऑपरेशन गंगा' राबवून भारतीय विद्यार्थ्यांना मायदेशी परत आणून आपल्या मुत्सद्दीपणाची चुणूक दाखविली आहे. अर्थात काही भारतीय या युध्दात मरण पावल्याच्या घटनाही घडल्या आहेत, हे नाकारून चालत नाही.

इ) रशिया - युक्रेन युद्धाचे परिणाम - कोणत्याही देशातील आणि कोणत्याही स्वरूपाचे युद्ध हे कायम घातकच असते. दुसऱ्या महायुध्दात जपानची झालेली अपरिमित हानी आजही भरून निघाली नाही, इतके वाईट आणि दीर्घकालीन परिणाम युद्धाचे होतात. शिवाय त्यावेळी वापरलेली शस्त्रे आणि आजच्या शस्त्रांची संहारकता यात खूप फरक आहे.

1. रशिया - युक्रेन युद्धामुळे जागतिक तिसऱ्या महायुद्धाची स्थिती निर्माण झाली आहे.
2. आज जगातील बहुतेक मोठे देश अण्वस्त्रांनी परिपूर्ण असल्यामुळे अनुयुद्धाचा धोका निर्माण झाला आहे, ज्यामुळे होणारे नुकसान कदापि भरून काढणे शक्य होणार नाही.
3. प्रस्तुत युद्धामुळे रशियावर जागतिक स्तरावर निर्बंध घातल्यास पेट्रोल, डिझेल, गॅस सारख्या जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जगातील सर्वच देशांना भासू शकते.
4. जगाची अर्थव्यवस्था मोडकळीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही.
5. भारताच्या दृष्टीने शिक्षण आणि संरक्षण या दोन महत्त्वाच्या बाबतीत रशिया आणि युक्रेन यांच्याकडून मिळणारी मदत होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.
6. सदरील युद्धात अणुबॉम्ब वापरले गेल्यास आणि तिसऱ्या युद्धाचा भडका उडाल्यास एकूण 10 कोटी लोक मृत्यू पावणे, 2 अब्ज लोकांवर उपासमारीची वेळ येणे तसेच होणाऱ्या विषारी किरणोत्सारामुळे जग 18 हजार वर्ष मागे जाणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.[6]
7. याशिवाय पशू, पक्षी, प्राणी तसेच पर्यावरण याचे होणारे नुकसान मोजताही येणार नाही इतके असेल.
8. युद्धामुळे होणारे भौतिक नुकसान याची भरपाई कदापि शक्य होणार नाही.
9. नैसर्गिक संसाधनांची कमतरता जगाला संकटात घेऊन जाऊ शकते.
10. जगातील प्रत्येक देशाचे आर्थिक गणित यामुळे बिघडेल.

एकूण आदिम काळापासून मानवाने विविध संहारक युद्ध पहिली आहेत. युद्धामुळे जगाचे कधीच भले होत नाही याची खात्री जगातील प्रत्येक देशाला आहे. परिणामी रशिया आणि युक्रेन यांचा प्रश्न सामोपचाराने सुटणे अत्यंत आवश्यक आहे, हे इथे नमूद करता येईल. जगातील कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण हे शांततेच्या मार्गाने जाणे नक्कीच अखिल मानव जातीच्या कल्याणाचे असेल हे नाकारता येत नाही.

निष्कर्ष – गेल्या शतकात दोन जागतिक युद्ध झाल्याच्या आठवणी अजून ताज्या असताना नक्कीच तिसरे युद्ध होऊ नये ही आपली भूमिका असायला हवी. जगातील एकाधिक देशाचे असंख्य मूलभूत प्रश्न अजून सुटलेले नाहीत. गेल्या दोन वर्षापासून कोरोनाच्या विळख्यातून आपण सावरलेलो नसताना तिसऱ्या जागतिक महायुध्दात सामोरे जाणे कदापि परवडणारे नाही.

1. रशिया - युक्रेन युद्धामुळे रशियाची महत्वाकांक्षा तर युक्रेनची एकाकी झुंज जगाने अनुभवली आहे.
2. मुळात एक कलावंत असलेल्या युक्रेनच्या राष्ट्रपतींची प्रतिमा या युद्धामुळे अधिक प्रभावी नेतृत्व म्हणून पुढे आली आहे.
3. युद्धामुळे दोन्ही देशातील सामान्य जनजीवन अत्यंत विस्कळीत झाले आहे.
4. जागतिक अर्थकारणावर या युद्धामुळे फार दूरगामी परिणाम झाले आहेत.
5. येणाऱ्या पुढच्या पिढीला या युद्धाचे दीर्घकालीन दुष्परिणाम भोगावे लागतील.
6. या युद्धामुळे जगातील सर्वच देशांच्या परराष्ट्रीय धोरणावर परिणाम होणे स्वाभाविक आहे.
7. जागतिक महागाई, उपासमार, रोगराई, पर्यावरणाचा ऱ्हास, नैसर्गिक साधन सामग्रीचा तुटवडा अशा कितीतरी दीर्घकालीन समस्या निर्माण होतील.

एकूण जगाला युद्धाची नसून बुद्धाची गरज आहे, हे मान्य करावे लागते. युद्ध कोणत्याही स्वरूपात परवडणारी बाब नाही. अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी शांती आणि साहचर्य, एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर याच बाबी अधिक महत्त्वाच्या आहेत, प्रत्येकांनी विचारात घेणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची -

1. दैनिक लोकमत, लातूर आवृत्ती - 25 फेब्रुवारी 2022.
2. https://mr.m.wikipedia.org.in
3. https://www.lokmat.com
4. दैनिक लोकशाहीवार्ता, नागपूर आवृत्ती - 3 मार्च 2022.
5. दैनिक लोकशाहीवार्ता, नागपूर आवृत्ती - 6 मार्च 2022.
6. दैनिक लोकमत, लातूर आवृत्ती - 3 मार्च 2022.

कोविड – १९ आणि मानसिक आरोग्य व उपाय

डॉ. आंबटकर वृषाली ओंकार

श्री गुरुवृधी स्वामी, महाविद्यालय, पूर्णा

ई-मेल: voambatkar10@gmail.com

प्रस्तावना: मानवी जीवनात 'आरोग्य' ही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण संकल्पना आहे. व्यक्ती विकासात आरोग्याला अन्नयसाधरण असे महत्व आहे. व्यक्तिचे आरोग्य चांगले असेल तर व्यक्ती विकासात येणारे इतर कोणते ही अडथळे दुर करता येतात, राष्ट्रविकासात सदृढ व्यक्तीमत्वाला खुप महत्वाचे स्थान आहे. मग हे आरोग्य शारीरिक असो किंवा मानसिक आरोग्य असो. शारीरिक आरोग्यासाठी ज्याप्रमाणे शारीरिक व्यायाम साधनेला महत्व आहे, त्याच प्रमाणे मानसिक आरोग्यावर मानसिक व्यायाम महत्वाचा ठरतो. व्यक्तीय शारीरिक आरोग्याचा परिणाम मनावर होतो व मानसिक आरोग्याचा परिणाम शरीरावर होतो. व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर विविध प्रकारचे बाहय घटक प्रभावकारी ठरतात, त्याप्रमाणे मानसिक आरोग्यात बदल होतो. यामध्ये साथीच्या आजारांचा रोग व अंतर्भाव होतो. मागील तीन वर्षापासून संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोविड-१९ साथीच्या आजाराचाही विचार केला तर त्याचे परिणाम सर्व स्थरावर, सर्व सजिवसृष्टीदर झालेले दिसुन येतात

आरोग्याचा अर्थ: जागतिक आरोग्य संघटना मतानुसार आरोग्य म्हणजे केवळ रोगांचा अभाव नसून एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि अध्यात्मिक समतोल याची अवस्था होय.

मानसिक आरोग्य: आयुष्यात येणाऱ्या सगळ्या बऱ्या-वाईट अनुभवांना खंबीरपणे सामोरे जावे तसेच कुटुंबातील आणि समाजातील सर्व लोकांशी चांगले नाते असणे असा अर्थ मानसिक आरोग्य असा अभिप्रेत होतो.

मानसिक आरोग्य संकल्पना:- मानसिक विकारांचा अभाव

आधुनिक संकल्पना: ज्या दीर्घकाळात मानसिक अवस्थेत व्यक्तीला एकंदर बरे वाटाते तिची विचारसरणी बुध्दीप्रमाणीत असते. प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ डॉ. सिग्मंड फ्राइड यांनी मानवी मनाच्या तीन काल्पनिक पातळ्या स्पष्ट केल्या आहेत. ज्यामध्ये अहम्, इदम्, परादम् या सांगितल्या आहेत. त्यांनी स्पष्ट केले की मानवी प्रेरणांचे दमन झाले तर मानसिक आरोग्य बिघडण्यास सुरुवात होते व तो मनोरुग्ण होतो. मनोविकारांची कारणे काय आहेत हे शोधुन काढणे सर्वात महत्वाचे आहे असे त्यांनीस्पष्ट केले आहे.

कोरोना व्हायरस चा अर्थ: हा संदर्भ मान्य आहे के हे SARS-COV2 विषाणूमुळे होतो. सामान्यतः या आजाराची लक्षणे फ्लू सदृश्य आढळतात.

कोरोना विषाणुचा प्रसार: संक्रमित थेंब, थेंबाच्या फवारा संपर्क हाताचा पृष्ठभाग शरीराबाहेर विषाणू जिवंत राहण्याचा काळ एक ते आठ दिवस. छिद्र नसलेला पृष्ठभाग आठ ते बारा तास, सध्या तरी या संदर्भात पूर्ण माहिती उपलब्ध नाही

उद्देश : मानसिक आरोग्य सर्व विकाराचा पाया आहे हे स्पष्ट करणे. कोविड-१९ चा मागील दोन वर्षात व्यक्तीच्या मानसिक झालेला परिणाम स्पष्ट करणे. कोणत्याही साथीच्या आजाराच्या काळात मानसिक संतुलनासाठी उपाय योजना स्पष्ट करणे. मानसिक आरोग्यात संतुलित आहारा बरोबर संतुलित परिस्थिती किती परिणामकारक आहे हे स्पष्ट करणे.

गृहितके: कोविड –१९ च्या संसर्गामुळे सर्व प्रकारचे नुकसान झाले आहे.कोविड-१९ च्या काळात सर्व राष्ट्रातील व्यक्ती मधीलं८५% व्यक्ती मानसिक आजाराचे शिकार झाले आहे. कोविड-१९मुळे व्यक्तीच्या आरोग्याचे महत्व व मानसिक आधाराचे व कुटुंबाच्या आधाराचे महत्व स्पष्ट झाले.

कोविड-१९ चा मानसिकतेवर झालेला परिणाम: मानव हा संवेदनशील प्राणी आहे. तो ज्या परिस्थितीत, वातावरणात राहतो त्या वातावरणाचा किंवा परिस्थितीचा परिणाम व्यक्तीच्या मानसिकतेवर पर्यायाने व्यक्तिमत्वावर होत असतो. समाजातील वर्तन प्रक्रिया ही देखील व्यक्तीचे मानसिक आरोगयात महत्वपूर्ण भूमिका बजावते. व्यक्ती वर्तनाचे तीन अंग किंवा भाग आहेत. बोधात्मक अंग भावनात्मक अंग क्रियात्मक अंग हे तीन ही काम संतुलित स्वरुपात असतील तर व्यक्तीचे मानसिक आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. मनुष्य हा स्वभावत: आपल्या जीवनाविषयी आसक्त आहे. म्हणुन तो सातत्याने स्वत:ला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतो. अनेकवेळा जीवनात प्रतिकुल परिस्थिती निर्माण झाली की, तो नकारात्मक विचार करु लागतो. बऱ्याचवेळा जीवन संपवण्याचा प्रयत्न तो करतो. जर जीवनाला या प्रवासात अचानक काही समस्या निर्माण झाल्यातर तो त्या समस्यांना सामोरे जाऊ शकत

नाही. मानसिक संतुलन बिघडून बसतो. मानसिक आरोग्य असंतुलित होते. अशावेळी मनुष्याला स्वत:च्या अस्तित्वाची चिंता वाटते, तो ते टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. मागील दोन वर्षापासून संपूर्ण जगाला ज्या गोष्टीने वेढीस धरले आहे, ती गोष्ट म्हणजे जागतिक स्थरावर अत्यंत भयानक परीस्थिती निर्माण करणारी स्थिती म्हणजे कोविड – १९ सारख्या साथीच्या आजाराने थैमान घातले होते. याचा परिणाम सर्व जगावरच झालेला दिसुन येतो. या आजाराने मृत्युचे प्रमाण अधिक वाढल्यामुळे मृत्यूची भिती अधिक प्रमाणात वाढली होती. यामुळे कुटुंबातील वृध्द व्यक्ती लहान मुले सर्वाधिक तणावाच्या अवस्थेत गेले.याचा परिणाम शरीर व मनाच्या स्वास्थेवर झाला व यापेक्षा जिथे या आजाराने कुटुंबातील व्यक्ती मृत्यू पावली किंवा ज्या कुटुंबात कोव्हीड सदृश्य व्यक्ती आठवल्यास त्या कुटुंबाकडे पहाण्याचा दृष्टीकोन नकारात्मक स्वरुपात होऊ लागला. किंवा त्या कुटुंबाला वाळीत टाकण्याचा प्रयत्न होत होता. अशा भयावह परिस्थितीत कुटुंबातील सर्वच व्यक्तींना मानसिक संतुलन असंतुलित होत होते. याबरोबरच सामाजिक हाणी तर झालीच आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या हाणी न भरुन निघणारी झाली. यांचा परिणाम सर्व समाज मनावर झालेला दिसतो. पर्यायाने कुटुंब, समाज आणि राष्ट्र प्रेमगीताच्या वाटेवरून कसे दुर केले. मानसिक आरोग्याचा परिणाम शारीरिक आरोग्यावर झाल्यामुळे अनेक कुटुंबातील अनेक व्यक्ती केवळ भितीमुळे मृत्यू पावले तर काही कुटुंबातील व्यक्ती रक्तदाब सारख्या आजाराने ग्रस्त झाले ज्याचा परिणाम सर्व कुटुंब व समाजावर झाले आहे. मानसिक आरोग्य ताणतणावाच्या परिस्थितीमुळे अद्याप पूर्ववत झालेले नाही. याचा परिणाम अधिक तीव्र समस्या निर्माण करणार आहे. आर्थिक असंतुलन, बेरोजगारी, गुन्हेगारीवृत्तीत जलद गतीने वाढ झालेली दिसते. अनेक शहरे, गावच्या गाव मृत्युच्या गर्तीत सापडल्यामुळे ओस झालेली स्थिती निर्माण झाली. कोविड-१९ सारखा साथीच्या आजाराने माणसातील संवेदना, कुटुंबातील प्रेम, आणि सामजिक ऐक्य यांचा जीव घेण्यास मदत झाली असाही एक परिणाम झालेला दिसुन येतो. मानसिक संतुलन प्रतिकुल परिस्थित सांभाळण्यासाठी प्रत्येकाने स्वत: प्रयत्न करने गरजेचे आहे. मागील दोन वर्षात ८०% लोकांचे मानसिक संतुलन केवळ या कोरोनाच्या काळात असंतुलित झाले आहे. यामुळे कुटुंबाचे समाजाचे व पर्यायाने राष्ट्रचेही सर्व बाजूने नुकसान झाले, जे नुकसान कशानेही भरुन काढता येत नाही.

मानसिक संतुलनासाठी उपाय योजना: 'मृत्यू' हे अंतिम सत्य आहे. मानव स्वत:चे जीवन सुखकर व सुंदर करण्यासाठी प्रयत्न करतो. कारण मृत्यू अटळ असला तरी तो अचानक आल्यावर त्या धक्क्यातून कुटुंबीय सावरु शकत नाही. याचा परिणाम कुटुंबातील व्यक्तीच्या मानसिक संतुलनावर होतो. सुंदर जीवनाच्या संकल्पनेत शारीरिक व मानसिक स्वास्थ खुप महत्वाचे आहे. कारण जीवनात प्रत्येक वेळी परीस्थिती अनुकुल असेल असे नाही तर अनेक वेळा परीस्थितीत बदल होतो ती प्रतिकुल होते. नैसर्गिक आपत्ती असेल किंवा अचानक आलेले कोरोनासारख्या संकटात प्रत्येक व्यक्तीला सामोरे जाण्यासाठी काही प्रयत्न करावे लागतात. प्रसिध्द, रेले देकार्त असे म्हणतात की शरीराचा मनावर व मनाचा शरीरावर परिणाम होत असतो याचा एकमेंकांचा एकमेंकांशी निकट संबंध आहे. म्हणून या दोघांचे संतुलन राखणे महत्वाचे आहे. अनेक मानसशास्त्रज्ञ मानसिक संतुलनासाठी अनेक उपाय योजना सांगतात ज्यामुळे तणावमुक्त परीस्थीतीत बदल होण्यास मदत होते. छंद जोपासना, जिवनाशैलीत बदल, अध्यात्मिक ज्ञानसाधना इत्यादी चा समावेश होतो. तणावयुक्त परिस्थितीमुक्त परावृत्त होण्यासाठी किंवा मानसिक संतुलन अनाधित राहण्यासाठी आदरनीय दर्शनात अनेक दर्शनाचे आत्मबल वाढण्यासाठी अनेक उपाय सांगितले आहेत. ज्यात बौध्द दर्शनात आष्टागं मार्ग, पंचशीलता यांचा समावेश होतो. ज्यात सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्मांत, सम्यक अजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी यांचा समावेश होतो. त्याप्रमाणेच भारतीय दर्शनातील योगदर्शनाने अष्टांगीक योगाच्या माध्यमातुन शारीरिक व मानसिक स्वास्थ कसे ठेवता येईल याचा विचार केला. आत्मबल वाढण्यासाठी अष्टांकग योग अत्यंत महत्वपूर्व आहे. योग साधनेच्या माध्यमातुन आत्मबल वाढल्यामुळे कोणत्याही प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जाण्याची क्षमता व्यक्ती मध्ये येते. योग म्हणजे चित्तवृत्तीचा विरोध असा अर्थ योगदर्शनाने केला आहे. योगाचा उद्देश हा मानसिक विकारांशी तादात्म्य कल्पिणाऱ्या आत्म्याने आपण वास्तवातील मानसिक विकार नसुन तसेच चित्तावर आढळणाऱ्या वृत्तीत नसुन त्यांच्यापासुन स्व: भिन्न आहोत असे ओळखणे आणि आत्म्याला स्वत:च्या यथार्थ स्वरुपाचे ज्ञान होणे योगाचा मुख्य उद्देश आहे. ते योग असे आहेत.

यम:-व्यक्तीच्या मनात काही वाईट वासना असतात त्यांना नष्ट करणे आवश्यक असते वाईट प्रवृत्तीचे दमन करणे म्हणजे यम होय. यम पाच प्रकारचे आहेत.

1. अहिंसा – हिंसा न करणे

2. सत्य –खोटे बोलण्यापासुन प्रतिवृत्त
3. असत्तेय – चोरी न करणे
4. ब्रम्हचय –लैंगिक वासनाकडे आकृष्ट न होणे
5. उपरीग्रह – अनावश्यक वस्तुचा संग्रह न करणे.

नियम :-प्रत्येकामध्ये केवळ वाईट प्रवृत्ती असतात असे नव्हे तर काही चांगल्या वृत्ती असतात चांगल्या वृत्ती सतत वाढवणे म्हणजे नियम होय. हे नियम पाच आहेत.

1. शौच- मानसिक व शारीरिक शुध्दता प्राप्त करणे
2. संतोष– समाधानी वृत्तीत वाढवणे
3. तप – व्यक्तीबाह्य परीस्थितीतही स्थिर राहणे
4. स्वाध्याय – मोक्ष साधक ग्रंथांचे ज्ञान प्राप्त करणे.
5. ईश्वर आराधाना – ईश्वर सेवा करणे ईश्वर भक्ती करणे.

आसन :--याचा अर्थ शरीराची सुखद व स्थिर अवस्था होय, यामुळे शारीरिक आरोग्य आणि स्थापित होण्यास मदत होते. शारीरिक आरोग्य मानसिक शांतते करिता आवश्यक आहे.

प्राणायाम :- प्राणाचा आणि चित्ताचा अतिशय घनीष्ठ संबंध आहे. प्राणाच्या चंचलतेचाचित्ताच्या चंचलतेवर परिणामहोत असतो म्हणुन योगाने प्राणाचा संयम सांगितला आहे. श्वसनाच्या स्व:नियंत्रणाला प्रणायाम असे म्हणतात. प्राणायामाची तीन अंगे आहेत.

1. पुरक – पूर्ण श्वास आत घेणे
2. कुंभक – श्वास आत रोखुन धरणे
3. रेचक – हळु-हळु श्वास बाहेर सोडणे.

प्रत्याहार :- यामध्ये प्रत्येक इंद्रियाना त्यांच्या दिषयापासुन परावृत्त करुन मनाच्या नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केला जातो. हा अभ्यास अवघड असला तरी अशक्य नाही.

धारणा :-चित्त कोणात्याही इष्ट इंद्रियावर केंद्रीत करणे म्हणजे धारणा होय. कोणत्याही विषयावर चित्त केंद्रीत करणे हि योगाची गुरुकिल्ली होय. धारणा व एकाग्रता यातबरेच साम्य आहे. परंतू एकाग्रता ही चित्ताची अवस्था आहे.

ध्यान:-ज्या विषयावर चित्त केंद्रीत केलेले आहेत. त्या विषयाचे सतत चिंतन म्हणजे ध्यान होय यामध्ये इष्ट विचारांच्या प्रवाह अखंडीतपणे चालु असतो. इष्ट वस्तुचा अभ्यास जसजसा चालु राहतो, तस तसे इष्ट विषयाचे ज्ञान अधिक वाढते.

समाधी :- ही शेवटची पायरी आहे. योग्याला इष्ट वस्तुची ओळख जरी झाली तरी ध्यान व ध्येय यांचा भेद नेहमीच राहातो. पुढे ध्यानाचे समाधी मध्ये रुपांतर होतेव कोणताही भेद राहत नाही. धारणा, ध्यान, समाधी या तीनच पायऱ्या आसल्या तरी योगाचा विषय एकच असतो. या एक विषयाचा अभ्यास साधुन योगी संयम नामक महत्वाची मानसिक स्थिती प्राप्त करीत असतो. यामुळे चित्तवृत्तीत विरोध होऊन चित्त होते. योग साधनेच्या माध्यमातुन अनेक शक्ती योग साधकाला प्राप्त होतात, म्हणून शारीरिक व मानसिक आरोग्याचा दृष्टीने योगासाधना महत्वाची आहे.

सारांश : मागील दोन वर्षापासुन सर्व जग कोविड सारख्या साथीच्या आजाराने त्रस्त आहे. याचा परिणाम सर्व सृष्टीवर झालेला आहे. कोविड सारखे साथीचे आजार यापूर्वीही आले होते. त्याचा दुरगामीपरिणाम अजुन पर्यंत जणवत आहेत. यापुढेही असे आजार येणार हे गृहीत धरावे लागले. पण अशा साथीच्या आजाराने होणारे नकारात्मक बदल येणाऱ्या समस्या या सर्वावर काही उपाय योजना करता येतात, हे काळाने वेळोवेळी दाखऊन दिलेआहे. व्यक्तीने अशा संकटाला सामोरे जाण्यासाठी खंबीर होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक व्यक्तीने मानसिक सदृढ असणे किंवा होणे आवश्यक आहे. याकरीता योग साधना हा उपाय महत्वाचा ठरतो शारीरिक व मानसिक आरोग्याचा परिणाम केवळ एका व्यक्तीवर होणे असे नव्हे तर त्याचा परिणाम कुटुंब समाज वर असणे आवश्यक आहे.

संदर्भ 1 प्रा. पां.दा. चौधरी, 'भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास', मंगेश प्रकाशन, नागपुर.

2 प्रा. सविता देशपांडे, प्रा.आशा वरुळेकर, 'समाज मानसशास्त्र', उमेश प्रकाशन, पुणे.

3इंटरनेट माध्यमातुन

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे योगदान

डॉ. विनायक रावसाहेब वाघमारे

वाणिज्य विभाग प्रमुख,श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा.

प्रस्तावना: भारत हा कृषी प्रधान देश आहे. आज ही भारतातील जवळपास ६०% ते ६५% टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. म्हणून भारतास कृषी प्रधान देश म्हणून ओळखतात, पणभारताच्या एकुण राष्ट्रीय उत्पन्नात १३.९०% योगदान शेती व्यवसायाचे आहे स्वतंत्र्य प्राप्तीनंतर ८ एप्रील १९४८ ला भारताचे पहिले औद्योगिक धोरण जाहिर केले. त्यावेळी आपल्या देशात मिश्र अर्थव्यवस्था स्विकारली गेली तर १९९१ मध्ये भारताचे अर्थमंत्री डॉ मनमोहन सिंह यांनी औद्योगिक धोरणामध्ये भारत सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण व जागतीकरण करण्याकरिता खुले आर्थिक धोरण स्विकारले. त्यामध्ये आर्थिक विकासाचा दर वाढवण्यासाठी वस्तु, सेवा, तंत्रज्ञान व भांडवल यांच्यात वाढ करण्यासाठी मुक्त अर्थ व्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली.

राष्ट्रीय उत्पन्न

राष्ट्रीय उत्पन्न समितीच्या मते "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तु आणि सेवाचे दुहेरी मोजदाद होऊ न देता केलेले मापन होय."

प्रा. फिशरच्या मते "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या काळात राष्ट्राच्या निव्वळ उत्पन्नापैकी जो भाग प्रत्यक्षपणे उपभोगासाठी वापरला जातो असा भाग होय."

वरिल व्याख्येवरुन असे म्हणता येते की, एकुण राष्ट्रीय उत्पन्न हे एखाद्या वैक्तिक घटकाचे उत्पन्न नसून ते संपुर्ण अर्थव्यवस्थतील उत्पन्नाचे प्रतिनिधीत्व करत असते. त्याच बरोबर राष्ट्रीय उत्पन्नात उत्पादित वस्तु व सेवाच्या निव्वळ मुल्याच्या समावेश केलेलाअसतो.

भारतीय अर्थव्यवस्था प्रामुख्याने तीन विभागात विभागली गेली आहे. १) प्राथमिक क्षेत्र २) द्वितीय क्षेत्र ३) तृतीय क्षेत्र. देशाच्या स्वतंत्र प्राप्तीनंतर तिन्ही क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील प्रमाण बदलत गेले. खुले आर्थिक धोरण राबवल्यानंतर देशात गुंतवणूकीचे प्रमाण वाढत गेले. खाजगी तसेच परकिय गुंतवणुकिमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत गेले. त्यामुळे प्राथमिक क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील प्रमाण कमी होत गेले. पण द्वितीयकक्षेत्राचे व तृतीयक क्षेत्राचे प्रमाण वाढत गेले.

भारतीय जनतेचा शेती हा अतिशय प्राचीन व्यवसाय असून शेती हे बहुसंख्या लोकांचे उदनिर्वाहाचे साधन आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे. परंतु दुर्देवाने भारतीय शेतीचा उत्पादकता कमी आहे. शेतीची उत्पादकता म्हणजे शेतीच्या उत्पन्नाचे शेतीमध्ये केलेल्या गुंतवणुकीशी असलेले प्रमाण होय. म्हणजेच शेतीतून निघणारे उत्पादन आणि शेतीत वापरलेल्या साधनाची मात्रा यांच्यातील गुणोत्तर प्रमाण म्हणजे शेतीची उत्पादकता होय. या कारणामुळे भारतीय शेती (प्राथमिक क्षेत्राचा) व्यवसायाचा वाटा दिवसेंदिवस राष्ट्रीय उत्पन्नात कमी होत असल्याचे दिसून येते.

संशोधनाचीउद्दिष्टे:

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राच्या योगदानाचा अभ्यास करणे.

२) प्राथमिक क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्व अभ्यासणे.

३) तिन्ही क्षेत्राचा तुलनात्मक अभ्यास करणे.

गृहितकृत्ये:

१) भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये संरचनात्मक बदल होत आहे.

२) प्राथमिक क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदानाचे प्रमाण कमी होत आहे.

३) राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचे प्रमाण कमी होत असले तरी प्राथमिक क्षेत्राचे महत्व कमी होत नाही.

संशोधनपद्धती:

भारतीय अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राचे योगदान यावर संशोधन करताना प्राथमिक व दुय्यम माहितीचा आधार घेताना निरिक्षण व मुलाखती याचा आधार घेण्यास आला तर दुय्यम माहितीमध्ये प्रकाशित पुस्तके, संदर्भ ग्रंथ,internet, मासिके व वर्तमानपत्रे यांचा जास्तीत जास्त वापर करण्यात आला आहे.

प्राचीन काळापासूनच भारत हा मुख्यत:शेती प्रधान देश आहे. त्यामुळे स्वतंत्र भारताला सुध्दा हाच वारसा प्राप्त झाला आहे. १९७०– १९७१ च्या किंमतीनुसार १९५० – १९५१ मध्ये देशाच्या ढोबळ देशी उत्पादनापैकी (Gross Domestic Product)५८.८% उत्पादन शेती आणि शेती पुरक व्यवसायातून प्राप्त होत होते. स्वतंत्र्य प्राप्तीनंतर देखील भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती हाच राहीला आहे. परंतु भारतीय शेती व्यवसाय आलिकडच्या काळामध्ये डबघाईस आला आहे. कारण भारतीय शेतीची उत्पादकता कमी झाल्यामुळे भारतीय शेती व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होत असल्याचेदिसून येत आहे.

भारतीय शेतीची उत्पादकताकमी असण्याची कारणे

१) भारतीय शेतकरी अशिक्षित, अंधश्रध्दाळू, पुरातनवादि नवीन तंत्राबाबत उदासीन आहेत.

२) भारतात लोकसंख्येचा शेतीवरील भार सतत वाढत आहे. त्यामुळे लागवाडी खालील शेती क्षेत्राचे प्रमाण सतत कमी होत आहे. उदा. १९०१ मध्ये दरडोई शेतजमीन ०.४३ हेक्टर होती ती आज ०.११४१ हेक्टर वर आली आहे.

३) भांडवल अभावी भारतीय शेतकरी आधुनीक तंत्राचा वापर करण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते.

४) आज ही भारतीय शेतीपैकी ६०% शेती ही नैसर्गिक पावसावर अवलंबून असल्याने उत्पादकता कमी आहे.

५) शेती मालास वाजवी भाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय नुकसानी मध्ये जात आहे.

देशाची रोजगार क्षमता २०२० मध्ये ४७.२० कोटी असून त्यामध्ये देशातील प्राथमिक क्षेत्राकडुन ६०% द्वितीयकक्षेत्राकडून १७% तर सेवा क्षेत्राकडून २३% रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

देशामध्ये बेरोजगारीचा दर १०.१९% असून दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणार्याची संख्या एकुण लोक संख्येच्या २५% आहे. तरी देखील देशातल्या ६०% जनतेला रोजगार देणारे क्षेत्र म्हणून शेती व्यवसाय व पुरक व्यवसायाकडे पाहिले जाते.

देशांतर्गत स्थूल उत्पादन

विवरण	२००९-१०	२०१०-११	२०११-१२	२०१२-१३	२०१३-१४
दे. स्थूल उत्पादन (वर्तमान बाजार मुल्य कोटीमध्ये)	६४,७७,६२७	७७,८४,११५	९६,६९,७२२	१,०१,१३,२८१	१,१९,५५,६७९
वृध्दी दर (%)	१५.१	२०.२	१५.७	१२.२	१२.३
दे. स्थूल उत्पादन (घटक खर्चानुसार कोटीमध्ये)	४५,१६,०७१	४९,१८,५३३	५२,४७,५३०	५४,८२,१११	१,१५,४१,७९१
वृध्दी दर (%)	८.६	८.९	६.७	४.५	४.७

संदर्भ : https//hi;Wikipedia.org/

वरिल तक्त्यानुसार असे स्पष्ट होते की, २००९-२०१० पासून राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ दाखवण्यात आली आहे. २००९- २०१० मध्ये राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वर्तमान मुल्यानुसार १५.१% तर २०१०-२०११ मध्ये २०.२%, २०१२- २०१३ मध्ये १२.३% तर वाढ झाल्याचे दिसते. घटक खर्चाचा विचार करुन राष्ट्रीय उत्पन्न मोजले असता २००९ – २०१० मध्ये ८.६%, २०१०- २०११ मध्ये ८.९%, २०११- २०१२ मध्ये ६.७%, २०१२- २०१३ ध्ये ४.५% तर २०१३- २०१४ मध्ये ४.७% राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते.

यावरुन असे स्पष्ट होते की, देशाचे राष्ट्रीय उत्पन्न २००९ -२०१० व २०१० –२०११ मध्ये वाढीचा दर जास्त होता परंतु २०११- २०१२ नंतर काहीप्रमाणात वाढीचा दर कमी झाला. कारण देशाची अर्थव्यवस्था कृषीवर आधारलेली असून कृषीचे उत्पन्न हे मान्सून वर आधारलेले अहे. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर कमी होतो आहे हे दिसून येते.

भारताला कृषी प्रधान देश आहे आणि देशाची अर्थव्यवस्था ही कृषी वर आधारलेली आहे असे मानले जात होते. परंतु आलिकडच्या काळामध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचाविचार केला तर राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा वाटा कमी कमी होत असल्याचे दिसून येते तर सेवा क्षेत्राचावाटा वाढत असल्याचे दिसून येते. हे पुढिल तक्त्यावरुन दिसून येते.

देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातविविध क्षेत्राचे योगदान

क्षेत्र	१९९९-२०००	२००७-२००८	२०१२-२०१३	२०१३-२०१४
प्राथमिक क्षेत्र	२३.२	१६.८	१३.९	१३.९
द्वितीय क्षेत्र	२६.८	२६.७	२७.३	२६.१
तृतीयक क्षेत्र	५०.००	५४.४	५६.६	५१.९

संदर्भ : https//hi..Wikipedia.org/wik

देशामध्ये दुध उत्पादन त्याच बरोबर गहु, तांदुळ, साखर, मसाले, चहा, बाक्साईट कोळसा इत्यादीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते. त्याच बरोबर लोह, बाक्साईट कोळसाइत्यादी खनीजे भरपुर प्रमाणात उपलब्ध आहे. त्याच बरोबर देशातील अनेक लोक विविध देशामध्ये कामा निमित्त देशाबाहेर आहेत. त्यामध्ये साफ्टवेअर इंजिनिअर आरोग्य विभाग इत्यादी मध्ये सर्वाधिक लोक बाहेर देशामध्ये काम करतात.

वरिल तक्त्यानुसार असे स्पष्ट होते की, १९९९-२०१४ पर्यंतचा अभ्यास केला असता १९९९-२००० मध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नामधील प्राथमिक क्षेत्राचा वाट २३.२०% होता तो २००७- २००८ मध्ये १६.८०% झाला, २०१२-१३ मध्ये १३.९०% या प्रमाणे कमी कमी होत असल्याचे दिसते. तरी देखील दशातील रोजगाराच्या संधी ह्या प्राथमिक क्षेत्रामध्ये होत्या. पण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा उलट झाल्याचे दिसून येते.

द्वितीयक क्षेत्राचा विचार केला असता राष्ट्रीय उत्पन्नतील हिस्सा हा स्थिर होता कारण १९९९-२००० मध्ये २६.८% होता तो २०१३ –२०१४ मध्ये २६.१०% आहे म्हणजेच द्वितीयक क्षेत्राचा हिस्सा कांही प्रमाणात स्थिर असल्याचे दिसून येते.

तर तृतीयक क्षेत्राचा विचार केला तर असे स्पष्ट होते की, १९९९-२००० पासून कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा कमी होत आहे. पण तृतीय क्षेत्राचा हिस्सा वाढताना दिसून येत आहे. १९९९-२००० मध्ये ५०% तर २००७- २००८ मध्ये ५४.४०%, २०१२- २०१३ मध्ये ५६.८०% तर २०१३- २०१४ मध्ये ५९.९०% असल्याचे दिसते.

याचाच अर्थ असा होतो की, भारतीय शेती व्यवसायामध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या प्रमाणात बदल हात नसल्याचे दिसते. पण सेवा क्षेत्रामध्ये वाहतुक, होटल, संचार, वित्त, विमा, पर्यटन इत्यादी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात तृतीय क्षेत्राचा हिस्सा वाढताना दिसून येतो.

त्याच बरोबर रोजगारांचा विचार केला तर आज ही देशामध्ये रोजगारामध्ये इतर क्षेत्राच्या तुलनेत प्राथमिक क्षेत्राचे योगदान सर्वाधिक असल्याचे पुढिल तक्त्यावरुन स्पष्ट होते.

भारतातील रोजगारांच्या संधी

क्षेत्र / वर्ष	१९९९-२०००	२००४-२००५	२०११-२०१२
प्राथमिक क्षेत्र	५९.९०	५८.५०	४८.९०
द्वितीय क्षेत्र	१६.४०	१८.२०	२४.३
तृतीयक क्षेत्र	२३.७०	२३.३०	२६.९

संदर्भ : https;//hi.wikipedia.org/wiki/

वरिल तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, जेव्हा तिन्ही क्षेत्राचा विचार केला जातो तेव्हा ५०% प्रेक्षा जास्त रोजगाराच्या संधी ह्या प्राथमिक क्षेत्रातून निर्माण होतात. पण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा हा १३.९०% आहे तर सेवा क्षेत्राचा विचार कला असता जवळपास २५% रोजगार सेवा क्षेत्रातुन प्राप्त होतो. पण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा हा ६०% च्या जवळपास आहे. म्हणजेच रोजगार देण्यामध्ये प्राथमिक क्षेत्र अग्रेसर आहे तर राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्यामध्ये सेवा क्षेत्र अग्रेसर आहे.

निष्कर्ष: भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान याचा आभ्यास करताना असे दिसून आले की. सुरुवातीच्या काळामध्ये भारतीय शेती व्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा उत्पन्न व रोजगार याचा एक आधार होता. पण १९९१ नंतरच्या खुल्या आर्थिक धोरणामुळे तो फक्त एक रोजगाराचा आधार राहिलेला आहे. तरी पण द्वितीयक क्षेत्र व तृतीयक क्षेत्र यांना मुलभुत सामग्री पुरवण्यास तो एक प्रथम माध्यम आहे. राष्ट्रीय उत्पन्नात तो कमी वाटा घेत असला तरी बाकीचे क्षेत्र हे प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून आहेत. तृतीयक क्षेताचा वाटा वाढण्याचे कारण म्हणजे आलिकडील

काळामध्ये सरकारचे धोरण व बदलेली परंपरा यामुळे तृतीय क्षेत्रामध्ये वाढलेली मागणी लक्षात घेऊन देशी व विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे तृतीय क्षेत्राची भागीदारी वाढलेली दिसून येते. पण कृषी क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढलेली नाही, कारण कृषी क्षेत्र हे मान्सुन वर आधारलेले आहे त्याच बरोबर कृषी योग्य जमीनेचे क्षेत्र कमी झाल्यामुळे या क्षेत्राचा हिस्सा कमी कमी होत असल्याने देशातील कृषी क्षेत्रातील योगदान कमी झाले आहे. पण रोजगाराच्या बाबतीत कृषी क्षेत्र हे इतर क्षेत्राच्या तुलनेस जास्त आहे. यावरुन असे म्हणवेसे वाटते की, भारत हा कृषी प्रधान देश आहे.

संदर्भ:

१) डॉ. जी. एन. झाबरे – भारतीय अर्थ व्यवसथा - पिंपळापुरे पब्लीकेशन, नागपूर.

२) योजना -विषेषांक, भारतीय अर्थव्यवस्था

३) https;//hi.wikipedia.org.

हिंदी-मराठी दलित स्त्री आत्मकथाएँ: जीवन संघर्ष की व्यथा-कथा 'दोहरा अभिशाप' और 'जीणं आमुचं' के विशेष संदर्भ में

डॉ. संजीवकुमार नरवाडे
आदर्श कॉलेज, हिंगोली
email: svnarwade1670@gmail.com

भौतिक पर्यावरणात हवामान,जमीन,सूर्यप्रकाश,पाणी, खनिज संपत्ती या घटकांचा समावेश होतो. या सर्व घटकांशी व्यक्तीचा सतत संबंध येत असतो.भौतिकपर्यावरणाचा स्वतःच्या फायद्यासाठी विशेष उपयोग केला जातो. पावसाचे पाणी वाहून जाऊ नये यासाठी मोठी धरणे बांधणे, त्यातील पाण्याचा उपयोग पिण्यासाठी व शेतीसाठी करणे,त्याद्वारा वीजनिर्मिती केली जाते. एकीकडे भौतिक परिस्थितीत अनुकूल बदल घडवलेले असल्याचे आढळते तर दुसरीकडे

भौतिक परिस्थिती निर्माण झालेल्या असमतोलामुळे मानवी जीवनात विविध समस्या निर्माण झाल्या आहेत.उदा. सतत वाढणारे प्रदूषण, पावसाचे अनिश्चित प्रमाण वाढते,उष्णता,भूकंप,ज्वालामुखी, सुनामीच्या लाटा.

अशा प्रकारे आरोग्य संकल्पनेशी निगडित अनेक घटक असतात त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.उदा.- अनुवांशिकता, पर्यावरण मनो सामाजिक परिस्थिती, भौतिक व जैविक परिस्थिती या घटकांवर नियंत्रण ठेवणे शक्य असते. त्यावर नियंत्रण ठेवून मानवी आरोग्य सुदृढ ठेवणे सुलभ होते.उदा.-पर्यावरण, भौतिक व जैविक परिस्थिती देशातील सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सुरक्षित रहावे, आरोग्यविषयक कोणत्याही समस्या उद्भवू नयेत, सशक्त व निरोगी नागरिक ही राष्ट्राची संपत्ती असतात, हे महत्त्वाचे मानून विविध प्रकारच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी सरकार मार्फत केली जाते. आरोग्य विषयक धोरण ठरविण्यासाठी सुरुवातीच्या काळात विविध समित्यांची नियुक्ती केली व समित्यांनी सुचविलेल्या शिफारशीनुसार आरोग्य विषयक धोरण निर्माण झाले. सर्वसामान्यांचे आरोग्य सुरक्षित राहावे या दृष्टीने विविध कृती कार्यक्रमावर भर दिला गेला पण त्या बरोबरीने प्रतिबंधात्मक, संवर्धनात्मक व पुनर्वसनात्मक उपायही योजले गेले आहेत. आरोग्य हा मूलभूत अधिकार आहे व तो प्रत्येकालाच मिळविण्यासाठी सरकार मार्फत विशेष अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आढळते.

मानसशास्त्रातील प्रचलित प्रवाह

प्रा. डॉ. गणेश वायकोस

सहाय्यक प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी.

सारांश: मानसशास्त्र हे जगातील सर्वात तरुण शास्त्र आहे. मानसशास्त्राच्या उदयापासून आतापर्यंत झालेले मानशास्त्रातील बदल आणि संशोधने अभूतपूर्व आहेत. परिस्थितीतील अनेक घटकांचा किंवा घटनांचा परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर होत असतो. कोविड १९ या साथीच्या रोगाचे तर मानवी जीवनावर आणि वर्तनावर अनेक विपरीत झाले आहेत. प्रस्तुत लेखात ऑनलाईन उपलब्ध असणारी संशोधने, संशोधन लेख, नियतकालिके आणि इतर उपलब्ध माहितीचा आधार घेऊन मानसशास्त्रीय संशोधनाच्या जगातात सर्वाधिक चर्चेत असलेल्या मानसशास्त्रीय प्रवाहांचे पुनरावलोकन केले आहे. सामाजिक माध्यमांचा वाढता वापर, मानसशास्त्रातील बदलणारे संशोधनाचे स्वरूप, मानसशास्त्रीय कौशल्यांची वाढती मागणी यासारख्या प्रवाहांचा अभ्यास मानसशास्त्रज्ञ करीत आहेत. मानसशास्त्रातील प्रचलित प्रवाहांवरुन असे दिसून येते की, परिस्थितीनुसार मानसशास्त्राच्या अभ्यास विषयात बदल झालेला दिसून येतो. मानवाच्या कल्याणासाठी मानसशास्त्राच्या अभ्यास विषयात झालेले बदल हे सर्व प्रचलित प्रवाह दर्शवितात. २१ व्या शतकात, मानसशास्त्रज्ञांनी त्यांचे लक्ष मानसशास्त्राच्या वर्तनात्मक दृष्टीकोनाकडून बोधात्मक दृष्टीकोनाकडे वळवले. मानसशास्त्रज्ञांचे लक्ष प्रायोगिक अभ्यासाकडून तर्कशुद्ध विचार आणि ज्ञान मिळवण्याच्या इतर पद्धतींकडे वळले ज्यामध्ये तर्क, स्मृती, अवधान आणि भाषा अशा बोधनिक प्रक्रियांचा समावेश होतो. मानसशास्त्रातील सर्व प्रचलित प्रवाह नवीन मानसशास्त्रज्ञांसाठी खूप अनुकूल आहेत आणि यातून त्यांना अनेक संधी उपलब्ध होतील.

प्रस्तावना

साथीच्या रोगाचा मानवाच्या सामाजिक, आर्थिक आणि मानसिक जीवनावर परिणाम होतो. हे विशेषतः मानवी आरोग्य आणि वर्तनाबद्दल सत्य आहे जे साथीच्या रोगाने प्रभावित होते. २१ व्या शतकात, मानसशास्त्रज्ञांनी त्यांचे लक्ष मानसशास्त्राच्या वर्तनात्मक दृष्टीकोनाकडून बोधात्मक दृष्टीकोनाकडे वळवले. तसेच मानसशास्त्रज्ञांचे लक्ष प्रायोगिक अभ्यासाकडून तर्कशुद्ध विचार आणि ज्ञान मिळवण्याच्या इतर पद्धतींकडे वळले ज्यामध्ये ज्ञानाचा स्रोत म्हणून तर्क, स्मृती, अवधान आणि भाषा यांचा समावेश होतो. (Goodwin, 2004) माहिती तंत्रज्ञानातील अविस्मरणीय प्रगती, इंटरनेटची उपलब्धता आणि सोशल माध्यमे प्रत्येक व्यक्तिपर्यंत मानसशास्त्र पोहचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. अमेरिकन सायकोलॉजिकल असोसिएशनच्या प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या मॉनिटर ऑन सायकॉलॉजी २०२१ मध्ये, पंधरा उदयोन्मुख प्रवाहांचा उल्लेख केलेला आहे. त्यात, ट्रेंट स्पिनर (Trent Spiner) यांनी असे नमूद केलेले आहे की कोविड-१९ या साथीच्या आजारामध्ये, मानसशास्त्रज्ञांनी अतिताण अनुभवणाऱ्या आणि कार्यस्थळी संघर्ष करणाऱ्या व्यक्तींना कसा पाठींबा देतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. याशिवाय कोविड-१९ लसींची स्वीकृती आणि विद्यार्थ्यांना शिक्षित करणे ही देखील मानसशास्त्रज्ञांसमोर आव्हाने होती.

सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर

आज मानसशास्त्रज्ञ त्यांचे ज्ञान /विचार सामाजिक माध्यमांचा उपयोग करून जगात सर्वत्र पोहचवित आहेत. मानसशास्त्रज्ञांना त्यांचे प्राथमिक कार्य किंवा माहिती किंवा संशोधनातील प्रदत्त हे सर्व धोरणकर्ते, इतर शास्त्रज्ञ किंवा सामान्य लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सामाजिक माध्यमांचा आधार घ्यावा लागतो. लॉकडाऊन कालावधीत, तर लोक सोशल माध्यमांवर मानसिक आरोग्य संदर्भातील माहिती शोधत होते. त्यामुळे अनेक मानसशास्त्रज्ञांनी तर साथीच्या रोगाच्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी मनोशिक्षण आणि सल्ला देण्यासाठी Instagram, Twitter, Facebook अशा सामाजिक माध्यमांचा वापर सुरू केलेला दिसून येतो. परंतु काही

संशोधक त्यांची संशोधने चालू असतानाच किंवा तज्ञांकडून पुनरावलोकन न करता प्रकाशित करत आहेत. सद्यस्थितीत जागतिक महामारीच्या परिस्थितीत महत्त्वाची आणि समाज उपयोगी माहिती देवाण घेवाण करण्याची जास्त गरज असताना सामाजिक माध्यमांद्वारे चुकीची माहिती दिली जाण्याचा धोका संभवू शकतो. चुकीची माहिती दिल्याने समाजात मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मानसशास्त्रज्ञांनी Instagram, Twitter, Facebook सारख्या सामाजिक माध्यमांवर अचूक माहीत देणे अपेक्षित आहे.

मानसशास्त्रीय संशोधने

कोविड-१९ साथीच्या रोगाने मानसशास्त्रीय संशोधनाच्या प्रक्रियेवर परिणाम केला असला तरी या परिस्थितीने मानसशास्त्राचे महत्त्वही अधोरेखित केले आहे. कोविड-१९ साथीच्या आजारावर शारीरिक अंतर ठेवणे हे एक आवश्यक मार्गदर्शक तत्व सांगितले गेले. त्यामुळे अनेक मानसशास्त्रांना त्यांच्या अशा संशोधन प्रकल्पांसाठी निर्विवाद अडचणी निर्माण झाल्या आहेत विशेषतः जे संशोधन वैयक्तिक आंतरक्रियांवर अवलंबून आहेत, त्या संशोधनावर प्रतिकूल परिणाम झाला. परिणामी अनेक संशोधकांना आपले संशोधन कार्य शक्य तितके काम ऑनलाइन करावे लागत आहेत.दरम्यान, अर्थ सहाय्य देणाऱ्या एजन्सी शक्य असेल तिथे विद्यमान अनुदान देण्यासाठी मदत करत आहेत आणि पुढील साथीच्या रोगासाठी मदत होऊ शकणाऱ्या संशोधनाकडे लक्ष केन्द्रित करीत आहेत. लॉकडाउननंतर, काही संशोधकांनी सावधगिरी आणि संरक्षणात्मक साधनांचा वापर करून वैयक्तिक संशोधन कार्ये पुन्हा सुरू केले आहे. वित्तीय अर्थ सहाय्य करणाऱ्या संस्थानी कोविड -१९ च्या काळात अनेक संशोधकांना पाठिंबा देण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. जसे NIH, नॅशनल सायन्स फाऊंडेशन (NSF) ने देखील कोविड-१९ नंतर मदत देऊ केली आहे. त्याच्या सामाजिक, वर्तनात्मक आणि आर्थिक विज्ञान संचालनालयाने (SBE) ऑक्टोबर २०२० पर्यंत एकूण $३२.४ दशलक्ष २४० रॅपिड पुरस्कारांसाठी निधी दिला होता. त्याच महिन्यात, NIH ने रॅपिड एक्सेलरेशन ऑफ डायग्नोस्टिक्स अनडिजर्व पॉप्युलेशन (RADx-UP) उपक्रमाची घोषणा केली, ज्यात $५०० दशलक्ष कार्यक्रम हे कोविड-१९ चाचणी करण्याच्या उद्देशाचे होते.

मानसिक आरोग्य विषयक ॲप्सचा वाढता वापर

कोविड-१९ या साथीच्या आजारामुळे मानसिक आरोग्य ॲप्सच्या विकासाला गती मिळू लागली आहे. मानसशास्त्रासाठी ही चांगली बातमी आहे कारण या प्रकारच्या ॲप्स वापराने सामान्य व्यक्तीला उपचार पद्धती आणि उपचारांविषयी अधिक माहिती मिळू शकते असे मानसशास्त्रज्ञ मानतात. स्टीफन शुएलर, पीएचडी, वन माइंड सायबरगाइड या ना-नफा संस्थेचे कार्यकारी संचालक, यांच्या मते मानसिक आरोग्य-संबंधित स्वयं-मदत ॲप्सची संख्या आता १०,००० आणि २०,००० च्या दरम्यान आहे.

मानसशास्त्रीय कौशल्यांना मोठी मागणी

कोविड-१९ या साथीच्या आजाराने सर्व देशाची अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. या आजाराने अनेक लोकांसाठी शैक्षणिक आणि करिअर नियोजनामध्ये अनिश्चितता आणली आहे. परंतु उपलब्ध माहिती असे सूचित करतो की, मानसशास्त्रीय शिक्षणाने दिलेली अष्टपैलुत्व आणि मानवी कौशल्ये या अस्थिरतेच्या वेळी वरदान ठरत आहेत. मानसशास्त्रातील पीएचडी धारक ६१ वेगवेगळ्या व्यावसायिक श्रेणींमध्ये काम करत आहेत. संप्रेषण, व्यवस्थापन आणि नेतृत्व ही कौशल्य मार्च ते जुलै २०२० दरम्यान नोकरीच्या जाहिरातींमध्ये दिसणारी प्रमुख कौशल्ये होती. समस्या सोडवणे, समूह कार्य आणि गंभीर विचारांसोबतच, ही लवचिक कौशल्ये ८४% रोजगार जाहिरातींमध्ये दिसतात. मानसशास्त्रज्ञांकडे नोकरीच्या क्षेत्रात अनेक भौगोलिक पर्याय आहेत - लोक जिथे राहतात तिथे मानसशास्त्रज्ञांची आवश्यकता असते. परवानाधारक मानसशास्त्रज्ञांची संख्या सद्य स्थितीत वाढत आहे. मानसिक आजारांचे प्रमाण जास्त आहे परंतु आजार असलेल्या रुग्ण संखेच्या तुलेनत परवानाधारक मानसशास्त्रज्ञांची संख्या कमी आहे. मानसशास्त्रातील पीएचडी धारकांसाठी अनेक व्यवसायात संधी उपलब्ध आहे. त्यात प्रमुख मानसशास्त्रज्ञ आणि प्राध्यापक हे दोन पर्याय आहेत. या शिवाय ते समुपदेशक, उच्च-स्तरीय व्यवस्थापक

आणि प्रशासक, इतर व्यवस्थापनाशी संबंधित व्यवसाय, वैद्यकीय / आरोग्य सेवा व्यवस्थापक, आरोग्य अभ्यासक, कर्मचारी प्रशिक्षण आणि कामगार संबंध विशेषज्ञ अशा अनेक क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य संकट

ज्यांना मदतीची गरज आहे अशा लोकांना मदत करण्यासाठी आणि कोविड-१९ या व्यापक संकट टाळण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी आता साधनात्मक कार्य करणे आवश्यक झाले आहे. पॉल मर्की/अनस्प्लॅश ७ मानसशास्त्रीय संघटना (APA) च्या २०२० स्ट्रेस इन अमेरिका सर्वेक्षण ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केले आहे की, अमेरिकन लोक कोविड-१९ साथीच्या आजाराने खूप प्रभावित झाले आहेत आणि राजकीय संघर्ष, वर्णद्वेषाचा प्रभाव आणि आर्थिक मंदी यासह तणाव निर्माण करणाऱ्या इतर घटकांचा सामना करण्यासाठी संघर्ष करत आहेत. ज्यामुळे पुढील वर्षांत गंभीर आरोग्य आणि सामाजिक समस्या होऊ शकतात. या सर्वेक्षणात असे आढळून आले की, जवळजवळ ७८% प्रौढ लोक म्हणतात की कोरोनाव्हायरस महामारी हा त्यांच्या जीवनातील तणावाचा एक महत्त्वपूर्ण स्रोत आहे. ६३% प्रौढ लोक म्हणतात की अर्थव्यवस्था हा तणावाचा एक महत्त्वपूर्ण स्रोत आहे, जो २००८ च्या मंदीच्या (६९%) दरम्यान नोंदवलेल्या पातळीच्या जवळ आहे. ५९% प्रौढ, वंशाची पर्वा न करता, असा सांगतात की अल्पसंख्याकांवरील पोलिसांचा हिंसाचार हा त्यांच्या जीवनातील तणावाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. ३३% भेदभाव त्यांच्या जीवनातील तणावाचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणून सांगतात. यात सकारात्मक बाब म्हणजे असंख्य तणाव असूनही, ७१% अमेरिकन लोक म्हणतात की त्यांना त्यांच्या भविष्याबद्दल ते आशावादी आहेत.

मानसिक आरोग्य आणि अमेरिकन मानसशास्त्रीय संघटना

मानसशास्त्रीय संघटना (APA) कोविड-१९ मदत योजनांमध्ये मानसिक आरोग्य आणि मनोसामाजिक सेवांच्या मोठ्या स्तरांचा समावेश करण्यासाठी प्रयत्न करीत आहे आणि नर्सिंग होम रहिवासी, मूळ अमेरिकन आणि इतर प्रतिष्टीत लोक समाजातील असमानता दूर करण्यासाठी आमदारांवर दबाव आणत आहे. जुलै २०२० मध्ये सिनेटच्या नेतृत्वाला पत्र, उदाहरणार्थ, एपीएने काँग्रेसला पुढील मदत पॅकेजमध्ये मानसिक आणि वर्तणुकीशी संबंधित आरोग्यासाठी "मजबूत समर्थन" देण्यास सांगितले. मानसशास्त्रीय संघटना (APA) वृद्ध प्रौढांवर कोविड-१९ चे मानसिक परिणाम देखील दर्शवीत आहेत. एक उदाहरण म्हणून, मानसशास्त्रीय संघटना (APA) ने जून २०२० मध्ये सिनेटच्या सुनावणीत संशोधन-आधारित साक्ष सादर केली ज्यामध्ये सामाजिक विलगीकरण आणि एकाकीपणामुळे लोकांच्या दीर्घकालीन आरोग्याला कसे हानी पोहोचते आणि मानसशास्त्रज्ञ लोकांची लवचिकता कशी वाढवू शकतात याचे वर्णन केले.

दूरध्वनी मानसिक स्वस्थ्य सेवा

एप्रिल २०२० मध्ये, अमेरिकन मानसशास्त्रीय संघटना (APA) ने मानसशास्त्रज्ञ आणि त्यांच्या रूग्णांसाठी दूरध्वनी औषधोपचार सेवांमध्ये वाढ करून मोलाचे कार्य केले आहे. विशेषत: सेंटर्स फॉर मेडिकेअर अँड मेडिकेड सर्व्हिसेस (CMS) ने तात्पुरते वैदीकिय क्षेत्रातील निर्बंध उठवून रुग्णांना त्यांच्या घरांसह कोणत्याही ठिकाणी वैद्यकीय सेवा मिळू शकतील अशी व्यवस्था केली आहे. याव्यतिरिक्त, CMS ने काही दूरध्वनी मानसिक स्वास्थ्य सेवांचे क्षेत्र ही विस्तारित केले आणि काही नियम तात्पुरते शिथिल केले जेणेकरून महामारीच्या काळात मानसशास्त्रज्ञ त्यांच्या बहुतेक वैशिष्ट्यपूर्ण सेवा केवळ ऑडिओ टेलिफोनद्वारे प्रदान करू शकतील अशी व्यवस्था केलेली आहे. अमेरिकन मानसशास्त्रीय संघटने (APA) ला या प्रथा महामारी नंतर ही चालू ठेवायची आहे, म्हणून अमेरिकन मानसशास्त्रीय संघटना (APA) आताऔषधोपचार आणि स्वयं विमा योजना या दोन्ही योजनांची मागणी करत आहे जेणेकरून दूरध्वनी मानसिक स्वस्थ्य सेवा कायमस्वरूपी विस्तारित करता येतील.

उद्योगकर्त्यांचा मानसिक स्वास्थ्यला वाढता पाठींबा

मानसिक आरोग्य सेवा पुरविणाऱ्या लिरा हेल्थ आणि नॅशनल अलायन्स ऑफ हेल्थकेअर पर्चेजर कोलिशन यांच्या सर्वेक्षणानुसार कोविड-१९ या महामारीच्या काळात २/३ कामगारांनी निम्न दर्जाच्या मानसिक स्वास्थ्याचा कार्यनिरवर्तनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे आणि ४०% कर्मचारी अतिताणाचा सामना करत आहेत, असे

दर्शीविले आहे. काही कर्मचारी आर्थिक अनिश्चिततेमध्ये अथकपणे काम करत आहेत. दरम्यान, कोविड-१९ या महामारीच्या काळात वर्क फ्रॉम होमवर भर देण्यात आला परंतु घरून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य ताण ओळखणे कठीण पर्यवेक्षकांना शक्य नसते, जेंव्हा कर्मचारी कार्यालयात असतात तेंव्हा ते एकमेकांना भेटायचे, संवाद साधयचे परंतु आता त्यांच्यात संवाद राहीला नाही. आज कार्यस्थळी कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याकडे अधिक लक्ष देणे हा एक महत्वाचा भाग बनत आहे. सद्य स्थितीत उद्योगकर्ते कर्मचाऱ्यातील ताण ओळखता यावा यासाठी सॉफ्टवेअर प्रशिक्षण कार्यक्रम आणि डिजिटल साधनांमध्ये गुंतवणूक करत आहेत.

निष्कर्ष

२१ व्या शतकात, मानसशास्त्रज्ञांनी त्यांचे लक्ष मानसशास्त्राच्या वर्तनात्मक दृष्टीकोनाकडून बोधात्मक दृष्टीकोनाकडे वळवले. मानसशास्त्रज्ञांचे लक्ष प्रायोगिक अभ्यासाकडून तर्कशुद्ध विचार आणि ज्ञान मिळवण्याच्या इतर पद्धतींकडे वळले ज्यामध्ये तर्क, स्मृती, अवधान आणि भाषा अशा बोधनिक प्रक्रियांचा समावेश होतो. मानसशास्त्रातील सर्व प्रचलित प्रवाह नवीन मानसशास्त्रज्ञांसाठी खूप अनुकूल आहेत आणि यातून त्यांना अनेक संधी उपलब्ध होतील. जेथे मानव आहे तेथे मानसशास्त्राची आवश्यकता आहे. सद्य स्थितीत कोविड १९ परिस्थितीनंतर व्यक्तींचे मानसिक आरोग्य राखण्यासाठी मानसशास्त्रज्ञ महत्वाची भूमिका बाजवताना दिसतात. मानसिक स्वास्थ्यावरच शारीरिक स्वास्थ्य अवलंबून असते. कोविड १९ परिस्थितीनंतर ताण, चिंता, निराशा, वैफल्य, निराशावाद इत्यादी अशा समस्यांशी समायोजन करण्यासाठी मानसशास्त्र आणि नोंदणीकृत मानसशास्त्रज्ञांची नितांत आवश्यकता आहे.

संदर्भ

1. Goodwin, C. J. (2004). *A history of modern psychology.* Hoboken, NJ: Wiley.
2. American Psychological Association (2021). *Monitor on Psychology*, Retrieved from https://www.apa.org/members/content/2021-trends-report.pdf
3. American Psychological Association. (2006). *About APA.* Retrieved from http://www.apa.org/about/

कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा. डॉ. नागनाथ महादेव अदाटे
सहाय्यक प्राध्यापक वाणिज्य विभाग शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब,ता. कळंब, जि. उस्मानाबाद

प्रस्तावना :

"भारतीय अर्थव्यवस्था एक विकसनशील अर्थव्यवस्था समजली जाते. 1991 च्या नवीन आर्थिक धोरणानुसार आर्थिक सुधारणा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला गेला. त्यानुसार भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धीदर वाढण्यास मदत झाली. खाऊजा धोरणानुसार अर्थव्यवस्थेवरील सरकारी नियंत्रणे कमी झाली. भारतीय अर्थव्यवस्थेत सरकारी नियंत्रणे कमी झाली. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी, उदयोग व सेवा क्षेत्राचे महत्त्व असल्याचे दिसून येते. आर्थिक विकासात या क्षेत्राचा वाटा महत्त्वाचा आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार निर्मितीत या क्षेत्रामुळे वाढ झाल्याची दिसते. याशिवाय भारताच्या विदेशी व्यापारात देखील कृषी, उदयोग व सेवा क्षेत्रामुळे वाढ झाल्याची दिसते. प्रस्तुत शोध निबंधात कृषी, उदयोग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा आढावा घेण्यात आला आहे.

संशोधनाचे उद्देश :

1.कृषी क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम जाणून घेणे.

2.उद्योग क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा आढावा घेणे.

3.सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम जाणून घेणे.

शोध निबंधाचे गृहिते :

1.कृषी, उदयोग व सेवा क्षेत्राच्या विकासामुळे रोजगार निर्मितीत वाढ झाली आहे.

2.कृषी, उदयोग व सेवा क्षेत्रामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झालेली दिसते.

3.कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रामुळे भारताच्या आर्थिक विकास दरात वाढ झाली आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिक, वर्तमानपत्र, इत्यादीचा गरजेनुसार वापर करण्यात आला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेची वर्तमान स्थिती :

भारतीय अर्थव्यवस्था एक विकसनशील मिश्र अर्थव्यवस्था आहे. जगातील मोठी सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. शिवाय ती जगात तिसऱ्या क्रमांची (Purchasing Power Parity) मोठी अर्थव्यवस्था आहे. 1991 च्या नवीन आर्थिक धोरणानुसार शिथिलकरणामुळे भारताचा आर्थिक वृदधीदर 6 ते 7% सरासरी असल्याचे दिसून येते. जगातील सर्वात वेगाने वृद्धीदर साध्य करणारी अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत आहे. 2016 भारताच्या GDP मध्ये कृषीचा वाटा 17.32% उदयोगाचा 29.02% आणि सेवा क्षेत्राचा 53.66% वाटा राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला. भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण 21.2% आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक 0.624 आहे. भारतातील एकूण उपलब्ध मनुष्य बळापैकी कृषी क्षेत्रात 47% उदयोगात 22% व सेवा क्षेत्रात 31% मनुष्यबळ गुंतलेली दिसून येतात. भारतातील एकूण ग्रामीण लोकसंख्येपैकी 5.1% लोकसंख्या व नागरी भागात 4.9% लोकसंख्या बेरोजगारीच्या अवस्थेत जीवन जगत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कापड उदयोग, अन्न प्रक्रिया उद्योग, सिमेंट उदयोग, पेट्रोलियम, सॉफ्टवेअर औषधी उदयोग, वाहतुकीचे अवजारे उदयोग, इत्यादी प्रमुख उद्योग आहेत.

कृषीक्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम :

भारतासारख्या अल्पविकसित अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका महत्वाची मानली जाते. अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व ठळकपणे दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेवर कृषीचा झालेला परिणाम पुढीलप्रमाणे दाखवता येईल.

1. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा :

राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा भारतात प्रगत राष्ट्रापेक्षा जास्त आहे. 2011-2012 च्या किमतीनुसार 2015-2016 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी व अनुशंगिक क्षेत्राचा वाटा 17.32% एवढा होता. CSO च्या आकडेवारीनुसार 1950-51 आणि 1960-61 या दरम्यान सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये (GDP) कृषीचा वाटा 52 ते 55% दरम्यान होते. औद्योगिकरण आणि आर्थिक विकासामुळे हा वाटा घटल्याचे दिसून येते.

2. रोजगार निर्मिती :

कृषी व्यवसायामुळे भारतातील उदयोग, व्यापार आणि दळणवळण या क्षेत्रांना भरीव मदत झाली. प्रक्रिया, उद्योग, साखर, सुती कापड, ताग, चहा, कॉफी इत्यादी उदयोग शेतीतील कच्चया मालावर अवलंबून आहेत. शेती व उदयोग यांच्या परस्पर संबंधामुळे भारतात रोजगारात वाढ झाल्याचे दिसते. 1981 मध्ये सरासरी 69% श्रमीक कृषी आणि कृषी संलग्न क्षेत्रात कार्यरत होते. 1991 मध्ये हे प्रमाण 68% राहीले 2001 मध्ये हे प्रमाण कमी होऊन् 58% एवढे झाले आजही 47% रोजगार शेती व्यवसायातून निर्माण होतो.

3. बाजारपेठांचा विस्तार :

भारतातील ग्रामीण भागात वास्तव्य करणारी लोकसंख्या मोठी आहे. या लोकांच्या खरेदी शक्तीत वाढ होत आहे. त्यामुळे औदयोगिक क्षेत्रात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तूंच्या मागणीत वाढ होत असल्याची दिसते. कृषी अवजारांची मोठी बाजारपेठ कृषी क्षेत्र आहे. या व्यतिरिक्त कापड, चहा, साबण, सायकल, मोटारसायकल, दूरचित्रवाणी संच, खाद्यपदार्थ यासारख्या मोठी बाजारपेठेत कृषीक्षेत्रात उपलब्ध झाली आहे.

4. उद्योग क्षेत्रासाठी कच्चा मालाचा पुरवठा :

भारतीय शेती ही देशातील अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांचा आधार मानली जाते. सुती कापड, साखर, चहा, कॉफी, रबर, तेल प्रक्रिया उद्योग, इत्यादी उदयोग कच्चया मालासाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून असतात. लघु उदयोगामध्ये तांदूळ, गहू, तेल, दाळी इत्यादी उदयोगासाठी शेतीतून कच्चा माल उपलब्ध होतो. शेतीमध्ये चांगले उत्पादन झाल्यास शेतकऱ्यांची खरेदी शक्ती वाढते. त्यामुळे औदयोगिक वस्तूंची देखील मागणी वाढते. यातून औद्योगिक प्रगतीला चालना मिळते.

5. किमतीतील स्थैर्य :

अन्नपुरवठा व कच्चा माल याचा पुरवठा वेळेवर झाल्यास किमतीतील स्थैर्य राखण्यास मदत होते. अन्नधान्याचा पुरवठा ज्या-ज्या वेळेस अपुरा असतो, त्या-त्या वेळेस अन्नधान्याच्या किमती झपाट्याने वाढतात. त्याचप्रमाणे कच्चया मालाचा पुरवठा अपुरा असल्यास त्यांच्या किमती वाढतात. भारतात किंमतस्थैर्य प्रस्थापित करण्यास कृषीक्षेत्र महत्वाचे ठरलेले दिसते.

6. अन्नधान्यांचा पुरवठा :

भारतातील लोकसंख्येत सतत वाढ होत आहे. परिणामी वाढत्या लोकसंख्येच्या पोषणाकरिता अन्नधान्याची आर्थिक उपलब्धता करावी लागते. ही जबाबदारी कृषीक्षेत्राकडून पार पाडली जाते. हरित क्रांतीनंतर अन्नधान्याच्या उत्पादनात भरीव वाढ झाल्याची दिसते. अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतः साध्य करता आली.

7. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास :

कृषी क्षेत्राच्या विकासामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास झाल्याचे दिसते. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य व काळजीपूर्वक पद्धतीने वापर करून कृषीवर आधारित असणाऱ्या लघु व कुटीर उद्योगांचा विकास झालेला आहे.

8. ग्रामीण जनतेच्या राहणीमानात वाढ :

कृषी क्षेत्राच्या विकासामुळे ग्रामीण जनतेच्या राहणीमानात वाढ झाल्याची दिसते. भारतीय शेतीची दरहेक्टरी उत्पादकता वाढत असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. अन्नधान्याच्या पीकासोबतच व्यापारी पीके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. परिणामी उत्पन्नात वाढ झाल्याची दिसते.

9. विदेशी व्यापारातील वाटा :

अंतरराष्ट्रीय व्यापारात भारतीय कृषीक्षेत्र महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. निर्यात होणाऱ्या वस्तूमध्ये कृषीतून उत्पादित झालेल्या वस्तूंचा समावेश मुख्यत: आढळूतो. उदा. चहा, कॉफी, काजू, सुती वस्त्र, तंबाखू,

खादयतेल, मसाल्याचे पदार्थ, फळे, इत्यादींची निर्यात होते. नियोजनाच्या काळात भारताच्या निर्यात व्यापारामध्ये यंत्रोत्पादित व अपरंपरागत वस्तुचे महत्व वाढत असल्यास दिसते.

उद्योग क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम :

देशाचा विकास जसा कृषीवर अवलंबून आहे. जलद गतीने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी उदयोगधंदयाची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नियोजनाच्या काळात उदयोगांच्या स्थापनेकडे व विकासाकडे लक्ष देण्यात आले. पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत लोहपोलाद उदयोग, रसायन उदयोग, मशीन, अवजारे आणि इंजिनिअरिंग उदयोग, इलेक्ट्रॉनिक उदयोग, पेट्रोकेमिकल्स इत्यादी उद्योग सुरू केल्यामुळे औद्योगिक उत्पादनात वाढ झाल्याची दिसते. उद्योग क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम पुढीलप्रमाण दाखवता येईल.

1. कृषी विकासाला प्रोत्साहन :

भारतातील उद्योगामुळे कृषी क्षेत्राच्या विकासाला मदत झाली आहे. कृषीला लागणारे यंत्र, तंत्र, खते, बियाणे उदयोगाकडून प्राप्त होते. त्यामुळे कृषी विकासाला चालना मिळते.

2. रोजगार निर्मितीस चालना :

भारतातील ग्रामीण भागात सर्वाधिक लोकसंख्या वास्तव्य करते. कृषी क्षेत्रात सर्वांनाच रोजगार उपलब्ध होत नाही. उदयोगातून रोजगार पुरविला जातो. मोठे उदयोग, लघु उदयोग, कुटिरोदयोग व अतिलहान उदयोगातून लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

3. दारिद्र्य निवारण :

भारतातील औदयोगिकीकरणामुळे रोजगार संधीत वाढ झाली आहे. रोजगार मिळाल्यामुळे उत्पन्नात वाढ झाली. लोकांच्या बचत पातळीत, गुंतवणूकीत वाढ झाली. त्यामुळे दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली.

4. विकास प्रक्रियेला गती :

विविध उद्योगाची स्थापना झाल्यामुळे वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे राहणीमान उंचावले. लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झालेली दिसते. त्यामुळे विकास प्रक्रियेला गती मिळाली.

5. समतोल प्रादेशिक विकास :

भारतामध्ये औद्योगिक धोरण प्रभाविपणे राबवून उद्योगांचे विकेंद्रीकरण केले जात आहे. मागासलेल्या भागात नवे उद्योग सुरु करण्यावर भर देण्यात येत आहे. समतोल प्रादेशिक विकासासाठी लघुउदयोग, कुटीरोदयोग, हस्तोद्योग, इत्यादींना प्रोत्साहन देण्यात आले.

6. निर्यातीत वाढ :

उदयोगांमुळे परकिय व्यापारात वाढ होवून आर्थिक विकासाला गती मिळत आहे. आयात कमी करून निर्यात प्रोत्साहन धोरण राबविले जात आहे. निर्यात रचनेत, दिशेत बदल घडून आला आहे. निर्यातीद्वारे दुर्मिळ असे विदेशी चलन मिळत आहे. वरीलप्रमाणे उदयोगाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्याचे दिसतात. उद्योगामुळे जनतेला विविध वस्तूचा मुबलकपणे उपभोग घेता येत आहे. औदयोगिकीकरणामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. बचत, भांडवल, गुंतवणूक इत्यादी साधने उपलब्ध होऊन सरकारला कर रूपाने उत्पन्न प्राप्त होत आहे. यामुळे भारताचा आर्थिक विकास होत आहे.

सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम :

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्र विस्तारत आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे. सेवा क्षेत्रात देशात उत्पादन होणाऱ्या सर्व प्रकारच्या उत्पादक सेवांचा समावेश होतो. व्यापार, दळणवळण, वाहतूक, बँका आणि वित्त व्यवहार, विमा, आरोग्य शिक्षण आणि सामाजिक तसेच वैयक्तिक सेवांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो. कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र परस्परांना स्पर्धक नसून सहाय्यक असतात. सेवा क्षेत्र हे कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या विकासाला हातभार लावते. भारतीय अर्थव्यवस्थेवर सेवा क्षेत्राचा झालेला परिणाम पुढीलप्रमाणे दाखवता येईल.

1. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा :

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्र महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा जवळपास 53.66% आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला वेग आल्यानंतर अर्थव्यवस्थेचे सेवा क्षेत्रावरील अवलंबित्व वाढत आहे.

2. रोजगार पुरवठा :

भारतात आर्थिक विकासाला प्राधान्य देवून सेवा क्षेत्र विकसित होत आहे. सेवा क्षेत्राच्या विकासामुळे कृषीवरील लोकसंख्येचा भार कमी होत आहे. सेवा क्षेत्रात रोजगारीच्या नवीन संधी उपलब्ध होत आहे. भारतात एकूण रोजगाराच्या 31% रोजगार सेवा क्षेत्राने पुरविला आहे.

3. कृषीच्या दरडोई उत्पादकतेत वाढ :

शेती सेवा क्षेत्र विकसित झाल्यास कृषीच्या दरडोई उत्पादकतेत वाढ झाल्याची दिसते. सेवा क्षेत्रात कुशल व अर्धकुशल रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. कृषीवरचा लोकसंख्येचा भार कमी होत आहे. परिणामी उत्पादकता वाढण्यास मदत झाली.

4. आधारभूत सोयी सुविधेत वाढ :

देशात सेवा क्षेत्राचा विकास होत असल्याने रस्ते, रेल्वे, वीज, पाणीपुरवठा, संदेशवहन, शिक्षण, आरोग्य, वित्तीय संस्था इत्यादीमध्ये प्रचंड वाढ झाल्याची दिसते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळत आहे. थोडक्यात नियोजनाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रात गुंतवणूक केल्यामुळे सेवा क्षेत्राच्या विकासात वाढ झाल्याची दिसते. सेवा क्षेत्राच्या विकासामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होताना दिसते.

5. उदयोगाच्या विकासात हातभार :

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राच्या विस्तार व विकासामुळे उद्योगाचा विकास झाला. उद्योगासाठी वित्तीय सेवा, वाहतूक व दळणवळण सेवा, आरोग्य सेवा, शैक्षणिक सेवा इत्यादी सेवा या क्षेत्राकडून पुरविल्या जात आहेत. त्यामुळे औदयोगिक क्षेत्राच्या विकासात सेवा क्षेत्राची भूमिका वाढत आहे.

6. साक्षरतेत वाढ :

सेवा क्षेत्र विकसित होत असताना अकुशल रोजगाराच्या तुलनेत कुशल व तांत्रिक रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. त्यामुळे देशातील नागरिक शिक्षण व प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करतात. परिणामी शिक्षणाचे प्रमाण वाढून साक्षरतेत वाढ होत आहे.

7. वित्तीय संस्थाच्या संख्येत वाढ :

भारतात सेवा क्षेत्र विकसित होताना ग्रामीण भागात सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, टपाल कार्यालय यासारख्या संस्थाचा विकास होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना हळूहळू बँकविषयक सवयी लागत आहेत. परिणामी, भांडवलाचे एकविकरण व पुरवठा होऊन कृषी, व्यापार व उद्योगधंदे यामध्ये वाढ होत आहे.

निष्कर्ष :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने भारताच्या जलद आर्थिक, औद्योगिक, सामाजिक व राजकीय विकासासाठी नियोजनाचा मार्ग अंगीकारला. जाणीवपूर्वक कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यात आली. याचा परिणाम म्हणून भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात भरिव वाढ झाली. सर्व क्षेत्राच्या उत्पादकतेत व स्पर्धात्मक शक्तीत वाढ झाली. देशामध्ये उपभोग्य व औद्योगिक वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली. देशातील उत्पन्न, बचत, गुंतवणूक, रोजगार, विदेशी व्यापार यात वाढ झाल्याची दिसते.

संदर्भग्रंथ :

1. कृषि अर्थशास्त्र : डॉ वसुधा पुरोहित 2016.
2. भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. सुखदेव खंदारे (जून 2013)
3. भारतीय अर्थव्यवस्था : प्रतियोगिता साहित्य (2012-13).
4. औद्योगिक अर्थशास्त्र : प्रा. रायखेलकर, डॉ. दामाजी (जून 2011)
5. भारतीय अर्थव्यवस्था : डॉ देसाई व डॉ. भालेराव (जून 1998)
6. भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अभ्यास : डॉ. जी. एम. झामरे
7. Indian Economy : Agrawal A. N.

कोरोना काळ व साहित्याचे बदललेले स्वरूप

डॉ. भास्कर गायकवाड

मराठी, विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा

EMAIL_bhilori24@gmail.com

कोरोनाने जगातील माणसांच्या जीवन जगण्याची दिशाच पूर्णपणे बदलून टाकलेली आहे. जागतिक पातळीवर वेगवेगळ्या देशांचे जे आंतरराष्ट्रीय संबंध आहेत त्यांची समीकरणे कोरोना नंतर फारच बदललेली आहेत, आणि त्यात रशिया- युक्रेन युद्धाने अधिकच भर घातलेली आहे. या बदलत्या जगाचा व्यवहार एखाद्या वेगळ्याच भाषेत होईल असे आज वाटू लागले आहे. वर्क फ्रॉम होम, लर्न फ्रॉम होमच्या माध्यमातून कामे होऊ लागली आहेत. संवाद साधण्याची प्रक्रिया ही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून होईल यात शंका नाही. या विषयाला अनुसरून या शोधनिबंधाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

सुशिक्षित माणूस आपल्या एकटेपणा दूर करण्यासाठी साहित्याचा आधार घेतो. किंवा आपला एकटेपणा कमी करण्यासाठी साहित्य आपल्याला वास्तवापासून थोडं दूर घेऊन जाते. ही परिस्थिती कोरोना काळात बऱ्याच लोकांनी अनुभवली. कोरोना सारखेच विविध आजार पूर्वीच्या काळीही होऊन गेलेत. ते कसे निर्माण झाले होते याबद्दलची बरीचशी माहिती काही ग्रंथामध्ये आलेली दिसते. अशी पुस्तके गेल्या दोन अडीच वर्षाच्या काळात अधिक प्रमाणात वाचली गेलेली दिसतात. ग्रंथरचना ही समाजाला शहाणे करण्याचे काम करते. कोरोना कालखंडात आजारांची उत्पत्ती कशी झाली? त्यावर काय उपाय करता येऊ शकतो? याबद्दलची भरपूर माहिती पाहावयास मिळते आणि अशा ग्रंथांची निर्मिती होणे हे फार पूर्वीपासून चालू आहे. मध्ययुगीन कालखंडात विज्ञान आणि गणित यांचा फार प्रसार जगात झाला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे एस फ्रेडरिक यांनी लिहिलेला "लाॅस्ट एन्लायटनमेंट" हा ग्रंथ होय. ब्रिटीश लेखक डॅनियल डेपो यांनी १७२२ मध्ये लिहिलेले पुस्तक "ए जर्नल ऑफ द प्लेग इयर" यात १६६५ साली लंडनमधील प्लेगच्या साथीने चे वर्णन आलेले आहे. त्या वेळेची लंडनमधील परिस्थिती आणि आजची कोरोनाची परिस्थिती जवळजवळ सारखीच आहे. अल्बर्ट कामो यांच्या "दि प्लेग" या पुस्तकात सुद्धा अल्जेरिया मधील 'ओरां' या शहराचे वर्णन आलेले आहे. प्लेगची साथ तिथे किती भयानक पसरलेली होती याचे चित्रण या पुस्तकात आलेले आहे. ब्रिटिश लेखिका कॅथरीन एन पोर्टर यांनी "pale Horse ,Pale Rider" या कादंबरीत स्पॅनिश प्लूच्या आगमनाचे चित्रण केले आहे. १९१८ सालचे हे चित्रण आहे. २०१४ मध्ये प्रकाशित झालेली "एमिली सेंट" ही जॉन मंडेल यांची कादंबरी एका संसर्गजन्य आजारावर आधारित आहे. ज्याची सुरुवात जाॅर्जियापासून होते. गेल्या अडीच वर्षांपासून 'कोरोना' या महाभयंकर रोगाचे सावट संपूर्ण जगावर आहे. या संदर्भातही अलीकडे बरेच ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. २००२ मध्ये सार्स, २०१२ मध्ये मदर्स, २०१४ मध्ये इबोला, २०१९ मध्ये कोरोना यासारखे विविध आजार जागतिक

पातळीवर पसरलेले दिसतात. या आजारावर आधारित विविध ग्रंथरचना निर्माण झाली आणि वाचकवर्गाने उत्सुकतेपोटी ही ग्रंथरचना वाचलेली दिसते. समकालीन प्रकाशनाने प्रकाशित केलेले व गौरी कानेटकर यांनी लिहिलेले "जग थांबते तेव्हा... लाॅकडाऊन काळातल्या नोंदी" चार महिन्याच्या नोंदी असलेले हे पुस्तकही फार महत्त्वाचे आहे. कोरोना संकटावर आधारित लेखसंग्रह "हरवू या कोरोनाला" हा सौ. भारती दिलीप सावंत यांचा ग्रंथ फार सुंदर शब्दात त्यांनी कोरोना संकटाचे चित्रण केलेले आहे. संजय येरणे यांची प्रस्तावना या कोरोना काळातील परिस्थितीला फारच अनुरूप अशी आहे. "वर्क फ्रॉम होम" हा कोरोनामुळे झालेला फार मोठा बदल आहे. आपल्याला वाटत होते की, हा तात्पुरता बदल आहे. पण जागतिक पातळीवर आता हा विचार होऊ लागला आहे की घरून कशी कामे करता येऊ शकतील. २०१५ मध्ये फेसबुकने "लाईव्ह" ची सुविधा उपलब्ध करून दिली होती. मार्क झुकेरबर्ग यांच्या या संकल्पनेला त्यावेळी चंगळवाद म्हणून हिणवले गेले. परंतु झुकेरबर्ग यांनी आपल्या तंत्रज्ञांना सोबत घेऊन काम चालू ठेवले आणि एप्रिल २०१६ मध्ये अँड्रॉइड मोबाईलचा शोध लागला. आणि कोरोना काळात सर्वच क्षेत्रात तो उपयोगी सिद्ध झालेला दिसतो.

प्रसारमाध्यमांमुळे सर्वच भाषा बदलून गेलेल्या आहेत. वाक्यात अल्पाक्षरत्व, चिन्हांची भाषा, इंग्रजी, मराठी, हिंदी व चिन्हांकित अशी मिश्रित भाषा, हल्लीच्या तरुण पिढीने ही भाषा स्विकारलेली दिसते. बदलत्या तंत्रज्ञानाचा परिणाम हा सर्वच घटकावर झालेला दिसून येतो. एकीकडे तंत्रज्ञानाने देश विकसित होत आहेत, हे जरी खरे असले तरी, तंत्रज्ञान हे एक दुधारी शस्त्र आहे हे विसरता येणार नाही. मराठी साहित्यापुरता विचार केला तर ब्लॉग लेखन, फेसबुक, व्हाट्सअप, याचा वापर अधिक होत आहे आणि लोक पुस्तकांकडे वळताना दिसत नाहीत. पुस्तकांचा वाचकवर्ग कमी झाल्यामुळे पुस्तक प्रकाशनाकडे लोकांचा कल राहिलेला नाही. असे दिसते. ऑनलाईन पुस्तके उपलब्ध होत असल्यामुळे, सोशल मीडियाच्या अधिक वापरामुळे पुस्तके खरेदीचा वेग मंदावलेला दिसतो. हे कोणीही नाकारू शकत नाही. हे जरी खरे असले तरी वाचनसंस्कृती समृद्ध करण्यासाठी डिजिटलायझेशनची कास धरली पाहिजे हे नक्की.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी मराठीभाषिक प्रयत्नशील आहेत. नवीन तंत्रज्ञानामध्ये मराठी भाषेचा वापरही होऊ लागलेला आहे. मराठी भाषीक मोठा वर्ग जो मातृभाषेतून व्यक्त होऊ इच्छितो, त्याने उपयुक्त समाज माध्यमांवर हळूहळू आपले वर्चस्व गाजवायला सुरुवात केलेली आहे. मोबाईल आता खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेला आहे. मोबाईलच्या वापरामुळे बरेच अडाणी लोक सुद्धा इंग्रजी शब्दांचा वापर करू लागले आहेत. इंग्रजी ही ज्ञानभाषा असली तरी ते ज्ञान मातृभाषेत, मराठी भाषेत उपलब्ध होऊ लागले आहे, कोणतीही व्यक्ती मातृभाषेतूनच व्यक्त होऊ शकते. समाज माध्यमांचा मराठी भाषेवरच नाही तर सर्वच भाषेवर परिणाम झालेला दिसतो. सर्वच भाषा झपाट्याने बदलताना दिसत आहेत.

कोरोना काळात 'कविता' हा वांड:मय प्रकार अधिक लिहिला गेला, कारण तो लवकर निर्माण होणारा वाड:मय प्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक यांचा पट थोडा मोठा असतो त्यामुळे त्याला वेळ लागू शकतो. मराठी साहित्यात नवीन शब्दांची भर पडलेली आहे. शब्द इंग्रजी असले तरी सर्वांच्या परिचयाचे असल्याने साहित्यनिर्मितीतही सहज सोपी झाली आहे. पॉझिटिव्ह, निगेटिव्ह, मास्क, काॅरनटाईन, सॅनिटायझर, कोव्हिड, व्हॅक्सीन, कोविशिल्ड असे शब्द आज सहज उल्लेखिले जात आहेत. कोवीडच्या काळात नियतकालिके पीडीएफ स्वरूपात निघालीत. प्राथमिक शाळेपासून तर विद्यापीठ स्तरापर्यंत ऑनलाइन शिक्षण घेतले गेले. लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर वस्तुनिष्ठ प्रश्नांचा पॅटर्न राबविला गेला. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल झाले आहेत. हे कोणीही नाकारू शकणार नाही.

कोरोना काळात शहरात काम करून पोट भरणाऱ्या अनेक लोकांनी शहरे सोडली. वाहने बंद असल्याने मजूर, कामगारांनी आपल्या गावाचा शेकडो किलोमीटरचा प्रवास पायी केला. पायी प्रवासादरम्यान अनेक दु:खद घटना घडल्या. अनेक सेवाभावी संस्थांनी रस्त्याने पायपीट करत घर गाठू इच्छिणाऱ्या लोकांना मदतीचा हात दिला हे सर्व येणाऱ्या काळात कोणत्याना कोणत्या साहित्य प्रकारात उमटणार आहे. निर्माण झालेल्या साहित्यामुळे वाचकाला धीर, आधार, बळ प्राप्त झाले पाहिजे एवढं मात्र नक्की. कारण सुखापेक्षा दु:खाची वेदना जास्त परिणामकारक असते.

सोशल मीडिया मध्ये अल्पाक्षरी शब्दांचा वापर हा अधिक प्रमाणात केला जातो आणि त्यातही जेइंग्रजीचा वापर. न्यायालयाच्या क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी शब्दांना मराठी पर्याय असून सुद्धा ते वापरले जात नाहीत. या पाठीमागचे कारण म्हणजे, दिलेले पर्याय हे सहज उच्चारता येण्यासारखे नाहीत. संविधानातील तरतुदींना इंग्रजीत "आर्टिकल" हा शब्द आहे. मराठीत पर्याय म्हणून "अनुच्छेद" शब्द असून सुद्धा "कलम" हा शब्द सर्रास वापरला जातो. "न्यायालयीन स्थगनादेश" ऐवजी शहरी-ग्रामीण सर्वच लोक "स्टे" हा इंग्रजी शब्द सर्रास वापर करताना दिसतात. साहित्यामध्ये हा बदल येणाऱ्या काळात होणारच आहे. कोरोनाशी संबंधित असलेले बरेचसे शब्द जगातील सर्वच भाषेत जसेच्या तसे वापरले गेलेले पहावयास मिळतात. क्वारंटाईन, सॅनिटायझर, पॉझिटिव्ह, निगेटिव्ह यासारखे अनेक शब्द आहेत. भाषातज्ञ, भाषाभ्यासक, शासनाने निर्माण केलेले भाषाविषयक काम करणारे विभाग, त्यातील सल्लागार, खाजगी संस्था यांनी पुढे येऊन अशा इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द शोधण्याची आज गरज आहे.

प्रत्येकाला आपापल्या भाषेचा अभिमान असतो, आणि तो असावाही. वैद्यकीय शिक्षणाचे ज्ञान हे इंग्रजी भाषेतून दिले जाते असे म्हणतात. परंतु यातील तांत्रिक शब्द हे ग्रीक आणि लॅटिन भाषेत आहेत. मग आपल्यालाही आपल्या मातृभाषेत वैद्यकीय आणि अभियांत्रिकी ज्ञान का देता येऊ शकत नाही. मराठी भाषा वैज्ञानिक दृष्ट्या परिपूर्ण आहे फक्त इतर भाषेतील पर्याय देताना ते सोपे कसे होतील हे पाहिले पाहिजे.

कोरोनाने साहित्याचे स्वरूपच बदलून गेले आहे.कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, चरीत्र, कविता, यात नवीन शब्दांची भर आता पडणार आहे. माणसाच्या आयुष्यातील संवादाचे प्रमुख माध्यम भाषा आहे, आणि जागतिक पातळीवर ती जर बदलली तर मराठी भाषेलाही बदलावे लागणार हे तितकेच खरे आहे. त्यामुळे आपली मराठी भाषा जागतिक पातळीवर कशी मजबूत आणि समर्थ होईल हे भाषेच्या अभ्यासकांनी समजून घेणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची:-

१) कोरोना नंतरचे जग आणि मराठी- नीलेश बने

२) https://www.bbc.com.

३) https://www.orfonline.org.

भारताच्या आर्थिक विकासातील राजकोषीय तुटीचे महत्त्व

जाधव रूपाली[1] डॉ. गाडेकर बी. पी.[2]

सारांश : देशाचा योजनाबद्ध विकास घडवून आणण्यासाठी सरकारला प्रचंड प्रमाणात खर्च करावा लागतो. सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या पूर्ततेकरिता दरवर्षी खर्चाचे प्रमाण अधिक राहून उत्पन्न कमी स्वरूपाचे राहते. शासनाकडून खर्च केल्या जाणा-या पैशाच्या प्रचंड रक्कमेत अर्थव्यवस्थेतील एकूण आर्थिक उलाढालींचा आकार, वेग आणि त्यांची दिशा यामध्ये इष्ट ते बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य असते. यासाठी राजकोषीय तूट ही अर्थव्यवस्थेच्या जलद आर्थिक विकासासाठी खूप महत्त्वाची आहे हे आपणास स्पष्ट होते. सदरील शोधनिबंधासाठी राजकोषीय तुटीमुळे भारतासारख्या विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला दिशा प्राप्त होऊन राजकोषीय तुटीचे प्रमाण सतत वाढत आहे. अशी परिस्थिती गृहीत धरण्यात आली आहे. तसेच राजकोषीय तुटीचे आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून सकारात्मक बाजू मांडण्याचे उद्दिष्ट ठेवून प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला. सदरील शोधनिबंध विश्लेषणाकरिता द्वितियक माहितीचा आधार घेण्यात आला आहे. या संशोधनाअंतर्गत सन 2017 ते 2021 हा पाचवर्षाचा कालावधी निश्चित करून राजकोषीय तूटीचा आढावा घेऊन सदरील शोधनिबंधासाठी निष्कर्ष व शिफारशी सूचविण्यात आल्या आहेत. सन 2019-20, 2020-21 या दोन वर्षातील कोव्हिड-19 चा प्रतिकूल परिणाम वगळता इतर वर्षामध्ये निर्माण झालेल्या राजकोषीय तुटीचा सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येतो. राजकोषीय तुटीचे महत्त्व हे निर्माण झालेली तूट उत्पादक घटकावर खर्च केल्यामुळे निर्माण झाली, की अनुत्पादक घटकांवर खर्च केल्यामुळे निर्माण झाली यावर अवलंबून असते. निर्माण झालेली तूट उत्पादकीय घटकांवर असेल तर सरकारला त्यातून आदेय संपत्तीची निर्मिती होते जेणेकरून सरकारला ही तूट भरून काढण्यासाठी तुटीच्या अर्थभरण्यांची आवश्यकता भासत नाही. जर तूट अनुत्पादकीय घटकांमुळे निर्माण झाली असेल तर सरकारला झालेली तूट भरून काढण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करावा लागतो.या पार्श्वभूमीच्या आधारे प्रस्तुत संशोधकाने भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी तुलनात्मक विश्लेषणाद्वारे या शोधनिबंधात महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत.

सूचक शब्द : राजकोषीय तूट, बेरोजगारी, दारिद्र्य, आर्थीक वृद्धीदर

प्रस्तावना : राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगार पातळी यावरील प्रतिकुल परिणाम टाळण्यासाठी सरकार ज्या धोरणांनुसार आपल्या खर्च विषयक आणि महसुल विषयक कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करते त्या धोरणाला राजकोषीय धोरण असे म्हणतात. राजकोषीय धोरणाला दृश्य स्वरूप देण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद करावी लागते. ही तरतूद करत असताना सरकारचे उत्पन्न जेव्हा अपुरे ठरते तेव्हा सार्वजनिक कर्जाची उभारणी करून संबंधित धोरण पूर्ण करावे लागते. म्हणजेच काय तर सरकारी उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण अधिक असते. अशा परिस्थितीत सरकारच्या अंदाजपत्रकी व्यवहारांमुळे अर्थव्यवस्थेतील खरेदी शक्तीत होणारी निव्वळ वाढ म्हणजे राजकोषीय तूट असते. राष्ट्राच्या आर्थिक विकासाची गती वाढविण्याकरिता शासनाकडून केल्या जाणा-या तुटीमध्ये अर्थव्यवस्थेतील एकूण आर्थिक उलाढालींचा आकार, वेग व त्यांची दिशा यामध्ये इष्ट ते बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य असते.

राजकोषीय तुटीची व्याख्या :

1) शासनाच्या संतुलित अंदाजपत्रकात निर्माण होणारी तूट म्हणजे राजकोषीय तुट होय.
2) चालू महसुलापेक्षा एकूण खर्चाचे अधिक्य म्हणजे राजकोषीय तूट होय.

राजकोषीय तुट काढण्याचे सुत्र :

रोजकोषीय तुट = एकूण खर्च - (महसूली जमा + पुनःप्राप्ती + सार्वजनिक मालमत्ता विक्रीतून मिळालेली रक्कम)

Fiscal Deficit = Total Expenditure - (Revenue Receipts + Recovery + Sale of Public Assets)

वरील सुत्राच्या आधारे देशातील अर्थसंकल्पीय तुटीचे प्रमाण उत्पन्नाशी किती आहे हे निश्चित केले जाते.

प्रा. केन्स यांचे राजकोषीय तुटीसंदर्भातील मत

प्रा. लॉर्ड केन्स यांनी राजकोषीय तुटीसंदर्भात आपले मत मांडताना असे स्पष्ट केले की, दिर्घकाळात वित्तीय तुट महत्त्वाची भूमिका बजावते. कारण त्यातून निर्माण होणारे फायदे कायमस्वरूपी अर्थव्यवस्थेस लाभदायी ठरतात.

शोधनिबंधाची उद्दिष्टे -

सदरील शोधनिबंध लिहिण्याकरिता संशोधकाने पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत -

1) राजकोषीय तुटीची आर्थिक विकासांच्या दृष्टीकोनातून सकारात्मक बाजू मांडणे.

2) अविकसनशील देशात राजकोषीय तूट वाढण्याच्या कारणांचा शोध घेणे.

3) सन 2017-2021 या पाच वर्षातील राजकोषीय तुटीचा आढावा घेवून आर्थिक विकासातील भूमिका तपासणे.

4) राजकोषीय तुटीसंदर्भात निष्कर्ष व शिफारशी सुचविणे.

शोधनिबंधाची गृहिते :

1) राजकोषीय तुटीमुळे विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळत आहे.

2) राजकोषीय तुटीची संकल्पना शासनाकडून राबविली जात आहे.

3) सरकारकडून निर्माण केल्या जाणा-या राजकोषीय तुटीचे प्रमाण सतत वाढत आहे.

4) उत्पादकीय क्षेत्रांवरील खर्चाच्या वाढीच्या प्रमाणांमुळे राजकोषीय तूट अधिक निर्माण होत आहे.

राजकोषीय तुटीची कारणे :

1) बेरोजगारीचा दर कमी करणे :

पूर्ण रोजगारांचे उद्दिष्ट प्राप्त करून बेरोजगारीचा दर कमी करण्यासाठी सरकारकडून अनेक योजना व उपक्रमांची आखणी करावी लागते. त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक तूट निर्माण होते ती पुढीलप्रमाणे -

वर्षे	बेरोजगारीचा दर (%)
2015	5.56%
2016	5.51%
2017	5.41%
2018	5.33%
2019	5.27%
2020	7.11%

Source : https://www.statista.com, https:www.macrotrends.net

वरील तक्त्याच्या निरीक्षणावरून स्पष्ट होते की, भारतात बेरोजगारीचा दर हा नेहमीच 5 टक्केपेक्षाही अधिकच राहीलेला आहे आणि 2020 मध्ये तो सर्वाधिक 7.11 टक्के पर्यंत पोहोचलेला आढळतो. देशातील वाढती बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारकडून खर्चाची तरतूद प्रचंड प्रमाणात केली जाते.

2) देशातील शहरीकरणांचा वेग वाढवणे :

देशातील शहरीकरणांच्या निर्मितीसाठी अलीकडील काळात सरकारने स्मार्ट सिटी योजना राबवलेली दिसून येते. देशात 100 शहरे स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ट करून त्यांच्या विकासावर भर देण्यात आला. यासाठी केंद्र सरकारकडून 48 हजार करोड रूपये खर्च करण्यात आलेले दिसून येते.

3) लष्कर व संरक्षण व्यवस्था दृढ निर्माण करणे :

देशाचे सार्वभौमत्व हे लष्कर व संरक्षण व्यवस्थेवर अवलंबून असते. यासाठी सरकारकडून केली जाणारी खर्चाची तरतूद ही खूप मोठी असते ती पुढीलप्रमाणे –

वर्षे	GDP च्या तूलनेत केला जाणारा खर्च (%)
2017-18	2.1%
2018-19	2.2%
2019-20	2%
2020-21	2.1%

Source : https://prsindia.org

वरील आकडेवारी स्पष्ट करते की, सन 2017-18 ते 2020-21 या आर्थिक वर्षात सरकारच्या तुटीत वाढ घडून येत आहे.

4) विकास व नियोजनात्मक कार्य करण्यासाठी :

देशांचा विकास ज्या घटकांवर अवलंबून असतो त्यावर केला जाणारा खर्च हा विकास खर्च व विशिष्ट कालखंडासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करून विकास साध्य करण्यासाठी केला जाणारा खर्च म्हणजे नियोजनात्मक खर्च होय तो पुढीलप्रमाणे झाल्याचे आढळते –

वर्ष	Development Expenditure	Non-Development Expenditure	Total
2015-16	899369	1075825	1975194
2017-18	998201	1143772	2141973
2018-19	1188215	1269021	2457236
2019-20	1341300	1445049	2786349

Source : https://www.rbi.org.in

राजकोषीय तुटीचे महत्त्व :

अल्पविकसित व विकसनशील राष्ट्रातील दारिद्र्यांचे दुष्टचक्र तोडून आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने राजकोषीय तूट महत्त्वाची भूमिका बजावते.

1) कल्याणकारी राज्यांची संकल्पना अस्तित्वात आणणे :

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी राज्यांची संकल्पना स्वीकारलेली आहे. ही संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी सरकारने सन 1990 नंतर सरकारी खर्चात नेहमीच वाढ केलेली आढळते.

2) राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे :

राहणीमानाचा दर्जा हा व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून असतो. देशातील गरीबीचे प्रमाण कमी होणे म्हणजेच राहणीमानांच्या दर्जात वाढ होणे अपेक्षित असते. या संदर्भात भारतात मागील कांही वर्षातील दारिद्र्याचे प्रमाण पुढील तक्त्यात स्पष्ट केलेले आहे. यावरून लक्षात येते की, सन 1981 ते 2016 या वर्षात 50 टक्क्यांवरून 27 टक्क्यांपर्यंत कमी झाल्याचे स्पष्ट होते. यावरून दारिद्र्याचे प्रमाण घटत असल्याचे दिसून येते.

वर्षे	दारिद्र्याचे प्रमाण (लोकसंख्या निकष)
1981	50%
1993	60%
2004	40%
2009	30%
2011	28%
2016	27%

Source : https://en.m.wikipedia.org

3) आर्थिक वृद्धीदरात वाढ घडवून आणणे :

सरकारद्वारे उत्पादकीय घटकांवर खर्च केल्यामुळे राजकोषीय तूट निर्माण होते. त्यातून रोजगारीचा दर अधिक होवून दरडोई उत्पन्नात वाढ घडून येते.

वर्षे	दरडोई उत्पन्न	Growth Rate (%)
1950-51	11370 {Rs.}	
1990-91	20634 {Rs.}	
2016	6120 {$}	8.3%

2018	6600 {$}	6.8%
2019	6390 {$}	6.5%
2020	6390 {$}	4.0%

Source : https://www.livemint.com, inelule.worldbank.com

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, लोकांचे दरडोई उत्पन्न सरासरी 6390 असून तो विकसीत राष्ट्राच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. त्याचा नकारात्मक परिणाम देशाच्या वृद्धीदरावर झाल्याने तो सन 2020 मध्ये 4.0 टक्केपर्यंत घटलेला आढळतो. या कालखंडात कोवीड-19 चाही विपरीत परिणाम झाल्याचे आढळते.

4) अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्राला विकासाच्या प्रवाहात आणणे :

GDP च्या तुलनेत केला जाणारा खर्च

वर्षे	Health Sector	Education Sector
2017-18	3.8%	3.4%
2018-19	1.35%	-
2019-20	1.8%	2.8%
2020-21	-	3.1%

Source : https://timesofindia.com

उपरोक्त तक्त्यावरून स्पष्ट होते की, सरकारकडून प्रमुख क्षेत्रांवर केला जाणारा खर्च अधिकचा राहून राजकोषीय तूट निर्माण होते. वरीलप्रमाणे राजकोषीय तूटीची कारणे व त्यांचे महत्त्व आपणास स्पष्ट करता येते. राजकोषीय तुटीच्या संदर्भात अधिक विश्लेषण पुढील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट होते.

Fiscal Deficit (FD) (As percentage of GDP)



उपरोक्त आकृतीवरून लक्षात येते की, GDP च्या तुलनेत दरवर्षी अंदाजित राजकोषीय तुटीपेक्षा अपेक्षित राजकोषीय तुटीचा दर जास्त आढळून येतो.

वर्ष	राजकोषीय तूट
2016-17	3.5%
2017-18	3.2%
2018-19	3.4%
2019-20	4.8%
2020-21	9.3%

Source : Budget Paper

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, सन 2020-21 मधील राजकोषीय तुटीचे प्रमाण जास्तीचे असण्याचे कारण म्हणजे निर्माण झालेली कोवीड-19 ची विपरित परिस्थिती होय. त्यामुळे विकासाचा दर यावर्षी नकारात्मक स्वरूपाचा असल्याचे आढळते.

2) Trends in Deficit (% of GDP)



Source : www.dnaindia.com

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकीय आकडेवारीनिहाय पाहिले गेले तर निश्चितपणे सरकारी उत्पन्नापेक्षा सरकारी खर्चातील वाढ जास्तीची असलेली दिसून येत आहे. त्याकरिता दरवर्षी रोजकोषीय तुटीचे प्रमाण वाढत गेल्याचे आढळते. हे उपरोक्त तक्ता आणि रेषा आलेखाच्या निरीक्षणावरून स्पष्ट होते.

निष्कर्ष व शिफारशी :

सरकारलादेशातील दारिद्र्य, बेरोजगारी कमी करणे व पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्याकरिता मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. त्यामुळे राजकोषीय तूट भरून काढण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कर्जाची उभारणी करावी लागत आहे. तसेच सरकार तुटीच्या अर्थभरणाद्वारे ही तूट भरून काढताना दिसते. सरतेशेवटी करांच्या प्रमाणात वाढ करून निर्माण झालेली तूट भरून काढली जात आहे. 2019-20, 2020-21 या दोन वर्षातील कोव्हिड-19 चा प्रतिकूल परिणाम वगळता इतर वर्षामध्ये राजकोषीय तुटीचा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. राजकोषीय तूट ही आर्थिक विकासास महत्त्वाची भूमिका पार पडते असा निष्कर्ष वरील विश्लेषणावरून काढता येतो.

संदर्भ सूची :

1. पाटील जे. एफ. (2011), सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पृ. 232-245.
2. देसले किरण (2019), भारतीय अर्थव्यवस्था, दीपस्तंभ प्रकाशन, आठवी आवृत्ती, पृ. 214.
3. भालेराव, देसाई (2016), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, चौदावी आवृत्ती, पृ. 63.1 ते 63.5
4. Hajela T.N. (2011), Public Finance, Ane Book Publication, 4th Edition, P. 306-307.
5. पूरी व्ही. के. व मिश्रा एस. के. (2016), भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिकेशन, 28 वी आवृत्ती, पृ. 567-574.
6. दै. लोकसत्ता, दि. 3 फेब्रु. 2022
7. Competitive Success, Dt. 20th Feb. 2022, P. 15-20.
8. Business Today, Dt. 20th Feb. 2022, P. 44-48.
9. Bulletin, Jan. 2022, P. 27.
10. Economic Survey 2021-22, Jan. 2022, P. 45-48.

11. https://www.statista.com,
12. https:www.macrotrends.net
13. https://prsindia.org
14. https://www.rbi.org.in
15. https://en.m.wikipedia.org
16. https://timesofindia.com
17. https://www.livemint.com,
18. inelule.worldbank.com
19. www.dnaindia.com

भारतीय इतिहासलेखनातील स्त्रीवादी इतिहासलेखन प्रवाह

डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार[1] डॉ.नितीन पांडुरंगरावबावळे[2]
[1]इतिहास विभागप्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर
[2]इतिहास विभागप्रमुख, शारदा महाविद्यालय, परभणी.

हिस्टोरिओग्राफी या इंग्रजी शब्दाचे मराठीत भाषांतर म्हणजे इतिहासलेखन ही संज्ञा होय. त्याप्रमाणेच स्त्रीवाद हे फेमिनिझम या इंग्रजी शब्दाचे मराठी रुपांतर होय.स्त्रीवादी इतिहासलेखन ही मुळात एक व्यापक अशी संकल्पना आहे. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टीकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला प्रकाश होय. स्त्रीवाद ही एक जाणीव आहे, ते एक जीवनविषयक तत्वज्ञान आहे तसाच तो एक सैद्धांतिक दृष्टीकोन आहे. त्याचप्रमाणे ती एक संघटीत कृतीसाठीची साददेखील आहे. जागतिक स्तरावर स्त्रीवादाच्या उदयानंतर बऱ्याच काळाने या परिप्रेक्षातून बोलले व लिहिले जाऊ लागले. परंतु भारतीय इतिहासलेखनात हा विचार प्रबोधन काळातच पहावयास मिळतो. त्यातून भारतीय इतिहासलेखन बरेच प्रभावित झाले होते. भारतीय इतिहासलेखनातील स्त्रियांचे दुय्यमत्व नाहीसे करणे, स्त्रियांवरील अत्याचार, स्त्रियांचे शोषण यांचा इतिहास मांडणे, स्त्रियांच्या कर्तबगारीला अधोरेखित करणे आणि लिंगभावात्मक जाणीवेतून इतिहास मांडणे अशी विविध वैशिष्ट्ये स्त्रीवादी इतिहासलेखनाची सांगता येतात.प्रबोधन चळवळीच्या माध्यमातून नव नवे विचार प्रवाह उदयास आले. स्त्रीवाद ही संकल्पना इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आली जॉन स्टुअर्ट मिल नावाचा उदारमतवादी प्रसिद्ध तत्ववेत्ता होऊन गेला त्याने इ.स. १८६१ मध्ये एक लहानसा ग्रंथ लिहिला तोच पुढे 'सब्जेक्शन ऑफ वुमन' या नावाने प्रसिद्धही झाला. यात त्याने'स्त्रियांचा इतिहास बळी जाणार आहे', पुरुषी ढाच्यामुळे अधिकाराचा दुरुपयोग करून पुरुषी वर्चस्वाचा इतिहास लिहिला गेल्याचे इतिहासातील अनेक दाखले देऊन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणून भारतीय इतिहास लेखनात स्त्रियांचे स्थान म्हणजे पुरुष इतिहासाला जोडलेली एक पुरवणी प्रमाणे आहे. त्यातही केवळ कर्तबगार स्त्रिया, राज्यकर्त्या, संत, लेखिका इत्यादींचाच उल्लेख आढळतो.

बळी तो कान पिळी या न्यायाने भारतीय इतिहास लेखनात सुद्धा पुरुषी वर्चस्वाची भूमिका दिसते. यासंदर्भात जॉन स्टुअर्ट मिल म्हणतो, एका वर्गाला दुसऱ्या वर्गाची कायदेशीर रित्या गुलामगिरी करण्यास लावणे हे तत्व माझ्या समजुतीप्रमाणे वस्तुतः अगदी चुकीचे असून एकंदर मानव जातीच्या सुधारणेस व उन्नतीस बाधक अशी समजूत आहे. संसारात स्त्री व पुरुष सारखे अधिकारी आहेत एकाला अधिकार किंवा हक्क जास्तीची व दुसऱ्याला कमी असा काही प्रकार नाही असे समजले पाहिजे.[1]जॉन स्टुअर्ट मिल प्रमाणेच पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये स्त्रीवादी साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली त्यातून स्त्रीवादी दृष्टीकोन विकसित झाला. त्यात गिल्बर्ट, हेलन सीज,एलेन शोवाल्डर, सिमोन द बोहुआर इत्यादी स्त्रियांनी आपल्या साहित्यातूनस्त्रीवादीविचार प्रवाहाची मांडणी केली. आपल्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथामध्ये म्हणते 'स्त्री ही जन्मत नाही तर ती घडवली जाते' समाज गुणविशेष स्त्रीमध्ये गृहीत धरतो त्यातील फारच थोडे प्रत्येक स्त्रीमध्ये निसर्गतः असतात. स्त्रीची बहुसंख्य वैशिष्ट्ये ही समाजाने तिच्यामध्ये जबरदस्तीने रुजविलेली असतात.[2]स्त्रियांना दुय्यमत्व देणारी पुरुषप्रधान व्यवस्था जगभर कार्यरत होती त्याचे प्रतिबिंब इतिहास लेखनामध्ये ही उमटत होते. किंबहुना पुरुष केंद्रित इतिहास लेखनामुळे सबंध स्त्रियांचा इतिहास जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवला असेच म्हणावे लागेल त्याला भारतीय इतिहास लेखन परंपराही अपवाद नाही.

भारतीय इतिहास लेखन परंपरा प्रामुख्याने पुराण ग्रंथांमध्ये शोधली जाते. पुराणांमध्ये काही ऐतिहासिक घराण्यांची क्रमवार मांडणी अथवा वंशावळी दिलेल्या असल्यामुळे भारतीय इतिहास लेखन परंपरा प्राचीन आहे हे दर्शविण्यासाठी पुराणांचा आधार घेतला जातो.भारतासंदर्भात बाराव्या शतकात कलहनने लिहिलेल्या राजतरंगिणी या ग्रंथास पहिला ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संबोधले जाते, असे असले तरी भारतीय इतिहास लेखनाची खऱ्या अर्थाने सुरुवात ब्रिटिशांच्या भारतातील आगमनानंतर झाली. ब्रिटिशांचे इतिहासलेखन हे वसाहतवादी विचारांनी प्रभावित होते. त्यामुळे नंतरच्या काळात वसाहतवाद्यांचे मत खंडन करण्याच्या प्रयत्नातून राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह जन्मास आला. त्याशिवाय भारतीय इतिहासाचे लेखन मार्क्सवादी प्रवाहाच्या माध्यमातून ही मोठ्या प्रमाणात होऊ लागले.

भारतीय इतिहास लेखनाच्या या सर्व परंपरा व प्रवाहांमध्ये ही राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक मांडणी होत असताना मात्र समाजाचा एक प्रमुख अंग असणारा स्त्री हा घटक मात्र अपेक्षित होता. साधारणता जागतिक स्तरावर इ.स. १९७५ नंतर स्त्रीवादी विचार प्रवाहाची सुरुवात मानली जाते, परंतु भारतीय इतिहास लेखनात स्त्रीवादी विचारप्रवाह याची सुरुवात जगाच्या तुलनेत एक शतकापूर्वी झाली होती. त्याचा संदर्भ महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीत पाहायला मिळतो. भारतात व महाराष्ट्रातही सुधारणावादी चळवळीत स्त्री प्रश्न हा केंद्रवर्ती होता एकोणिसाव्या शतकात महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीने

प्रथमता स्त्रीवादी विचारधारा मांडली. सत्यशोधकी विचारांच्या ताराबाई शिंदे यांनी स्त्री पुरुष तुलना या निबंधामध्ये प्रथमतः स्त्रीवाद ही संकल्पना मांडलेली दिसते यासंदर्भात ताराबाई शिंदे म्हणतात की, ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली त्यानेच स्त्री-पुरुष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहस दुर्गुण स्त्रियांचे संगे आहेत तेच पुरुषांना आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे. याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देश भगिनींचा अभिमान धरून रचिला आहे. यात अमुकच जाती किंवा कुळ याकडे माझे मुळीच लक्ष नाही.[३] या ताराबाईंच्या विधानात वर्तमान स्त्रीवादी संकल्पनेची विचारधारा प्रतिबिंबित होते.

भारतीय इतिहास लेखनात ताराबाई शिंदे स्त्री पुरुषांची तुलना करून परंपरिक संकल्पनांना छेद द्यायचा प्रयत्न करत होत्या. त्यांनी यासाठी रामायण-महाभारतातील अनेक संदर्भांची स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून चिकित्सा केली. त्याचबरोबर स्त्री धर्म, स्त्री चारित्र्य या संकल्पनामधील विरोधाभासही स्त्रियांना बंदिस्त बनवण्यासाठीचा आहे. हा स्त्रीवादी विचार प्रथम त्यांनी मांडला भारतीय इतिहास लेखन पुरुषी ढाच्यामध्ये झाले असल्यामुळे स्त्रियांना राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक या विभिन्न क्षेत्रात दुय्यम अशीच मांडणी झालेली दिसते. भारतीय इतिहासात स्त्रियांची भूमिका मांडण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी विचार प्रवाहाच्या माध्यमातून ए. एस अळतेकर यांनी 'पोझिशन ऑफ इंडियन वुमन' या ग्रंथाच्या माध्यमातून केला. प्राचीन कालखंडात स्त्रियांची स्थिती चांगली होती असे दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी काही तत्कालीन स्त्रियांच्या उदाहरणांवरून केलेला दिसतो परंतु या प्रयत्नांमध्ये स्त्रीवादी विचारधारा प्रकर्षाने जाणवत नाही, तर त्यात भारतीय व्यवस्थेच्या उदात्तीकरणाची राष्ट्रवादी भावना जाणवते त्यात स्त्रीवादी भावना जाणवत नाही.

पुरुषी वर्चस्व झुगारून देण्यासाठी स्त्रियांनी संघटित झाले पाहिजे हा विचार दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात प्रकर्षाने उदयाला आला. स्त्रियांच्या चळवळीशीवाय स्त्री मुक्ती होणार नाही यावर त्यांना विश्वास वाटला.[४] स्त्री मुक्ती चळवळ भारतात सुधारणावादी चळवळीने प्रथमता चालवली. सुधारणावादी चळवळीच्या केंद्रस्थानी स्त्री प्रश्न होता. ही चळवळ प्रथमच स्त्रियांच्या जाणिवेतून कार्य करू लागली. स्त्रीमुक्तीसाठी सामाजिक व धार्मिक व्यवस्थेची चिकित्सा करायला सुरुवात झाली. समाजव्यवस्था व पितृसत्ताक कुटुंब व्यवस्था या स्त्रियांच्या शोषणास प्रामुख्याने कारणीभूत होत्या म्हणून त्यांच्याविरोधात वैचारिक संघर्ष स्त्री मुक्ती चळवळीने सुरू केला.

स्त्रियांचे निश्चित स्वरूपातील दास्यत्व हे हिंदू जाती रचनेतील अधिकारांच्या उतरंडीशी आणि त्यामागील धार्मिक मूल्यांशी अंगभूतपणे निगडित होते आणि थोडीशी शिक्षण आणि बहिष्कृत विभागांपैकी काही थोड्यांना जास्त मोकळीक निर्माण करून देणे यामधून शेवटी दास्यावर आधारलेल्या या रचनेवरच हल्ला करण्याच्या आकांक्षा निर्माण होतील.[५] या आकांक्षा स्त्री दास्याच्या कारणांच्या शोधातून निर्माण झाल्या होत्या. त्यासाठी प्रथमतः शिक्षण हे महत्त्वाचे शस्त्र मानल्या गेले आणि त्यातून स्त्री शिक्षणाची चळवळ स्त्रीदास्य विमोचन यासाठी उदयास आली. १९९० च्या दशकात तर मोठ्या प्रमाणात सुशिक्षित महिलांनी स्त्री मुक्ती चळवळीचे संघटन वाढवण्याचे प्रयत्न चालवले. त्यासाठी विविध नियतकालिके मासिके इत्यादींच्या माध्यमातून स्त्रीवाद व स्त्री मुक्ती चळवळीची वैचारिक जाणीव आणि जागृती करण्याचा प्रयत्न चालवला.

संघटनांच्या माध्यमातून एकत्रित आलेला स्त्रीवादी विचार प्रवाह हळूहळू जहाल बनू लागला या जहाल स्त्रीवादी विचार प्रवाहाने स्त्रीमुक्तीसाठी मोर्चे काढणे, लढा देणे यांची तीव्रता वाढविली बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रीवादी प्रवाहाने सुद्धा नवनवीन विचारधारा स्वीकारल्या समाजवादी विचारांचा ही मोठ्या प्रमाणात प्रभाव स्त्रीवादी विचार प्रवाहावर पडला. परिणामी हा विचारप्रवाह अधिकाधिक प्रखर बनवून लढा दिल्याशिवाय स्त्रीमुक्ती होणार नाही यावर ठाम विश्वास निर्माण होऊ लागल्याने स्त्रीदास्य भांडवलशाही सरंजामशाही समाजव्यवस्थेने निर्माण झाले आहे. लिंगभेद यावर आधारलेल्या श्रमविभागणी मुळे मुख्यता पुरुषांना अधिकार प्राप्त होतो उत्पादनाचे कार्य पुरुष करत असल्यामुळे समाजातील संपत्ती व सत्ता यावर त्यांचे नियंत्रण राहते म्हणून त्यांना स्त्रियांवर ही सत्ता प्राप्त होते. स्त्रियांच्या विशेष स्थानाचा उदोउदो करणे व त्या स्थानाचे गूढत्व मानणे अशा उद्योगातून ही साधी वस्तुस्थिती झाकली जात नाही.[६]

अशीही दुटप्पी भूमिका स्त्रीवादी विचार प्रवाहांना मान्य नव्हती. एकीकडे संपत्ती व सत्ता आपल्या ताब्यात ठेवायची आणि स्त्रियांना यापासून वंचित ठेवण्यासाठी धार्मिक व नैसर्गिक शरीरधर्माची कारणे दाखवणे ही पितृसत्ताक व्यवस्था बळकट बनवण्यासाठी मागची भूमिका आहे. पुरुष व स्त्री यांच्यात जीवशास्त्रीय स्वरूपाचे भेद असल्याने लिंगभेद यावर आधारलेली श्रमविभागणी निर्माण झाली. मुलांना जन्म देणे व त्यांचे पोषण करणे ही गोष्ट स्त्रियाच करू शकतात. पण याखेरीज लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी आवश्यक ठरेल असे कोणतेही जीवशास्त्रीय कारण नाही.[७] ही भूमिका स्त्रीवादी चळवळींनी समाजवादी विचारधारेच्या प्रेरणेतून घेतली.लिंग भेद व लिंगभाव या संकल्पनांमुळेप्रामुख्याने स्त्रियांना दुय्यम दर्जा देणारी व्यवस्था निर्माण होते. म्हणून स्त्रीवादी चळवळीने या संकल्पनांना विरोध करण्याचा प्रयत्न केला लिंगभाव म्हणजे लिंगावर आधारलेल्या

समाजाच्या भावना किंवा दृष्टिकोन.[८] हा दृष्टीकोन बदलण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीने चालवला. सरंजामी समाजरचनेत धर्माचा आधार घेऊनही स्त्रियांचा दर्जा कायम राहील याची काळजी घेतल्याचे जाणवते.पत्नी व माता एवढेच आपले स्थान आहे यावर स्त्रियांच्या निष्ठा भाव रुजेल अशा तऱ्हेने स्त्रियांची घडण केली जाई[९] अशा जडणघडणीत स्त्रीत्व, मातृत्व आणि पतीव्रत्ताधर्म या संकल्पनांचा गौरव करून स्त्रियांना बंदिस्त बनवण्याचा प्रयत्न केला जातो अशा गौरवीकरनातून स्त्रियांना सत्ता आणि संपत्ती पासून वंचित बनवण्याची व्यवस्था निर्माण होते.

पितृसत्ताक व्यवस्था हीसुद्धा स्त्रियांना सत्ता आणि संपत्तीच्या अधिकारांपासून वंचित ठेवणारी व्यवस्था आहे कुटुंबातील घटक व्यक्तीवर पित्याची वडीलधाऱ्या पुरुषांची अधिसत्ता असणारी कुटुंबाची संघटना म्हणजे पितृसत्ताक कुटुंब पद्धती अशा कुटुंबातील सर्वच स्त्री पुरुष व्यक्तींचे जीवन नियंत्रित करण्याचा अधिकार वयाने किंवा नात्याने मोठ्या असलेल्या पुरुषांकडे असतो. परंतु पितृसत्ताक पद्धतीत वयात आलेल्या इतर पुरुषांचे अधिकार वाढतात.[१०] हे या संदर्भात लक्षात ठेवावे लागते. या व्यवस्थेने स्त्रियांना सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारून त्यापासून त्यांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला दिसतो. भारतीय इतिहास लेखनात स्त्रीवादी विचार प्रवाह रुजवण्याचा प्रयत्न कुमकुम संगारी, सुदेश वैद्य, राधाकुमार, भारती रे, पार्थ चाटर्जी, उर्मिला पवार, मीनाक्षी मून, उमा चक्रवर्ती, शर्मिला रेगे,उर्वशी बुटालीया इत्यादी लेखिकांनी मोठ्या प्रमाणात केलेला दिसतो.

सारांशता, हा सामाजिक व सांस्कृतिक ढाचातून स्त्रियांना बाहेर काढण्याचा प्रयत्न स्त्रीवादी विचार प्रवाहाने केला. स्त्रीवाद हा एक दृष्टिकोन आहे, त्या माध्यमातून स्त्री म्हणून एक स्वतंत्र विचारधारा निर्माण करण्याचा प्रयत्न या सिद्धांताच्या माध्यमातून केला गेला.१९७५ नंतर अनेक स्त्रीवादी चळवळी उदयाला आल्या त्यातूनही स्त्रियांच्या दृष्टिकोनातून इतिहास लिहिण्याची परंपरा मोठ्या प्रमाणात सुरू झाली. तरी परंतु या प्रवाहास प्राचीन, मध्ययुगीन भारताच्या इतिहासलेखनात म्हणावी तेव्हढी प्रगती अद्याप साधता आली नाही. असे असले तरी गेल्या ३० ते ३५ वर्षात या प्रवाहाने आपल्या सैद्धांतिक मांडणीतून एक वेगळा ठसा इतिहासलेखनात उमटवला हे मात्र मान्य करावेच लागते.

संदर्भ:

१. कानिटकर गो. वा.(अनु.), जॉन स्टूअर्ट मिलकृत, स्त्रियांची परवशता, बाबाजी सखाराम आणि कंपनी, मुंबई, १९०२ पृ. २.
२. सीमान द बोहुआर(अनु. म.गोखले करुणा) द सेकण्ड सेक्स, पद्मगंध प्रकाशन पुणे, पृ.२४५.
३. खोले विलास (संपा.), स्त्री पुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन पृ.१.
४. कर्वे स्वाती(संपा.), स्त्रीविकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.४१.
५. तांबे श्रुती व सुमती लांडे(संपा.), स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर,पृ.१४.
६. उपरोक्त.
७. सोनाळकर वंदना व रेगे शर्मिला, पितृसत्ता व स्त्रीमुक्ती पृ.२.
८. तांबे श्रुती...उपरोक्त, पृ. १८.
९. मराठी विश्वकोश, खंड ९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पृ.६९३.

अंकेक्षण आतील आधुनिक प्रवाह एक अभ्यास

प्रा.डॉ.शिंदे.बी.आर

वाणिज्य विभाग कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

प्रस्तावना:-

हिशोब लिहिणे आणि तपासण्याचे कार्य प्राचीन काळात सुद्धा असल्याचे अनेक उदाहरणे आपणास प्राचीन ग्रंथात आढळून येतात. प्राचीन काळी राज्य महाराज यांच्या राजकीय निधी चा हिशोब ठेवण्याची व ते तपासण्याची पद्धती अस्तित्वात असल्याचे आपणास दिसून येते. एवढेच नव्हे तर प्राचीन काळी भारताचा व्यापार सुद्धा समृद्ध होता. त्याकाळी व्यापार व्यवहाराच्या नोंदी एक नोंद पद्धती नुसार ठेवल्या जात असत आणि त्या नोंदी ज्या व्यक्तीला हिशोब तपासणी चे ज्ञान आहे. अशा विश्वासू व्यक्तीकडून त्या नोंदी तपासल्या जात असत. त्या तपासणीवरून व्यवसायाच्या आर्थिक व्यवहाराची स्थिती लक्षात येत असत. १५ व्या शतकात व्यापाराला चालना मिळाली व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ होऊ लागली. त्याच बरोबर हिशोब लिहिण्याच्या कामाचे महत्त्व वाढत गेले. आणि तो हिशोब तपासण्याची गरज वाढू लागली. वाढत्या व्यापारामुळे एक नोंद हिशोब पद्धतीनुसार हिशोब लिहिण्यात अडचणी येत होत्या. हिशोब लिहिण्याच्या पद्धतीत बदल होण्याची आवश्यकता होती. याच काळात 'लुका पोसईओ' या इटालियन व्यक्तीनी १४९४ मध्ये 'द्विनोंद' हिशोब लिहिण्याची पद्धत शोधून काढली व हिशोब लिहिण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणली. आणि हिशोब लिहिण्याच्या शास्त्रशुद्ध पद्धती ला सुरुवात झाली. १८ व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली आणि उत्पादन, व्यवसाय यामध्ये अमूलाग्र बदल झाला. व्यासाय उधोगामध्ये स्पर्धा वाढली मोठ्या प्रमाणात उधोगात भांडवलाची गुंतवणूक झाली. मोठ्या प्रमाणात व्यवसाय वाढले. या व्यवहाराचे व्यवस्थित हिशोब ठेवण्यासाठी एक स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक करणे आवश्यक झाले. हि व्यक्ती हे सर्व व्यवहार व्यवस्थित ठेवण्यासाठी 'द्विनोंद पध्दतीचा वापर करू लागली. त्यामुळे लिहिलेले सर्व व्यवहार बरोबर आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी एका हिशोब तपासणीची गरज निर्माण झाली. या गरजेतून अंकेक्षकाचा उगम झाला. हिशोब लिहिण्याच्या पध्दतीचा विकास बरोबर हिशोब तपासणीच्या पध्दतीचा विकास होत गेला. ज्या व्यक्तीला हिशोब तपासणीचे ज्ञान आहे अशा व्यक्तीची गरज निर्माण झाली. म्हणून १८४५ ला इंग्लंडमध्ये कं अधिनियममाद्वारे कं स्थितीविवरण करणे व त्याचे अंकेक्षण अशी तरतूद करण्यात आली. तेव्हाच हिशोब तपासणीच्या कायदेशीर बाबींची सुरुवात झाल्यामुळे अंकेक्षण करणाऱ्या तज्ञ व्यक्तीची गरज भासली. त्याच काळात म्हणजे ११ मे १८८० रोजी इंग्लंडमध्ये Institute of Chartered Accountant या संस्थेची स्थापना करण्यात आली. भारतात या कायद्याच्या आधारे कं. अंकेक्षण तरतुदी लागू करण्यात आल्या. ही १९४९ मध्ये चार्ड अकाउंट्स या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेकडून ज्या व्यक्तींनी प्रमाणपत्र धारण केले आहे अशा व्यक्तींनाच हिशोब तपासण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. अधिकारा बरोबरच, कर्तव्य, आणि जबाबदाऱ्या देण्यात आल्या काळानुसार उद्योग व्यवसायाच्या व्यवहारामध्ये बदल झाले त्यातबरोबर अंकेक्षणाच्या कार्यात मोठे बदल झालेले आपणास दिसून येतात. आज अंकेक्षण कार्यात वेगवेगळया आधुनिक प्रवाह निर्माण झालेला आहेत. त्यात परिव्यय अंकेक्षण, व्यवथपणाचे अंकेक्षण, अणव शेण, कर अंकेक्षण, असे प्रवाह निर्माण झाले आहेत. या लेखात आपणास अंकेक्षणातील आधुनिक प्रवाह याचा अभ्यास करणार आहोत.

अंकेक्षणाचे उद्देश:-

१. चुका शोधून काढले.

२. कपट, अफरातफर शोधून काढणे.

३. हिशोबातील सातत्य प्रगत करणे.

४. संपत्ती व दैयता यांचे सत्यपणा करणे.

५. संपत्ती व दै यंत्यांचे मूल्यंयाकण करणे.

परिव्यय अंकेक्षण Cost Audit:-

परिव्यय अंकेक्षण हा अंकेक्षणातील आधुनिक प्रवाह होय. अंकेक्षणाची सुरुवात दुसऱ्या महायुद्धानंतर झालेली दिसून येते. दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात सैनिकांसाठी सरकारला अनेक वस्तू खरेदी करावी लागत असे. हा खरेदी सरकारला नेमित करावी लागे. ही खरेदी करताना कमीत कमी किंमत आणि दर्जेदार वस्तू मिळाल्या पाहिजे हा सरकारचा हेतू होता.

परंतु त्या काळी वस्तूच्या किमतीत मोठ्या प्रमाणात अस्थिरता होती. त्यामुळे वस्तूची उत्पादित किंमत आणि विक्री किंमत काय यांची माहिती सरकारला होत नसे. म्हणून सरकारने परिव्यय अधिक करा ही संकल्पना खरेदी व्यवहारात आणली. सरकार सैनिक वस्तूच्या पुरवठ्या बरोबर करार करताना परिव्यय अधिक करार असा करार केला जातो. या करारानुसार सैनिकी वस्तूचा पुरवठा वस्तूची निर्वि दा सादर करतो या वस्तूचे परी वेळ अमूल्य सरकारने नियुक्त केलेली यंत्रणा पडताळून पाहत असते. यापूर्वी अमूल्य त्या वस्तूची पुरवठा दाराचे कमिशन अधिक. व त्या वस्तूची प्रमाणित परिव्यय काढला जातो आणि नंतर पुरवठादाराला रक्कम दिली जाते.

देशात अनेक मूलभूत उद्योग आहेत या उद्योगातील वस्तूचा किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी परिव्यय अंकेक्षणाची आवश्यकता आहे. त्यासाठी सरकारने एक परिव्यय रचना निर्माण करून त्याचा अभ्यास करण्याचे ठरविण्यात आले. भारतीय कंपनी कायदा १९५६ ला तयार करण्यात आला. १०६५ साली त्यात सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणांमुळे केंद्र सरकारला 'परिव्यय खाते' काही कंपन्यांना बंधनकारक करण्याचा अधिकार मिळाला. या अधिकारामुळे केंद्र सरकारने काही कं. कलम २०९ (१)(d) नुसार परिव्यय खाती स्वातंत्र्य पणे परिव्यय लेखापाल आखडून कॉस्ट अँड वर्क्स अकाउंटंट अॅक्ट १९५६ नुसार ठेवणे बंधनकारक केले आहे. या लेखांचे कलम २२३(B) नुसार अंकेक्षण करणे बंधनकारक केले आहे.

२. **व्यवस्थापनाचे अंकेक्षण Management Audit :-**

व्यवस्थापन अंकेक्षण हा व्यवस्थापनातील नवीन प्रवाह आहे. आज जगात अनेक कंपन्या इतर अंकेक्षण ना बरोबर व्यवस्थापन क्षणाचा अभ्यास करत आहेत. १९६२ पासून व्यवस्थापन कौशल्यावर स्वीडन मधील फिन्लंड येथील अंकेक्षण कंपनी आर्थिक व्यवहारा बरोबर व्यवस्थापकीय कार्याचा अभ्यास करत होती. ही संकल्पना व्यवस्थापनात नवीन असली तरीही अमेरिकेमध्ये या संकल्पनेचा अभ्यास सर्वप्रथम करण्यात आला होता. या संकल्पनेचा वापर भारतात १९६० नंतर करण्यात आला.

ज्या सार्वजनिक कंपन्यांची स्थापना भारतीय कंपनी कायदा १९५६ नुसार करण्यात आली अशा सर्व कंपन्यांमध्ये व्यवस्थापकीय अंकेक्षण महत्त्वाचे मानले जाते. कारण असे सर्व उद्योग किंवा कंपन्यांचे व्यवस्थापन कुशल व्यवस्थापकीय नोकर वर्गाकडून करून घेतले जाते. या कंपन्यांचे व व्यवस्थापन मालकी शिवाय करण्यात येते. व्यवस्थापन हे भाग धारकाचे विश्वस्त म्हणून कार्य आहे. व्यवस्थापक कंपनीत पगारी नोकर म्हणून काम करतात. सर्व नोकरानी काळजीपूर्वक कार्य करावे. त्यांच्या कार्यात व कंपनीची आभार जन क्षमता कमी होऊ नये म्हणून व्यवस्थापकीय अंकेक्षण केले जाते आज सार्वजनिक कंपनी व्यवस्थापन की अंकेक्षण आला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

३. **अन्वेषण (Investigation):-**

व्यवसायाच्या किंवा उद्योगाच्या आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी म्हणजे अन्वेषण होय. साई उद्योगाचे दैनंदिन व्यवहार लेखा पुस्तकात लिहिले जातात या लेखा पुस्तकावरून वर्षाच्या शेवटी अंतिम खाती तयार केली जातात.

अंतिम खाती तयार करण्याचा मूळ हेतू म्हणजे व्यवसायात उद्योगाची आर्थिक स्थिती कशी आहे. हे माहिती करून घेण्यासाठी लेखा पुस्तकांचे व अंतिम विवरणाचे अंकेक्षण केले जाते. अंकेक्षण करण्याचा मुख्य हेतू व्यवसायाच्या किंवा उद्योगाच्या आर्थिक विवरण आत आलेल्या चुका, लबाड्या व अफरातफरी शोधून काढण्यासाठी व व्यवसायाची आर्थिक स्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी अंकेक्षण केले जाते. भारतीय प्रमंडळ कायदा १९५६ नुसार प्रत्येक प्रमंडळ आला अंकेक्षण करून घेणे बंधनकारक आहे. एखादा व्यवसाय किंवा उद्योगाच्या व्यवहाराची अंकेक्षण झाल्यानंतर जर त्या अंकेक्षण आतील काही शंका असल्याचे त्या शंका दूर करण्यासाठी पुन्हा अंकेक्षण केले जात नाही. त्या शंका दूर करण्यासाठी अन्वेषण केले जाते. अन्वेषणात जे अंकेक्षण आत व्यवहार चेक केले आहेत. ते कोणत्या व्यक्ती ने चेक केले आहेत याची माहिती करून घेतली जाते. च्या कारणाचा शोध घेतला जातो. अन्वेषण म्हणजे पुन्हा अंकेक्षण नावे किंवा संपूर्ण लेखांचे अन्वेषण नव्हे तर केवळ विशिष्ट व्यवहाराची चौकशी होय.

४. कर कायदयानुसार अंकेक्षण (Tax Audit):-

कर कायद्यानुसार अंकेक्षण हा आधुनिक अंकेक्षण आतील महत्त्वाचा प्रकार आहे. कर कायद्यानुसार केलेले अंकेक्षण हे विशेष अंकेक्षण हे विशेष अंकेक्षण होय. व्यवसाय उद्योगातील वित्तीय लेखातील विशेष स्वरूपातील माहिती आयकर विभागाला आवश्यक असते. कारण लेखा विभागाच्या दृष्टिकोनातून नफा आणि आयकर विभागाच्या दृष्टिकोनातून नफा या दोन्हीचा अंतर असतो. आयकर हा आयकर विभागाने व्यवसायाच्या उत्पादनावर आकारलेला कर असतो. लेखापालआने किंवा उद्योगातील आर्थिक वर्ष संपल्यानंतर काढलेला नफा किंवा तोटा आयकर विभाग विचारात घेत नाही. कारण कर आकारणी साठी नफा विचारात घेणे म्हणजे कर दायित्व निश्चित करण्यासाठी नफा विचारात घेणे होय. हा कायदा १९६१ ला तयार करण्यात आला या कायद्याच्या तरतुदीनुसार व्यवसाय उद्योगाचे अंकेक्षण करण्यात येते.

हे अंकेक्षण व्यवसाय उद्योग व्यतिरिक्त इतर करदाते ज्यांच्याकडे धर्मदाय संस्था किंवा इतर संस्था आहेत या संस्था असे अंकेक्षण करून घेतात. या अंकेक्षणाचे च्या तरतुदी १९६१ चाकर कायद्यात दिलेल्या आहेत. हे अंकेक्षण कलम १२ (A) ३५ (D) ४४(AB) ८० (HHC) ८०१(A) १४२(२A) या कलमाद्वारे करण्यात येते. हे अंकेक्षण करत्याची कायदेयता निश्चित करण्यासाठी हे अंकेक्षण करण्यात येते.

निष्कर्ष:- अंकेक्षण हे प्राचीन काळापासून व्यवसायाची आर्थिक स्थिती तपासण्यासाठी केले जाते पूर्वी राज्य महाराज यांच्या राज्यात राजकीय लोक त्यांच्या राजकीय हिशोब ठेवण्यासाठी एका अनुभवी शिव हा लेख याची माहिती असणाऱ्या व्यक्तीकडून अंकेक्षण करून घेतले जात असे. परंतु औद्योगिक करणा नंतर प्रत्येक क्षेत्रात अमुलाग्र है बदल झाला त्यानुसार व्यवसाय उद्योग क्षेत्रात सुद्धा बदल झाला व्यवसाय उद्योगाच्या वित्तीय लेखांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल आले या बदलानुसार अंकेक्षण कार्यात सुद्धा बदल होऊन वेगवेगळे आधुनिक प्रवाह निर्माण झाले या आधुनिक प्रवाहात ची आज अंकेक्षण कार्यात आवश्यकता आहे.

संदर्भ:-

१. अंकेक्षण:- डॉ. प्रभाकर हरकळ
२. अंकेक्षण:- डॉ. के. पी. बिरादार
३. उच्च अंकेक्षण:- डॉ. सुधीर बोधनकर व कुलकर्णी
४. उच्च अंकेक्षण:- डॉ. बी. आर. शर्मा.

मराठी भाषा स्थित्यंतरे

डॉ. एम. के. शिंदे
मराठी विभाग देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.
manikshinde222@gmail.com

प्रस्तावना- भाषेची उत्पत्ती मानवी उत्पत्तीच्या जवळची आहे. असे मानायला काही हरकत नाही. मानवाने भाषेचा उपयोग अतिप्राचीन काळापासून करत आलेला आहे. भाषेमुळे मानवाचे प्राणीमात्रापासून स्वतंत्र अस्तित्व ठरते. त्याचे सकारण म्हणजे प्राण्याला भाषा नाही किंवा त्यांना स्वतःची भाषा निर्माण करता आली नाही. म्हणून मानव इतर प्राण्यांच्या तुलनेने स्वतःचे वेगळे अस्तित्व सिद्ध करू शकला. आपल्या देशामध्ये कोणत्याही विषयाची पार्श्वभूमी पाहताना सुरुवातीस वैदिक कालखंडाचा विचार करावा लागतो. त्याशिवाय त्याची मुळे सापडणे अशक्य आहेत. हे भाषेच्या बाबतीतही लागू होते. "वैदिक काळामध्ये 'वाक' ही देवता मानली गेली"[१] आहे. ही देवता भाषेवर अनुसरून आहे. 'वाक'च्या माध्यमातून वाणीच्या सर्व दृष्टिकोनासह आर्यांचे प्राचीन भाषेविषयी मते अभ्यासता येतात. पुढे "इ. स. १७८६ मध्ये कलकत्ता येथे रॉयल एशियाटिक सोसायटीच्या सदस्यापुढे भाषण करताना सर वुइल्यम जोन्स याने संस्कृत, ग्रीक, लॅटिन, जर्मेनिक, केल्टिक भाषांमध्ये आढळणारे विलक्षण साम्य भाषा पंडितांच्या दृष्टोत्पत्तीस आणले व हा सर्व भाषापरिवार एकाच भाषेपासून उत्पन्न झाला असावा असा सिद्धांत जगापुढे मांडला."[२] हा सिद्धांत मांडल्यानंतर भाषेच्या विविधांगी अभ्यासाला सुरुवात झाली आणि भाषा परिवारातील भाषा अभ्यासक अभ्यास करू लागले. त्यातूनही असे सिद्ध झाले की इंडो-युरोपियन ही मूळ भाषा असून ग्रीक, लॅटिन, संस्कृत अशा भाषा जन्माला आलेल्या आहेत.

मराठी भाषा स्थित्यंतरे -

मराठी भाषेचे संशोधन करताना मराठी भाषेत काही पुरावे आढळतात. त्या पुराव्या आधारित मराठीत झालेले स्थित्यंतरे गृहीत धरावे लागतात. महाराष्ट्राची प्राकृत भाषा ही मराठी आहे. महारठ्ठी, मरहठ्ठी व महाराष्ट्री प्राकृत भाषा असे अपभ्रंश असले तरी त्यातील तीन भाषा वेगळ्या असून हे तीन रूपे एकट्या मराठी भाषेचे आहेत. मराठी भाषेचा उल्लेख 'गाथासप्तशती', 'लीळाचरित्र' आणि 'ज्ञानेश्वरी'तही होतो. तत्कालीन कालखंडामध्ये मराठी भाषा ही प्रगत झाल्याचे स्पष्ट होते. तत्पूर्वी मराठी भाषेचे काही पुरावे संशोधनाच्या आधारे मिळतात. त्यामध्ये शिलालेख, ताम्रपट, पोथ्या, हस्तलिखिते, काही ऐतिहासिक ग्रंथ पुराव्यासाठी उपलब्ध आहेत. या पुरावे आधारित मराठी भाषेचे वय वर्ष अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे सिद्ध झालेले आहे. त्यावर काही लेखक अभ्यासक आणि संशोधकांचा समावेश होतो. कौटिल्य, टॉलेमी, पसंजली, ह्यूमन त्संग, श्री. व्य. केतकर, वि. ना. मंडलिक, डॉ. रा. गो. भांडारकर, वि. का. राजवाडे, वि. ल. भावे, शं. गो. तुळपुळे इत्यादींच्या भाषाविषयक दृष्टिकोनातून महारठी, महाराष्ट्र आणि सध्याची मराठी ही अडीच वर्ष जुनी आहे. असे म्हणावे लागते.

मराठी भाषा उत्पत्ती -

मराठी भाषा व तिच्या उत्पत्तीविषयक विविध मते मांडलेली आहेत. वि. का. राजवाडे यांच्या मते मराठी भाषेची उत्पत्ती "पाणिनी पूर्वकालीन आर्य भाषा त्याही पूर्वीची पूर्व वैदिक भाषा"[३] यांच्या पासून झालेली आहे. मराठी भाषेचा उल्लेख करताना दुर्गा भागवत म्हणतात की, "प्राचीन काळीही प्रकृत ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसापासून होता. हे उघड होय. तेव्हा महाराष्ट्र शैरसेनी, मागधी व पैशाची या सर्व जितक्या 'पाअड' भाषा होत्या, तितक्या प्राकृत झाल्या व या प्राकृत भाषांचे प्राकृतप्रकाश नावाचे सूत्रमय व्याकरण कात्यायनाने पहिल्यांदा लिहिले. वर लिहिलेल्या चारही भाषा या 'पाअड' भाषा. इतकेच की सर्वात प्राचीन व सर्वांची प्रकृती महाराष्ट्र उर्फ प्राचीन मराठी. महाराष्ट्रापासून निघाली शौरसेनी. शौरसेनीपासून कालांतराने मागधी व पैशाची या दोन भाषा निघाल्या. तेव्हा मागधी व पैशाची ही दोन्ही प्राचीन मराठीची नातवंडे होत. शौरसेनीची खरी आई म्हटली पाहिजे. एकटी प्राचीन मराठी भाषा होय"[४] वरील संदर्भावरून एकूणच मराठी भाषा व इतर भाषांचा सहसंबंध कसा आहे व त्याच्या नाते कसे स्थापित झालेले आहे याची उकल दुर्गा भागवतांनी केलेली आहे.

जागतिकीकरण आणि मराठी -

मराठी भाषेचा उगम आठव्या शतकात झाला असला तरीही ही भाषा अपभ्रंश पद्धतीने चालू होती. बाराव्या शतकोत्तर ते सतराव्या शतकापूर्व कालखंडामध्ये मराठी भाषेने मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. त्यामध्ये म्हाइम भटाचे लीळाचरित्र, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम इत्यादी संताचे वर्णन येथे येते. 'ज्ञानदेव रचिला पाया, तुका झालासे कळस' याचे सार्थ वर्णन मराठी मधून झालेली आहे. याबरोबरच मोरोपंत,

मुक्तेश्वर, वामन पंडित यांच्यासारख्या पंत वाग्मयातील पंत कवींनीही संस्कृतप्रचुर कविता रचत असता त्यांच्यात दुसऱ्या बाजूला शाहिरी काव्य आपल्या लोकभाषेतून उदयाला येत होते. त्यामध्ये लावण्या, पोवाडे यांचा समावेश होतो. "अनेक प्रकारचे प्रभाव पुन्हा पुन्हा पचवून त्यांना आत्मसात करून ही देशी भाषा प्रगल्भ होत गेलेली आहे. आज जगातल्या सर्व महत्त्वाच्या भाषा प्रमाणे मराठी भाषा इंग्रजीच्या दबावाखाली आहे. ही गोष्ट कोणीही नाकारत नाही; पण जागतिकीकरणाचा उलटा परिणाम होऊन ही भाषा टिकण्यास व वाढण्यास अंततः हातभारच लागेल असे वाटते. मुक्त व्यापारात ग्राहकाला गाठणे व त्याला हवे ते हवे तसेच देऊन नफा कमविणे हा मुख्य उद्देश असतो. त्यासाठी भाषा हे उपयुक्त असेल तर ते वापरले जाईल. जात आहे. असे दिसते. आपल्या आजच्या सगळ्याच महत्त्वाच्या भाषा केवळ संख्येच्या बळावर टिकतील अशी चिन्हे आहेत"[५] म्हणजेच मराठी भाषेमध्ये होत चाललेले हे स्थित्यंतर काळानुरूप बदलले आहेत. असेच म्हणावे लागते.

संदर्भ ग्रंथ

१. गजेंद्रगडकर श्री. न. भाषा व भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे. पुनर्मुद्रण जुलै 2012
२. गजेंद्रगडकर श्री. न. भाषा व भाषाशास्त्र व्हीनस प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण, जुलै 2012
३. राजवाडे वि. का. महाराष्ट्राचा वसाहत काल निबंध, इतिहास, ऐतिहासिक
४. दुर्गा भागवत संपा. पुणे 1979 राजारामशास्त्री भागवत खंड १ मराठ्या संबंधाने चार उद्धार, वरदा प्रकाशन
५. अभिजात मराठी भाषा समिती अहवाल 2013 महाराष्ट्र शासन

दळण वळण नवीन सुधारणा एक विचार प्रवाह

श्रीकांत गव्हाणे

संशोधन विद्यार्थी

प्रस्तावना : कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास हा त्या त्या राष्ट्रातील दळण वळणा च्या साधना व अवलंबून असतो दळणवळणाच्या पद्धती टपाल सेवा तारसेवा टेलिफोन दूरदर्शन आणि माहिती सेवांचा समावेश होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक नियोजनात सुरुवात झाली. म्हणजे 1950-51 पासून भारतातील टपाल सेवेच्या विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. भारतात सध्या 1.5 लाख टपाल कचऱ्यात आहेत. भारताच्या ग्रामीण भागात डोंगराळ व आदिवासी भागात टपाल सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे हे असे असले तरी अद्यापही 1,10,000 ग्रामपंचायती असलेल्या खेड्यात टपालाची कार्यालय नाही .टपाल खात्याने लोकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करून दिले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत दळणवळण किंवा संदेशवहन प्रणालीला अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे .कारण अर्थव्यवस्थेच्या गतीमान विकासासाठी जलद गतीने संपर्क माध्यमे उपलब्ध असणे तितकेच महत्त्वाचे असते .ज्ञान माहिती आणि संदेश यांचे आदान-प्रदान म्हणजे संदेश वहन होय. कोणत्याही क्षेत्राचा विकास देशाच्या दळणवळणाच्या सुविधा वर अवलंबून असतो ज्याठिकाणी दळणवळणाची माध्यम पुरेशी आहेत .त्या ठिकाणच्या भागाचा विकास हा पूर्णपणे होत असतो. म्हणून प्रत्येक क्षेत्रात दळणवळणाच्या सुविधा पुरेश्या असणे आवश्यक असते व त्या ठिकाणी पूर्ण विकास हा घडून येतो.

अभ्यास पद्धती :-

सदर शोध प्रबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे .दुय्यम माहिती संदर्भ दैनिक वर्तमानपत्रे, मासिके ,पुस्तके, इंटरनेट सुविधा ,इत्यादी गोष्टीचा आधार घेतलेला आहे .वरील उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून सामग्री संकलन केले आहे.

संशोधनाचा उद्देश:-

1) राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्य महामार्ग यांचा दर्जा सुधारणे.

2) ग्रामीण भागात रस्ते उपलब्ध करणे.

3) रस्ता वाहतुकीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

4) रोजगार वाढविण्यासाठी रस्त्याचा विकास करणे.

ग्रहीतके :-

1) भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठा उद्योग म्हणून भारतीय रेल्वेचा उल्लेख करावा.

2) भारतातील हवाई वाहतुकीचे आधुनिकीकरण करणे .

3) भारतातील हवाई वाहतुकीच्या दराची पुनर्रचना करणे.

दळण वळण सुविधा /साधने :-

1) दूरसंचार (दूरध्वनी /मोबाईल):-

भारतीय अर्थव्यवस्थेत दूरसंचार माध्यमाला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. सर्वप्रथम भारतात 1851 मध्ये कोलकत्ता ते डायमंड यादरम्यान पहिली टेलिग्राम लाईन सुरू करण्यात आली. 1882 मध्ये टेलिफोन सेवा भारतात सर्वप्रथम सुरू करण्यात आली. दूरसंचार क्षेत्रातील वेगवान बदल लक्षात घेता शासनाने 1971 मध्ये नवीन कायदा करून भारत दूरसंचार नियंत्रण प्राधिकरणाचा स्थापना केली.

2) टपाल व तार सेवा :-

भारतात जवळपास 1,50,000 लाखापेक्षा अधिक पोस्ट ऑफिस असून जगातील सर्वात जास्त टपाल सेवा आपल्याकडे आहे .सुरूवातीला 1688 मध्ये मुंबई आणि मद्रास येथे कंपनी पोस्टची कार्यालय स्थापन झाली .भारतीय टपाल सेवा ही भारतातील मध्यवर्ती सरकारच्या टपाल खात्यामार्फत इंडिया पोस्ट या ब्रँड च्या नावाने चालवली जाते. 1986 मध्ये भारतीय पोस्ट खात्याने स्पीड पोस्ट सेवा सुरू केली आहे .तसेच 2002 पासून स्पीड पोस्ट साठी इंटरनेट सिस्टीम वापरली जाते. 15 जुलै 2013 पासून मात्र देशातील तार सेवा बंद केली आहे.

3) रेडिओ :-

जनसंपर्क माध्यमाचे एक प्रभावी साधन म्हणून रेडिओ चा उल्लेख केला जातो. भारतात सर्वप्रथम 1923 मध्ये रेडिओ कार्यक्रमाचे प्रसारण केले गेले होते .23 जुलै 1927 रोजी मुंबई येथून रेडिओ प्रसारण हास सुरुवात झाली. भारतात सध्या 233 प्रसारण केंद्र कार्यरत आहेत.

4) टीव्ही (दूरदर्शन):-

भारतात दूरदर्शनचे पहिले प्रसारण 15 सप्टेंबर 1959 रोजी दिल्ली येथे करण्यात आले .15 सप्टेंबर 1976 मध्ये दूरदर्शन आकाशवाणी पासून वेगळे करू 1982 मध्ये राष्ट्रीय प्रसारण आला सुरुवात झाली .तसेच भारतात सर्वप्रथम चेन्नई येथून रंगीत दूरदर्शन प्रक्षेपणात सुरुवात झाली. आज आपल्या देशात 22.3 कोटी घरांपैकी 13.4 कोटी घरांमध्ये म्हणजे जवळपास 60 टक्के घरांमध्ये दूरदर्शन संच आहेत.

5) इंटरनेट सुविधा:-

इंटरनेट सुविधा प्रथम 1969 मध्ये अमेरिकेत सुरू झाली. जगभरातल्या छोट्या नेटवर्कना जोडणारे मोठे नेटवर्क म्हणजे इंटरनेट होय. इंटरनेट मुळे जगभरातले असंख्य संगणक एकमेकांशी जोडले जातात. 15 ऑगस्ट 1995 पासून विदेश संचार निगम लिमिटेड एन भारतात इंटरनेट सेवा सुरू केली. यादृष्टीने इंटरनेटचे महत्त्व आपल्याला लक्षात घेता येईल. आज आपण जगातील कुठलीही माहिती घरी बसल्या इंटरनेट च्या माध्यमातून उपलब्ध करू शकतो.

6) रस्ते वाहतूक:-

रस्ते वाहतूक निर्माण करण्यासाठी रेल्वे वाहतुकीच्या खर्चाच्या तुलनेत फार कमी गुंतवणूक करावी लागते. देशाच्या काही भागात यात प्रामुख्याने डोंगराळ भागात रेल्वे वाहतूक अवघड असते. तेव्हा अशा भागात रस्त्याची वाहतूक आवश्यक आणि आणि सोयीची असते. भारतात प्रामुख्याने कृषिप्रधान देश असताना शेतमाल असे फळे भाज्या यासारख्या नाशवंत शेतमालाची वाहतूक करण्यासाठी रस्ते वाहतूक महत्वाची असते.

7) वाहतूक:-

देशातील वाहतूक व्यवस्थेवर बाजारपेठेचा विस्तार अवलंबून असतो. देशात रेल्वे रस्ते आणि जलवाहतूक वाढल्यास विविध प्रदेश एकमेकास जोडले जातात. आणि बाजारपेठ वाढते देशातील वाहतूक व्यवस्था विसरल्यास श्रमविभागणी आणि उत्पादन यांच्या वाढीस चालना मिळते. देशातील वाहतूक व्यवस्था सुधारल्यास स्थिती तसेच कारखानदारी या क्षेत्राचा विकास होतो . वाहतूक व्यवस्था एक विकास जोडली केल्यास शेती जंगल खनिज इत्यादी साधनांचा योग्य प्रमाणात वापर केला जातो.

8) रेल्वे वाहतूक:-

भारतात सर्वप्रथम मुंबई ते ठाणे 22 मेलाचा रेल्वे मार्ग 1856 मध्ये सुरु करण्यात आला. व त्यानंतर कलकत्ता शहरात रेल्वे मार्ग सुरू करण्यात आली. भारतातील रेल्वे वाहतुकीची प्रगति देशाच्या औद्योगिक करणार बरोबरच झाली. असे म्हणता येईल मुंबई शहरात कापड उद्योग अस्तित्वात आले. आणि त्याबरोबरच तेथे रेल्वे वाहतुकीला सुरुवात झाली.

9) इंडियन एअर इंटरनॅशनल:-

ही संस्था भारत व जगातील इतर देशांना हवाई वाहतुकीची सेवा पुरविते.

10)जलमार्ग वाहतूक:-

जलमार्ग वाहतुकीचे दोन प्रकार आहे. एक म्हणजे अंतर्गत जलमार्ग आणि दुसरा म्हणजे किनाऱ्यावरील किंवा सागरी वाहतूक होय .भारतात काही मोजक्या राज्यातील पश्चिम बंगाल आसाम तामिळनाडू या राज्यात अंतर्गत जलवाहतूक चालते. 1951 मध्ये एक समितीने आपले अहवाल सादर केला. व सरकारने त्याअंतर्गत वाहतुकीने सुधारणा घडवून आणण्याच्या या समितीने केलेल्या शिफारशी कारल्या या शिफारशीची अंमलबजावणी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून करण्यात आली.

निष्कर्ष :-

उत्तम दळणवळण हे आजच्या काळातील महत्त्वाची गरज बनली आहे .भूतलावर तलाशया वरून व आकाशातून दळणवळण होऊ शकते. दळणवळणासाठी वाहने लागतात. पण वाहतुकीसाठी वेगवेगळ्या ठिकाणांना जोडणाऱ्या रस्ते किंवा रूळमार्ग असावे लागतात. राष्ट्रीय महामार्ग हे मार्ग देशाच्या विकासात फार मोठा हातभार लावतात .या रस्त्याची ची बांधणी आणि देखभाल केंद्र सरकार करते. राज्याचा विकास हा तिथल्या पायाभूत सुविधावर अवलंबून असतो .आजही बऱ्याच ठिकाणी रस्त्याचे दुरावस्था आहे .परंतु मागील काही वर्षात भारत सरकारने रस्तेबांधणी दळण वळणावर भर दिलेला आहे . म्हणून भारत देशात दळणवळणाची प्रमाण वाढत जात आहे.

संदर्भसूची :-

1). भारतीय अर्थव्यवस्था: प्रा. एस एस देवनाळकर.

2) भारतीय अर्थव्यवस्था: विद्यावती प्रकाशन लातूर.

3). इंटरनेट सुविधा:-

4). स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र: डॉ.किरणजी देसले.

महिला उद्यमिता

डॉ सुरेखा पिपलानी
एसोसिएट प्रोफेसर (अर्थशास्त्र विभाग) जीयू (पी जी) कॉलेज, बहेड़ी (बरेली)
E-mail:- piplanisurekha03@gmail.com

सार–संक्षेप

आर्थिक उदारीकरण के इस दौर में राष्ट्र के आर्थिक विकास की गति को प्रोत्साहित करने हेतु महिला उद्यमिता का महत्व बढ़ता जा रहा है। महिला समाज का एक महत्वपूर्ण और अभिन्न अंग है। सदियों से चली आ रही परम्पराओं को पार कर भारतीय महिलाऐं अपने सीमित दायरे से बाहर निकली हैं और व्यापार जगत में अपनी एक अलग पहचान बना रही हैं। महिला उद्यमिता महिला सशक्तीकरण का सबसे बड़ा माध्यम है। वर्तमान समय में महिला अपनी बहु–आयामी भूमिकाओं के साथ व्यवसाय और औद्योगिक क्षेत्रों में योगदान देकर स्वयं तो स्वावलम्बी हो ही रही है लेकिन साथ ही साथ दूसरों के लिये भी रोजगार का सृजन कर रही हैं परिणामस्वरूप सकल घरेलू उत्पाद एवं राष्ट्रीय आय में वृद्धि हो रही है। विगत दशकों में कृषि, यातायात, उद्योग, संचार, शिक्षा, स्वास्थ्य आदि क्षेत्रों में हुए विकास में महिलाओं ने प्रत्यक्ष एवं अप्रत्यक्ष रूप में अपनी सहभागिता की है। शिक्षा, प्रशिक्षण एवं आवश्यक दिशा निर्देशों के कारण उन्हें वित्तीय स्वतन्त्रता और अपने प्रबन्धकीय कौशल का प्रदर्शन करने का अवसर भी मिला है। इस क्षेत्र में महिलाओं की बढ़ती सक्रियता ने महिलाओं के अन्दर नेतृत्व करने का विश्वास जाग्रत किया है। सरकार द्वारा भी महिला उद्यमिता को प्रोत्साहित करने हेतु कई योजनाऐं चलाई जा रही हैं।

मुख्य शब्द महिला उद्यमिता, प्रबन्धकीय कौशल, नेतृत्व क्षमता, वित्तीय स्वतन्त्रता, आर्थिक विकास

प्रस्तावना

महिला उद्यमिता किसी भी राष्ट्र की आर्थिक प्रगति का महत्वपूर्ण साधन है। परिवर्तित होते समय के साथ सांस्कृतिक मानदण्डों और साक्षरता में वृद्धि के साथ महिलाऐं तेजी से उद्यमशीलता के क्षेत्र में प्रवेश कर नव प्रवर्तनों की वाहक बन रही हैं। वर्तमान समय में महिला उद्यमियों की संख्या में तेजी से वृद्धि हो रही है। नेतृत्व एवं प्रबन्धन क्षमता के साथ–साथ महिलाओं की सूझ–बूझ और कौशल ने व्यवसाय और उद्यमों को नवीन दिशाऐं प्रदान की हैं। आज विभिन्न उद्यमों में महिलाऐं अपने विशिष्ट योगदान से एक अलग पहचान बना रही हैं। वे न केवल खुद को आत्मनिर्भर बना रही हैं अपितु दूसरों के लिये भी रोजगार का सृजन करके सकल घरेलु उत्पाद बढ़ाने, निर्धनता को दूर करने एवं आर्थिक विकास को बढ़ावा देने में उल्लेखनीय योगदान दे रही हैं।

महिला उद्यमिता ने समाज में महिला सशक्तीकरण को काफी बल प्रदान किया है। अच्छे जीवन स्तर की लागत में लगातार वृद्धि होने के कारण महिलाओं को अपने परिवार के सहयोग हेतु घरेलु दायित्वों के साथ आर्थिक गतिविधियों में संलग्न होना आवश्यक हो गया है। आधुनिक युग में महिला उद्यमिता को पर्याप्त प्रोत्साहन भी मिल रहा है। सरकार भी महिला उद्यमिता के महत्व को स्वीकार करते हुए अनेक योजनाएँ उपलब्ध करा रही है जिससे महिला उद्यमियों को अपना उद्यम शुरू करने में सहायता मिल रही है। उद्यमिता वास्तव में औद्योगीकरण का आधार है और देश के आर्थिक विकास को निर्धारित करता है। एक महिला उद्यमी वह है जो अपना उद्यम शुरू करने, उसकी व्यवस्था सम्भालने तथा उसके लिये वित्तीय संसाधनों का प्रबन्ध करने के सभी दायित्व निभाती है।

भारत सरकार के अनुसार महिला उद्यमी होने के लिये उद्यमी का वित्तीय भागीदारी में कम से कम ५१ प्रतिशत योगदान होना आवश्यक है। इस प्रकार प्रमुख वित्तीय भागीदारी होने के बाद ही वह महिला एक उद्यमी की श्रेणी में मानी जायेगी।

महिला उद्यमियों के समक्ष चुनौतियाँ

यद्यपि महिला उद्यमिता का क्षेत्र निरन्तर विकसित हो रहा है फिर भी महिला उद्यमियों को अपने व्यवसाय से सम्बन्धित अनेक संरचनात्मक एवं संगठनात्मक चुनौतियों एवं बाधाओं का सामना करना पड़ता है। राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण के अनुसार भारत के व्यवसायिक प्रतिष्ठानों में वर्तमान में ८.०५ मिलियन से अधिक महिला उद्यमी हैं। यह कुल भारतीय व्यापार उद्योग का १४ प्रतिशत है, इसमें से अधिकतर उद्यम स्ववित्त पोषित तथा छोटे स्तर के हैं। वास्तविकता यह है कि महिलाओं के स्वामित्व वाली कम्पनियों की संख्या अभी भी काफी कम है, यद्यपि इंद्रा नुयी, चंदा कोचर, अरून्धति राय, किरण मजूमदार, नीलम धवन तथा रितु कुमार जैसी सफल महिला उद्यमी हमारे देश के आर्थिक विकास का एक नया अध्याय लिख रही हैं लेकिन फिर भी सामान्य महिलाओं को अपना व्यवसाय शुरू करने में एक अलग ही परिदृश्य का सामना करना पड़ता है। उन्हें वित्तीय व्यवस्था, कार्यस्थल पर सुरक्षा व्यवस्था से लेकर विपणन, प्रशिक्षण, सरकारी सहायता प्राप्त करने, नवाचार अपनाने की चुनौतियो का सामना करने के साथ–साथ कुछ अन्य प्रकार की समस्याओं का भी सामना करना पड़ता है। व्यक्तिगत प्राथमिक दायित्वों तथा कार्य के दबाव के कारण भी महिलाओं को अपने व्यक्तिगत और व्यवसायिक जीवन के बीच संघर्ष से निपटना पड़ता है। 'मास्टर कार्ड' की एक रिपोर्ट के अनुसार भारत का कारोबारी माहौल महिला उद्यमियों के लिये अनुकूल नहीं है। ऐसी अनेक सामाजिक, तकनीकी और वित्तीय बाधाऐं हैं जो महिलाओं के स्वामित्व वाले व्यवसायों के विकास में बाधा हैं। जिस प्रकार का व्यवसाय महिलाऐं करती हैं उसकी प्रकृति भी पुरूषों की तुलना में अलग है। इसलिए ऋण एवं समरूपी ऋण की उनकी आवश्यकता अलग है।

वित्त किसी भी व्यवसाय का जीवन दाता होता है। सामान्यत: महिला उद्यमियों को अपने वित्तपोषण विकल्पों तक उचित पहुँच बनाने में कई चुनौतिपूर्ण स्थितियों का सामना करना पड़ता है। यह स्थिति शहरी महिलाओं की तुलना में ग्रामीण महिलाओं में अधिक गम्भीर है। ग्रामीण महिलाओं के लिये आर्थिक सहायता के स्रोत के रूप में अनौपचारिक सामाजिक नेटवर्क की उपलब्धता कम ही बनी रहती है जिससे अनेक कारणों से महिलाओं की वित्तीय संसाधनों तक पहुँच सीमित बनी रहती है। ग्रामीण क्षेत्रों में सुरक्षा चिन्ताओं और सामाजिक मान दण्डों के कारण समीप के बैंक तक जाने के लिये एक महिला को पुरूष सदस्य को साथ में ले जाना पड़ता है। कई शोधों के आधार पर यह तथ्य सामने निकलकर आया है कि महिलाएँ अपने पारिवारिक व्यवसाय में काफी सहजता के साथ योगदान देती हैं क्योंकि सामान्यत: महिला उद्यमियों में गतिशीलता की

कमी पायी जाती है और वे शीघ्रता से एक उद्यम को छोड़कर दूसरे उद्यम को अपनाने की जोखिम नहीं उठा पाती तथा एक स्थान को छोड़कर दूसरे स्थान पर जाने में हिचकिचाती हैं। अनिश्चितता के माहौल के कारण भी महिला उद्यमी दबाव में रहती हैं। उनमें असफल होने का डर बना रहता है जिससे वे अपनी क्षमताओं पर पूर्ण भरोसा नही कर पातीं क्योंकि उन्हें परूष प्रधान मानसिकता वाले वातावरण में कार्य करना पड़ता है। कई क्षेत्रों में इस कारण से महिला प्रतिनिधियों की संख्या में भारी कमी आ जाती है। जिससे लिंग असंतुलन को बढ़ावा मिलता है। 'बेन एण्ड कम्पनी' और 'गूगल' की 'बूमन इण्टरप्रेन्योराशिप इन इण्डिया— पावरिंग द इकोनोमी विद हर' नामक रिपोर्ट के अनुसार, यदि महिलाओं में उद्यमशीलता को प्रोत्साहन दिया जाये तो देश के आर्थिक और सामाजिक परदृश्य में काफी बदलाव आ सकता है। यह रिपोर्ट बताती है कि महिलाओं के उद्यमशीता के क्षेत्र में आगे आने से देश में १५ से १७ करोड़ रोजगार के अवसर पैदा हो सकते हैं। भारत जैसे विशाल जनसंख्या वाले देश में रोजगार के अवसर सृजित करने में महिला उद्यमियों की इस महती भूमिका पर ध्यान दिया जाना आवश्यक है।

महिला उद्यमियों की समस्याओं और बाधाओं के अनुभव के परिणामस्वरूप महिला उद्यमिता में वांछित विकास का लक्ष्य अभी प्राप्त नहीं हो पाया है। यद्यपि कानूनों और नीतियों के लागू हो जाने से महिलाओं के लिये व्यापार करने की स्थितियाँ तुलनात्मक रूप से बहुत अनुकूल हुई हैं लेकिन सरकारी नीतियों के साथ पारिवारिक सोच एवं सामाजिक बंधनों में शिथिलता भी बेहद आवश्यक है।

महिला उद्यमिता को प्रोत्साहन देने हेतु सरकारी पहल

आर्थिक विकास को गति देने में नि:सन्देह महिला उद्यमियों की भूमिका अत्यन्त महत्वपूर्ण है। देश में महिलाओं द्वारा कई उद्यम सफलता पूर्वक चलाये भी जा रहे हैं लेकिन अभी भी इनकी संख्या काफी कम है। अत: उद्यमिता से जुड़े क्रिया कलापों में महिलाओं की भागीदारी को बढ़ाने एवं प्रोत्साहित करने का वातावरण तैयार करना अत्यन्त आवश्यक है। स्वतन्त्रता प्राप्ति के बाद से ही महिलाओं का विकास सरकार की शीर्ष प्राथमिकताओं में रहा है और महिला उद्यमिता को प्रोत्साहन देने के लिये न्यूनाधिक प्रयास किये जाते रहे हैं, किन्तु इधर कुछ समय से हमारे देश में महिला उद्यमिता को बढ़ावा देने के प्रयासों में काफी तीव्रता आयी है। आज न केवल केन्द्र एवं राज्य सरकारों द्वारा महिला उद्यमियों के लिये विशिष्ट योजनाऐं संचालित की जा रही हैं अपितु बैंकों द्वारा भी सस्ती ब्याज दरों पर ऋण उपलब्ध कराया जा रहा है। अपना उद्यम चलाने वाली महिलाओं को वित्तीय आधार पर समर्थन देने एवं प्रोत्साहित करने के लिये भारत सरकार द्वारा कई योजनाऐं एवं प्रशिक्षण कार्यक्रम प्रारम्भ किये गये हैं।

एम.एस.एम.ई. मन्त्रालय ने महिला उद्यमियों की कठिनाईयों को दूर कर उन्हें सहयोग करने के लिये हैल्प लाईन शुरू की है। सरकार उद्यमिता विकास कार्यक्रम के अर्न्तगत महिलाओं को शिक्षित करने के साथ—साथ उनके कौशल विकास पर भी बहुत ध्यान दे रही है। सरकार ने महिला उद्यमियों को उनके व्यवसाय से होने वाले लाभ पर ३ साल तक १०० प्रतिशत करों से छूट दी है। इसके अतिरिक्त केन्द्र व राज्य सरकारों द्वारा महिलाओं को अपना उद्यम चलाने हेतु प्रेरित करने की कई योजनायें चलायी जा रही हैं।

भारतीय महिला बैंक

यह बैंक महिलाओं को नई उद्यम इकाईयाँ शुरू करने के लिये समर्थन देता है और उन्हें इसके लिये प्रोत्साहित भी करता है। भारतीय महिला बैंक का विलय भारतीय स्टेट बैंक में हो चुका हैं। इस बैंक के माध्यम से महिलाओं को कई आधारों पर ऋण उपलब्ध कराये जाते हैं।

देना शक्ति और उद्योगिनी योजना

देना बैंक तथा पंजाब एण्ड सिंध बैंक द्वारा महिलाओं को कृषिगत कार्यों, फुटकर क्षेत्र और लघु उद्यम शुरू करने के लिये यह ऋण दिया जाता है। इन क्षेत्रों में उद्यम शुरू करने के लिये यह ऋण लेने पर महिलाओं को ०.२५ प्रतिशत कम ब्याज देना पड़ता है।

महिला उद्योग निधि योजना

महिलाओं द्वारा मुख्य रूप से लघु आकार का उद्यम शुरू करने के लिये यह योजना पंजाब नेशनल बैंक ने शुरू की है। योजना के अर्न्तगत् महिलाओं को १० लाख रूपये तक का ऋण मिल सकता है जो उन्हे १० साल में चुकाना होता है। इस ऋण पर ब्याज की दरें बाजार की दरों पर निर्भर करती हैं जो समय—समय पर बदलती रहती हैं।

प्रधानमंत्री मुद्रा योजना

यह योजना भारत सरकार द्वारा शुरू की गयी प्रमुख योजनाओं में शामिल है। यह योजना उन उत्साही महिला उद्यमियों को समर्थन और प्रोत्साहन देती है जो ब्यूटी पार्लर, खुदरा दुकान या ट्यूशन केन्द्र जैसे कम लागत और आसानी से शुरू किये जा सकने वाले स्टार्टअप लगाना चाहती हैं।

स्त्री शक्ति ऋण

यह योजना महिला उद्यमियों को कई रियायतें देने के लिये भारतीय स्टेट बैंक द्वारा शुरू की गयी है। इस योजना का लाभ पाने के लिये पहले महिला उद्यमियों को उद्यमिता विकास कार्यक्रम (ई.डी.पी.) में नाम दर्ज कराना होगा जिसमें सफलता पूर्वक व्यापार चलाने का प्रशिक्षण दिया जाता है।

महिला उद्यमिता मंच

देश भर में उभरती महिला उद्यमियों को उपयुक्त परिवेश दिलाने के उद्देश्य से नीति आयोग और सिस्को ने श्ँण्म्च् छगजश शीर्षक से महिला उद्यमिता मंच का अगला चरण शुरू किया है। नीति आयोग ने २०१७ में महिला उद्यमिता को बढ़ावा देने के लिये इस मंच को प्रारम्भ किया था महिला उद्यमिता मंच एक ऐसी पहल है जो विविध पृष्ठभूमि की महिलाओं को साथ लाता है और उन्हें कई संसाधनों, सहायता और सीखने की सुविधा प्रदान करता है। सरकार, निजी क्षेत्रों और गैर सरकारी संगठनों ने महिलाओं के स्वामित्व वाले कारोबार में मदद के लिये कई योजनाओं एवं पहलों का शुभारम्भ किया हुआ है महिलाओं के स्वामित्व वाले ३ प्रतिशत एम.एस.एम.ई. फर्मों से अनिवार्य खरीद तथा महिला उद्यमियों से जुड़े कौशल प्रशिक्षण एवं कौशल प्रमाणन आदि इसके कुछ उदाहरण हैं।

निष्कर्ष

नि:सन्देह भारत को आत्मनिर्भर बनाने के साथ—साथ विकास की गति को तीव्र करने के लिये महिला उद्यमिता की भूमिका अत्यन्त महत्वपूर्ण है। भारत को + ५ ट्रिलियन की अर्थव्यवस्था बनाने के लिये महिलाओं को उद्यमिता के क्षेत्र में महत्वपूर्ण भूमिका निभानी होगी। इसके लिये शीर्ष प्रथमिकता के रूप में लैंगिक असमानता को कम करना अत्यन्त आवश्यक होगा क्योंकि भारत को एक ऐसे विकास मॉडल की जरूरत है जो अधिक से अधिक महिलाओं को उनकी योग्यता के अनुसार उद्यमशीलता के लिये प्रोत्साहित करे।

सन्दर्भ सूची

1. कोठारी, मिलिन्द, उद्यमिता विकास,२०१६, रमेश बुक डिपो, जयपुर
2. माथुर, डॉ०,एस०बी, भारत में उद्यमिता विकास २०१०हिमालया पब्लिशिंग हाउस, मुम्बई।
3. Startupindia.gov.in
4. www.niti.gov.in
5. www.jagranjosh.com
6. www.yojana.gov.in
7. www.jansatta.com

आंबेडकरोत्तर काळातील आंबेडकरवादी चळवळी

प्रा.डॉ. बी.एम. काळे

मराठी विभाग प्रमुख, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

गोषवारा : आंबेडकरोत्तर कालखंडात आंबेडकरी विचार रुजविण्यासाठी, अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व्यापक प्रमाणात चळवळी उभारल्या गेल्या. त्या चळवळींच्या यशापयशाबद्दल विचारवंतांनी विचार व्यक्त केले आहेत, स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीअनेक राजकीय लढे उभारले. महाडच्या सत्याग्रहापासून ते धर्मांतरापर्यंत त्यांनी जे जे प्रयत्नकेले ते अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक न्याय मिळावा याच हेतूने; परंतुधर्मांतराच्या ऐतिहासिक घटनेनंतर अल्पावधीतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाणझाले. त्यामुळे जातिव्यवस्थेचे निर्मूलन करण्याचे, सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचेआणि गौतम बुद्धाने पुरस्कृत केलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या तत्त्वत्रयीवर आधारलेल्यामानवताधर्माची प्रस्थापना करण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले. हे अपुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठीआंबेडकरोत्तर काळात अनेक चळवळी उभारल्या गेल्या. भूमिहीनांचा सत्याग्रह,बौद्धांच्या सवलती, धर्मांतराची चळवळ, दलित पँथरचे कार्य, नामांतरलढा, मास मुव्हमेंट, दलित मुक्तिसेनेचेकार्य,मंडल आयोग,रिडल्स प्रकरण इत्यादींसंबंधी विविध चळवळी उभारल्या गेल्या.या चळवळींचाआढावा घेऊन डॉ.गंगाधर पानतावणे,राजा ढाले, ज.वि.पवार,डॉ.यशवंत मनोहर,नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे इत्यादी विचारवंतांनी या चळवळींच्या यशापयशाचा मागोवा घेतला आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाने अस्पृश्यांचेप्रश्न सोडविण्यासाठी आंबेडकरोत्तर काळातविविध चळवळी उभारल्या. रिपब्लिकन पक्ष म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील पक्ष. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून या पक्षाची निर्मिती करण्यात आली. भारतातील सर्वदुर्बल घटकांना, अल्पभूधारकांना, भूमिहीन मजुरांना, श्रमिकांना, अल्पसंख्याकांना संघटितकरून त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याची घोषणा केली. नुसती घोषणाचकेली असे नव्हे, तर त्या दृष्टीने पाऊलही उचलले; परंतु अवघ्या दोन वर्षांच्या आतच पक्षदुभंगला आणि पुढे चालून वेळोवेळी दुभंगत राहिला. तरीही एन. शिवराज (१९५७ ते १९६४),दादासाहेब गायकवाड (१९६४ ते १९७१), रा. सु. गवई (१९७१ ते १९७९) यांनी पक्षाचे नेतृत्वखंबीरपणे स्वीकारून अस्पृश्यांचे प्रश्न सोडवण्याचा सातत्याने प्रयत्न केला. भूमिहीनांच्याप्रश्नाबरोबर बौद्धांना सवलती मिळाल्या पाहिजेत.

प्रस्तावना

, अस्पृश्यांना दीक्षाभूमीची जागा मिळाली पाहिजे, शेतमजुरांवर होणारे अन्याय थांबले पाहिजेत, महागाईला आळा घालावा, झोपडपट्टयांची सुधारणा करावी, राखीव जागाचा अनुशेष भरून काढावा, अस्पृश्यता निवारण कायद्याची अंमलबजावणी करावी आणि लोकसभेच्या केन्द्रीय सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेतैलचित्र लावावे, अशा मागण्यांसाठी रिपब्लिकन पक्षाने वेळोवेळी सत्याग्रह, मोर्चे, आंदोलनेकेले. आपल्या प्रश्नांवर अस्पृश्यांना संघटित करून ते प्रश्न त्यांनी सोडवले. या संदर्भात डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात, "अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीभारतीय जनतेला दिलेले शेवटचे राजकीय हत्यार आहे. या हत्याराचा प्रभावीपणे उपयोगकरून भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक जीवनात लोकशाहीच्या आणि अहिंसक मार्गानेक्रांतिकारी परिवर्तन केले जाईल, असा त्यांना विश्वास वाटत होता." रिपब्लिकन पक्षामार्फत १९६४ साली लढलेल्या भुमिहीनांच्या सत्याग्रहाला अधिक महत्त्वदिले जाते. कारण हा सत्याग्रह देशव्यापी होता. ०१ऑक्टोबर १९६४ रोजी देशाच्या विविध भागांतूनहजारो भुमिहिनांना संसदेवर मोर्चा नेऊन त्या वेळचे पंतप्रधान

लालबहादूर शास्त्री ह्यांना आपल्यामागण्यांचे निवेदन दिले होते. ह्या सत्याग्रहाची आखणी एन. शिवराज ह्यांनी केली होती;पण त्यांचे सत्याग्रहापूर्वीच निधन झाल्याने ह्या सत्याग्रहाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड यांनी केले.'कसेल त्याची जमीन, नसेल त्याचे काय?' अशी घोषणा देऊन त्यांनी विराटसत्याग्रह घडवून आणला.या संदर्भात अर्जुन डांगळे म्हणतात,"१९६४साली देशव्यापी भूमिहीनांचाविराट सत्याग्रह झाला. ज्यात तीन लाख चाळीस हजार सत्याग्रही तुरुंगात गेले. सत्याग्रहींनातुरुंग अपुरे पडू लागले होते. धुळ्यामध्ये तर सत्याग्रहींना ठेवण्यासाठी थिएटर भाड्याने घ्यावेलागत होते. हा सत्याग्रह दादासाहेबांच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे; पण, डॉ. बाबासाहेबआंबेडकरांच्या नंतर रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीतील एक सोनेरी पान आहे. "हे जेलभरोआंदोलन पाहून लालबहादूर शास्त्रींनी त्यांच्या वजनाची व कार्याची तोंड भरून प्रशंसा केलीहोती. हे आंदोलन अडीच महिने चालले. भूमिहीनांनी अडीच महिने शर्थीने लढा दिला.शेवटीसरकारला नमते घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या लागल्या.त्यानुसार पडीक, फॉरेस्ट व गायरानया तिन्ही प्रकारच्या जमिनी देण्याचा सरकारने निर्णय घेतला.याबाबतज.वि.पवार म्हणतात,"आंबेडकरी जनतेचा आंबेडकरोत्तर चळवळींतील हा पहिला विजय होता. लोकशक्तीच्या बळावर मिळवलेला हा विजय होता. मुकुटातला तो एक शिरपेच ठरला. "विशेष म्हणजे या सत्याग्रहाचे महत्त्व हे केवळ आर्थिक प्रश्नापुरते मर्यादित नव्हते, तर त्याला सामाजिक आशयही होता. कारण जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या भिंती ओलांडून सगळ्या भारतातील ग्रामीण कष्टकरी जनता या सत्याग्रहात सामील झाली होती. दलित पँथरच्या उदयाबाबत डॉ.लता मुरूगकर लिहितात,"आर्थिक-सामाजिक दुःस्थिती, वाढते अत्याचार, समर्थ व प्रेरक विद्रोही साहित्य निर्मिती व दलित तरुणवर्गाच्या टोकदार झालेल्या जाणिवा ह्याच गोष्टी दलित पँथर चळवळीच्या उदयास निर्णायकपणे कारणीभूत ठरल्या. "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवरील असीम श्रद्धा, आंबेडकरवादी समाजाविषयीचा अपार जिव्हाळा, सामाजिक विषमतेविरुद्ध पेटून उठलेले संतप्त तरुण ह्यांमुळे'दलित पँथर'ही अल्पावधीतच राज्यभर पसरली. गावोगाव पँथरच्या छावण्या निघाल्या. पँथर्सची बेदरकार भाषणे, गर्दी खेचणाऱ्या वादळी सभा, हाणामारी, मोर्चे, पोलीस केसेस ह्यांमुळे दलित पँथरची संघटना चर्चेत ठरल्याचीत्या नमूद करतात.

'दलित पॅंथर' च्या संस्थापकाबद्दलसांगताना प्रल्हाद चेंदवणकर लिहितात, "साहित्यिकनामदेव ढसाळ, ज.वि.पवार, राजा ढाले, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, उमाकांत रणधीरत्याचप्रमाणे साहित्यिक नसलेले; परंतु सभा-संमेलनांमधून बोलणारे भाई संगारे, लतीफ खाटीक हे आणि रामदास सोरटे, गायकवाड व प्रत्यक्ष चळवळीत कार्य करणारे इतर कार्यकर्तेहे सर्वच जण त्या वेळी तेथे जातीने मोर्चात घोषणा देत होते. त्या सर्व जणांना मी तर “दलितपँथर"चे मूळ संस्थापक समजतो. "अमेरिकेतील 'ब्लॅक पँथर' चळवळीपासून स्फूर्ती घेऊनचळवळीने 'दलित पॅंथर' नाव ठेवल्याचेही ते सांगतात. ही चळवळ वाढविण्यासाठी नामदेवढसाळ, राजा ढाले, ज.वि. पवार, रामदास सोरटे, लतीफ खाटीक, अविनाश महातेकर, अर्जुनडांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, भाई संगारे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे,उमाकांत रणधीर, दयानंद मस्के, प्रीतमकुमार शेगावकर आणि टी.एम. कांबळे आदी पँथरनेत्यांनी कष्ट उपसले. आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मोर्चे, घेराओ, निदर्शने, बंद, सभा,मंत्र्याच्या गाडीपुढे आडवे पडणे, विधानसभेत उड्या मारणे, काळा स्वातंत्र्यदिन साजरा करणे,जिथे अस्पृश्यांवर अन्याय झाला तेथे जाऊन अन्यायखोराला जाब विचारणे इत्यादी उपक्रमत्यांनी राबविले.या चळवळींचे महत्त्व विशद करताना शरणकुमार लिंबाळे म्हणतात,"दलितपँथर म्हणजे दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धची जळजळीत प्रतिक्रियाच. आंबेडकराच्यानिधनानंतर मरगळ आलेल्या दलित समाजाला पँथर एक नवी ठिणगी वाटू लागली.आपल्यामुक्तीची आशा वाटू लागली. दलित पँथरच्या उदयामुळे दलित तरुणांच्या मनात विषमव्यवस्थेविषयी असलेल्या संतप्तपणाला एक नवे व्यासपीठ जसे मिळाले तसेच दलित समाजातचळवळीचे चैतन्य निर्माण झाले होते,हेही नाकारता येत नाही.

"वरळीची दंगल, गीतेचे दहन,शंकराचार्यावर जोडा फेकणे, शिवसेनेबरोबर झालेल्या मारामाऱ्या यांमुळे दलित पँथरचा दबदबानिर्माण झाला.'शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन मेलेलं बरं' असाप्रखर बाणा अस्पृश्य तरुणांत निर्माण केला. परंतु पुढे दलित पँथरमध्ये'मार्क्सवाद की आंबेडकरवाद' हा वैचारिक संघर्ष सुरू झाला.नामदेव ढसाळ 'मार्क्सवादाची' री ओढत होते, तर राजा ढाले 'आंबेडकरवादाची'. दलितपँथरने दलित, शोषित, कष्टकऱ्यांचा लढा उभारला पाहिजे ही ढसाळांची भूमिका तर दलितपँथर बौद्ध तत्त्वप्रणालीनुसार चालवली पाहिजे असे राजा ढालेंचे मत. त्यामुळे त्यांनी नामदेवढसाळ यांना 'दलित पँथर' मधून काढून टाकल्याचे जाहीर केले; परंतु नामदेव ढसाळ त्याचनावानं वावरू लागले म्हणून पुढे राजा ढालेंनी दलित पँथरच बरखास्त केली. या संदर्भात तेलिहितात, "१९७४ साली नामदेव ढसाळ यांना दलित पँथरमधून काढून टाकले, तरीही तेत्याच नावानं वावरू लागले. त्यामुळे दलित पँथर बरखास्त करण्याशिवाय इलाजच नव्हता. हेविचार प्रकर्षाने माझ्या मनात १९७५ साली आले. तोपर्यंत आणीबाणी लागू झाली. ती उठताचमी आणि ज.वि. पवार यांनी 'पँथर' बरखास्त करण्याचा निर्णय घेतला." राजा ढाले यांनीदलित पँथर' ही संघटना बरखास्त करून 'मास मुव्हमेंट' ही नवीन संघटना स्थापन केली. असेजरी असले तरी राजा ढालेंनी 'दलित पँथर'च्या माध्यमातून केलेल्या कार्याला तोड नाही. यासंदर्भात साराभाई वेळुंजकर म्हणतात,"मार्च १९७५ पर्यंत राजा ढालेंवर महाराष्ट्रात ५६ केसेस विविध कोर्टात चालू होत्या. ..... या केसेस सांभाळूनही कम्युनिस्टांच्या कचाट्यातून निगैररिपब्लिकनांच्या एकीच्या नाटकातून दलित पँथर वाचवली ती ढालेंनी." महाराष्ट्रात विविधन्यायालयांत राजा ढालेंवर झालेल्या विविध खटल्यांवरुनच त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नासंदर्भातकेलेले कार्य लक्षात येते. पुढे पँथरच्या बरखास्तीला आक्षेप घेऊन अरुण कांबळे, भाई गारे, रामदास आठवले,उमाकांत रणधीर, वामन निंबाळकर, दयानंद मस्के यांनी 'दलित पँथर' चे पुनरुज्जीवन करून'भारतीय दलित पँथर'असे नामकरण केले. आजही ही चळवळ टिकून आहे.याचे कारण सांगतानाशरणकुमार लिंबाळे म्हणतात, "त्याचे कारण म्हणजे पँथर जनतेच्या समस्यांशी प्रामाणिकराहिली आहे. तुटपुंजी आर्थिक व्यवस्था,स्वत:च्या प्रचारयंत्रणेचा अभाव आणि प्रशिक्षित कार्यकर्तेनाहीत, असे असूनही पँथरची चळवळ व्यापक बनली आहे.याचे कारण म्हणजे,पँथरकार्यकर्त्यांच्यामनातील आंबेडकरांविषयी अमाप श्रद्धा, दलित समाजाविषयीचा जिव्हाळा आणि विषमसमाजव्यवस्थेविरुद्धचा प्रखर विद्रोह, हे होय. "नामदेव ढसाळ, राजा ढाले एकत्र होते तेव्हाहीआणि नंतरही दलित पँथर सजग राहिलेली दिसून येते. छात्रवृत्ती, बॅकलॉग, आरक्षण, नामांतर,मंडल आयोग, रिडल्सचा प्रश्न अशा विविध मुद्यांवर पँथर आघाडीवर राहिली आहे. आंबेडकरोत्तर काळातला विराट लढा म्हणून नामांतराच्या लढ्याचा उल्लेख केला जातो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव 'मराठवाडा विद्यापीठाला' देण्यात यावे म्हणून सुमारे १७वर्षे हा लढा लढला. या क्रांतिसूर्याच्या नावासाठी अनेक भीमवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. पोचिराम कांबळे, पँथर गौतम वाघमारे, जनार्दन मवाडे, गोंविद भुरेवार, दिलीप रामटेके, चंदर कांबळे, नारायण गायकवाड, शरद पाटोळे, रोशन बोरकर, कु. सुहासिनी बनसोड, कु.प्रतिभा तायडे आदी कार्यकर्ते बाबासाहेबांच्या नावासाठी शहीद झाले. या शहिदांच्या अजोडकर्तृत्वाची नोंद आंबेडकरोत्तर विचारवंतांनी घेतली आहे वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडा ही आपली कर्मभूमी मानली होती. मराठवाड्यासारख्या मागासलेल्या प्रदेशात उच्च शिक्षणाची निकड अधिक आहे, हे जाणूनत्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या ह्या कार्यामुळेतेमराठवाड्यातील शैक्षणिक चळवळीचे प्रणेते ठरले. मराठवाड्याच्या भूमीवर त्यांनी केलेल्याकार्याचे उचित स्मारक असावे म्हणून मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर'ह्यांचे नाव द्यावे, अशी मागणी पुढे आली. ०७जुलै १९७७ ला जाहीर मागणी सर्वप्रथम नवस्थापितपँथरचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी केली. ०१ जुलै १९७७रोजी औरंगाबादच्या सरस्वती भुवनप्रांगणावर मराठवाड्यातील सर्वपक्षीय विद्यार्थी युवक संघटनांनी एकत्र येऊन 'विद्यार्थी कृती समिती' स्थापना केली होती. त्यांनीही इतर मागण्यांबरोबर मराठवाडा विद्यापीठास डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या, या मागण्याची समावेश केल्याचे प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे नमूद करतात. २७ जुलै १९७८ ला महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने तो ठराव मंजुर झाला;परंतु ठराव संमत झाल्याचे कळताच मराठवाड्यात दलितविरोधी दंगली ठराव सुरू झाल्या. ह्या दंगली गोरगरिबांची घरे उद्धवस्त झाली. संपुर्णजनजीवन विस्कळीत झाले.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून भारतीय दलित पँथर, मास मुव्हमेंट (राजा ढाले),दलित मुक्तिसेना (प्रा. जोगेन्द्र कवाडे)लढा तीव्र केला. प्रा.जोगेन्द्र कवाडे ह्यांनी तर नागपूर ते औरंगाबाद असा 'लॉंग मार्च' काढला.ह्या लाँग मार्चमध्ये हजारो तरुण सहभागी झाले. लाँग मार्च काढण्यापाठीमागचा उद्देश सांगतानाप्रा.जोगेन्द्र कवाडे म्हणतात, "नामांतरासाठी असे आंदोलन व्हावे ज्यामुळे संपूर्ण देशाचे, सर्वजगाचे लक्ष या आंदोलनाकडे लागावे, राज्याचे सरकार दलितांच्या मानवी मूल्यांना कसेपायदळी तुडवीत आहे हे जगजाहीर व्हावे, दलितांच्या व्यथा जगाच्या वेशीवर टांगता याव्यात,असे आंदोलन उभारावे यासाठी स्वतः तासन्तास मी विचार करत असे. ..... आंदोलनाचाधाक बसावा, दहशत निर्माण व्हावी, संपूर्ण महाराष्ट्र व देशातील जनता या आंदोलनाशीएकरूप व्हावी, अशा आंदोलनाच्या शोधात असताना 'लाँग मार्च'ची कल्पना सुचली. "संपूर्णमहाराष्ट्रातून ठिकठिकाणी लाँग मार्च निघाले. नामांतर प्रश्नही वातावरणनिर्मिती करण्यात लाँग मार्च व प्रा.जोगेन्द्र कवाडे यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांचे महत्त्व प्रतिपादन करतानाताराचंद्र खांडेकर म्हणतात, "प्रा. जोगेन्द्र कवाडे यांचे नामांतर आंदोलनातील कार्य ऐतिहासिकआहे. त्यांनी काढलेला लाँग मार्च हा जसा ऐतिहासिक आहे तसाच त्यांना मिळालेला जनतेचाउत्तुंग प्रतिसाद अविस्मरणीय म्हणावा लागेल. लॉंग मार्च हे जसे मराठवाडा विद्यापीठ नामांतराशीसंलग्न असे क्रांतिकार्य होते तसेच ते व्यापक अशा आंबेडकरी सम्यक क्रांतीचे सजग प्रत्यंतरहोते. "सवर्णांनी केलेल्या अन्याय-अत्याचारापुढे नमून न जाता दलितांनी आपली मागणीसतत पुढे रेटली. नामांतरासाठी अनेक तरुणांनी आत्मदहन केले.

दंगली, सत्याग्रह, जेलभरो आंदोलने सातत्याने चालू असताना अखेर शासनाला नमते द्यावे लागले. व तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवारांनी यांनी १४ जानेवारी १९९४ला'डॉ.बाबासाहेबआंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार केला. आंबेडकरोत्तर काळात भूमिहीनांच्यालढ्यानंतर मोठ्या दिमाखाने नोंदविला जाणारा ऐतिहासिक लढा म्हणून नामांतरलढ्याकडेपाहावे लागेल. जगाच्या कानाकोप-्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे या विद्यापीठाचे नावगेले आहे.थोडक्यात, आंबेडकरोत्तर कालखंडात आंबेडकरी विचार रुजविण्यासाठी, अन्यायालावाचा फोडण्यसाठी ज्या चळवळी उभारल्या त्या चळवळींचे महत्त्व विचारवंतांनी व्यक्त केलेआहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही मानवी मूल्ये त्या चळवळींच्या मुळाशीअसल्याचे त्यांनी प्रतिपादले आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. कसबेडॉ. रावसाहेब, रिपब्लिकन पक्ष ऐक्य, वास्तव आणि भवितव्य, सुगावा प्रकाशन,पुणे, प्र. आ. १९९८, पृष्ठ क्र. ०१
2. डांगळे अर्जून, आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, लोकवाड्.मय गृह मुबई, दु.आ-.०७. पृ.४९
3. पचार ज.वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळी-खंड पहिला, कौशल्य प्रकाशन,औरंगाबाद, व्दि. वि.आ. २००७, पृष्ठ क्र. ८२
4. मुरूगकर डॉ. लता, दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन,पुणे, प्र. आ.१९९५,पृष्ठ क्र.५३
5. चेंदवणकर प्रल्हाद, दलित पँथर, संपादन- शरणकुमार लिंबाळे, सुगावा प्रकाशन, पुणे,प्र. आ. १९८९, पृष्ठ क्र.
6. लिबाळे डॉ. शरणकुमार, दलित पँथर, सुगावा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८९, पृष्ठ क्र. ०३

7. ढाले राजा, दलित पँथरची संस्थापना : वस्तुस्थिती आणि विपर्यास, फुले-आंबेडकरविचारप्रसार केन्द्र, पुणे, प्र. आ. २००२, पृष्ठ क्र. ८७
8. वेळुंजकरसाराभाई, दलित पँथरची संस्थापना : वस्तुस्थिती आणि विपर्यास, फुले आंबेडकरविचारप्रसार केन्द्र, पुणे, प्र. आ. २००२, पृष्ठ क्र. ९१
9. लिंबाळे डॉ. शरणकुमार, दलित पँथर, सुगावा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८९, पृष्ठ क्र. ०९
10. गव्हाणे डॉ. सुधीर, नामांतर लढा : एक शोधयात्रा, परिवर्तन प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९६, पृष्ठ क्र. २२
11. कवाडे जोगेन्द्र, अधिष्ठान (नामांतर विशेषांक), संपादक युवराज धबडगे, दि. १४ जानेवारी२०१०, पृष्ठ क्र. ५५

मोगलकालीन कृषीव्यवसायाचा ऐतिहासिक दृष्टीकोण

पवार डी. व्ही.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
Email ID : pawardatta600@gmail.com

गोषवारा: अनुकूल भौगोलिक परिस्थिती किंवा वातावरण या कारणाने भारत हा प्राचीन काळापासून एक कृषीप्रधान देश म्हणुन ओळखला जातो. प्रारंभापासूनच येथील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. उदरनिर्वाहाची सर्व साधने नंतर विकसीत झाले मात्र हि साधनेही कृषीवर अधारित होती. भारतीय शेतकऱ्यांच्या अध्ययनाकडे विदवानांचे मुख्य लक्ष विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या शेवटी वेधले गेले. सर्वप्रथम इतिहासकार मोरलँड ने कृषी महत्वाला उघड केले. डी.डी. कोसांबी, के.एम. अशरफ, आर.एस.शर्मा डेनिएल थोरनर या विदवानांनी शेतकरी वर्गाला इतिहास लेखनाचा विषय बनवून याचे विस्तारपुर्वक अध्ययन केले. यानंतर इरफान हबीब तसेच अन्य इतिहासकारांनी या क्षेत्रात महत्वपूर्ण संशोधन करून मुगल साम्राज्याच्या आर्थिक इतिहासलेखनात बहुमुल्य योगदान दिले. इतिहासकार इरफान हबीबने कृषीची व्याख्या करतेवेळी स्पष्ट केले की "शेतकऱ्याचा अभिप्राय त्या जनसाधारणाशी आहे जे की शेतात आपल्याच कृषी यंत्राचा प्रयोग करून किंवा केवळ आपल्याच कुटुंबियांच्या सदस्यांच्या श्रमाचा उपयोग करून स्वत: कृषी कार्य करतो. '[1]मध्ययुगीन भारताच्या इतिहासात कृषी व्यवसाय सुलतानशीमध्ये विकसीत झाला. अल्लाउद्दीन खिलजी त्यानंतर मुहम्मद तुघलक या शासकांच्या काळात कृषी व्यवसायाकडे विशेष लक्ष दिलेले दिसते. पुढे मोगलकालखंडात अफगाण शासक शेरशहासुरीने प्रशासन व्यवस्थेबरोबरच कृषी व्यवस्थेतही बदल केले. या व्यवस्थेवर आधारित अकबर कालखंडापासून शेती व्यवसायामध्ये बदल घडण्यास सुरूवात झाली. मोगल शासकांनी शेतकऱ्यांना संपुर्ण सुरक्षा किंवा त्यांना सुविधा प्राप्त होतील याकडे विशेष लक्ष दिलेले आहे. शेतकरी कृषी कार्यामध्ये टिकून राहतील आणि यामुळे साम्राज्याच्या उत्पन्नात वाढ होईल हा प्रमुख उद्देश होता.

प्रस्तावना

मोगल भुराजस्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना खुले शाही आदेश होते की यांनी सतर्कतापुर्वक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करावे त्यांना आवश्यकतेनुसार कृषी – यंत्र तसेच बी-बियाणे खरेदीसाठी तकावी (कर्ज) उपलब्ध करून द्यावे व पडिक जमीन लागवडीखाली आणावी. 'अकबर शासन काळात रचनाकार अबुल फजल दवारा लिखित फारशी ग्रंथ ' आइने - अकबरी' मध्ये अमलगुजार याला शेतकऱ्यांचा मित्र राहणे व गरिब शेतकऱ्याला अग्रीम धनराशी देऊन त्यांची सहाय्यता करण्याचे निर्देश दिलेले आहेत"[२] औरंगजेबने ही रसिकदास नावाच्या महसूल अधिकाऱ्याला निर्देश दिले होते की "या गोष्टीकडे त्याने पूर्ण लक्ष दिले पाहिजे की भुमी कर आकारण्यामध्ये कोणत्याही व्यक्तीसोबत अन्याय होता कामा नये जर महसूल जमा करण्यामध्ये चौधरी, मुकदम, पटवारी यांनी शेतकऱ्यासोबत कठोर व्यवहार केला असेल तर उत्पीडीत शेतकऱ्यांना राजी करवुन अतिरीक्त वसुल केलेला कर त्यांना परत मिळवुन दयावे. '[३] या निर्देशावरून स्पष्ट होते की मोगल शासक कृषी विकास तसेच शेतकऱ्यांच्या समस्या निराकरण करण्यामध्ये इच्छुक होते. मात्र राजकोष वृत्तीची भावना प्राथमिक होती. शेतकरी आपल्या शेतीत प्रामूख्याने क्षेत्रीय भिन्नतेनूसार भारतात वेगवेगळया प्रकारची पिके घेत असत. ज्वारी हे पीक महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व कर्नाटक या भागात घेतले जाई. हे पीक व्यापारी पीक नसून शेतकरी वर्ग आपल्या खाद्यान्नासाठी घेत असत 'बाजरी हे पीक महाराष्ट्र, गुजरात दिल्ली आग्रा, मुलतान, राजस्थान या क्षेत्रात याचे उत्पादन घेत असे. ज्वारी व बाजरी हे प्रामुख्याने कोरडवाहू क्षेत्रात घेतली जाणारी पिके होती. तांदूळ मोठया प्रमाणात उत्तर भारत, आंध्र, कोकण किनारपट्टी याठिकाणी याचे उत्पादन होई. '[४] याबरोबरच नगदी पिकामध्ये कापूस, तंबाखु यांचे उत्पादन प्रभावी होते. शेतकरी आपल्या आहारात शाकाहारी व मांसाहारी दोन्ही खाद्यान्नाचा उपयोग करीत हिंदु' शाकाहारी होते तर मुस्लीम सामान्यात; मासांहारी होते हिंद व गंगा घाटिचे लोक गहु रोटी याचा वापर आपल्या आहारात करायचे दक्षिण भारताच्या लोकांचे प्रिय भोजन मांसे, तांदूळ होते भारतीय आहारात दुध तसेच दुधापासून बनविलेल्या वस्तुना महत्वपुर्ण स्थान होते. कश्मीर मध्ये विभिन्न पालेभाज्या प्रयोगात आणले जायचे त्यामुळे आपल्या आहारात तेथील लोक पालेभाज्यांचा वापर केलेला दिसतो. मीठाचा उपभोग प्रतीव्यक्ती याचे स्तर कमी होते.

शेतक़्यांच्या पेहरावाबद्दल इतिहासकरात मतभेद आहेत मात्र' बाबरनामा' या आत्मकथेत बाबर लिहीतो की, 'शेतकरी अथवा निम्न जातीचे लोक अधिकांशत ; उघडेच रहायचे ते एक लंगोटी बांधायचे स्त्रीया लुंगी बांधायच्या बाबराच्या कथनावरून स्पष्ट होते की पुरूष एक छोटी धोती तसेच स्त्रीयांचा पूर्ण पोशाख साडी होती.विभिन्न क्षेत्रात मनुष्याच्या पेहरावावर हवामान देश – प्रकृती, सामाजिक रितीरीवाज यांचा मुख्य प्रभाव पडतो. 'यामूळे भिन्नतेनुसार व भारतातील पेहराव वेगवेगळे असलेले दिसते." मध्युगातला शेतकरी चप्पल वापरत नव्हता असे मोरलँड म्हणतो कारण बंगालच्या व्यतिरीक्त नर्मदा नदीच्या उत्तरेत कुठेही चप्पलाचा उल्लेख मिळत नाही. कारण चमडा महाग होता. परंतु कवी तुलसीदास व सुरदास यांनी आपल्या काव्यामध्ये पनही व उपानह अशा चप्पलांचा उल्लेख केलेला आहे. "[५] संभवतं: हे गावचे धनिक वर्ग वापरत असतील शेतक़्यांचे संपूर्ण जीवन माती आणि गवतापासून बनविलेल्या झोपडीमध्ये जायचे.

"कृषी सिंचनासाठी शेतकरी ' रहट ' चा वापर करायचा 'रहट'हे सुरूवातीपासून सिंधू नदी घाटी आणि राजस्थानमध्ये लाकडाची विलक्षण मशीन सोळाव्या शतकापर्यंत सर्वसामान्य शेतक़्यापर्यंत पोहचले. मात्र धनिक शेतकरीच याचा उपयोग करित असत. '[६] यातून कृषी तंत्रज्ञानाची माहिती प्राप्त होते. मोगल कालखंडात ग्रामीण भागामध्ये शेतक़्यांचे वेगवेगळे स्तर दिसतात. हे स्तर संपत्ती व समाजातील स्थान यावर अधारीत होते." मोठया शेतक़्यांना उत्तर भारतात ' खुदकाश्त ' (स्वत: शेती करणारे शेतकरी) राजस्थानमध्ये ' गारूहाला ' (धरूहल/गवेती) , तर महाराष्ट्रात मीरासदार म्हटले जाई. गरिब शेतक़्यांना उत्तर भारतात 'रेजा रियाया'(छोटे किसान), राजस्थानमध्ये पालती व महाराष्ट्रात कुणबी म्हणत असत. '[७] मध्ययुगीन भारतात भुराजस्व वसूली मूख्यत :नगदी स्वरूपात वसुल केले जायचे यामुळे शेतकरी धान्य बाजारात व्यापाऱ्याला विकायचे नगदी पीक घेणारे शेतकरी फायद्यात रहायचे संसाधनाचा वापर करून नगदी पीक संपन्न शेतकरी वर्गाकडून घेतला जाई. यामुळे कृषी व्यवसायात हे स्तरीकरण दिसते. तसेच ग्रामीण भागातील स्थायी निवासींना उत्तर भारतात ' पाईकाश्त '(पाहिकाश्त) , महाराष्ट्रात उपरी म्हणायचे यांच्यामध्ये ही भेद होते जातीगत बंधन, गोत्रीय संबंध हेही विभाजनाचे आधार होते. शेतक़्यांच्या खालोखाल श्रमीक वर्ग होता. ग्रामीण् समुदायामध्ये बलुतेदारी व्यवस्था मुगल सम्राज्याच्या सर्व ग्रामीण भागात हि पध्दती समान नव्हती विभिन्न प्रदेशात विभिन्न प्रकारची संरचना होती. मोगल साम्राज्याचा कृषी भुभाग हा खलिसा आणि ' जागीर ' या दोन भागामध्ये विभागलेला होता. ज्या क्षेत्राचा महसूल शाही खजान्यात जाई त्याला 'खालिसा ' म्हणत. तर जो महसूल वेतनाच्या बदल्यात प्रशासनातील अधिकाऱ्यास दिल्यास ती ' जागीर ' समजली जाई. मध्ययुगीन कालखंडात जमीनदारांचे महत्व वाढले आणि ग्रामीण क्षेत्रात हि व्यवस्था अधिक जटील झाली. शेतक़्याकडून जमा केलेला अतिरीक्त कृषी उत्पादन बादशहाकडून अमीर व जमीनदारामध्ये वाटण्यात येई. ' जमीनदार शब्दाचा वापर मोगलकालखंडात झाला मुघलांच्या अगोदर सरदारांना राजा, राय, ठाकूर या नावाने ओळखले जाई. लहान मध्यस्त लोक चौधरी. खोत, मुकदम म्हणून ओळखले जायचे. '[८] मोगलकालीन जमीनदारांचे तीन मूख्य श्रेणीमध्ये विभाजन करता येते. स्वायत्त जमीनदार , मध्यस्त जमीनदार आणि प्राथमीक जमीनदार जेव्हा जमीनदारांना राजस्व वसुलीचे अधिकार प्राप्त झाले तेव्हा जमीनदाराला या मोबदल्यात कुल राजस्वमधुन १०% हिस्सा मिळू लागला त्याला ' नानकार ' असे म्हणतात. '[९] जेव्हा प्रशासन जमीनदाराव्यतीरीक्त आपल्या प्रतिनिधीकडून महसुल जमा करवून घ्यायचे तेव्हा यांना जमीनदाराल काही हिस्सा दयावा लागे गुजरातमध्ये जमीनदाराच्या या अधिकाराला'बंठ ' (वंठ) म्हणायचे. जमीनदार या कराव्यतीरीक्त शेतक़्याकडून उपकर व नजराने वसूल करायचे यामध्ये ' दस्तर शुमारी ' (पगडीकर) , खाना शुमारी (ग्रह कर) आणि विवाह व जन्म यावरील कर जमा करायचे. यातून शेतकरी वर्गाचे शोषण जमीनदाराकडून होत असे. मात्र सम्राटाचे शाही आदेश हे शेतक़्याप्रती विकासात्मक स्वरूपाचे असलेले दिसते. कृषीयोग्य भुमीचा विस्तार करण्यासाठी जंगल आणि बेकार भुमीला कृषीयोग्य भुमीमध्ये बदलण्यासाठी मुघल बादशहांनी जमीनदारी अधिकार प्रदान केले. मध्यकालीन अर्थव्यवस्थेत जमीन महसुल पध्दत ही मुघल साम्राज्याचा मूख्य आधार बिंदू होता. मुघल काळात भुराजस्वाला फारसी शब्दात माल किंवा मालवाजिब म्हटले जायचे भुराजस्व वसुलीची प्रक्रिया दोन भागात संपन्न होती कर निर्धारण (तशखीस जमा) आणि वास्तवीक वसुली (हासील) होय. कर निर्धारण प्रक्रिया समाप्त झाल्यानंतर पटटा, कौल किंवा कौल करार केला जाई व ज्याच्यावर कर लावलेला आहे त्याला कबुलियत म्हणजेच स्वीकृती दयावी लागत असे. भुराजस्व निर्धारणासाठी अनेक पध्दती होत्या यामध्ये गल्ला बख्शी पध्दतीत उत्पन्नाचा हिस्सा जागीरदारास दिला जाई. यामध्ये हि तीन पध्दती होत्या खेतबटई, लांगबटई आणि राशी बटई तसेच कनकुत प्रणालीहि वापरण्यात येई अकबराने जी भुराजस्व पध्दत लागु केली तीला ' झब्ती 'किंवा ऐनी-दाह-साला किंवा तोडरमलपध्दत म्हणतात. ' जमीन ' मोजणीचे परिणाम हे बिघा होते एक बिघा म्हणजे ३६०० चौरस यार्ड होय.

क्षेत्रीय भिन्नतेनुसार जमीनीची वर्गवारी ठरविण्यात आली होती. यामध्ये पोलज (उत्कृष्ट जमीन ,) परौती (मध्यम) , चाचर (निक्रष्ट) आणि बंजर (खडकाळ) होय. '[१०] शेतीमध्ये प्रामुख्याने दोन पीके घेतली जात असत. यामध्ये ' हरी' (खरिप) आणि ' सवानी' (रब्बी) होय. भुराजस्व दर हे 1/3 एवढे होते भौगोलिक भिन्नतेनूसार राजस्व दर कमी – अधिक प्रमाणात होते. तसेच मुघल शासकांच्या काळात या दरात चढ-उतार झालेला दिसतो. मूगल साम्राज्यात अनेक प्रकारचे प्राकृतिक विपदा, दुष्काळ यामुळे कृषी व्यवसायातील उत्पादन धोक्यात आले. इ.स. १५५५ ते १५५६ या काळात भयंकर दुष्काळामुळे आगरा तसेच बाजुचे राज्यक्षेत्र बयाना दिल्ली दुष्काळाने होरपळून काढले इ.स. १६०० मध्ये गुजरातमध्ये भयंकर दुष्काळ पडला भुखमारिपासून वाचण्यासाठी आई-वडिलांनी आपल्या मुलांना विकले. यामूळे अनेक लोक एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात स्थानांतरण झाले 'शहजादा मुराद बख्श चा दरबारी कवी बिहश्ती सिराजी याने दुष्काळ व प्लेगच्या संकटाचे वर्णन केले आहे. या संकटाचा प्रभाव व्यापार व वाणिज्य यावरती पडला.' तसेच औरंगजबेचा दरबारी इतिहासकार आलमगीरनामाचा लेखक मुहम्मद काजिम म्हणतो "दुष्काळामुळे कंगाल शेतकऱ्यांना गावाकडून शहराकडे स्थानांतरण करावे लागले. '[११] दुष्काळ, स्थानिक शोषण या कारणामुळे शेतकरी सुविधा मिळविण्यासाठी एका गावातून दुसऱ्या गावात जात असत. यावरून अशा शेतकऱ्याला 'पाहि'म्हणत असत. '[१२] अशा दुष्काळी परिस्थीमध्ये मध्ययुगात आधुनिक दळणवळणाचे प्रभावी तंत्रज्ञान नसल्याने केवळ बंजारा समाजच बैलानवर धान्य लादून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे. मात्र व्यापक मार्गासाठी त्यांची सेवा अपूरी पडत असे. यामुळे शेतकरी वर्ग सम्रध्द क्षेत्राकडे प्रस्थान करीत असत. यावरून मध्यकालीन अर्थव्यवस्थेत स्थलांतरण हे कशा पध्दतीने होत असे यांची माहिती मिळते. मध्ययुगात अनेक प्रकारची शेतकऱ्यांचे बंडही झालेले दिसतात जेव्हा जमीनदाराला शेतसारा कमी प्रमाणात मिळत होता तेव्हा बादशाहाच्या विरोधात शेतकऱ्यांना संघटीत करून सम्राटाला विरोध केला जाई. या बंडाची सुरूवात इ.स. १६६० पासून उत्तर भारतामध्ये झाली. औरंगजेब कालखंडात हि अशी बंडे शेतकऱ्यावर लादलेल्या कराव्यतिरीक्त जो धार्मिक कर लादलेला होता यामूळे राजपूतांकडून मोठे बंड झाले. '[१३] सारांश, मोगलकालीन कृषीव्यवसाय हा मध्ययुगीन अर्थव्यवस्थेसाठी व्यापाराचे व उत्पन्नाचे एक प्रमुख साधन म्हणून याकडे पाहिले जाते. तसेच कृषीव्यवसायातुन शेतकरी वर्ग, व्यापार, मुद्रा -व्यवस्था, बाजारपेठा यांचा विस्तार घडून आला व शहर हे ग्रामीण कृषीवर आधारित एक मुख्य व्यापारी ठिकाण बनले. आधुनिक कृषीसंरचनेची बीजे ही मध्ययुगीन कालखंडात आढळतात.

संदर्भ :

1. वर्मा हरिश्चंद्र,' मध्यकालीन भारत' (भाग-2) ,हिंदी माध्यम कर्यान्वय निदेशालय,दिल्ली, पृष्ट क्र.399
2. उपरोक्त
3. हबीब इरफान, ' मध्यकालीन भारत' (खंड-1), राजकमल प्रकाशन, नई दिल्ली पटना.1981. पृष्ट क्र. 130.
4. डॉ. गाठाळ एस.एस 'मोगलकालीन भारताचा इतिहास', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2014 पृष्ट क्र. 269.
5. वर्मा हरिशचंद्र, उपरोक्त टिप क्र.01 पृष्ट क्र.402,403
6. इबीब इरफान, 'मध्यकालीन भारत' (खंड-2), राजकमल प्रकाशन, नई दिल्ली पटना, 1983 पृष्ट क्र.35
7. इंदिरा गांधी राष्ट्री मुक्त विश्वविद्यालय सामाजिक विज्ञान विद्यापीठ, भारत : 16 वी से 18 वी शताब्दी के मध्य तक (खंड-5) पृष्ट क्र. 22-23
8. उपरोक्त पृष्ट क्र. 20
9. वर्मा हरीशचंद्र उपरोक्त टिप क्र. 1 पृष्ट क्र. 45
10. प्रा. मार्डिकर मदन, 'मध्ययुगीन भारताचा इतिहास',विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, 1997 पृष्ट क्र. 281
11. इबीब इरफान ' मध्यकालीन भारत' (खंड-3) राजकमल प्रकाशन नई दिल्ली पटना, (आव्रती सातवी) 2002 पृष्ट क्र. 123
12. चन्द्र सतीश, 'मध्यकालीन भारत' (भाग-2), जवाहर पब्लिशर्स एवं डिस्ट्रब्युटर्स, नई दिल्ली 2016 पृष्ट क्र. 363
13. Habib Irfan ,TheAgrarian system of Mughal India(1556-1707) Asia Publishing house. New York, 1962 p.318

भारतातील कौशल्य विकास व योजनांचा चिकित्सक अभ्यास

प्रा.पांचाळ विजय किशनराव
सह.प्राध्यापक, महाराष्ट्र महाविद्यालय,निलंगा

प्रास्ताविक :-कोणत्याही उद्योगात कुशल मनूष्यबळाची आवश्यकता असते. कारण त्या उद्योगाची उत्पादनवाढ प्रक्रिया कूशल मनूष्यबळावरच अवलंबुन असते.उत्पादन वाढीमूळे रोजगारनिर्मिती व उत्पन्न वाढते. परिणाम त्याच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. त्यादृष्टीने भारताच्या विशाल लोकसंख्येचा विचार करता भारतात कुशल मनुष्यबळ जास्त असणे आवश्यक आहे. परंतु एकुण लोकसंख्येच्या तुलनेत अशा कुशल मनुष्यबळाचा संख्या अत्यंत कमी आहे यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.पण यासाठी कोणतीही उद्योगसंख्या पुढे येत नाही. तसेच त्यांना या युवकांना प्रशिक्षण देऊन कुशल बनविण्यासाठी वेळ ही नाही. प्रत्येक उद्योगसंख्या ही कुशल श्रमिकांची मागणी करते पण प्रत्येकांची मागणी पुर्ण होत नाही सर्वांना कुशल श्रमिक मिळतातच असे नाही. परिणामी त्यांचा परिणाम उद्योगसंख्येच्या उत्पादकतेवर होतो. तेव्हा अशा परिस्थितित देशातील युवकाना कौशल्य शिक्षणाबरोबरच कौशल्य आत्मसात करता यावे यासाठी सरकारने काही सूरू केल्या आहेत. त्याचाच थोडक्यात आढावा या लेखात घेणार आहोत.

उद्दीष्टये : -

1. देशाच्या आर्थिक विकासात कुशल मनुष्यबळाचे महत्त्व सांगणे
2. कौशल्य विकासाच्या योजनाची माहिती अभ्यासणे
3. कुशल मनुष्यबळ रोजगार व उत्पादनवाढ यांचा परस्परसंबंध स्पष्ट करणे

संशोधन पध्दती : -

प्रस्तुत शोधनिबंध हाद्वितीय तथ्य संकलनाच्या साधनसामग्रीवर असून यासाठी तथ्यसंकलन करताना संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, पुस्तके व इंटरनेट इ.साधनातून माहिती संकलन करून शोध निबंध लिहिला आहे.

कौशल्य विकास

देशातील वाढत्या लोकसंख्येला रोजगार मिळवून देण्यासाठी कौशल्य व ज्ञान यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.कारण कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती व सामाजिक विकास हा त्या देशातील कुशल श्रमशक्तीवर अवलंबुन असतो. यादृष्टीने भारतातील लोकसंख्येचा विचार करता भारत एकुण श्रमशक्तीच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर आहे. असे असले तरी या एकुण श्रमशक्तीमध्ये कुशल श्रमीकांचा वाटा किती आहे. आर्थिक प्रगती व सामाजिक विकास याबाबतीत भारतातील परिस्थिती इतर देशाच्या तुलनेत असामधानकारक आहे. यांचे मुख्य कारण म्हणजे एकुण श्रमशक्तीमध्ये कुशल श्रमिकाची संख्या कमी असणे हे आहे. याचबरोबर एकीकडे लोकसंख्या वाढत असताना दुसरीकडे शैक्षणिक पात्रता पूर्ण करण्याऱ्याचीही संख्या वाढत आहे . प्रत्येकालाच सरकारी नौकरी/सरकार रोजगार पुरवू शकेल असे नाही. त्यातील काहीना बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे.

परिणामी सुशिक्षित बेरोजगाराची संख्या वाढत आहे. तेव्हा अशा बेरोजगारीला तोंड देण्यासाठी आर्थिक प्रगती व सामाजिक विकासाठी गतिशील आणि उद्योजक तरूण तयार करणे आवश्यक आहे. यासाठी देशातील तरूणाना शिक्षणाबरोबर कौशल्याधिष्ठीत शिक्षण देणे आवश्यक आहे.

कोणतेही विशिष्ठ कार्य करण्यासाठी कौशल्य एक महत्वाचे वैशिष्टय आहे. कौशल्य निर्माणाकडे उत्पादनाची परिणाम कारकता आणि कामगाराचे त्यातील योगदान सूधारण्याचे एक साधन म्हणून पाहिले जाऊ शकते. कौशल्य निर्माण हे उत्पादनक्षमता व अर्थव्यवस्थेचा विकासावर वाढविण्यासाठीचे एक महत्वपुर्ण घटक आहे.

ज्या देशाकडे उच्च आणि उच्चतम कौशल्य आहेत ते जागतिकीकरणाची आव्हाने आणि संधी प्रभावीपणे जुळवून घेऊ शकतात. भारत हा जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक देश आहे, तेव्हा आपल्या देशाचा आर्थिक वेग वाढविण्यासाठी व देशातील तरूणाना रोजगार मिळवून देण्यासाठी भारत सरकारने पूढील तीन मूख्य कौशल्यधारीत योजना सुरू केल्या आहेत. त्यांची थोडक्यात माहिती दिली आहे.

कौशल्य विकास योजना : -

पंडीत दीनदयाल उपाध्याय योजना (DDU-GKY)

पंडीत दीनदयाल उपाध्याय यांची 98 वी जयंतीचे औचीत्य साधुन ग्रामीण विकास मंत्रालयाने 25 सप्टेंबर 2014 रोजी देशातील 15 ते 35 वर्षे वयोगटातील ग्रामीण गरीब तरूणामध्ये कौशल्य विकसित करून त्यांची उत्पादनक्षमता वाढविणे व त्यांना विकासाच्या प्रवाहात आणून समावेशक विकास करण्यासाठी जीवनोन्नती कौशल्य विकास कार्यक्रमाचे रुपांतरण करून दि 25 सप्टें 2014 रोजी दीनदीयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना सुरू केली.

ही योजना सध्या 21 राज्ये 568 जिल्हे,6215 तालुकामध्ये कार्यरत आहे. या योजनेचे लहानगट13 ते 35 वर्ष वयोगटातील ग्रामीण गरीब तरूण आहेत. या तरुणांना कौशल्याचे मोफत प्रशिक्षण दिले जाते.

राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान (NSDM) किंवा कुशल भारत (skill India

15 जुलै 2015 रोजी जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधुन पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान सुरू करण्यात आले. या अभियानाला कुशल भारत असेही संबोधले जाते. NSDM कौशल्य विकास व व्यावसायिकता मंत्रालयामार्फत राबविली जाते.

कौशल्य विकासाच्या विविध योजना,संस्था, केंद्र-राज्य सकरकारचे कौशल्य विकासाचे कार्यक्रमामध्ये समन्वय साधण्याचा उद्देशाने हे अभियान सूरू करण्यात आले आहे. देशात सुमारे 20 मंत्रालये/विभाग 70 पेक्षा जास्त कौशल्य विकासाच्या योजना राबवितात या योजनांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य NSDM करते.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना :- PMKVY

कौशल्य विकास व व्यावसायिकता मंत्रालयामार्फत 15 जुलै 2015 ला **PMKVY**योजना सुरु करण्यात व आली व त्यांना रोजगार लायक बनविणे तरुणांना उद्योगपुरक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे हे योजनेचे मुख्य उद्देश होते. 2016 ते 2020 योजनेचा दुसरा टप्पा सुरु झाला या टप्प्याला PMKVY2.0 म्हणतात PMKVY2.0 अन्वये 2016 ते 2020 या कालावधीत 1 कोटी तरुणांना योजनेचा लाभ मिळवून देण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले होते. यासाठी 12020 कोटी रू.तरतूद करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत देशातील प्रत्येक जिल्हयात किमान एक मॉडल प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे ठरले होते. या संख्याना प्रधानमंत्री कुशल केंद्र असे संबोधण्यात आले स्पर्धात्मक, गुणवत्ता पूर्ण आणि मागणी आधारीत प्रशिक्षण देणे या केंद्र उभारणीमागील उद्देश आहे. या केंद्राना राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळामार्फत (NSDC) अर्थसहाय्य केले जाते. पहिले प्रधानमंत्री कुशल केंद्र नवी दिल्लीत उभारण्यात आले पुढे 2020 पर्यंत देशात 723 केंद्रे उभारण्यात आला होती.

सारांश :-

भारतातील कौशल्यविकास कार्यक्रमामुळे देशातील अकुशल मनुष्यबळ स्वावलंबी व रोजगारक्षम बनत आहे. रोजगारातील वाढीमुळे नवयुवकाच्या उत्पन्नात वाढ होऊन गरिबी व दारिद्रय याचे निर्मूलन होत आहे . कृषी क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे त्यामुळे कृषी उत्पादकतेत वाढ झाली आहे. उद्योगसंस्थाना आवश्यक असलेला कच्चा माल हा शेती क्षेत्रातून मिळत असल्यामुळे त्यांचीही उत्पादन क्षमता वाढली आहे. थोडक्यात कौशल्याधिष्ठीत युवकामुळे उद्योगाना कुशल मनुष्यबळाचा समाधानकारक पुरवठा होत आहे. परिणामी देशातील उद्योगाची उत्पादनक्षमता वाढून देशाचे आर्थिक उत्पन्न वाढत आहे. थोडक्यात देशाची आर्थिक वृध्दी व विकास हा कौशल्याधिष्ठीत युवकावर अवलंबून आहे असे मला वाटते.

संदर्भ : -

1. डॉ. देसले किरण - दीपस्तंभ प्रकाशन, अर्थशास्त्र-भाग-1 पृष्ठ क्र.४३,३२५ .
2. डॉ. देसले किरण - दीपस्तंभ प्रकाशन, विकासाचे अर्थशास्त्र-भाग-2 पृष्ठ क्र .१०५ ते ११०.
3. प्रा. कोळंबे रंजन- भगीरथ प्रकाशन, भारतीय अर्थव्यवस्था पृष्ठ क्र . १६४
4. www.maharshtratimes.com

स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.

शितल भागवत जाधव[१] प्रा.डॉ.रमेश पठारे[२]

[१]एस.एन.डी.टी विदयापिठ, पुणे.

[२]एस.एन.डी.टी विदयापिठ, पुणे.

प्रस्तावना प्रत्येक व्यक्ती ही समाजाचा मुलभूत घटक आहे. समाजात आज जी काही प्रगती आहे ती सामाजिक योगदानामुळेच समाजातील चांगल्या व्यक्तीमुळेच हा समाज घडलेला आहे. त्या व्यक्ती सतत समाजाच्या प्रगतीसाठी, दुस-यांच्या कल्याणासाठी धडपड करीत असतात निस्वार्थीपणे समाजाबरोबर त्या व्यक्तींची बहुआयामी प्रगती होत असते, समाजातील इतर व्यक्ती कडुन मानसन्मान प्राप्त होत असतो. सामाजिक योगदानाबरोबर भावनिक कार्यकुशलता हा घटक ही व्यक्तीसाठी खुप महत्वाचा आहे. भावनिक दृष्टया कार्यकुशल व्यक्ती जीवनाच्या कोणत्याही टप्प्यात समस्येवर प्रभावीपणे मात करू शकतो, यातुन सुंदर व्यक्तीमत्वाची जडण-घडण होते. भावनिक कार्यकुशल व्यक्तीचे कोणत्याही भावनेवर उत्तम असे नियंत्रण असते, इतरांशी नातेसंबंध सकारात्मक असतात, उत्तम प्रतिचे मानसिक आरोग्य असते व प्रभावीपणे स्वत:बरोबर या व्यक्तींच्या संपर्कात राहणा-या व्यक्तींना पण बराच फायदा होतो. कुटूंबातही या व्यक्तीमुळे कौटुंबिक सदस्यांची घडणही उत्तम प्रकारे होते अशा प्रकारे ही भावनिक कार्यकुशलता स्त्री-पुरूषांपैकी कोण्हामध्ये जास्त असते ? कुटूंबात सामाजिक योगदानाची भावना असेल तर ती स्त्री-पुरूषांपैकी कोण्हामध्ये जास्त आहे? हया प्रश्नांची उकल करण्यासाठी संशोधिकेला प्रस्तुत संशोधनाची गरज वाटली.

सामाजिक योगदान व्याख्या

एखादयाचे जीवन समाजाला उपयोगी आहे आणि लोकांनीसुध्दा त्याला मुल्य दिले आहे असे वाटणे म्हणजे सामाजिक योगदान होय. जगाला देण्यासाठी माझ्याकडे काहीतरी मौल्यवान आहे. यासारख्या विधानावरून व्यक्तीचे सामाजिक योगदान ही व्याख्या निश्चीत करता येते.

सामाजिक योगदानाचा अर्थ

या व्यक्तिंना असे वाटते की, एखादयाचे आयुष्य समाजासाठी उपयुक्त आहे आणि स्वत:च्या क्रियाकल्पनांचे मूल्य एखादयाला मूल्यवान किंवा इतरांना मूल्यवान असते.

"एखादयाच्या सामाजिक मूल्यांचे मुल्यांकन करणे" म्हणजे सामाजिक योगदान होय.

किज, १९९८, पान नं १२३

भावनिक कार्यकुशलता

विविध परिस्थितीमुळे बाहेर आलेल्या भावनिक प्रेरकांना कौशल्याने प्रतिसाद देण्याची योग्यता, उच्च प्रतीचा आत्मसन्मान आणि आशावाद, संवादकौशल्ये, नैराश्य, मतभेद, अहंगंड, न्युनगंड इ. भावनिक विघाड हाताळण्याची पात्रता, भावनिक आनंदीपणा, यशदायी कृती, इतरांशी नाते ठेवण्याची क्षमता, ताण-तणाव, उद्रेक टाळण्याची क्षमता, भावनांची नकारात्मकता बाजूला करण्यास शिकणे.

दलिप सिंह, पान नं ११६

सकारात्मक भावनेमुळे आपली कार्यक्षमता वाढते. कारण सकारात्मक भाव आणि व्यक्तीचे यश आणि आरोग्य त्याला कारणीभुत ठरते. फ्रेडरिक्सन आणि लोसाडा (२००५) यांनी व्यक्तीचे सकारात्मक अनुभव आणि त्यांच्या जास्तीत जास्त कार्यक्षमतेची पातळी यांचा संख्यात्मक संबंध वर्णन केलेला आहे. भरभराट ही मनुष्याच्या कार्यक्षमतेची एक परिणामकारक स्थिती असते. म्हणजेच ते एक संपूर्ण मानसिक आरोग्य असते. दारिद्रियपणा ही स्थिती मानसिक आरोग्याला, मानसिक आजारापासुन वेगळी करते आणि ती एक रितेपणाची भावना, उदासीनता, पोकळपणा दर्शविते. अशा व्यक्तींमध्ये मानसिक आजाराची थोडीफार लक्षणे आढळतात. पण त्यांच्यामध्ये थोडी मानसिक आरोग्याचीही लक्षणे दिसतात

प्रत्येक कार्यकुशलतेचा, कोणत्याही कामावर स्वत:चा असा एक प्रभाव असतो, असे तात्विकदृष्टया महत्वाचे असले तरी, औपचारिक किंवा मुद्दाम त्या क्षमतेचा जाणीवपुर्वक उपयोग करण्याचेही महत्व आहेच. आयुष्यात आणि विशेषत: कामाच्या ठिकाणी, गटात, गटाच्या पलीकडेसुध्दा या कार्यक्षमता व्यक्त होतात. आणि एकमेकांना पाठिंबा देण्यासाठीसुध्दा त्यांचा उपयोग होतो. गुंतागुंतीच्या समुहाच्या कार्यक्षमतेवर ताबा मिळविणे हे उत्कृष्ठ कामगिरीकरता गरजेचे आहे. यावरून स्पष्ट होते की, भावनिक कार्यकुशलता सिनिर्जिस्टिक गटांमध्ये अधिक सबळपणे सक्रिय होत असतात. संघटना व व्यक्ती यांना परस्परांना सामोरे जातांना विपुल प्रमाणात, भावनिक बुध्दिमत्ता क्षमतांची गरज असते. या व्यक्ती जोडीने एकमेकांबरोबर काम करतात. यातील प्रत्येक क्षमता अतिशय परिणामकारक होत असते. सहानुभाव आणि प्रभाव कार्यक्षमतांना, भावनिक स्वयंनियंत्रणामुळे पाठिंबा मिळतो. संघटना संस्कृतीचे पध्दतीचे महत्वाचे घटक (उदा. वेगाने प्रगती इ.) एखादयाच्या क्षमतांशी जोडण्यापेक्षा, क्षमतांच्या गटाशी जोडले जातात. तेव्हा समुह व व्यक्ती यांच्यात एकवाक्यता होते. पूर्णत्वाच्या पध्दतीने एकत्रित कार्यक्षमतांचा परिणाम चांगला होतो. सार्थ क्षमतांचा नमुना साकार झाल्याने, दिलेल्या भूमिकेतील, कामाच्या ठिकाणी यशस्वी कामगिरी सोपी केली जाते.

भावनिक बुध्दिमत्ता कार्यकुशलता

आर. बॉयटझीस एट.अल. (२०००) याने भावनिक बौध्दिक कार्यकुशलतेचे प्रारूप/नमुना वर्णन केले आहे. त्यात चार तत्वांचे प्रतिबिंब आहे.

१) आत्मभान

२) स्वयंव्यवस्थापन

३) सामाजिक भान

४) नातेसंबंध व्यवस्थापन

हा नमुना जास्त करून तात्विक भूमिका असलेला दिसतो, कारण त्याच्या प्रात्यक्षिक परिस्थितीत केलेला उपयोग परीक्षण करून झालेला नाही. प्रारूपामध्ये निश्चितच त्याने मोलाची भर टाकल्यासारखे होईल, जर दैनंदिन जीवनात त्याचे मुल्यमापन केले आणि त्याचे परिणाम समजले तर सर्वसाधारण भावनिक बुध्दिमत्तेच्या चार समुहांची मांडणी वीस क्षमतांच्या रचनेत प्रस्तुत केली आहे. या मांडणीतून असे दिसते की, उदा, स्वयंव्यवस्थापन नसेल तर, आपण विश्वासार्हता, सदसदविवेकबुध्दीप्रमाणे सिध्द करू शकत नाही किंवा नातेसंबंधाचे व्यवस्थापन ताब्यात असल्याशिवाय, प्रभावाची कुशलता, संवादाचे कौशल्य, मतभेदनिवारण वगैरे आपण दाखवू शकत नाही.

संशोधनाची उद्दिष्टये

१) सामाजिक योगदान या घटका संदर्भात स्त्री-पुरूषांमध्ये लक्षणीय फरक आढळतो का? हे शोधणे.

२) भावनिक कार्यकुशलता या घटका संदर्भात स्त्री-पुरूषांमध्ये लक्षणीय फरक आढळतो का? हे शोधणे.

गृहितके

१) स्त्रियांमध्ये पुरूषांपेक्षा सामाजिक योगदान या घटका संदर्भात लक्षणियरित्या फरक अधिक आढळतो.

२) स्त्रियांमध्ये पुरूषांपेक्षा भावनिक कार्यकुशलता लक्षणियरित्या फरक अधिक आढळतो.

प्रस्तुत संशोधनातील परिवर्तकांचे स्वरूप

अ.क्र	संशोधनातील परिवर्तके	घटक
१	स्वतंत्रपरिवर्तके	विवाहित स्त्री-पुरूष
२	परतंत्र परिवर्तके	सामाजिक योगदान भावनिक कार्यकुशलता

संशोधनातील नमुना -

प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असतांना असंभाव्यता पध्दतीने नमुन्याची निवड केली.

नमुन्याचे सर्वसाधारण स्वरूप -

अ.क्र	गट	वय	शिक्षण	संख्या
१	विवाहित स्त्रिया	२५ ते ४०	दहावी ते पदवी पर्यंत	६०
२	विवाहित पुरूष	२५ ते ४०	दहावी ते पदवी पर्यंत	६०

संशोधनातील साधने

प्रदत्त संकलन प्रक्रिया -

२५ ते ४० वयोगटातील महाराष्ट्रातील शहरी भागात राहणारे विवाहित स्त्री-पुरूषांची निवड केली.

शिक्षण - १० वी ते पदवी या निकषात बसणा-या प्रौढांना चाचणी बद्दल माहिती सांगितली स्वत:हुन सहभाग घेणा-या स्त्री-पुरूषांची निवड केली व चाचणी सोडवुन घेतली. चाचणीचा हेतु समजावून सांगितला वेळेचे काटेकोरपणे पालन केले. सुचना हया हस्तपुस्तिकेत दिल्याप्रमाणे दिल्या. विधान न समजल्यास अर्थ समजावून सांगितला. एकही विधान रिकामे राहणार नाही याची काळजी घेतली. सुचना व्यवस्थित समजावून सांगितल्या, चाचणी सोडवितांना अडचण आल्यास त्याविषयी मार्गदर्शन केले.

संशोधनात वापरलेली उपलब्ध प्रमाणित मानसशास्त्रीय चाचणी

सामाजिक सुस्थिती चाचणी

कोरे. एल. एम. किज, १९९८ यांनी सामाजिक सुस्थितीचे मापन करण्यासाठी चाचणी विकसित केली. सदर संशोधनात स्त्री-पुरूषांच्या सामाजिक सुस्थितीचे मापन करण्यासाठी ही मापन श्रेणी वापरली.

हया चाचणीत एकूण विधाने १७ आहेत. या चाचणीव्दारे सामाजिक स्विकृती, सामाजिक योगदान, सामाजिक अनुरूपता, सामाजिक समन्वय, सामाजिक एकत्रिकरण, या ५ पैलुंचे मापन होत असून प्रत्येक पैलुसाठी ७ पर्याय आहेत. पुर्णपणे सहमत, काहिसे सहमत, थोडेसे सहमत, माहित नाही, थोडेसे असहमत, काहिसे असहमत, पुर्णपणे असहमत हया सामाजिक सुस्थितीच्या पाच पैलुंपैकी सामाजिक सुस्थिती हया पैलुचा सदर संशोधनात चाचणी म्हणुन वापर केलेला आहे.

भावनिक बुध्दिमत्ता चाचणी

प्रो.एन.के चढ्ढा आणि डॉ.दलिप सिंह यांनी ही चाचणी २००३ साली विकसित केली. हया शोधिकेत २२ एकके आहेत. ही एक पेपर-पेन्सिल चाचणी आहे. व्यक्ती त्याच्या वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात, ज्या प्रकारे भावनिक कौशल्यांचा उपयोग करते त्यांचे मापण ही चाचणी करते. भिन्न भिन्न परिस्थितीला, व्यक्तित्व्याच्या भावनिक प्रतिक्रीया, २२ स्थितीवरून मोजल्या जातील. या चाचणीच्या तीन घटकांपैकी भावनिक कार्यकुशलता या एका घटकाचा सदर संशोधनात चाचणी म्हणुन वापर केलेला आहे.

या चाचणीव्दारे भावनिक संवेदनशिलता, भावनिक परिपक्वता, भावनिक कार्यकुशलता या भावनिक बुध्दिमत्तेच्या घटकांचे मापण होते.

हया चाचणीची चाचणी पुनर्रचाचणी स्पिट हाफ विश्वसनियता तपासली असता ०.९४ आणि

०.८९ इतका सहसंबंध गुणांक आढळून आला.

चाचणीची यथार्थता :

चाचणीची यथार्थता ०.८९ सहसंबध गुणांक इतकी आढळुन आली.

मानदंड चाचणीची प्रत्येक भावनिक गुणांकाच्या घटकांवर मिळालेल्या गुणांकाचा अर्थ लावण्यासाठी, व्यावसायिक, व्यवस्थापक, उदयोजक, राज्यकर्ते, कलाकार, पदवीधर, यांच्या साठी स्वतंत्र मानदंड आहे. ते पर्सेंटाईलच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. ही चाचणी मराठी व इग्रंजी अशा दोन भाषांमध्ये आहे.

माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी वापरलेली संख्याशास्त्रीय साधने -

संशोधनात विविध साधनांच्याव्दारे माहिती जमा केलेली असते. एक एक उद्दिष्ट व परिकल्पना घेऊन त्या संबंधित मिळविलेल्या माहितीचे शास्त्रशुध्द पध्दतीने विभाग करावे लागतात हीच प्रक्रिया म्हणजे वर्गीकरण होय.

१) संशोधकास संशोधनासाठी दिशा मिळते.

२) माहितीचे वर्गीकरण केल्याने संशोधकाला विविध प्रश्नांच्या संदर्भात माहिती उपलब्ध होते.

३) निवडलेल्या नमुन्याची विभाजनासंदर्भात कोणती गुणवैशिष्टये आहे हे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय वर्गीकरणातून समजते.

प्रस्तुत संशोधनात खालील साधनांचा वापर करण्यात आला आहे.

मध्यमान

सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता मापन यामध्ये विवाहित स्त्री-पुरूषांनी प्राप्त केलेल्या गुणांची सरासरी काढून तुलना करण्यासाठी मध्यमान या साधनाचा वापर करण्यात आला आहे.

प्रमाणविचलन

चाचणीतील विवाहित स्त्री-पुरूषांच्या गुणांची तुलना करण्यासाठी 'टी' परिक्षिका काढण्यासाठी आवश्यक म्हणून प्रमाणविचलन काढले.

'टी' परीक्षिका

चाचणीत विवाहित स्त्री-पुरूषांनी मिळविलेल्या गुणांच्या मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यासाठी 'टी' परीक्षिकेचा वापर करण्यात आला. तसेच विवाहित स्त्री-पुरूषांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी 'टी' परीक्षिकेचा वापर करण्यात आला.

विवाहित स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता मापन करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी-परिक्षिकेचा उपयोग केला आहे.

फलिते आणि चर्चा -

चाचणीव्दारे मिळालेल्या संख्याशास्त्रीय प्रदत्तावे विश्लेषण वर्णनात्मक संख्याशास्त्राच्या सहाय्याने केले. त्यासाठी मध्यमान व प्रमाण विचलन या पध्दतीचा वापर केला आहे. प्रातिनिधिक गटाची अनुमाने संपूर्ण जनसंख्येला लागू केली जातात. तर संशोधनासाठी जे दोन समुह वापरले आहेत व त्यापैकी एक समुह दुस-यापेक्षा खरोखरच श्रेष्ठ आहे का? हे पाहण्यासाठी चाचणी या पध्दतीचा उपयोग केला आहे. याकरीता प्राचल संख्याशास्त्राचा वापर केला आहे. विवाहित स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता गुणांकांची सरासरी काढून त्या सरासरीमधील भेद सांख्यिकीय दृष्ट्या सार्थ ठरतो का? हे पाहिले.

संकलित माहितीच्या आधारे प्राप्तांकाचे सांख्यिकी विश्लेषण, फलितांची नोंद आणि सिध्दांत कल्पनेच्या आधारे पुढील चर्चा करण्यात आली आहे.

मिळालेल्या सर्व संख्याशास्त्रीय माहिती नुसार आणि विश्लेषणानुसार गृहितक क्र १

तक्ता क्र. १

अ. क्र	समुह	प्रयुक्त संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	प्राप्त टी मुल्य
१	सामाजिक सहभाग असलेले विवाहित स्त्री प्रयुक्त	६०	१७.९	४.४४	-०.६६४
२	सामाजिक सहभाग असलेले विवाहित पुरूष प्रयुक्त	६०	१७.३	४.०८	
३	भावनिक कार्यकुशलता असलेले विवाहित स्त्री प्रयुक्त	६०	१७०.३	१९.३५	१.१४१
४	भावनिक कार्यकुशलता असलेले विवाहित पुरूष प्रयुक्त	६०	१७४.२	१७.४०	

सामाजिक सहभाग (प्राप्त 'टी' मूल्य -०.६६४ हे ११८ स्वाधीनता मात्रेवर ०.०१ स्तरावर असार्थ आहे)

भावनिक कार्यकुशलता (प्राप्त 'टी' मूल्य १.१४१ हे ११८ स्वाधीनता मात्रेवर ०.०१ स्तरावर असार्थ आहे.)

सदर सारणी क्रमांका नुसार विवाहित स्त्री-पुरूषांच्या सामाजिक सहभाग या चाचणी गुणांकाचे मध्यमान काढले असता चाचणीचे स्त्रियांचे मध्यमान १७.९ आले. प्रमाण विचलन काढले असता प्रमाण विचलन ४.४४ आले. तर सामाजिक सहभाग चाचणीचे पुरूषांचे मध्यमान हे १७.३ इतके आले. तर प्रमाण विचलन हे ४.०८ इतके आले. या मध्यमानातील फरकांची सार्थकता ०.०१ सार्थकता स्तरावर तपासली असता. प्राप्त 'टी' मूल्य हे प्रमाणित 'टी' मूल्यापेक्षा (-०.६६४≥ २.६३) ११८ स्वाधीनता मात्रेवर असार्थ असल्याचे दिसुन येते. म्हणुन शून्य परिकल्पना स्वीकारावी लागेल व मुख्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. याचा अर्थ असा की स्त्रियांमध्ये पुरूषांपेक्षा सामाजिक सहभाग या घटकाबाबत फरक आढळतो. ही निरीक्षणे गृहीतकाला अनुसरून नाहीत. त्यामुळे त्यात लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.

सदर सारणी क्रमांका नुसार विवाहित स्त्री-पुरूषांच्या भावनिक कार्यकुशलता या चाचणी गुणांकाचे मध्यमान काढले असता चाचणीचे स्त्रियांचे मध्यमान १७०.३ आले. तर प्रमाण विचलन काढले असता १९.३५ आले. तर भावनिक कार्यकुशलता चाचणीचे पुरूषांचे मध्यमान हे १७४.२ इतके आले. तर प्रमाण विचलन हे १७.४० इतके आले. या मध्यमानातील फरकांची सार्थकता ०.०१ सार्थकता स्तरावर तपासली असता. प्राप्त 'टी' मूल्य हे प्रमाणित 'टी' मूल्यापेक्षा (१.१४१≥ २.६३) ११८ स्वाधीनता मात्रेवर असार्थ असल्याचे दिसुन येते. म्हणुन शून्य परिकल्पना स्वीकारावी लागेल व मुख्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. याचा अर्थ असा की स्त्रियांमध्ये पुरूषांपेक्षा भावनिक कार्यकुशलता या घटकाबाबत फरक आढळतो. ही निरीक्षणे गृहीतकाला अनुसरूण नाहीत. त्यामुळे त्यात लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.

थोडक्यात वरील फलिते व चर्चा लक्षात घेता निश्चितपणे असे म्हणता येईल की, स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या सामाजिक सहभाग या चाचणीत एखादयाचे जीवन समाजाला उपयोगी आहे, लोकांनीसुध्दा त्याला मुल्य दिले आहे असे वाटणे, जगाला देण्यासाठी माझ्याकडे काहीतरी मौल्यवान आहे, एखादयाचे आयुष्य समाजासाठी उपयुक्त आहे आणि स्वत:च्या क्रियाकल्पनांचे मूल्य एखादयाला मूल्यवान किंवा इतरांना मूल्यवान असते. या घटकांबाबत अर्थपुर्ण भिन्नता दिसुन येत नाही.

स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या भावनिक कार्यकुशलता या चाचणीत विविध परिस्थितीमुळे बाहेर आलेल्या भावनिक प्रेरकांना कौशल्याने प्रतिसाद देण्याची योग्यता, उच्च प्रतीचा आत्मसन्मान आणि आशावाद, संवादकौशल्ये, नैराश्य, मतभेद, अहंगंड, न्युनगंड इ. भावनिक बिघाड हाताळण्याची पात्रता, भावनिक आनंदीपणा, यशदायी कृती, इतरांशी नाते ठेवण्याची क्षमता,

ताण-तणाव, उद्रेक टाळण्याची क्षमता, भावनांची नकारात्मकता बाजूला करण्यास शिकणे या घटकांबाबत अर्थपुर्ण भिन्नता दिसुन येत नाही.

मध्यमानावरून पाहिले असता स्त्रियांमध्ये पुरूषांपेक्षा सामाजिक सहभाग हा काहीसा अधीक आढळतो, तसेच स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये भावनिक कार्यकुशलता ही अधीक आढळते.

समारोप

अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने संशोधनातून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण कोष्टक व सारणी स्वरूपात करून संख्याशास्त्रीय विश्लेषणाच्या आधारे अर्थनिर्वचन केले आहे.

निष्कर्ष

१) स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या सामाजिक सहभाग या घटकाबाबत लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.

२) स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या भावनिक कार्यकुशलता या घटकाबाबत लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.

पुढील संशोधनासाठी सूचना

वरील संदर्भाचा अभ्यास सामाजिक सहभाग व भावनिक कार्यकुशलता या चावणी विषयी विदयार्थी, वृध्द, यांच्या संदर्भात केल्यावर त्यांचे सामाजिक सहभाग व भावनिक कार्यकुशलता वाढविण्यासाठी प्रयोगात्मक पध्दत वापरून उपाययोजना करू शकतो.

References

1. The jamovi project (2021). jamovi. (Version 2.2) [Computer Software]. Retrieved from https://www.jamovi.org.
2. R Core Team (2021). R: A Language and environment for statistical computing. (Version 4.0) [Computer software]. Retrieved from https://cran.r-project.org. (R packages retrieved from MRAN snapshot 2021-04-01).

Website

1] Proquest database

2] Google Scholar

3] Shodhganga

पुस्तके

१) सी.पी.लभाणे., जे, सोनटक्के. एस.सावदेकर, सकारात्मक मानसशास्त्र (सप्टेंबर २०१५) प्रशांत प्रकाशन, जळगांव ४२५०१.

२) व्ही.शिंदे., सकारात्मक मानसशास्त्र (जुन, २०१६), डायमंड प्रकाशन, पुणे ४११ ०३०

३) सी.बडगुजर, पी. वरखेडे, सकारात्मक मानसशास्त्र (५ सप्टेंबर, २०१६) प्रशांत प्रकाशन, जळगांव

४२५००१

४) लेखक- दलिप सिंह, पुस्तकाचे नाव-भावनिक बुध्दिमत्ता एक व्यावसायिक मार्गदर्शन डायमंड पब्लिकेशन्स व्दितीय मराठी आवृत्ती - २०१० ISBN No- 978-81-8483-352-2

उद्योजक आणि महिला उद्योजकांची वाटचाल

डॉ. कु. धुतमल वर्षा सिताराम
श्री. गुरू बुध्दीस्वामी महाविद्यालय पूर्णा (जं.) जि. परभणी.
Email Id :Vdhutmal.2020@gmail.com

प्रस्तावना :

उद्योजकता ही संज्ञा फार प्राचीन काळापासुन प्रचलीत आहे. उद्योजक्ता ही संज्ञा विकसित आणि अविकसित देशात प्रचलित आहे. परंतु त्या त्या देशांतील उद्योजकांनी उद्योजक होण्यासाठी अवलंबलेली प्रक्रिया मात्र समान आहे. उद्योजकतेत उद्योजकाचे कौशल्य, गुण, त्यांनी केलेले धाडस व संशोधन कृती यांचा समावेश होतो. उद्योजक आपल्या व्यवसायात सतत कार्यरत असतो. त्याला त्याच्या कार्यातच उद्योजकीय शिक्षण प्राप्त होत असते. तर काही उद्योजक परंपरागत पध्दतीतुन पुढे आलेले असतात. व काही उद्योजक उद्योजकीय प्रशिक्षण घेऊन विविध ज्ञान शाखा प्राप्त करून उद्योजक झालेले असतात.

आर्थिक विकास हा औदयोगिक विकासावर अवलंबुन असतो, देशाचा विकास हा औदयोगिकरणाच्या वेगावर व औदयोगिकरणाचा वेग उद्योजकांच्या कार्यक्षमतेवर व योग्यतेवर अवलंबुन असतो. अमेरिकन मानसशास्त्रज्ञ डी.सी.मॅक्लीलॅड यांनी प्रदीर्घ संशोधनातुन असे सिध्द करून दाखविले आहे की, कोणत्याही राष्ट्राची औदयोगिकरणाची गति पायाभुत सोयी, नैसर्गिक साधन संपत्ती, तंत्रज्ञान, व्यवस्थापनाचे ज्ञान, भांडवलाची उपलब्धता यावर अवलंबुन नसुन त्या देशातील जनतेच्या प्रेरणेवर आणि उद्योजकतेवर अवलंबुन असते, व अंत:प्रेरित असा उद्योजक नैसर्गिक व इतर साधन संपत्तीचा वापर करून औदयोगिकरणाची गती वाढवू शकतो.

अर्थ :

उद्योजक ही संज्ञा मुळ फ्रेंच शब्द Antrprendre या शब्दापासुन तयार झालेला आहे. या शब्दाचा अर्थ जबाबदारी घेणे असा होतो. ऑक्सफर्ड शब्दकोशात या संज्ञाचा अर्थ धारिष्ट्याचे प्रकल्प असा दिला होता तर वेल्स्टर शब्दकोषा प्रमाणे धारिष्ट्याचे प्रकल्प हाती घेण्याची तयारी असा अर्थ दिलेला आहे. यावरून उद्योजक्ता या संज्ञेत धीटपणा, निर्भयता, गतीक्षमता व धोका पत्कारण्याची तयारी हे सर्व गुणविशेष एकत्रित दिलेले आहेत. यावरून उद्योजक्ता या शब्दांचा अर्थबोध होतो. प्रत्येक देशाला उद्योजक्ता विकासाला महत्वदयावे लागते, कारण उद्योजकतेच्या विकासावर त्या देशाची प्रगती अवलंबुन असते.

व्याख्या :

१) जेफरी टिमन्स :

यांच्या मते, 'उद्योजक्ता म्हणजे प्रत्यक्षात कोणतीही अनुकुलता नसतांना काहीतरी नव्याने उत्पन्न करण्याची व निर्माण करण्याची क्षमता होय'.

२) डॉ. जे.ई.स्टेपनेक :

यांच्या मते, ''जोखिम पत्कारण्याची क्षमता, संघटनाची कुवत आणि उदयोगसंस्थेत विविधता आणण्याची व नवनिर्मिती करण्याची तीव्र इच्छा म्हणजे उदयोजक्ता होय.''

३) ए.एच.कोल :

यांच्या मते, ''नफा मिळविणे, नफ्याचे प्रमाण टिकवुन ठेवणे किंवा नफ्यात वाढ करण्याच्या हेतुने आर्थिक वस्तु व सेवांचे उत्पादन किंवा वितरण करण्याकरिता एखादी व्यक्ती किंवा परस्परांशी संबंधीत असलेल्या व्यक्तीच्या एखादया समुहाने केलेले सहेतुक कार्य म्हणजे उदयोगक्ता होय.''

थोडक्यात वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, नव्या गोष्टी करणे किंवा अगोदर माहित असलेल्या गोष्टी नविन पध्दतीने करणे होय.

आजच्या आधुनिककाळात पुरूषांबरोबर स्त्रीया सर्व जबाबदारी सांभाळण्यास समर्थ आहेत. म्हणुन महीला उदयोजकांची भुमिका ही वेगळया प्रकारची दिसुन येते, स्त्रीया ह्या पूर्वी पासुन उदयोजकीय कार्य करतात. असे म्हणता येईल, कारण हॅरेज विल्सन यांनी असे स्पष्ट केले आहे की, स्त्रीया जन्मजात उदयोजक आहेत. त्यांच्यात पुरूष उदयोजकांच्या तुलनेत काही विशेष गुण आहेत, म्हणुन स्त्री उदयोजक यशस्वी होऊ शकतात. परंतु स्त्री उदयोजकाच्या काही समस्या असतात. व त्यांना प्रेरणा देण्याची गरज आवश्यक आहे.

महीला उद्योजकांची व्याख्या :

भारत सरकारच्या नॅशनल लेव्हल स्टॅडिंग कमिटी ऑन विमेन ऑन्ट्प्रनरशिप (१९९१) या समितीने निर्देशित केलेल्या व्याख्ये नुसार, ''ज्या उद्योगात ५१ टक्के भाग भांडवल स्त्रीयाकडुन गुंतविण्यात आलेले आहेत. तसेच ज्या उद्योगातील निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधी पैकी किमान ५० टक्के रोजगार स्त्रियांनाच देण्यात आलेले आहेत, अशा उद्योगांना महिला उद्योग म्हटले आहे.''

महिला उद्योजक आणि समाज :

सध्या आपण २१ व्या युगात वावरत असतांना महिलांना स्वांतञ्य, समान संधी देण्याच्या फक्त वायफळ गप्पा न मारता प्रत्यक्ष कृतीशी अपेक्षा आहे. या दृष्टिने समाज, गाव, राज्य, देशाच्या व्यवस्थेचा विचार करण्यापेक्षा त्या समाजातील कुंटुब प्रमुखाने आपल्या कुंटुबातील महिलाना व त्यांच्या कर्तृत्त्वाला वाव दिला पाहिजे कारण त्यामध्येच कुंटुबाचे, समाजाचे व राष्ट्राचे हित आहे.

सध्या भारतीय महिलाच्या जिवनात अनेक अमुलाग्र बदल घडुन आले आहेत. त्याचे व्यक्तीमत्व बदलेले, सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक अस्तित्व अर्थपूर्ण बनले. समाजाचा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन काहीप्रमाणात का होईना सकारात्मक होऊ लागला आहे. त्यामुळे महिलांना विविध क्षेत्रात पदार्पनाच्या संधी मिळाल्या आहेत. पुर्वीच्या काही रूढी, परंपरा यांच्या जोखंडात अडकलेल्या महिलांनी संधी मिळताच त्यांचे सोने करून घेणाऱ्या महिला आजही समाजात प्रचलित आहेत.

आधुनिक युगात स्त्री – पुरूष समानते विषयी आज आपण सजगतेने आपली मत मांडतो. परंतु काही अपवाद वगळता आजही, सद्य परिस्थिती म्हणावी तशी बदलेली दिसत नाही. विविध क्षेत्रात महिला आजही आघाडीवर आहेत.

नवनविन क्षेत्रात महिलांचा टक्का वाढतोय ही सुसावह गोष्ट नक्कीच आहे. त्यांच बरोबर आजही काही क्षेत्रात पुरूषाचे वर्चस्व मोठया प्रमाणात आढळते. अशी संमिश्र स्थिती आज आपल्या देशात पाहायला मिळते. महिला आणि उद्योग याचा विचार केला तर आज आपल्या देशात महिलांचे उद्योगाकडे वळण्याचे प्रमाण वाढू लागले आहे.

महिला उद्योजक आणि आर्थिक धोरण :

महिला उद्योजकता आणि आर्थिक धोरण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. राज्यातील औदयोगिक वातावरण अधिक सुधारण्यासाठी व उद्योजकांच्या विकासासाठी ते अधिक अनुकूल बनविण्याकरिता व समावेशक्ता कायम ठेवत उद्योगाना जागतिक स्पर्धेची किनार देण्यासाठी औदयोगिक धोरण २०१३ ला घोषित केले आहे, त्यामुळे राज्याच्या औदयोगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात महिला उद्योजकांच्या सक्रिय सहभागाने सर्वसमावेशक आर्थिक सक्षम होण्यासाठी महिला उद्योजकाकरिता विशेष योजना प्रस्तावित करण्याची बाब शासनाची आहे. महिला उद्योजकांसाठी विशेष धोरणाचे उद्दीष्टे महिला परिचालीत उद्योगाचे प्रमाण ९ टक्क्यावरून २० टक्क्यापर्यत सुधारण्याचे आहे. महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात व्यावसायिक वातावरण निर्माण करणे व तांत्रीक परिचालनात्मक तसेच आर्थिक साहाय्य पुरवुन राज्यातील महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातुन राज्यातील महिला उद्योगजकांसाठी विशेष धोरण २०१७ शासनाने मान्य केले.

शासनाने १९९१ मध्ये औदयोगिक धोरण ठरविण्यात आले पुढे १९९४ मध्ये महिलांसाठी स्वांतत्र महिला धोरण, २००१ मध्ये दुसरे महिला धोरण, २०१३ मध्ये तिसरे महिला धोरण आखण्यात आले, आणि या धोरणाव्दारे महिला सक्षमिकरणासाठी उद्योग हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. असे निदर्शनास दिसुन आले आहे.

महिला उद्योजकांसाठीच्या योजना :

१) उदयोगिनी योजना :

देशातील क्रमांक एक असलेल्या सहकारी बँकेत महिलांसाठी विशेष उदयोगिनी ही योजना उपलब्ध आहे. यामध्ये महिलांना विविध दरामध्ये सुट देण्यात आली आहे.

सुक्ष्म क्षेत्रात मोडणाऱ्या महिला उदयोजिका यामध्ये दोन लाखापर्यत कर्ज मिळवु शकतात. लघु क्षेत्रातील उदयोजिकांना ५० लाखांपर्यत कर्ज सुविधा आणि मध्यम क्षेत्रातील महिला उदयोजकांना एक कोटीपर्यत कर्ज उपलब्ध आहे. लघु व मध्यम क्षेत्रातील कर्जासाठी २० ते २५ टक्के मार्जिन आवश्यक आहे.

२) महिला उदयोजक कर्ज :

छोटे छोटे व्यवसाय जसे की, ब्युटिपार्लर, कॅटरिंग, मसाले बनविणे असे करणाऱ्यांसाठी टीजेएसबी बँकेनी विशेष कर्ज सुविधा उपलब्ध केली आहे. महिला बचत गटांनी या योजनेत प्रधान्य देण्यात येते. या योजनेव्दारे २ लाखा पर्यत कर्ज घेऊन ६० महीन्याच्या सुलभ हप्त्यात परतफेड करण्याची सोय शासनाने केली आहे.

३) भारत वनिता उदयमी :

भारत को – ऑप. बँकेमध्ये महिला उदयोजकांसाठी ही विशेष योजना उपलब्ध आहे. कॅश क्रेडिट रूपात महिला उदयोजकांना याव्दारे कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

4)WomanEntrepreneur :

महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटकात प्राबल्य असणारी ही बँक महिला उदयोजक व व्यावसायिकांना आपल्या कर्ज योजनेत विविध चार्जेस माफ करते, तसेच त्यांना लागणारे विविध प्रकारचे अर्थसहाय्य केले जाते.

५) स्त्री उदयोजिका आणि स्वयंसिध्द :

एनकेजीएसबी बँकेने महिला उदयोजक तसेच व्यावसायिक महिला साठी या दोन विशेष योजना तयार केल्या आहेत. महिला उदयोजक विविध कारणासाठी या योजना व्दारे टर्म लोन किंवा कॅश क्रेडिट घेऊ शकतात. कमी होत जाणाऱ्या रक्कमेनुसार व्याजाची रक्कमही यात कमी होत जाते, तसेच यावरील प्रोसेसिंग चार्जेस व अन्य खर्चातही सुट देण्यात आली आहे.

६) उदयोगिनी :

जनकल्याण सहकारी बँक या बँकेच्या शाखा तुलनेने कमी असल्यातरी महिला उदयोजकांसाठी बँकेच्या योजना खुप चांगल्या आहेत. नविन व्यावसाय सुरू करण्यासाठी किंवा असलेल्या व्यावसाय वाढविण्यासाठी या योजनेव्दारे महिला उदयोजकांना अर्थसहाच्य केले जाते. या योजनेव्दारे १० लाखापर्यंत टर्म लोन घेऊ शकता व सात वर्षात त्यांची परतफेड करू शकतात.

थोडक्यात वरील योजनाचा लाभ समाजातील प्रत्येक महिलेने घेतला तर निश्चितच महिलेचे जिवन सुखदाय होऊ शकते.

निष्कार्ष :

१) महिला उदयोजकतेमुळे महिला स्वावलंबी झाल्या आहेत.
२) महिलांचा एकंदरीत कुटुंबाचा, समाजाचा व राष्ट्राच्या सर्वागीन वृध्दी झाली आहे.
३) डिजीटल युगात लिंगभेद काही प्रमाणात कमी झाला आहे.
४) महिला विकासासाठी शासनाने विविध आर्थिक धोरणाचा अवलंब केला आहे.
५) महिला आर्थिक सक्षम होण्यासाठी विशेष योजना शासनाने प्रस्तावित केल आहेत.

सारांश :

वरिल विवेचनावरून असे निदर्शनास आले आहे की, प्राचीन काळापासुन तथाकथित उदयोग क्षेत्र स्त्रीच्या दृष्टिने एक उपेक्षित क्षेत्र मानले गेलेले असले तरी आज विद्यमान आधुनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात औदयोगिक क्षेत्रात अनेक स्त्रीया उदयोजक व कामगार म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचे दिसून येते.

संदर्भ :

1) Gupta B.L. Mahamaya, Anil Kumar, Entrepreneurship Development New Delhi, 2009.
२) देशमुख, प्रभाकर, उदयोजक्ता विकास संकल्पना व व्यवहार, नागपुर, २००२.
३) उदयोजक्ता विकास, आयडियल, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, २०१४.
४) महिला उदयोजकांसाठी शासनाचे विशेष धोरण, शैलजा पाटील देशमुख.
5) https:// udyojak.org/importance of woman entrepreneurship – in – India.
६) भारत ॲग्री स्मार्ट उदयोजक.

आधुनिक हिन्दी साहित्य में नारी

प्रा. डॉ. वडचकर एस.ए.
हिन्दी विभाग, कै. रमेष वडपुडकर महा. सोनपेठ
जिला. परभणी महाराष्ट्र ४३१५१६
Email-sayaliswapnilwsa@gmail.com

भुमिका :- भारतीय जीवन में शुरुवात से अभीतक स्त्री के प्रति सच्चा लेखा-जोखा उपन्यास, कहानी या कविता में मिलता है । हजारों साल पहले जब हमने लिपि का अविष्कार भी नहीं दिया था तब जो रचा जाता वह मौखिक हुआ करता था । उस वक्त भी हम मौखिक को दूसरों तक पहुँचा देते थे । यह परंपरा पीढ़ी दर पीढ़ी चलती आ रही है । उन दिनों नारी - पुरुष का शारिरिक भेद तो मानते थे, किन्तु कोई किसी प्रकार का अंतर नही समाज में नारी-पुरुष का समान भाव ही हमेंस सदियों से स्वस्थ समाज बने रहने में सहास्यक मानते रहे है । किन्तु हमारे उपर जो माइग्रेसन का जो असर हुआ । समाज का ऐक्य का भाव सपना बन गया । परंपरा से चले आरहे मुल्य क्रमषः बिखरते गए । वह विघटन हमारे समाज को दुर्बल बनाता रहा । ऐसे कई उतार - चढाव इतिहास में आते गये । इसका परिणाम हमारी पारंपारिक समाज व्यवस्था में भी निरंतर होता रहा । कुछ मुल्य बिखरे, टूटे, तो कुछ मुल्यों में बदलाव आया तो कुछ स्थायी बन गये जिस की चमक आज भी है । नारी के प्रति भी यही दृष्टि लगी रही । इसमे जादा प्रभाव विदेषी आक्रमणों और पर्यटकों का रहा । शासन द्वारा जो जबरन हमेषा परिवर्तन कराया । उसमे स्वदेषी, पदरेषी परतंत्र में सब से ज्यादा तनाव नारी ने भोगा है । समय - समय के अनुरुप नारी चिंतन भिन्न-भिन्न रुप से हमारे सामने आता है । इसमें सबसे बडा हाथ नारी के प्रति दृष्टिकोण का रहा है । भारतीय दृष्टि में नारी एक 'मुल्य' है । पर पाष्चात्य जगत में नारी एक 'वस्तु' है ।

पुरुष समाज में पुरुष के बनाये नियमों के, उसके वर्चस्वके, स्त्री की अपनी निरीहता के विवषता के विवषता के, कि वह अपने को उस जकड़न से, उन रुढियों से, विपरीताओं से निकलने की कोषिष नही करती । अर्थात स्त्री स्वभाव को समझाने के लिए यह विचार विमर्ष महत्वपुर्ण है । नारी विमर्ष में अनेकों रिष्तें है - केवल पति-पत्नी ही नही । परिवार के अन्य रिष्ते भी है । समाज में स्त्री देसी व्यक्ति है जिसके तार समाज के हर वर्ग से जुडे है । फिर वह प्रेम रस है, शोषण है । पीड़ा है, अस्मिता है, संघर्ष है, यह सब नारी विमर्ष के अंग बनते है । उसकी इच्छा के विरुध्द एक दृष्टि भी वह नही सह पाती । मतलब नारी विमर्ष बहस का मुद्दा उतना नहीं जितना जागृति का हे । यहाँ आधुनिकता संतुलित है ।

प्राचीन भारत में नारी को लगभग समान स्थान दिया गया है । क्योंकि उसके बिना कोई राजकार्य, धर्मकार्य, दान-दक्षिणा दि संभव ही नही था । परंतु आधुनिक युग में परिवर्तन हुआ है ।

हिंन्दी कथा साहित्य में नारी

सामाजिक और राजनैतिक स्तरपर नारी अस्मिता की स्थापना और गरिमा के लिए काफी प्रयास हुए । नारी के सुखद भविष्य को लेकर जब हम विचार करते है, तब लगता है की उसे न्याय और स्वतंत्रता देना अनिवार्य है । परम्परागत बंधनों को तोड़ना आवष्यक है । उसमे कुछ बाते इस प्रकार है - स्त्री - पुरुष समानता, षिक्षा, विवाह, नौकरी प्रत्येक क्षेत्र में दोनों लिंगो को समान अधिकार हो । आजादी के बाद संविधान में समान अधिकार दिया गया । जनतंत्र में वोट का समान अधिकार भी मिला किन्तु व्यावहारिक रुप में बहुत कुछ घुट गया । शोषण चला, दहेज, उत्पीडन, वेतन का तारतम्य जैसी घटनाएँ । इसमे नारी उठ खड़ी हुई । रामायण - महाभारत में नारी के साथ जो हुआ वह अकल्पनीय है । विलास की साधन बनी थी । तो हिन्दी साहित्य के बीरगाथा काल में वह इज्जत और प्रतिष्ठा का प्रतीक बनी । उसपर बंदि से लगाई गई । सती, बहु-विवाह, अंध-विष्वास जैसी कुरीतियाँ नारी जीवन को संकट में ले गयी । सती प्रथा का खंडन राजा मोहन राय ने किया । उसे भवितकाल में भी अवलेहना ही झेलनी पड़ी । उसको द्वितीय दर्जे का इंसान कहां । रीतिकाल तक आते-आते नारी मांसलता प्रमुख हो गई । भोग्यता रुप ही जादा चित्रित हुआ । दरबारी और सांमती युग में नारी की महिला उसके सौन्दर्य, उसकी मांसलता अथवा कला रुप पर निर्भर करने लगी । किन्तु आगे चलकर आधुनिक युग में बदलाव हुआ । सती प्रथा का अंत, विधवा - विवाह, बाल विवाह पर प्रतिबंध, षिक्षा का प्रचलन आदि सुधार चले । हिन्दी साहित्य में भारतेंदु हरिष्चंद्र ने नारी के बदले रुप की तस्वीर को उभारा है । बिसवी सदी के आरंभ में गांधीजी ने आवाज उठाया । महिला रचनाकारों ने इसे अनदेखा नही किया । प्रेमचन्द ने नारी शोषण का विरोध किया । जैनेन्द्र कुमार ने परंपरागत नारी की मुर्ति का भंजन किया । घर - परिवार पति के बंधनों से मुक्त करने प्रोत्साहित किया । माँ-पत्नी, पुत्री से हटकर नारी का अस्तित्व क्या हो, इस पर विचार किया ।

१९४७ के बाद नारी घर से निकली । स्कूल, कालेज, बाजार, दफ्तर गई । सामाजिक स्थिति बदलली पर नई समस्याये आयी । घर-बाहर दोनों जगह पर पुरुष वर्चस्व के खिलाफ खड़ी हुई । संघर्ष और साहस से बदले परिवेष को स्थापित किया । पूराने मुल्यों, जंजीर, रुढियों, आधुनिक सभ्यता के

तथा कथित अधिकारों मे बदलते संदर्भ में नारी की स्थिति उभारी । उनमे कमलेष्वर, राजेंन्द्र, मन्नुभंडारी, प्रभाखेतान, उषा प्रियवन्दा, मैत्रेयी पुष्पा को हम महत्व दे सकते है । राजेन्द्र यादव ने संयुक्त परिवार कुचलना चाहता है । पर संभव नही है । अब वह 'माँ' तक की पत्नीत्व की उपेक्षा करती है । मन्नुजी कहती है - "आज की 'मै' इतनी निर्बल और निरीह नहीं कि मुझो जीवन बिताने के लिए कोई सहारा चाहिए । " इस युग में वह अपनी ताकत पहचान रही है । विवाह संस्था की मोहताज नहीं रह जाती । कामकाजी महिला घर का दायित्व लेकर भरण पोषण करती है । पर वह जो चाहती है, वह भी करने को इच्छुक है ।

कमलेष्वर जी ने नगरीय परिवेष पर लिखी नारी की विद्रूप, विसंगतियों और समस्याओं पर प्रकाष डाला है । 'काली आंधी' कहानी में पत्नी राजनेता बनकर पति और संतान का साथ नही निभा पाती । 'तलाष' कहानी भी विधवा, कामकाजी को चित्रित करती है । पर मानसिकता और शारीरिक स्वतंत्रता में अपनी पुत्री बाधक बनती है । अंदर घुट रही है, लाचारीवष व्यक्त नही कर पाती । नैतिकता उसके कदम रोक लेती है । कमलेष्वर और उषा प्रियबंदा ने नारी की आर्थिक आत्मनिर्भर, व्यक्तित्व के टकराव की समस्या वाली नारीयों को अपनी कहानियों में चित्रित किया है । आगे चलकर हम देखते है की प्रभाखेतान की कहानियों में विद्रोह और तीव्र है । रुढिया तोड आत्मनिर्भर सफल कार्यषील महिला का चित्राण है । ग्रामीण परिवेष में सामाजिक जागरण का दायित्व लेती है । समय - समय के अनुरुप कहानीकारों ने अपने कहानी के कथ्य को परिवर्तित किया है । आजादी के बाद नारी को पारीवारिक दायरे से बाहर निकालकर सामाजिक सरोकार और जीवन के यथार्थ से जोड़ा है । इसमे अपने सजग और सषक्त नेतृत्व में स्त्री संसार की जटिलताओं में व्यक्त करनेवाली लेखिकाएँ आती है । कृष्णा सोबती, उषा प्रियवंदा, मन्नु भंडारी, षिवानी, ममता, कालिया ।

जटिलताओं के साथ आगे चलकर आधुनिक नारी की मनस्थिति, पारिवारीक जीवन और दांपत्य-जीवन को लेकर भी लेखन कार्य हुआ । इनमें चन्द्रिका सोनरेक्सा, मालती जोषी, प्रतिभा वर्मा, सुधा अरोडा, मृदुला गर्ग प्रमुख है । इन्होने समाज और युग के सत्य को पहचान कर भारतीय समाज के मध्यमवर्ग की स्त्रियों का परिवारीक समाज जीवनायुक्त लेकर चलने का कार्य किया है । इन्होने अपनी भाषा शैली और संवेदना से सूक्ष्म स्तरों पर भारतीय नारीयों को चित्रित किया है । तो उत्पीडित नारी जीवन की अनुभूतियों को व्यक्त करनेवाली लेखिकाएँ - मेहरुन्निसा परवेज, नासिरा शर्मा है । इन्होने काफी अविस्मरणीय कहानियाँ लिखी है । नारीमन, जीवन मुल्यों, परंपरा और आधुनिकता के टकराव, नारीमन की घनीभु पीड़ा संबंधों में दरार आदि विषयों को रुपाकार देने में सुर्यबाला, चित्रमुदगल, चंद्रकांता का नाम सर्वोपरी लिया जाता है । यहाँ पर नारी मुक्ति ही नही, देष और समाज की अन्य अनेकों समस्याएँ भी है । मृषाल पांडेय, अलका सरावगी, कुसुम असंल ने परिवर्तित जीवन स्वरुप को सही रुप से अभिव्यक्त किया है । कथाओं का लेखन विविध प्रकार से यहाँ दिखाई देता है । नारी का अपना वृतांत विष्वासनीय ढंग से यहाँ चित्रित हुआ है । इसीलिए इसे नारी की अपनी निजी प्रासंगिकता का प्रष्न भी उत्तरित हुआ है । वह यथार्थ को मजबूती से व्यक्त कर सकती है । व्यंग्यकी पैनी धार में कोई संकोच नही रखती । वैसे हम देखते है की कई पीढ़िया एक साथ लिख रही है । किन्तु पिछले दषक में शामिल हुई कथाकारों में महुआ माझी काफीचर्चित हुई । इन्होने आदिवासी और मुस्लिम महिला चरित्रोंके अंतर्मन को गहराई से खोला है । नारी मन की कोमल संवेदना (फयनषा-कालिदास) बड़ी संजीदगी से अंकित करती है । देह की मादकता से बंधी है । परंतु हलकी भावुकता से बचकर लिखने में सफल हो रही है । अपने व्यापक अनुभव और गहन सृजन धर्मिता के बल पर नई पीढ़ी ने इस क्षेत्र में अपनी पहचान बनाई है । अल्पनामिश्र का कहना है की यहाँ यह महानगर तक सीमित न होकर आदिवासी और ग्रामीण परिवेष में नारी का रुप चित्रित हो रहा है । यहाँ आनेवाला राष्ट्रीय परिदृष्य भी अच्छुता नही रहेगा । अपने अनुभव के बलबुतेपर नई पीढ़ी ने बहुत जल्द ही इस क्षेत्र को स्वीकारा है । युवा पीढ़ी की लेखिकाओं ने अपने सृजनधात्री और संघर्षषील लेखन के आधारपर हिन्दी को समृध्द बनाने का सक्षम कार्य किया है ।

स्त्री का आजादी का प्रष्न हमारी बहसों का विषय है । 'यत्र नार्यस्तु पूज्यतें रमतें तत्र देवता' के खयालों में स्त्री को ऊंचा उठाया है । उसे मानवीय बनने नही दिया । उसे पुज्यनीय भाव से सराहा गया है । मंदिरों की सीढियाँ मात्र चढ़ाई गई । कोरी आदर्षवादी चिंतनधारा ने ही उसे अधिक रुढिवादी बनाने का काम किया है । हमें स्त्री विमर्ष हिन्दी साहित्य में पहलीबार मध्यकालीन कवयित्री मीराबाई के काव्य और व्यक्तित्वमें उभरता दिखाई देता है । विद्रोहिणी प्रतिभा से उन्होने नारी अस्मिता को एक अभूतपुर्व नीव रचने का कार्य किया है । "मेरे तो गिरधर गोपाल दूसरो न काई । " इस पद से तत्कालीन रुढियों में जकडे राज समाज में कितने ज्वालामुखी न फट पडे होंगे । मीरा के कई वर्ष के बाद यह स्त्री-चेतना की लहर हमें वी सदी में तक सीर उठाती नजर आती है । यह पुनर्जागरण की लहर हमे राजाराम मोहन राय और पंत्र विद्यासागर के स्त्री-मुक्ति प्रयासों में नजर आती है । स्वाधिनता के पहले १८५७ में इसका प्रभाव हमें महारानी लक्ष्मीबाई के विद्रोह में परिलक्षित होता है । साहित्य जगत में भारतेंदु हरिष्चंद्र और उनकी मंडली के कई रचनाकारों ने नारी की दयनीय स्थिति पर रचनाओं की निर्मिती की है । हिन्दी के महिला रचनाकारों

ने घर-परिवार समाज और देष सभी को अपनी दृष्टि के केंद्र में रखा है । इन्होने कभी भी अपने कृतित्व को घोषित रख नारी विमर्ष की संज्ञा नही दी । हमे अस्सी के पहले कुछ बार स्त्री विमर्ष - दलित विमर्ष की अनुगुंज सुनने को मिलती थी । उदाहरण के लिए हम बोधिसत्व की कविता को देख सकते है ।

' नारी'
ननी विचारी,
पुरुष की मारी,
तब से सुधित,
मन से मुदित
ललककर झपककर
अंत में वित्त ' । "

बोधिसत्व की कविता में औरत की रची-बसी जिन्दगी की अंदरुनी स्थितियों की सुक्ष्म दृष्टि दिखाई देती है । शकुंत माथुर की कविता ' जी लेने दो ' जिसमें नारी की अस्मिता की तलाष पहचानी गई है ।

" जी लेने दो / मुझे / वह कोरा अर्थ /
मेरे लिए अपना है ।
रख लेने दो मुझे
वही मेरे पास
जो नितान्त मेरा अपना है ।
पी लेने दो वह
वह चाह
वह रस
जो मेरे लिए अच्छा है ।
संवित कर लेने दो वह
जो
घुम रहा नस-नस में
हर धडकन में जीवन
जीसको जीकर मै जान सकूं
मैने भी कुछ
अपनी तरह जिया है । "

सारत

स्त्री हर क्षेत्र में अपने आपको सक्षम सिध्द करने का प्रयास कर रही है । उसकी शैक्षाणिक प्रगति, परिवार एवं समाज का उसकी ओर देखने का दृष्टिकोण में भी बदलाव आया है । स्त्री की स्वतंत्रता और उसका सबलीकरण का प्रमुख आधार अर्थ है । वह आर्थिक दृष्टि से स्वावलंबी हो रही है । राजनीति के क्षेत्र में उसका पदार्पण भले ही मंद गति से हो रहा हो । वह शीघ्र ही इस क्षेत्र में आधिकाधिक संख्या में सिध्द होगी । वर्तमान स्त्री धार्मिक, आडम्बरों, पाखंडो, अंधविष्वासो से उबरकर अपनी जड़वत स्थितियों को त्याग रही है ।

संदर्भ ग्रंथ

१.स्त्रीत्ववादी विमर्ष समाज और साहित्य - नमा शर्मा
२.महिलाओं का संसार और अधिकार - वंदना सक्सेना
३.उत्तर ष्षती के हिंदी उपन्यास - एन. मोहन
४.औरत : उत्तर कथा - राजेन्द्र यादव एवं अर्चना वर्मा
५.स्त्री संघर्ष का इतिहास - राधाकुमार

बँकींग क्षेत्रातील सुधारणा

प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे
संशोधन मार्गदर्शक व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी
Email-mkachave@gmail.com

प्रस्तावना

सद्याच्या काळात बँकींग क्षेत्र हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. अलिकडच्या काळात भारतीय बँकींग कार्यप्रणालीत मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत बँकाचे महत्व वाढल्यामुळे बँकावर नवनवीन जबाबदा-या सोपवून सातत्याने बदल घडून येताना दिसत आहेत. बँकींग कार्यात संगणकाच्या आणि इंटरनेटच्या वापरामुळे व विस्तारामुळे अमूलाग्र बदल दिसून येत आहेत. त्यामुळे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात बँकींग व्यवसायातील तंत्रज्ञानाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. मोठ्या प्रमाणावर संगणकांच्या वापरामुळे माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक प्रकारची क्रांतीच झालेली आहे. आज भारतातील बँका विविध बँक विषयक सेवा आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देताना विशिष्ट सेवांवर जास्त भर देताना दिसून येतात. मानवी शरीरात रक्तवाहिन्यांना जेवढे महत्व असते तेवढे महत्व देशांच्या अर्थव्यवहारात बँकांना असते.

भारतात 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यात आले. परकीय बँका, थेट परकीय गुंतवणूक इत्यादींना परवानगी देण्यात आली. भारतीय बँकानी इतर देशातही आपल्या शाखा उघडल्या. त्यामुळे अमेरीका, युरोप, जपान, फ्रॉन्स, आशिया देश, इत्यादी सोबतच्या आर्थिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भारतीय बँकांना हे सर्व व्यवहार कार्यक्षमपणे हाताळण्यासाठी त्यांच्या कार्यपद्धतीत बदल करून संगणीकृत आणि आधुनिक कराव्या लागल्या सध्याच्या स्पर्धेच्या युगात बँकांना टिकाव धरण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज निर्माण झाली आहे. आज भारतातील बँका विविध बँकविषयक सेवा आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देतांना विशिष्ट सेवांवर जास्त भर देताना दिसून येतात.

शासनाने बँकींग क्षेत्राचा योग्य दिशेने विकास व्हावा यासाठी वेळोवेळी विविध प्रकारचे बँकींग कायदे करून आणि विविध बँक सुधारणा समित्या स्थापन करून सकारात्मक प्रयत्न केले. प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या सुधारणा बाबतची 1977 ची दांतवाला समिती, 1987 ची केळकर समिती, 1994-95 मधील भंडारी समिती स्थापन केली. भारत सरकारने 1991 मध्ये एम. नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली वित्तीय क्षेत्र सुधारणा विषयक समिती स्थापन केली. 14 ऑगस्ट, 1991 रोजी रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर एम.नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय 'वित्तीय क्षेत्र सुधारणाविषयक समिती' ची स्थापना केली. या समितीने 19 नोव्हेंबर, 1991 रोजी आपला अहवाल सादर केला. या समितीच्या शासनाने बहुतेक शिफारशी स्वीकारून टप्याटप्याने अंमलात आणल्या. यामुळेच बँकींग क्षेत्रात फार मोठे बदल घडून आले आहेत. माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्र झपाटयाने विस्तारीत होत असल्यामुळे सध्या सर्वच क्षेत्रात संगणकाचा वापर वाढत असल्याचे दिसून येते. इंटरनेटच्या प्रसारामुळे ग्राहकांना आता बँकेत जाण्याची गरज नाही घरात बसून किंवा प्रवासात असताना देखील धनादेश भरणे, पासबुक नोंदी अद्यावत करने ही कामे करता येतील. दूर अंतरावर असून सूध्दा चर्चा, विचार, विनिमय, सूचना, आदेश, संदेश व माहितीवहन इत्यादी गोष्टी एकमेकाकडे पाठविता येतील. इंटरनेटमुळे व संगणकामुळे बँकींग सेवा आता वर्षातील चोवीस तास उपलब्ध होऊ शकेल.

संशोधनाचे आदेश :-

सदर शोधनिबंध खालील उदेश डोळयासमोर ठेवून करण्यात आला आहे.

1. बँकेची संकल्पना स्पस्ट करणे,
2. बँकेच्या नरसिंहन समितीचा शिफारशीचा अभ्यास करणे
3. बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा अभ्यास करणे
4. निष्कर्ष काढणे

संशोधनाची गृहीतके :-

1. नरसिंहन समितीने सुचविलेल्या बहुतांश समस्या शिफारषी शासनाने स्वीकारल्या
2. 1991 व 1997 साली बँकींग क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी समिती नेमण्यात आली.

अभ्यास पध्दती :-

सदर शोध प्रबंधांसाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला असून दुय्यम माहितीत संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील संपादकीय लेख, मासीके यांचा आधार घेतलेला आहे. वरील उदिष्टे डोळया समोर ठेवून सामग्री संग्रहन केले आहे

बँक क्षेत्रातील सुधारणांची आवश्यकता :-

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने मिश्र अर्थव्यवस्था व लोकशाही पद्धतीचा अवलंब करून देशाच्या विकासासाठी आर्थिक नियोजनाचा अवलंब केला. 1969 व 1980 साली अनुक्रमे 14 व 06 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरणामुळे शेती, लघुउद्योग, दारिद्र्य रेषेखालील घटक, आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटक इत्यांदींना प्राधान्याने कर्ज पूरवठा करण्यात आला. बँकांची संख्यात्मक वाढ झाली परंतु त्यांचा गुणात्मक विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले. अनेक आजारी बँका दिसून आल्या. अर्थव्यवस्थेला दिवाळखोरीच्या संकटातून वाचविण्यासाठी शासनाने सोने तारण ठेवले. 1991 साली डॉ. मनमोहन सिंह यांनी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला बँकांची कार्यक्षमता वाढवून त्या नफ्यात याव्यात म्हणून प्रयत्न करण्यात आले. बँकींग व्यवसायात सुधारणा करणे आवश्यक असाल्याचा निर्वाळा नरसिंहन समितीने दिलेला आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे भारताला सुध्दा वित्तीय क्षेत्रात सुधारणा करणे क्रमप्राप्त झाले.

बँकींग व्यवसायातील आर्थिक सुधारणांची उदिष्टये :-

1. भारतीय बँक व्यवसाय व वित्तीय प्रणाली, बँकांची धोरणे, बँक व्यावस्थापन संघटात्मक रचना व बँकांच्या कार्यपद्धती मध्ये सुधारणा घडवून आणणे.
2. भारतीय बँक पध्दती व भारतातील वित्तीय संस्था, सहकारी बँका, ग्रामीण बँका इत्यादीवर परिणामकारक नियंत्रण ठेवून सर्व वित्तीय संस्थांची संतुलीत वाढ करणे.
3. बँका आणि वित्तीय संस्थांचे व्यवहार, जबाबदा-या आणि किफायतशीरपणा यांच्या संदर्भात त्या सर्व संस्थांची कार्यक्रमता व परिणामकारकता वाढविणे.
4. देशातील सर्व क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्था यांच्या सर्व व्यवहारावर देखरेख ठेवणे.
5. भारतीय बँकींग प्रणालीची वैधानिक चौकट लक्षात घेवून आवश्यक त्या दुरुस्त्या करणे.
6. बँकांची सुरक्षितता विश्वासार्हता वाढविणे.
7. नवीन कर्जाची गरज लक्षात घेवून बँकाकडून योग्य प्रतिसाद मिळेल असे वातावरण निर्माण करणे.
8. बँकांच्या कार्यात आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, संगणकीकरण इत्याचीचा वापर करणे.

एम. नरसिंहन समिती :-

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असल्यामुळे बँकांनी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शाखा उघडून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. बँकांच्या दर्जावर विपरित परिणाम झाला. त्यामुळे बँकांची उत्पादकता कार्यक्षमता खालावली आणि नफाही कमी झाला याचा विचार नरसिंहन समितीने विचार करुन आपली मते खालील प्रमाणे दिली आहेत.

1. रोख राखीव प्रमाण (Cash Reserve Ratio) (CRR) रिझर्व बँकेकडील रोख राखीव प्रमाण 15% वरून 5% पर्यंत कमी करावे.
2. वैधानिक रोखता प्रमाण (statutory Liquidity, Ratio) (SUR) 38.5 टक्क्याहून पुढील पाच वर्षात 25% पर्यंत कमी करावे
3. शेती लहान उद्योग, प्राधान्य क्षेत्र इत्यादीना कर्ज देण्यात सुधारणा करावी. या क्षेत्राला एकून कर्जाच्या 10% कर्ज बँकांनी द्यावे.
4. देशातील व्याजदरांची संरचना बाजाराधिष्ठीत असावी बँकांना स्वतःचे व्याजदर ठरविण्याची संमती देण्यात यावी
5. देशात चतुःस्तरीय बँक संरचना निर्माण करण्यात यावी अशी संरचना निर्माण करण्यासाठी बँकांच्या विलीनीकरण व संपादनाच्या प्रक्रियेला प्रोत्साहन द्यावे.
6. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची प्रक्रिया थांबविण्यात यावी. खाजगी क्षेत्रात नवीन बँका स्थापन करण्याची समती द्यावी.
7. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिक स्वायतता देण्यात यावी रिझर्व्ह बँकेचे या बँकावर नियंत्रण व नियमन असावे, त्यांना अधिकारी नियुक्त करण्याचे स्वातंत्र द्यावे.
8. कर्ज वसुलीच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी विशेष कर्जवसुली न्यायाधीकरणे स्थापण करणे.
9. भांडवल बाजाराचे उदारीकरण घडवून आणणे.
10. शाखा परवाना पद्धती रद्द करण्यात यावी
11. संशयित व बुडीत कर्जासाठी मालमत्ता पुनर्रचना निधी स्थापन करावा.

एम. नरसिंहन समिती - II

भारत सरकारने 1997 साली वित्त मंत्रालयाने एम नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती नेमली. या समितीचे नाव 'किंग क्षेत्र सुधारणा समिती' असे होते. या समितीला आता पर्यंत झालेल्या बँकिंग क्षेत्र सुधारणांचे परीक्षण करून भारताच्या वित्तीय व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बनविण्यासाठी वित्तीय क्षेत्र सुधारणेचा एक निश्चित कार्यक्रम तयार करण्याचे सांगण्यात आले. या समितीने एप्रिल 1998 मध्ये आपला अहवाल सादर केला.

समितीने खालील महत्वाच्या शिफारशी केल्या :-

1. 1991 ते 1997 या कालावधीत पहिल्या नरसिंहन समितीने केलेल्या शिफारशी लक्षात घेवून बँकींग क्षेत्रात सुधारणा व प्रगतीचा आढावा घेणे.
2. आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातील बदल लक्षात घेवून देशातील बँकींग व्यवस्थेत कोणते बदल करणे आवश्यक आहेत.
3. बँकींग क्षेत्रातील कायदेशीर व तांत्रिक बदल लक्षात घेऊन बँकांचे धोरण ठरविणे.
4. नाणे बाजार व विदेशी चलन बाजार यांचे संबंध अधिक दृढ करण्याचे दृष्टीने सूचना कराण्यात आल्या.

5. आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने समितीने वित्तीय व नियमन देखरेख मंडळाच्या स्थापनेची शिफारस केली.
6. लघु उद्योगांच्या गरजांसाठी अनेक लहान बँकांच्या स्थापनेवर भर द्यावा.
7. बँकींग कायद्यांचे पुनर्विलोकन करून त्यांना अद्यावत करण्यात यावे.
8. आजारी बँकांना अर्थक्रम बनविणे शक्य नाही झाल्यास त्यांना सक्षम बँकेत विलीन करण्याऐवजी बंद करावे.

1991 नंतर बँकींग कंत्रातील सुधारणा.

भारत सरकारने 1991 मध्ये आर्थिक सुधारणांचे धोरण स्वीकारामुळे जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय वित्तीय प्रणालीचा विकास करणे आणि त्यात खालील प्रमाणे सुधारणा करणे अपरिहार्य ठरले. भारत सरकारने नरसिंहन समित्यांच्या अनेक शिफारशी स्वीकारल्यामुळे भारतीय बँकींग व्यवसायात खालीलप्रमाणे सुधारला घडून आल्या.

1. भांडवल पुर्याप्तता प्रमाण (Capital Adequary Ratio - CAR):

बँकांनी दिलेल्या कर्तावरील व्याज जोपर्यंत प्रत्यक्षात प्राप्त झाल्याशिवाय त्याची उत्पन्नात गणना न करता अशा संदिग्ध व बुडीत कर्जाना अलाभदायी मालमत्ता समजावे. अशा अलाभदायी मालमत्तेला भांडवल पर्याप्तता गुणोत्तराचे निकष लावण्यात यावेत. यामुळे सर्व बँकांनी भांडवल पर्याप्ततेचे किमान 9% चे बंधन साध्य करणे गरजेचे आहे.

2 रोख राखीव निधीचे प्रमाण (cash Reserve Ratio-CRR) :

बँकांना रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार आपल्याकडे जमा झालेल्या ठेवीपैकी विशिष्ट प्रमाणात रक्कम रिझर्व्ह बँकेकडे ठेवावी लागते. यालाच रोख राखीव निर्धाचे प्रमाण असे म्हणतात. नरसिंहन समितीच्या शिफारशीवरून (CRR) कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

3 वैधानिक रोखता प्रमान (Statutory Liquidity Radho - SLR):-

व्यापारी बँकांना आपल्याकडील एकून ठेवीपैकी ठराविक प्रतिशत रक्कम स्वत:कडे रोख स्वरूपात किंवा सोन्याच्या स्वरूपात ठेवाव्या लागतात. या प्रमाणालाच SLR असे म्हणतात. या रक्कमेचा उपयोग बँका ठेवीदारांना आपल्या ठेवी मागणी करताच परत करण्यासाठी करतात. बँकांना या ठेवी कर्ज देण्यासाठी वापरता येत नाहीत.

4. अलाभदायी मालमत्ता (Non Performing Assets NPA) :-

बँकांनी कर्जरूपी दिलेल्या मालमत्तेवरील व्याज सहा महिन्यापेक्षा जास्त काळांसाठी थकीत झाल्यास त्यास अलाभदायी मालमत्ता असे म्हणतात. बँकांचे अलाशदायी मालमत्तेचे प्रमाण कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक 1991 पासून निर्देश देवून ते 10% च्या आत ठेवावे असे सुचविले होते.

5. धोरणात्मक हिशोब पद्धतीतील घटक :-

रिझर्व्ह बँकेने 1992 पासून देशातील सर्व व्यापारी बँका करीता एक समान निर्दोष हिशोब पद्धती असावी या हेतूने सर्व बँकांसाठी धोरणात्मक हिशोब पद्धती सुरू केली. बुडीत कर्जाची तरतूद, उत्पन्नाचे मोजमाप या सारख्या बाबींचे रिझर्व्ह बँकेच्या निकर्षानुसार एक समान पद्धतीने आर्थिक बाबीचे मापन कावे

6. बँक दरात घट :-

रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांना दिलेल्या कर्जावर ज्या दराने व्याज आकारते त्याला बँक रेट असे म्हणतात. नरसिंहन समितीच्या शिफारशीप्रमाणे बँक रेट कमी केला आहे. बँकदर कमी झाल्याचा परिणाम म्हणजे व्यापारी बँकांना रिझर्व्ह बँकेकडून स्वस्त दरात कर्जे मिळतात. त्यामुळे व्यापारी बँकांना ग्राहकांनाही स्वस्त दराने कर्जे देतात.

7. व्याज दराबाबत सुधार :-

नरसिंहन समितीच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक कडून नियंत्रीत होणारी व्याजदर पद्धती बंद करावी व देशातील व्याज दराची संरचना बाजाराधिष्ठीत असावी आणि बँकांना स्वतःचे व्याजदर ठरविण्याची परवानगी देण्यात यावी असे निश्चित करण्यात आले.

8. कर्जवसुली कायदा व कर्जवसुली न्यायाधिकरणे :-

व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे व अग्रिमे यांच्या वसुलीचा प्रश्न बँकासमोरील सर्वात महत्वाचा व बँकांना भेडसावणार आहे. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने 1993 मध्ये वसुली कायदा समंत केला. त्यामुळे कर्ज वसुलीच्या कार्यात एक प्रकारची गती आली. तसेच 1995 मध्ये प्रमूख 8 शहरात कर्जवसुली न्यायालये स्थापन केली.

9. बँकींग लोकपाल योजना :-

बँकींग सेवामधील त्रुटी विरूध्द ग्राहकांच्या तक्रारीचे त्वरीत व अल्प खर्चामध्ये निवारण करण्यासाठी जून 1995 मध्ये " लोकपाल योजना' सुरत करण्यात आली. सध्या देशात असे एकून 10 लोकपाल कार्य करीत आहे.

10. परवाना शिथिलीकरण :-

रिझर्व्ह बँकेने नवीन व्यापारी बँका व त्यांच्या परवान त्याबाबतचे परवाना धोरण शिथील करण्यात आले आहे. परिणामी देशात खाजगी क्षेत्रात अनेक नवीन बँका स्थापना झाल्या. अनेक बँकांनी ग्रामीण आणि अर्धनागरी भागातही आपले शाखांचे जाले विस्तारून ग्रामीण आर्थिक विकासास हातभार लावत आहे.

11. खुल्या बाजारातून भांडवल उभारणी :-

व्यापारी बँकांना खुल्या बाजारातून स्वतःचे उभारणीची मिळालेली परवानगी ही बँकींग क्षेत्रातील एक महत्वपूर्ण सुधारणा मानली जाते. परिणामी सर्व राष्ट्रीयकृत बँका तसेच इतर सर्व बँकांना खुल्या बाजारातून भांडवल उभारणीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे त्यांनी भांडवल उभारणीस प्रारंभ केला.

भारतात वरीलप्रमाणे अशा अनेक सुधारणा घडून आल्या आहेत. त्याचा देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यात मोलाचा वाटा राहिला आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1. डॉ. एस. के. ढगे : भारतीय बँकींग व्यवसाय आणि सहकार के. एस. के. पब्लिकेशन, पुणे
2. डॉ. पांडूरंग गुढ्ढे : बँक प्रणालीतील नवीन सुधारना दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड
3. प्रा.डॉ.मारोती कच्छवे : भारतीय बँक व्यवसाय, श्रध्दा पब्लिकेशन्स, सोलापूर
4. प्रा. डॉ. कचरादास पि. बैरागी व इतर : भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन, पुणे.

नागरी सहकारी बँकांचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थिती

प्रा. डॉ.अरूण बळीराम धालगडे[1] सय्यद फारुखअली जहूरअली [2]

[1]संशोधक मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा जि.लातूर.

[2]पीएच.डी. संशोधक, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर. जि. लातूर.

Email- abdhalgade@gmail.com

Email- sayyedsirmgm@gmail.com

प्रस्तावना : सहकारी बँकिंग हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि राजकारणाचाही कणा आहे महाराष्ट्र सहकारात कायमच आघाडीवर राहीला. आजही महाराष्ट्रातच सर्वाधिक सहकारी बँका आहेत. सहकारी बँका मुळे बँकिंग क्षेत्र खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचले. जिल्हा, तालुका, गाव स्तरावर सहकारी बँका उभ्या राहिल्या. सहकारी साखर कारखाने उभे राहिले. अनेक राजकीय नेते सहकाराच्या आधारानेच मोठे झाले. अगदी मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. सहकारी क्षेत्र टिकून राहिले पाहिजे यासाठी राजकारणातील भांडणे सहकारात येऊ नयेत अशीच भूमिका आजवर घेतली गेली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेची 62 वर्ष पूर्ण होत असताना, म्हणूनच सहकारी बँकांच्या वाटचालीचा सद्यस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1)भारतातील नागरी सहकारी बँकांचा अगोदर चा व सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

2) रिझर्व बँकेला सहकारी बँकामध्ये जादा अधिकार मिळाल्यामुळे होणाऱ्या फायदे व तोट्याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती

हा संशोधन लेख लिहिण्यासाठी द्वितीय सामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, शासनाचे अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

सहकारी बँकांचा इतिहास

सहकारी बँकिंगची भारतातील सुरुवात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात सुरू झाली. ब्रिटन, जर्मनी व अल्पप्रमाणात इटलीमधील सहकारी चळवळींची कामगिरी पाहून भारतातील मध्यम व कनिष्ठ वर्गातही ही चळवळ योग्य दिसेल या विचाराने चळवळीची सुरुवात झाली, असे म्हटल्यास हरकत नाही. भारतातील तत्कालीन व्यापारी बँका मध्यम आणि समाजाच्या कनिष्ठ स्तरावर कर्जे देण्यास फारशा उत्सुक नव्हत्या. शिवाय वैयक्तिक जामीनकीवर कर्ज वाटप करण्यास या बँका अजिबात तयार नव्हत्या; त्यामुळे गरजू वर्गासमोर सावकाराकडे जाऊन भरमसाठ व्याजाने कर्ज घेण्यात व्यतिरिक्त अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. बडोदा संस्थानमध्ये 'म्यूच्यूअल एड फर्स्ट सोसायटी' म्हणून 1889 मध्ये विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'अन्योन्य सहकारी मंडळी' या नावाने संस्था सुरू झाली. मध्यम व कनिष्ठ स्तरावर ठेवी गोळा करून याच स्तरावरील गरजूंना कर्ज वाटप करण्याचे काम मोठ्या उत्साहात सुरू झाले. ही संस्था अनेक वर्ष कार्यरत होती.

पुढची अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे 1904 मध्ये भारत सरकारने पहिल्यांदा को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा मंजूर केला त्यामुळे भारतामध्ये अशा सहकारी तत्त्वावरील संस्था सुरू करण्यास उत्तेजन मिळाले. कायद्यान्वये भारतामधील पहिली सोसायटी तत्कालीन मद्रास प्रांतातील कांजीवरमम मध्ये ऑक्टोबर 1904 मध्ये स्थापन झाली. पाठोपाठ मुंबई, पुणे, कर्नाटकातही काही ठिकाणी अशा संस्था स्थापन झाल्या. रिझर्व बँकेने 1958-59 मध्ये सहकारी बँकांचा सखोल अभ्यास करून 1961 मध्ये अहवाल प्रसिद्ध केला. याचा परिपाक म्हणून रिझर्व्ह बँकेने 1 मार्च 1966 पासून एक लाखापेक्षा अधिक भागभांडवल असलेल्या सहकारी बँकांना' बँकिंग रेगुलेशन ॲक्ट 1949' खाली आणून खऱ्या अर्थाने दुहेरी नियंत्रण सुरू केले. यानुसार बँकिंगमधील विषय, लायसनिंग, एरिया ऑफ ऑपरेशन, इंटरेस्ट रेट्स इत्यादी रिझर्व बँकेच्या, तर रजिस्ट्रेशन, मॅनेजमेंट, ऑडिट, लिक्विडेशन सारखे नियम संबंधित

राज्याकडे दिले गेले. पुढे 1968 मध्ये ठेव विमा योजनेखाली या सहकारी बँकाही सामील करून घेण्यात आल्या. परिणामी 1948-49 मध्ये 815 इतकी असलेली सहकारी बँकांची संख्या, 1978-79 मध्ये 1408 इतकी झाली. या सर्वांचा परिणाम म्हणून 31 मार्च 2003 अखेरीस भारतातील नागरी सहकारी बँकांची संख्या 2104 झाली त्यामधील 56 शेड्युल्ड बँका होत्या. त्यातील 79% बँका महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, कर्नाटक व तामिळनाडू मधील होत्या. 1988-89 मध्ये ज्या बँकांची डिमांड अंड टाईम टाईम लायबिलिटीज 50 कोटी रुपयांपेक्षा अधिक आहेत अशा 11 बँकांना रिझर्व बँकेच्या सेकंड शेड्युलमध्ये घेऊन ,त्यांना शेड्युल बँकेचा दर्जा देण्यात आला. विविध राज्यांमध्ये अर्बन बँकांची फेडरेशन स्थापन केली गेली आणि फेब्रुवारी 1977 पासून संपूर्ण भारतातील अर्बन बँकांचे नॅशनल फेडरेशन, दिल्ली येथे मुख्यालय ठेवून स्थापण्यात आले.

यापैकी महाराष्ट्रात 348, गुजरातमध्ये 265, कर्नाटकात 225, आंध्र प्रदेशात 132, तमिळनाडूमध्ये 131, पश्चिम बंगालमध्ये 111 व केरळमध्ये 67 बँका होत्या.

24 जून 2020 रोजी जेंव्हा बँकिंग रेगुलेशन अॅक्ट चा वटहुकूम मंजूर झाला तेव्हा संपूर्ण देशात 1482 नागरी सहकारी बँका होत्या. त्यापैकी 58 मल्टीस्टेट आहेत

सहकारी बँकांची सद्यस्थिती

भारतात नागरी सहकारी बँकांची संख्या 1544 आहे. त्यात एकट्या महाराष्ट्रात 497 बँका आहेत नागरी सहकारी बँकांमध्ये ठेवी ची किंमत 4 लाख 85 हजार कोटी इतकी आहे .यापैकी महाराष्ट्राचा वाटा 2 लाख 93 हजार कोटी रुपये इतका आहे.देशभरात एकूण 53 शेड्युल नागरी सहकारी बँका तर 35 राज्य सहकारी बँका आहेत. रिझर्व बँकेने सध्या देशातील 44 नागरी सहकारी बँकांवर निर्बंध घातलेले असून 9 बँकावर एप्रिल 2020 मध्ये कारवाईही केलेली आहे. पणजी (गोवा) येथे मुख्यालय असणाऱ्या 'म्हापसा सहकारी बँकेवर' 17 एप्रिल 2020 रोजी तर ठाणे येथील 'सीकेपी सहकारी बँकेवर' 2 मे ,2020 रोजी रिझर्व्ह बँकेने परवाना रद्द करून बरखास्तीची कारवाई केली आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील इतर तीन सहकारी बँकावरची बंधने वाढविण्यात आली आहेत. मुंबईतील 'कपोल सहकारी बँक मल्टीस्टेट आहे या बँकेवर 30 मार्च 2017 पासून निर्बंध घालून रिझर्व बँकेचा एक वरिष्ठ अधिकारी प्रशासक म्हणून नेमला होता. तरीही बँक सावरली नाही म्हणून बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक घ्यावी लागली या निवडून आलेल्या संचालक मंडळाला ही बँक सावरता न आल्याने हे निर्बंध सहा-सहा महिन्यांनी वाढवत आता 30 एप्रिल, 2022 पर्यंत वाढविण्यात आले आहे|. उस्मानाबाद येथील 'वसंतदादा नागरी सहकारी बँकेवर' 13 नोव्हेंबर, 2017 पासून असलेले निर्बंध 30 सप्टेंबर, 2020 पर्यंत वाढविण्यात आले होते, पुढे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या सहकारी बँकेची मान्यता 11 जानेवारी, 2021 रोजी रद्द केली.

संचालक मंडळाच्या पात्रतेचे निकष ही आता रिझर्व बँक निश्चित करणार आहे. एखाद्या संचालकाला निवडणूक लढविण्यासाठी त्यांच्या पात्रतेचे निकष आरबीआय निश्चित करेल, तसेच नागरी बँकांना भाग भांडवल उभारणीसाठी यापूर्वी सभासदांच्या शेअर्स मार्फत भांडवलाची उभारणी करण्यात येत होती परंतु आता नागरी सहकारी बँकांना भाग भांडवल उभारणीसाठी खुल्या बाजारातून शेअर्स, बॉण्ड आणि कर्जरोखे विक्रीतून भागभांडवल उभारता येणार आहे. त्यामुळे नागरी सहकारी बँकांना आता खासगी व्यापारी बँकांचे स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता आहे. नागरी सहकारी बँकांचे सहकाराचे 'एक सभासद एक मत' हे तत्व ही गुंडाळले जाणार आहे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी 1 फेब्रुवारी 2020 रोजी लोकसभेत पुढे अर्थसंकल्प ठेवताना हे सूचित केले होते ही सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्ण नियंत्रणाखाली आणले जाणार आहे 5 फेब्रुवारी रोजी मंत्रिमंडळाने 'बँकिंग रेगुलेशन अॅक्ट अमेंडमेंट' मान्य केल्यानंतर ते लोकसभेपुढे मांडले गेले. 24 जून रोजी च्या बैठकीत या निर्णयास मान्यता मिळून तो राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर त्वरित म्हणजे 26 जून 2020 रोजी वटहुकूम काढण्यात येऊन नागरी सहकारी बँकेचे बहुतांश नियंत्रण रिझर्व बँकेकडे देण्यात आले आहे.

आव्हाने व भविष्य

येणाऱ्या काळात रिझर्व बँक वरील सर्व बाबीकडे तसे पाहते आणि वटहुकुमाने मिळालेले अधिकार कसे कसे वापरते ते पहावे लागेल. नव्या अध्यादेशामुळे रिझर्व बँकेला जादा अधिकार प्राप्त होणार आहेत रिझर्व बँकेला एखाद्या संचालक मंडळावर किंवा संचालकावर थेट कारवाई करता येईल यापूर्वी रिझर्व बँकेला सहकार आयुक्तांमार्फत अहवाल मागून कारवाई करता येत होती परंतु आता राज्यातील सहकारी बँका बाबत सहकार आयुक्तांशी केवळ सल्लामसलत होणार आहे. छोट्या-छोट्या नागरी सहकारी बँकांना आपल्या कारभारात अधिक व्यावसायिकता आणणे आवश्यक ठरणार आहे कारण असे न केल्यास न झाल्यास अशा बँकांचे सक्तीने विलीनीकरण अन्य मोठ्या सहकारी बँकेत करण्याचे अधिकार रिझर्व बँकेला या वटहुकूमामुळे मिळाले आहेत. ठेवीदारांच्या ठेवी या सर्वातून अधिक सुरक्षित होतील हे जरी वास्तव असले तरीही नागरी बँकांची देशातील संख्या तीन आकडी होण्याची शक्यता जाणवत आहे राज्यांच्या अगर भारत सरकारच्या सहकार विभागातील अज्ञानी अधिकाऱ्यांचे अधिकार रिझर्व बँकेसारख्या तज्ञ व मध्यवर्ती नियंत्रकाकडे आले ही आशादायक घटना आहे मात्र सहकारी अस्तित्व कायम राहिले पाहिजे तरच मध्यम व तळागाळाच्या गरजूंना आपल्या गरजा सुलभ रीतीने भागविता येतील.

रिझर्व बँकेच्या नियंत्रणामुळे फायदे तोटे

1)नागरी सहकारी आणि मल्टीस्टेट बँकांमध्ये आर्थिक शिस्त येईल.

2) ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहण्यासाठी मदत होणार.

3) दोषी संचालकावर आरबीआयकडून थेट कारवाई.

4) राज्यातील सहकार आयुक्त आणि केंद्रीय सहकार आयुक्तांच्या अधिकारावर मर्यादा.

5) सहकारी बँकिंग क्षेत्राची तत्वे संपुष्टात येण्याची भीती.

6) असुरक्षित कर्ज वाटपावर प्रतिबंध.

निष्कर्ष:

देशातील नागरी सहकारी बँका वर रिझर्व बँकेचे नियंत्रण पूर्वीपासूनच आहे परंतु केंद्र सरकारच्या अध्यादेशामुळे रिझर्व बँकेला जादा अधिकार प्राप्त होणार आहेत त्यामुळे सहकारी बँकांमध्ये शिष्य होऊन ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहतील परंतु सहकारी बँकिंग क्षेत्राला व्यापारी बँकांचे स्वरूप प्राप्त होऊन सहकारी बँकिंग क्षेत्र संपुष्टात येण्याची शक्यता आहे त्यामुळे रिझर्व बँकेचे सहकारी बँकावर नियंत्रण असले पाहिजे परंतु सहकाराची तत्वे अबाधित राखूनच.

संदर्भ ग्रंथ

1)भोसले व काटे (2002) सहकाराचा विकास, चैतन्य प्रकाशन, नाशिक.

2) सुधाकर मानकर (2006) सहकार, निराली प्रकाशन, पुणे.

3) महाराष्ट्र टाइम्स 2 ऑगस्ट, 2020.

4) इ. सकाळ 18 मार्च, 2022.

Chief Editor
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email- rbhole1965@gmail.com
Visit-www.jrdrvb.com

Address
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102